
शब्द
# रुची

मार्च २०१७
मूल्य ६० रुपये
पृष्ठे ७२

## महिलादिन विशेषांक

अतिथी संपादक
डॉ. सुलभा कोरे





पुरुषोत्तम गावंडे लिखित 'डोळियांचा डोळा' या पुस्तक प्रकाशनसमयी सुदेश हिंगलासपूरकर, दीपक करंजीकर, डॉ. रवींद्र कोल्हे, लेखक पुरुषोत्तम गावंडे, रत्नाकरी मतकरी आणि संपदा जोगळेकर कुलकर्णी.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन – अस्मिता पांडे























डॉ. प्रकाश लोथे लिखित 'धर्मधुरीण' या कादंबरीचे पुणे येथे प्रकाशन झाले. त्यावेळी सुदेश हिंगलासपूरकर, सुमित्रा भावे, डॉ. मोहन आगाशे, लेखक डॉ. प्रकाश लोथे, रंगनाथ पठारे, दिनकर गांगल आणि मंदार जोगळेकर

डॉ. प्रकाश लोथे लिखित 'धर्मधुरीण' या कादंबरीचे नागपूर येथे प्रकाशन झाले. त्यावेळी सुदेश हिंगलासपूरकर डॉ. रवींद्र शोभणे लेखक डॉ. प्रकाश लोथे डॉ. श्रीपाद जोशी आणि डॉ. अलका लोथे











सुधीर कारखानीस लिखित 'प्रतिबिंब' या पुस्तकाच्या प्रकाशनसमयी धनश्री धारप, लेखक सुधीर कारखानीस, डॉ. जब्बार पटेल आणि अमलेश कणेकर

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

महिलादिन विशेषांक

४२ ||ग्रंथाली||

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

मार्च २०१७, वर्ष तिसरे
अंक अकरावा, मूल्य ६० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**
अतिथी संपादक : **डॉ. सुलभा कोरे**
मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप / मधु भोसले**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी २५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, तळमजला,
यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४२१६०५०, २४३०६६२४
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**ऑफिस वेळ : सकाळी ११ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

अनुक्रम

८ अभिव्यक्ती, व्यक्ती आणि 'ती'
**संजय पवार**

११ ...प्रवाही अस
**निलकांती पाटेकर**

१६ गर्भपात कायदा आणि वास्तव
**डॉ. लतिका भानुशाली**

२० जे बोलत नाहीत, लिहीत नाहीत, त्यांचा आवाज...
**मल्लिका अमरशेख**

२४ गोव्यातील स्त्री, तिचा गोव्यातील वावर
**दिलीप बोरकर**

३० स्त्री काव्याची स्पंदने...
**डॉ. नीलिमा गुंडी**

३६ त्रिपुरी पौर्णिमेची ज्योत
**संपदा जोगळेकर-कुलकर्णी**

३८ दलित स्त्रियांची अभिव्यक्ती
**प्रा. आशालता कांबळे**

४५ योनिभयग्रस्त शोकांतिका...
**संजीव खांडेकर**

५२ आयुष्य उधळायचे की जोजवायचे?
**चित्रा फडके**

५५ स्त्रीचा राजकीय प्रवास : उपस्थितीपासून सहभागाकडे
**राजश्री कुलकर्णी**

५७ अमेरिकेतलं महिला राजकारण
**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

६१ **ग्रंथाली पुस्तक प्रकाशन वृत्तांत**

६४ ग्रंथपाने – **राजहंस प्रकाशन, साधना प्रकाशन, रोहन प्रकाशन**

६७ ग्रंथाली ग्रंथपाने – **चांगदेव काळे**



डॉ. सुलभा कोरे

## संपादकीय...

'बाई' जन्माला येते म्हणजे नेमकं काय होतं? X व Y गुणसूत्रे एकत्र येऊन एक नवीन जीव जन्माला येतो, एक नवीन संकल्पना जन्म घेते? नेमकं काय होत असावं, जेव्हा बाई जन्माला येते? स्त्री-पुरुष समागमाची सार्थक फलश्रुती म्हणजे योग्य वेळेत मातेच्या गर्भात योग्य वाढ होऊन नवीन जीव जन्माला येतो. तो जीव समान गुणसूत्रे असली की मुलगा असतो नाहीतर मग मुलगी. याचाच अर्थ जन्माला येण्यापर्यंतची ही प्रक्रिया मुलगा किंवा मुलगी, दोघांच्याही बाबतीत सारखीच असते.

गावची आजी आपल्या गावंढळ टोनमध्ये म्हणायची, ''थोडीशी माती कमी पडली, नाहीतर मुलगाच झाला असता.'' काहीतरी 'कमी' पडणं म्हणजे मुलीचा जन्म घेणं, ही पूर्वापार चालत आलेली धारणा. आपला समाजपुरुष का बरं मुलीच्या जन्म घेण्याला योग्य मानत नाही? तिचा जन्म, एक जबाबदारी ओझं म्हणून का येतो? खरंच मुलीचा जन्म ओझं म्हणूनच येत असावा अन्यथा आपल्याच देशात काही ठिकाणी अजूनही गर्भ जर मुलीचा असेल तर त्याला गर्भातच संपविण्याचे प्रयत्न केले जातात अन् या प्रयत्नांतूनही जर तिने जन्म घेतला तर तिला कधी पाण्यात बुडवून, तिच्या गळ्याला नख लावून, गळा दाबून मारलं जातं. या भयंकर प्रकारांतूनही जर 'ती' वाचलीच तर मग ती कुपोषणाचा, उपेक्षेचा बळी ठरू शकते किंवा अगोदरच घरात मुलगा असेल तर मग भेदभावाचा बळी ठरू शकते. तिला उरलंसुरलं अन्न देणे, घरकामाला जुंपणं या गोष्टी सर्रास होतात. वयानुसार तिची बंधनंही वाढू लागतात. गेला बाजार 'सात'च्या आत घरात हा प्रकार अगदी बाळबोध झाला असला तरीही तिची घरात यायची वेळ ठरलेली असते. शाळा, कॉलेज, ऑफिसच्या वेळेनुसार त्यांचं ठरणं बदलतं, एवढंच! ती तारुण्यात आली की बंधनाचे वेगळे प्रकार तिच्या वाट्याला येतात. लग्न हा त्यातला एक महत्त्वाचा प्रकार! या लग्नांमुळे उद्‌भवलेले अनेक 'हुंडाबळी' या समाजाने पचविले आहेत. किंबहुना 'हुंडा' घेण्याची, जुनी प्रथा आहे, असं सांगून त्याचं समर्थनही केलं जातं. विवाहबंधनांतून स्त्री मुलं जन्माला घालते पण आतापर्यंतचे अनुभव तिला हेच सांगत असतात की तिला मुलाला जन्म द्यायचाय, कारण तो तिच्या पतीच्या वंशाचा दिवा असेल, तिला मुलगी नकोच असते अन् मग अशा तऱ्हेनं इतिहासाची पुनरावृत्ती होते.

इतिहास... इतिहासाची पुनरावृत्ती इथंच येऊन का होतेय? इतिहास हेही सांगतो की जेव्हा समाज अस्तित्वात नव्हता, जेव्हा पाषाणयुग होतं, जेव्हा आदिमानव टोळ्या बनवून जंगलात-डोंगरदऱ्यांत फिरायचा, गुहेत-कंदरात वास करायचा, कंदमुळे किंवा शिकार करून कच्च मांस खायचा, त्यावेळी त्याच्या टोळीची 'मुख्य' - 'स्त्री' असायची. टोळीवर तिचं राज्य, अधिकार असायचा. शिकार करताना पहिला वार तिचा असायचा अन् शिकारीतील महत्त्वाचा हिस्साही तिचाच असायचा. नात्यागोत्यांच्या, संबंधांचा सुतराम संबंध नसायचा. स्त्रीचा अधिकार टोळीतील पुरुषांवरही चालायचा. नर अन् मादी एवढीच ओळख! त्यामुळे भाऊ, बाप, पती, मुलगा असला काहीही प्रकार नसायचा. जो पुरुष तिला आवडायचा, तो तिचा असायचा. ती टोळी तिच्या नावाने ओळखली जायची. कौमार्य, मातृत्व, योनीशुचिता, या सर्वच प्रकारांपासून स्त्रीच नव्हे पण संपूर्ण समाज अनभिज्ञ होता. ही मातृसत्ताक पद्धती जगात फार पूर्वीपासून अस्तित्वात होती.

पण मग एका टोळीच्या अनेक टोळ्या झाल्या, एकत्र येऊन राहू लागल्या. शिकारीबरोबरच जमीन साफसूफ करून शेती करणं सुरू झालं. स्त्रीने अनेक शोध लावले पण शेतीसाठी पुरुषानं नांगराचा शोध लावला अन् त्याने भूमीला व स्त्रीला एकाच नियमात बांधून टाकलं. घराची, कुटुंबाची जबाबदारी स्त्रीवर दिली. युद्धे, आक्रमणे पुरुषाकडे आली. 'स्त्री' घरापुरतीच मर्यादित झाली. पुरुषाने भूमी व स्त्रीचं शोषण एकत्रच करायला सुरुवात केली, तेही फारसा गाजावाजा न करता. कारण ते सारं काही त्याला सहजपणे मिळत गेलं.

'स्त्री'चा त्यानंतरचा प्रवास तसा सर्वश्रुत आहे. तिचं होणारं दमन, तिची सहनशीलता... किती काळ लोटला. हे रहाटगाडगं असंच चालू राहिलं असतं पण स्वत:वर होणाऱ्या अन्यायाची जाणीव स्त्रीला हळूहळू होऊ लागली, आपले हक्क, अधिकार म्हणजे नेमकं काय, हेही तिला कळू लागलं. उशीर झाला होता पण जागरूकताही तेवढीच महत्त्वाची होती.

दुसरं महायुद्ध, औद्योगिक क्रांती, शिक्षणामुळे आलेली जागरूकता, जाणीव, अनेक टप्पे आले अन् पार पडले. या प्रत्येक टप्प्यावर आपलं अस्तित्व जाणवून देण्यासाठी, ओळख पटविण्यासाठी स्त्री झटत होती. युरोपातील स्त्रीला ते मिळालं, तिनं ते मिळविलं पण जगभरातील इतर स्त्रियांसाठी ते तेवढं सहज व सोपं नव्हतं. मग खऱ्या अर्थानं संघर्षाला सुरुवात

झाली. कायदे, नियम, आंदोलने, पुरोगामी पुरुषांचंही पाठबळ, संघर्ष संपत नव्हता पण बदल मात्र हळूहळू होऊ लागले. अफगाणिस्तानात अजूनही स्त्रीशिक्षण नाही. इराण-इराकची स्त्री अजूनही आपल्या अधिकारांसाठी लढतेय, असे काही मोजके अपवाद वगळता स्त्री, शिक्षण व आधुनिकतेची सोबत घेऊन वाटचाल करू लागली. स्त्री अन् पुरुष, ही समाजरथाची जर दोन चाकं असतील अन् ही चाकं जर समाजपातळीवर वाटचाल करतील तरच समाजाची प्रगती अभिप्रेत आहे. पण आजही सर्वच क्षेत्रात आपल्या कर्तृत्वानं, प्रतिभेनं, कष्टानं आपला ठसा उमटविणाऱ्या स्त्रीला खरंच का एक व्यक्ती, एक माणूस म्हणून स्वत:ची ओळख मिळालीय? तिला अभिप्रेत असलेलं तिच्या जोडीदारसारखे स्वातंत्र्य, स्वावलंबन तिला मिळालंय? हे असेच काही ज्वलंत व मोजके प्रश्न आहेत, ज्यांची ठोस उत्तरे आपल्याकडे नाहीत. अमेरिकेसारख्या प्रगत देशातही हा प्रकार तसा नवा नाही.

आरक्षण मिळालं, स्त्रियांसाठी राखीव जागा आल्या, ग्रामपंचायतींतून 'स्त्री सरपंच' दिसू लागल्या. ('सूत्रधार' कोण ते विचारू नका) स्त्रीची भरारी उंच उंच जाऊ लागली अन् मग एक वेगळा मुद्दा परत ऐरणीवर आला.''
...आता हिला आणखी हवं तरी काय?''

राजकारण, समाजकारण, खेळ, कला, विज्ञान, संस्कृती, परंपरा, सेना, पत्रकारिता एवढंच नव्हे तर इतर कुठल्याही क्षेत्रात तिचा वावर सहजपणे होऊ लागला तेव्हा परत तोच प्रश्न डोकं वर काढू लागला की एवढं सगळं असूनही तिला आणखी काय हवंय?

प्रश्न वाजवी आहे. सारं काही आहे पण अजूनही कलकत्त्याचा 'सोनागाछी'. मुंबईचा 'कामाठीपुरा' यासारखे एरिया दिवसरात्र गजबजत असतात. अजूनही देवाच्या सेवेसाठी वाहिलेली 'देवदासी' साऱ्या पंचक्रोशीची बायको(?) असते. अजूनही काही घरांच्या भिंती नवऱ्याने बायकोवर केलेल्या बलात्काराची ग्वाही देतात. अजूनही स्त्रीचं यश तिच्या लैंगिकतेमुळे तिला मिळालं, हा किंतु नेहमीच लसलसत राहतो. अजूनही नऊ महिने आपल्या रक्तामांसाचे शिंपण घालून जन्म दिलेल्या मुलामुलीच्या नावामागे बापाचेच नाव लागते. अजूनही अनेक निर्भया समाजपुरुषाच्या वासनेच्या बळी ठरत असतात. अजूनही भ्रूणहत्या होतात. बलात्कारही होतात. अजूनही बाई दारूड्या नवऱ्याचा मार खात, त्याच्याबरोबर राहतच असते. अजूनही ती नोकरी, घर, नवरा, मुलं सांभाळायची तारेवरची कसरत करीतच असते. हे सारं करीत असली तरी स्त्री नेहमीच आपल्या घराशी, मुलांशी बांधलेली राहिली. मानसिक, शारीरिक, तडजोडी करीतच राहिली. अजूनही... या 'अजूनही'च्या पल्याड आपणही कधी तसं पाहिलं नाही. अन् स्त्रीदेहाच्या पलीकडचं स्त्रीचं 'स्त्रीत्व' ही पाहिलं नाही.

समाजपुरुषानं म्हटलं,

*'ती' म्हणजे ईश्वराचं देखणं स्वप्न.*
*ती म्हणजे नियंत्याचं सर्वश्रेष्ठ सृजन*
*आणि ती सृजन करते*
*नवविश्वाचं, नवसृष्टीचं*
*तुम्ही आव्हानाच्या कड्याकपारींशी*
*अन् तिचं प्रोत्साहित, संजीवनी देणारं स्मित*
*अनवट, वेड्यावाकड्या रस्त्यांवरून तुमची वाटचाल*
*अन् हातात तिचा आश्वासक हात*
*तुम्ही थकता, ती घाम पुसते*
*तुम्ही रडता, ती डोळे टिपते*
*तुम्ही आनंदात, ती दुरून न्याहाळते*
*तुमचा विजय, तिचे आनंदाश्रू*
*ती रेशीम लडी अन् काथ्याची दोरी*
*ती नीरगाठ, सूरगाठ अन् दर्भगाठही*
*ती माता, भगिनी, भार्या, कन्या, सखी अन् प्रेयसी*
*ती तुमच्या, आमच्या अन् माझ्याही घरात...*
*ती वंचिता, संचिता, ती यशस्विनी, मानिनी*
*ती असते आयुष्याच्या प्रत्येक वळणावर*
*ती भेटते जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर!*

तर अशा अनेक नात्यांनी, रूपांनी स्त्री आपल्यासमोर येते. अनेक उपाधी आपण तिला दिल्या. तिचं उदात्तीकरणही केलं. देवी, शक्ती म्हणून तिची पूजाही केली. गेली अनेक शतके तिला भ्रमात ठेवलं गेलं. प्रजननात स्त्री फक्त गर्भधारणेचं काम करते अन् ते तिला पुरुष वीर्यामुळेच शक्य होतं. बलात्कारात पुरुषाचा गुन्हा असला तरीही स्त्री अपवित्र होते किंवा मुलींनी-स्त्रियांनी उत्तान किंवा उत्तेजक कपडे घालू नयेत इ. गोष्टी सहजपणे सांगताना आपण ही गोष्ट सहजपणे विसरून जातो की तीन किंवा सहा महिन्याच्या बालिकेवर किंवा ६० वर्षे वयाच्या वृद्धेवर होणारे अमानुष बलात्कार कुठल्या प्रेरणेतून आलेले असतात? परंपरा, रीतिरिवाज, आर्थिक अडचणी, पळवून आणून विकलेल्या, नवऱ्याने टाकून दिलेल्या अशा अनेक बायका वेश्या व्यवसायात येतात. पुरुषाला लैंगिक सुख देतात पण त्या पुरुषापासून जन्माला आलेल्या मुलांचा तो पिता मात्र नसतो पण बाई मात्र त्या मुलांची आई नक्कीच असते.

खरंच बाई 'आई' असते अन् बाई 'नदी'ही असते. एखादी नदी जशी आपल्या उगमस्थानापासून अनेक उतार चढावांना, डोंगरदऱ्यांना पार करत वाहात असते, तद्वत बाई ही आपल्या जन्मापासूनच अनेक अडचणींचा, समस्यांचा सामना करीत चालत असते. नदी जशी आपल्याबरोबर जीवनदायी 'जल' अन् काठांवर 'सुपीक जमीन' निर्माण करीत धावत असते. बाई ही तशीच असते एखाद्या नदीसारखी! ती समाजाचं निर्माल्य आपल्याबरोबर घेते, घाण कचरा घेते अन् वाहत राहते. 'नवनिर्माण', 'सृजन' तिचं जीवनध्येय असतं अन् या

ध्येयपूर्तीसाठी ती अनेक डोंगरदऱ्यांना, अडचणींना पार करत चालत असते, वळणावर हवं तसं वळण घेत, वळत ती काळाबरोबर धावत असते. काळ बदलतो, माणसं बदलतात, समाज बदलतो, समाजाच्या मान्यता, परंपराही बदलतात. या सर्व स्थित्यंतरात फक्त बाईच नदी म्हणून वाहत राहिली, वाहत राहते.

'बाई'ची ही लढाई सुरूच असते. या जगात जन्म घेण्यापूर्वीपासून अन् या जगातून जाईपर्यंत. या सर्व 'योद्धा स्त्रियां'च्या अभिव्यक्तीचा, व्यक्त होण्याचा धांडोळा 'शब्द रुची'च्या या विशेषांकातून घेण्याचा हा एक अल्पसा प्रयत्न! स्त्रीत्वाचे, सर्व कंगोरे यात समाविष्ट झालेत. असा दंभ नाही. पण अनेक नव्या-जुन्या, प्रथितयश व वेगवेगळ्या क्षेत्रात आपापल्या प्रतिभेला व अभिव्यक्तीला आजमावणाऱ्या मित्र-मैत्रिणींनी त्यांच्या लिखाणानं हा अंक समृद्ध केलाय, त्यांचे अनेक आभार! त्यांनी पुढेही जेव्हा कधी गरज भासेल, तेव्हा अशीच साथ द्यावी, एवढंच मी मैत्रीच्या हक्काने सांगू इच्छिते.

कळत्या वयापासून 'ग्रंथाली'शी असलेलं 'मैत्र' शब्द रुचीच्या अतिथी संपादनामुळे पुन्हा नव्यानं अनुभवता आलं. या अंकातील सर्वच लेखक-लेखिका आपापल्या क्षेत्रातील नावाजलेले व प्रसिद्ध आहेत. प्रत्येकाची वाटचाल व अर्धविश्व व्यापणाऱ्या स्त्रीत्वाची अनुभूती इथं येते तेव्हा ती सृजनांचं एक वेगळं लेणं लेवून येते. स्त्रीत्वाचे सगळेच पैलू इथे आलेत, असं मी म्हणणार नाही, ते शक्यही नाही पण अंकातील प्रत्येक लेखक-कलाकाराची अभिव्यक्ती व्यक्तीबरोबरच समष्टीला जोडणारी आहे अन् मोकळीक मिळाली की ती उत्स्फूर्त व प्रामाणिकपणे समोर येते. ही मोकळीक, हे स्वातंत्र्य डॉ. वीणा सानेकर व सुदेश हिंगलासपूरकर या मित्रद्वयानं दिलं. योगिता मोरेचं सहकार्य व उत्साही सोबत आपलेपणाची जोडीला धनश्री धारप व किरण येले हे सुहृद! सतीश भावसारांचं मुखपृष्ठ सम्यक व सार्थक!

स्त्रीत्वाचे, स्त्रीत्वाच्या अभिव्यक्तीचे हे वेगवेगळे कंगोरे कुठे कुठे टोकदारही झाले असावेत पण ती अभिव्यक्तीची गरज असते, असं मला वाटतं अन् त्या गरजेपोटीच ते आले असावेत, टोकदार झाले असावेत.

अर्धविश्व व्यापलेल्या, व्यापणाऱ्या या स्त्रीत्वाला हा आमचा एक प्रामाणिक व सच्चा सलाम! तो तुम्हालाही भावेल, अशी आशा...


**– डॉ. सुलभा कोरे**


भ्रमणध्वनी : ९८२०४६८९१९

kore.sulabha@gmail.com


आंबेडकरी साहित्याचे व्यासंगी अभ्यासक आणि संशोधक
डॉ. कृष्णा किरवले तसेच लोकसाहित्य व
सत्यशोधक चळवळीचे लेखक आणि कार्यकर्ते
प्राचार्य गजमल माळी यांना भावपूर्ण आंदराजली!


ग्रंथाली

**तरीही**
**शेषप्रश्न**



**छाया दातार**

**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**

छाया दातार यांचा एक अभ्यासक आणि एक कार्यकर्त्या अशा दोन्ही भूमिकांमधून स्त्रियांच्या चळवळीत सातत्याने आणि महत्त्वपूर्ण सहभाग राहिला आहे. त्यांच्याच शब्दात ही एक डॉक्यूनॉव्हेल आहे. त्यातला काही भाग आत्मचरित्रासारखा वाटला तरीही लेखिकेचे हे आत्मचरित्र नाही. त्याला स्त्री-चळवळीच्या प्रवाहाचे चरित्र म्हणता येईल. त्यात चळवळीचा केवळ दस्तावेज नाही तर त्याच्या बरोबरीने चळवळीतल्या अनेक चर्चा, मतभेद आणि जिवंत अनुभवाची चित्रे आहेत. केरळात अनेकदा प्रवास करताना पाण्याच्या प्रवाहाची सोबत घेत आपण काठाकाठाने प्रवास करतो. तसा हे लेखन वाचताना अनुभव येतो. पाण्याचे प्रवाहीपण, त्यावरचे तरंग, भोवरे आणि भवतालाचे प्रतिबिंब हे सारे या प्रवाहचरित्रातून भेटत राहते.

**– विद्या बाळ**

## साधना प्रकाशनाची
# दोन नवी पुस्तके

**जमीला जावद**
आणि
इतर कथा
**हमीद दलवाई**




इ.स.१९५२ ते ६६ या काळात
विविध नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या या कथा
प्रथमच पुस्तकरूपाने आल्या आहेत.
मागील ५० वर्षे पडद्याआड राहिलेल्या या कथांच्या
कलात्मक मूल्यांबाबत साहित्यक्षेत्रातील जाणकारच
अधिकारवाणीने सांगू शकतील.
मात्र या कथा कमालीच्या वाचनीय आहेत आणि
आजच्या काळातील कोणत्याही प्रकारच्या वाचकमनाचा
ठाव घेणाऱ्या आहेत, हे निश्चित!

अनुक्रम

दहा रुपयांची नोट । ब्राह्मणांचा देव । आहमद । धर्म ।
आमच्या घरची गोष्ट । कोल्हा आणि कोकरू । नर
एका अव्यवहारी अपूर्णांकाची गोष्ट । अशीच एक झोपडी ।
जमीला जावद

पृष्ठे : १०८, किंमत : १०० रुपये
**सवलतीत ८० रुपये.** (टपाल खर्च वेगळा)
५ किंवा अधिक प्रती घेतल्यास ४० टक्के सवलतीत


---

पूर्व पाकिस्तानच्या (आताचा बांगलादेश) सीमेजवळील
भारतीय प्रदेशांतील सामान्य लोकांशी, कार्यकर्त्यांशी,
बुद्धिवंतांशी संवाद साधून केलेली ही लेखमाला
१९६८ मध्ये आचार्य अत्रे संपादक होते त्या 'मराठा' दैनिकात
क्रमश: प्रसिद्ध झाली. ती संपूर्ण लेखमाला
हमीद दलवाईंच्या मृत्यूनंतर १९८२ मध्ये
श्रीविद्या प्रकाशनाकडून पुस्तकरूपाने आली.
त्यानंतर ३५ वर्षांनी आलेली ही दुसरी आवृत्ती.

अनुक्रम

एक अस्सल भारतीय । ह्या विलक्षण विसंगती! ।
बदललेले वातावरण । दोन अजब मुस्लिम ।
ग्रँड हॉटेलातील कार्यक्रम । हिंदू जातीयवादावर कडाडून हल्ला ।
अजब आदरातिथ्याचा अनुभव । पूर्व पाकच्या सीमेवर ।
समंजस मुस्लिम स्त्रिया । हमदी बे यांचे विचित्र विचार ।
मानसिक तणाव

पृष्ठे : ६८, किंमत : ५० रुपये
**सवलतीत ४० रुपये** (टपाल खर्च वेगळा)
५ किंवा अधिक प्रती घेतल्यास ४० टक्के सवलतीत





**इस्लामचे भारतीय चित्र**
**हमीद दलवाई**

संपर्क : साधना प्रकाशन,
४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०, फोन : ०२०-२४४५९६३५

महिलादिन विशेषांक

लेखक, नाटककार, दिग्दर्शक अन् आपल्या स्त्रीविषयक रोखठोक व स्वतंत्र विचारांनी ओळखले जाणारे हे एक नाव. लेखकाच्या विचारांचा व स्त्रीविषयक जाणिवांच्या वाटचालीचा त्यांनीच घेतलेला हा लेखाजोखा...

संजय पवार



# अभिव्यक्ती, व्यक्ती आणि 'ती'

**स्त्री** आणि तिची अभिव्यक्ती याबर जगभरातच चर्चा चालू असतात. साहित्य चर्चा, विद्यापीठीय चर्चा, वृत्तपत्रांच्या महिला पुरवण्या इथपासून साहित्यविषयक नियत-अनियतकालिके, सामाजिक संस्था, समाज अभ्यासक, विविध स्त्री संघटना, अभ्यासक यातून ही चर्चा सुरू झाल्यालाही जवळपास पन्नास वर्षांचा काळ लोटलाय आणि ढोबळमानाने त्याचे निष्कर्ष असे की स्त्री 'आजही' (हा 'आज' पन्नास वर्षांपासून 'आज'पर्यंतचा) तिला हवी तशी, हवी तितकी आणि हवी तिथे व्यक्त अभिव्यक्त होऊ शकत नाही.

काळ 'ग्लोबलायझेशनचा' असला आणि 'थिंक ग्लोबल अॅक्ट लोकल' असे नवे सुविचार जोरात असले, तरी या लेखापुरता आपला देश एवढाच विचार करून बघूया.

भारत संविधान, लोकशाही, विविधतेतून एकता, आदि परिभाषेतून देशाची पार्श्वभूमी कथन करणारा परिच्छेद बगळून आपण थेट मुद्याला भिडूया. पण त्याचवेळी या प्रश्नाच्या (म्हणजे स्त्री अभिव्यक्ती) मुळाशी असलेली 'जातिव्यवस्था' बगळून आपण ही चर्चाच करू शकणार नाही कारण जातिव्यवस्थेने 'स्त्री' ही वेगळी जात करून, तिला अस्पृश्य आणि शूद्रांसारखे सगळे मूलभूत अधिकारच नाकारले होते. उच्च जातीसह सर्व जातींमधील 'स्त्री' ही ढोल, अशिक्षित, पशू, पिडित यांच्यासारखी 'बडविण्याच्या' योग्यतेचीच आहे, असं जात व धर्मसंस्थेने लिखित, मौखिक आणि जैविक परंपरेतून इतक्या ठाशीवपणे ठसवलंय की लढे, चळवळी, बदल, परिवर्तन, कायदे, न्याय, शिक्षा यांच्या सक्रीय हस्तक्षेपानंतरही 'स्त्री'विषयक जातीय/धार्मिक दृष्टिकोन बदलला नाही उलट त्याला वेगवेगळे आयाम देत, ती पुन्हा कशी 'नियमात' बसवता येईल याचे प्रयत्न सतत चालू आहेत. अगदी डीएनए पण याच मानसिकतेतून तयार होतो.

त्यामुळे भारतीय पार्श्वभूमीवर या प्रश्नाकडे बघताना जातीचा दगड ओलांडून पुढे जाणे अवघड आहे. साहजिकच स्त्री अभिव्यक्ती नियंत्रित करणाऱ्या अनेक घटकातला प्रमुख घटक जात हा आहे. (तसा जात व धर्म हा घटक एकूणच अभिव्यक्त होणाऱ्या कुणालाही स्त्री/पुरुष/किन्नर नियंत्रित करत असतोच)

स्त्री लिहू लागली, बोलू लागली ती कशी? या इतिहासातही जाण्याचं कारण नाही, कारण तो आता जवळपास तोंडपाठ झालाय. एवढंच नव्हे तर स्त्री लिहू लागली, बोलू लागली, मार खाऊ लागली, लक्ष्य केली जाऊ लागली आणि बहिष्कृतही केली जाऊ लागली. म्हणजे प्रवास पुन्हा शून्याकडून शून्याकडे अशीच स्थिती आहे सध्या.

स्त्रीला शिक्षणाचा अधिकार मिळाल्यानंतर 'शाळा' शिकण्यासोबत स्वत:ला व्यक्त होणं हेही सुरू झालं. शालेय पातळीवर निबंध लेखन (सावित्रीबाई फुलेंच्या शाळेतील मुलींचे निबंध लेखन) गायन, नृत्य, अभिनय, चित्रकला, अशा विविध सृजनशील माध्यमातून ती व्यक्त होऊ लागली आणि घरकाम, स्वयंपाक, शिवणकाम, भरतकाम, शेतीकाम या व्यतिरिक्त ती 'कलेच्या' अंगाने जाणारी अभिव्यक्ती करू लागली. इथेही सुरुवातीला जातीचा अडसर होता. मात्र लबाड पुरुषांनी, धर्म व जातीय संस्थांनी स्वत:च्या करमणुकीसाठी आणि लैंगिक विरेचनासाठी कुलीन 'स्त्री'ला सुरक्षित घरात ठेवत, अकुलीन, हीन, शूद्र जातीतील स्त्रीला मात्र अभिव्यक्त होण्याची मुभा दिली. पण ही मुभा देताना ही कला व कलावंत हे भद्र समाजाच्या दृष्टीने अभद्र ठरवून त्यांना गावकुसाबाहेर ठेवून त्यांची भौगोलिक सीमा ही अधोरेखित केली. यातूनच जन्माला आलेली तवायफ, गणिका, तमासगिरीण आणि बावन्नखणीसारखे जन्माला आलेले त्यावेळचे

सांस्कृतिक SEZ हे त्याचे ऐतिहासिक पुरावे आहेत.

तवायफ, तमासगिरिणीला पर्याय म्हणून जे बालगंधर्व जन्माला आले आणि रंगभूमीचा सुवर्णकाळ म्हणून नोंदवले गेले त्या बालगंधर्वांनी उत्तरेतल्या तवायफांची गाणी चाली चोरून इकडे नाट्यपदे 'अजरामर' केली! म्हणजे स्त्री अभिव्यक्तीच्या पहिल्या काळातही तिच्या सृजनावर पुरुषांनी 'डल्ला' मारला, तोही स्त्री वेश पांघरून! हे म्हणजे त्या इंद्रदेवाने नवऱ्याचे रूप घेऊन आवडती विवाहिता अथवा परस्त्री भोगावी तसं(च) झाले! बरं पुन्हा हा परकायाप्रवेशाचा व्हिसा देवांनाच! असो.

तर कलेच्या क्षेत्रातील स्त्रीच्या अभिव्यक्तीचा प्रवास कलंकित कलेतून झाला. आज कला ही 'एंटरटेनमेंट इंडस्ट्री' झालीय आणि ज्या उच्च जातींनी तिला 'हीन' ठरवली होती, त्यांचीच एक अलिखित मिरासदारी या क्षेत्रात तयार झालीय. हा एक वेगळा स्वतंत्र विषय आहे. आणि 'शब्द रुची'च्या या अंकातील स्त्री अभिव्यक्तीचा समास मुख्यत्वे 'साहित्य' असावा. तिथे काय घडले, घडतेय यावरच आता लक्ष केंद्रित करूया.

सावित्रीबाई फुले आणि त्यांच्या काही धाडसी अब्राह्मणी विद्यार्थिनी (ब्राह्मण मुलीही होत्याच) यांनी शिक्षण हक्कासाठी जो लढा दिला आणि धर्मजाती सनातन्यांच्या प्रखर विरोधाला न जुमानता तो हक्क मिळवला व एक पायवाट बनवली त्या पायवाटेने पुढे जात, कर्वे, आगरकर, गोखले यांनी रस्ता रुंदीकरण करत, हळूहळू पदपथ तयार केला आणि जातीच्या भिंतींना ठोकरून स्त्री शिकू लागली ती सावित्रीबाई फुलेंना वंदन करून नाही तर मोरावर विराजमान गणपतीभार्या सरस्वतीला वंदन करून!

चोरावर मोर ही म्हण बदलून मोरावर चोर म्हणावं अशीच ही परिस्थिती. कुठून आली ही सरस्वती? कधी झाली ती विद्येची देवता? जर मूळात 'स्त्री'ला विद्याग्रहणाचा अधिकार नाही तर विद्येची देवता कशी असू शकते? का वकिलाची बायको वकिलीण तशी विद्यापती गणपती, म्हणून त्याची पत्नी सरस्वती विद्येची देवता करण्यात आली का? बरं हे प्रकरण एवढ्यावर थांबत नाही. मेंदू विज्ञान प्रगत झालंय तरीही आज अमक्याला 'सरस्वती प्रसन्न' म्हणून तो सारस्वत आणि सारस्वतांच्या लेखणीचं, प्रतिभेचं प्रतीक म्हणून मोरपिस! सावित्रीबाई मार खात होत्या किंवा पुढे कर्वे, आगरकर शिव्या खात होते तेव्हा या सरस्वतीबाई मोरासकट कुठे गायब होत्या? म्हणजे इथे पुन्हा बालगंधर्व पॅटर्न! सांस्कृतिक शुद्धिकरणाची ही ब्राह्मणी प्रक्रिया आजही मराठी साहित्यावर आपली सांस्कृतिक सत्ता टिकविण्यासाठी धडपडते आहे.

पण या सांस्कृतिक इतिहासावर, अभिव्यक्तीच्या या मूळ लढ्यावर आमच्या ज्येष्ठ, श्रेष्ठ स्त्री लेखिकांनी कधीही 'ब्र' काढला नाही की सरस्वती पूजनाऐवजी जाऊ द्या, सोबतीनंही सावित्रीबाईंचं स्मरण करण्याबाबत आग्रही राहिल्या नाहीत. परंपरेचं वीणावादन एखाद्या मैफिलीत तल्लीनतेने गाणं ऐकावं तशा ऐकत राहिल्या. जो समाज आपला इतिहास विसरतो, त्याला भविष्य काय असणार?

साहजिकच मग पहिली सगळी अभिव्यक्ती, पुरुष लेखकां-प्रमाणे मोराच्या पिसाऱ्यासारखे, प्रतिभेचे पंख फुलवत कृत्रिम भाषा, कल्पना यावरच पोसली गेली. सदाशिव पेठेने फुलेवाडा कधीच लिलावात काढून टाकला.

हे चित्र बदलायला, थोडंफार हलायला सुरुवात कधी झाली? तर ६०च्या जागतिक 'व्यवस्थाविरोधी' आलेल्या लाटेनंतर. पुढे ७०-८०च्या दशकात आंतरराष्ट्रीय स्त्री मुक्ती वर्षानंतर मोरीचा बोळा काढावा तसा 'साचलेपणाचा' एक काळ वाहून गेला. याच दरम्यान आलेल्या दलित साहित्याने तर सरस्वतीच्या मोराची पिसे काढली. तरीही 'गंधर्व पॅटर्नधारी' सारस्वत मागे हटले नाहीत. जगात बदल घडत असताना मराठी सारस्वतांची लेखन 'मौजे'ची खटाववाडी जोरात होती. तिथूनही स्त्री अभिव्यक्तीला धुमारे फुटले किंवा बोन्सायसारखे फोडण्यात आले. साहित्यातील या भागवत धर्माला, त्या काळच्या पुरुष लेखकांप्रमाणे, स्त्री लेखिकाही शरण गेल्या. त्याचा जो परिणाम पुरुष लेखकांसह मराठी साहित्यावर झाला तसा स्त्री साहित्यिकांवरही झाला.

आणि मग इब्सेनचा कौटुंबिक, सामाजिक दिवाणखाना आमच्या नाटकात आला तसा साहित्यातही प्रमाणभाषेच्या सालंकृत महिरपीतून कौटुंबिक, किंचित सामाजिक विषय छापखान्याची शाई पिऊ लागले. इथे पुन्हा दोन तट पडले. पुण्या-मुंबईच्या सदाशिव पेठी संस्कृतीचा प्रभाव असणारी पण भागवत धर्माची पताका उंचावणारी अभिजन स्त्रियांची एक तुकडी, आणि त्याचवेळी या सदाशिवपेठी प्रभावाचाच आधार घेऊन, कल्पना विस्ताराच्या अंगाने साहित्य प्रसवणारी आणि गावोगावच्या ग्रंथालयात तुफान मागणी असणारी अशी बहुप्रसवा स्त्री लेखिकांची एक झुंड! (हे दोन प्रवाह पुरुष लेखकांतही होते.)

कथा, लघुकथा व हुकमी तंत्राचा वापर केलेल्या कादंबऱ्या यातूनही तेव्हाची नवशिक्षित स्त्री आपल्या प्रतिभेचं विरेचन किलोच्या भावात करत होती. त्यांचे उमाळे, विषय, हुंदके, धक्कातंत्रे, भाषेची पखरण यांचं गारूड मोठ्या प्रमाणावर त्याच किंवा त्याहीपेक्षा कमी प्रतवारीच्या स्त्री वाचकांवर होतं.

याला छेद देण्याचं काम पुढे इरावती कर्वे, मालतीबाई बेडेकर, गौरी देशपांडे, अंबिका सरकार, सानिया, आशा बगे वगैरे मंडळींनी केलं. मराठी साहित्याच्या भाषेतच सांगायचं तर 'शांत जलाशयात एक दगड भिरकावला आणि त्याने उठलेले तरंग नंतर काही काळ किनाऱ्यापर्यंत उमटत राहिले!'

इथूनच स्त्रीच्या अभिव्यक्तीची (साहित्यिक) चर्चा सुरू झाली. विभावरी शिरूरकरांचे 'कळ्यांचे निश्वास' आणि इरावती कर्वे यांची महाभारताची स्त्री अंगाने फेरमांडणी इथून या चर्चेचा कंठ फुटला तो पुढे गौरी देशपांडेंच्या 'धीट' कादंबऱ्यांनी भद्र समाजाला थोडा धक्का दिल्यावर आधी आश्चर्य, धक्का, नंतर कौतुक आणि वेगळे विश्व दाखवल्याबद्दल मैलाचा दगड भेट असा तो पट दिसतो. गौरी देशपांडेंच्या कादंबऱ्या, अनिल अवचटांचे

रिपोर्ताज आणि तेंडुलकरांची नाटके हे सगळे वरील क्रमानेच पार पडले. गौरी, सानिया, अंबिका सरकार, शांता गोखले यांची नवी बेधडक (अपवाद सानिया) मांडणी अभिव्यक्तीचा बंडखोर आवाज न करता पुढे कौतुकातच समेटली गेली. दलित साहित्य वाचून हे आपल्या वाट्याला न आलेलं बलुतं समजून गहिवरणारा वाचक, गौरी देशपांडेंची गळणारी पाने विदेशी अंगणातली म्हणून दूरस्थ राहिला.

यानंतरचा मेघना पेठे, नीरजा, प्रज्ञा दया पवार, प्रतिमा जोशी, कविता महाजन आणि त्या पुढच्या मनस्विनी लता रवींद्र, इरावती कर्णिक, यांच्या लेखनापासून काय लिहिलं, कसं लिहिलं, का लिहिलं आणि का लिहिता हे प्रश्न सुरू झाले.

आणि हे उपस्थित होण्याचं कारण, या कालखंडातील सर्वच भारतीय भाषांसहित इंग्रजीतही लेखन करणाऱ्या २५ ते ५० या वयोगटातील स्त्री लेखिका आता कथा विश्व, बाहेरच्या विस्तारित विश्वासोबत, स्वत:च्या अगदी आतल्या विश्वात घेऊन जाऊ लागल्या. त्यामुळे बाजारपेठीय संस्कृतीसोबतच विज्ञान-तंत्रज्ञानाने 'गॅझेट' द्वारा स्वकेंद्रित केलेली नवी जीवनशैली आणि वर्ग, जात, धर्म या पलीकडे जात लेखन लैंगिक विषमता, आवड, निवड, दमन, शोषण यांना केंद्रस्थानी घेऊन आलं आणि हे करताना भाषा अधिक धीट झाली ती कालसुसंगत, मिश्र आणि अधिक टोकदार-तीक्ष्ण झाली.

इथून एका नव्या वर्गीय+जातीय+धार्मिक युती विरोधात लैंगिक+लिंगनिरपेक्ष+लिंगभावदकेंद्री लिखाणाची लढाई सुरू झाली. आणि शतकानुशतके जी चर्चा एकाच मुद्यावरती येऊन थांबते त्याच मुद्यावर आजच्या स्त्रीची सर्वच माध्यमातील अभिव्यक्ती थांबवली जाते, प्रश्नांकित केली जाते व बहिष्कृत केली जाते. तो मुद्दा म्हणजे स्त्रीचं स्ववर्तन, विचार व लैंगिक स्वातंत्र्य!

स्त्रीला शिक्षणाचा अधिकार ते मनात वाटतेय ते कागदावर, रंगमंचावर, कॅनव्हास, सिनेमाच्या पडद्यावर उतरवण्याचं स्वातंत्र्य जरूर दिलं गेलं. त्या धाडसाचं कौतुकही झालं. पण आपलं 'स्त्री'त्व लिंग ज्या विषमतेवर आधारित आहे या समाजात त्या समाजाच्या स्त्रीकडे बघण्याच्या जाणिवांवर खूप लिहिलं-बोललं गेलं. स्त्रियांनी लिहिलं, पुरुषांनी लिहिलं, एवढंच काय स्त्रीच्या वैषयिक आसक्ती, विरेचन यावरही पुरुषांनी लिहिलं. पुरुषांच्या लैंगिकतेवर तर लिहिलंच लिहिलं.

पण मानवी देहाच्या आणि त्यातूनही स्त्री देहाच्या केंद्रस्थानी असणाऱ्या लैंगिकतेवर, लैंगिक इच्छा, आसक्ती, विरेचन यावर मोकळेपणी लिहिण्याचं स्वातंत्र्य हा समाज स्त्रीला देत नाही. आम्ही कुठे अडवलंय? असं म्हणतो पण लिहिलं की जे लिहिलं तेच तिचं चित्र व चरित्र असं समजून समीक्षेच्या नावाखाली जी चिखलफेक होते किंवा त्याचे ज्या पद्धतीने संकलित पुनर्मुद्रण केले जाते व आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाते ते आमच्या एकूणच जीवन व्यवहाराची पातळी दाखवणारे आहे.

जे स्वातंत्र्य तेंडुलकर, जयवंत दळवी, भाऊ पाध्ये, बाबुराव बागुल, नामदेव ढसाळ घेतात ते स्वातंत्र्य मेघना, नीरजा, कविता, प्रतिमा यांना नसते. उर्मिला पवार आणि प्रज्ञा पवार यांना तर नव्या आंबेडकरी (मनु)स्मृतीत कोंबण्याचा प्रयत्न होतो.

यातली उर्मिला पवारांची घुसमट वेगळीच. त्यांचा काळ गौरी, सानिया, अंबिका सरकार, शांता गोखलेंचा, पण त्यांच्या कथा एकाच 'दलित' प्रवर्गात टाकून साहित्यचर्चात अनुशेष भरून काढण्यात-वापरण्यात येतात. परंतु दलितपणाच्या पलीकडे जाऊन त्या पुरुषी प्रवृत्ती, लैंगिकता या संदर्भात दलित पुरुषालाही इतर पुरुषासोबत उभा करतात, तेव्हा दलित साहित्यिक, समीक्षक त्यांच्यावर तुटून पडतात. त्या ज्या एकट्या पडतात तिथे त्यांच्या पाठीशी कुठलेही स्त्रीवादी उभे राहत नाहीत. हाच अनुभव प्रज्ञा दया पवारांचा.

तुलनेने मनस्विनी, इरावती या 'स्वतंत्र' राहतात. बदलता काळ, बदलती माध्यमं आणि बदलता प्रेक्षक यामुळे त्यांच्या अभिव्यक्तीला त्या अर्थाने मर्यादा पडत नाहीत पण स्त्री म्हणून या नवीन विचाराने अभिव्यक्त होत जगताना मात्र 'लढाई' लढावीच लागते. आज त्यांच्या पिढीतल्या मुली आपल्या लैंगिकतेचा रंगमंचीय अविष्कार करताना विवस्त्रही होताहेत. सिनेमातही पण 'कमोडिटी'पण कसं चुकवायचं हा प्रश्न राहतोय. त्यामुळे अभिव्यक्तीचा हा प्रवास आता नव्या बाजारकेंद्री समाजात प्रदर्शित तर होतोय पण त्यावरची प्रतिक्रिया समंजस नाही तर विकावू, प्रसंगी सनसनाटी, परत प्रतिगामी आणि पुरुषी वर्चस्वाची धर्मजातिगंडाचीच आहे.

या बाबतीत दोन उदाहरणे देऊन थांबतो. नागराज मंजुळेचा सैराट ऑनर किलिंगवर प्रखर भाष्य करतो पण प्रेक्षक शेवटाची चर्चा न करता आर्ची-परश्याच्या लव्हस्टोरीवरच खुश होऊन झिंगाट नाचतो. हा पराभव सिनेमाचा की आपल्या जाणिवांचा.

दुसरं उदाहरण अंजली जोशी यांच्या कादंबरीचं. एका प्रख्यात मॉडेलच्या अनुभव विश्वावर आधारित ही कादंबरी स्त्रीच्या लैंगिक गरजा, त्याचं दमन, विरेचन, तृप्ती, अतृप्ती यावर(च) कथापट उभारते. रूढ संकेतांना बाजूला ठेवून वेगळाच मार्ग अनुसरणारी ही कादंबरी पारितोषिक मिळवूनही सर्व साहित्य व्यवहारातून अनुल्लेखाने अव्हेरली गेली. इथेच आमचा समाज स्त्रीअभिव्यक्तीबाबत अजूनही सोळाच्या शतकातच आहे हे अधोरेखित करतो.

**– संजय पवार**
भ्रमणध्वनी : ९८९२५२१२५१
writingwala@gmail.com

आविष्कार अन् सृजनात्मकता यांचा शोध वाचन, लेखन, दिग्दर्शन, कॅमेरा, संकलन, निर्मिती, चित्रकला अन् स्कल्प्चर अशा वेगवेगळ्या माध्यमातून घेणाऱ्या एक प्रवाही अन् तेवढ्याच प्रामाणिक व्यक्तिमत्त्वाचा हा एक आत्ममग्न प्रवास...

निलकांती पाटेकर



# ...प्रवाही अक्स

**आ**युष्य कसं असावं...?
तर आयुष्य हॅपनिंग असावं!
एका क्षणातून दुसऱ्या क्षणात अलगद उतरत रहावं... सहज..
पण हा सहजपणा आणायचा कसा?
आणायचा नसतो. खरं तर येतो तो... सहजपणे...
पण कसा?
अट्टाहास धरावा लागतो अट्टाहास सोडण्याचा?
म्हटलं तर.. सगळ्यात अवघड असतो तो सहजयोग...
आणि सगळ्यात सहज सोपा असतो तोही सहजयोगच!
परस्परविरोधी... हं...ऽऽ...'जाणं' येणं...!
आपल्याला जाणीव होते... त्यातही एक प्रयत्न असतो...
पण जाण मात्र सहज येते...
आणि ही सहज येणारी...
आलेली 'जाण'च अलगद एका क्षणातून दुसऱ्या क्षणात नेत असते आपल्याला..
हे वहाणं असतं... वहात जाणं नाही..
आपण प्रवाही होतो..

Laws of Conservation of Energy..
खूप बोजड वाटलंय ना?
पण अवघड अगदीच नाहीये...
Energy म्हणजेच ऊर्जा...
वापरून कमी होत नाहीये किंवा ती निर्माणही होत नाही... ना ती नाहीशी होते..
एकातून दुसऱ्यात तिचं फक्त रूपांतर होतं...
आलेली जाण आणि असलेली ऊर्जा... हीच आपल्यामध्ये मस्त स्थित्यंतरं घडवून आणतात...
आणि आयुष्याच्या क्षणांमध्ये... क्षणांवर... आपण विहरायला लागतो एका क्षणात...
आपण आयुष्य मागच्या पानावरून पुढे.. असंच तर जगत असतो. जणू काही आपल्याला माहीत आहे – हा क्षण असाच असणार आहे.
आणि अचानक वेगळंच घडतं आणि जाण येते कुठल्याच क्षणी काय होणार हे माहीत नसतं तरीही..

तिसरीत अभ्यासात ढ असणारी मी..
अचानक अभ्यास करू लागले..
गणितात ३ मार्क पडले म्हणून आमच्या केळकरबाईंनी त्यांच्या ऑफिसमध्ये बोलावून कानाखाली जाळ काढला...
हा प्रकार अचानक घडला..
अन्यथा माझं 'ढ'पण न्यूटनच्या पहिल्या नियमाप्रमाणे Continues to be in the state of rest or in the uniform motion unless compelled to change it's state by an external force...
म्हणजे ह्या ठिकाणी 'कानाखाली निघालेला जाळ...' तो त्या क्षणापर्यंत निघेल हे ठाऊक नव्हतं...
ते झालं...
आणि माझ्यातल्या डोकेबाज हुशारीची जाण आली मला...
त्यानंतर पहिल्या ३ मध्ये नंबर आणि गणितात १००/१०० कधीच चुकले नाहीत.

हेही गाडं असंच मस्त घरंगळत चाललं होतं..
आणि ७ वीत असताना कॉलेजच्या ३ अंकी नाटकात महत्त्वाची भूमिका करणार का? विचारणा झाली.
नाटक प्र.के. अत्र्यांचं 'कवडीचुंबक'.

तालमीचा १ ला दिवस. मी केर काढत असते, आणि माझा प्रियकर (?) दरवाजात...
प्रियकर म्हणजे... १९६६च्या सुमारास ७वीतल्या मुलीला 'प्रियकर' कसे समजावणार...
आमचे तालीम मास्तर (दिग्दर्शक) काळे ह्यांची तारांबळ..
नंतर कधीतरी माझ्या बाबांना ते इतकंच म्हणाले...
अत्यंत नैसर्गिक देणगी आहे पोरीला अभिनयाची..
माझा अभिनय प्रवास गणिताच्या हातात हात घालून चालू झाला.

नाशिकला कॉलेजच्या १ल्या वर्षाला असताना डॉ. सुमन माटे तात्यासाहेबांचं (वि.वा. शिरवाडकर) कौंतेय बसवत होत्या. त्यातल्या वासंतिका ह्या अवाढव्य जाड भूमिकेसाठी त्यांनी मला निवडलं. मी अत्यंत बारीक भूमिका विनोदी – फक्त ३ सीन होते.. नाटकाच्या तालमीला समोरच राहत असल्याने तात्यासाहेब यायचे.. बऱ्याच वेळेला.. माझी त्यांची दोस्ती तिथंच झाली.. बाई एकदा म्हणाल्या – तुम्ही फक्त निलकांतीचे सीन बघता आणि निघता पूर्ण नाटक कधी बघणार..
अग, ती दररोज कुठल्यातरी वेगळ्याच पॉईंटला हसवते.. लिहिताना वाटलं नव्हतं ही हशाची जागा आहे..पण अचानक हसू फुटतं खरं.. पण तेच तात्यासाहेब. एकदा मी काम करताना घागरा घोट्यावरून ४ इंच वर सरकला म्हणून वाक्य विसरल्याबरोबर तालीम थांबवून म्हणाले..
भूमिकेत असताना असं होऊ कसं शकतं निलकांती? लक्ष तुझ्या चेहऱ्यावर होतं माझं – तू घोट्यावरून चुकून वर सरकलेल्या घागऱ्याकडे वेधवलंस.. त्यानंतर आजतागायत माझ्या गाभ्यात ती जाण आहे... नकळत आणि सहज...कायम जागी असते... प्रेक्षक हे वेगळं रसायन आहे.. पुन्हा न्यूटनचा १ला नियम.. Continues to be in the state of rest or in the uniform motion unless compelled to change it's state by an external force...
ह्या ठिकाणी माझं भूमिकेतून क्षणिक का होईना पण बाहेर येणं...

अरे हो... राहिलंच...
वय वर्षे ७...
दरवर्षी पुण्याला आजोळी मे महिन्याच्या सुट्टीत – सगळ्या आते-मामे-मावस भावंडांचा कल्ला असायचा. आजूबाजूच्या आणि समोरच्या बंगल्यामधले सगळेच चोर-शिपाई-लगोरी-डब्बा ऐसपैस आणि दुपारी पत्ते, कॅरम ह्या खेळातले भिडू... अय्यंगारांची सविता अशीच समवयीन.. आणि हे अय्यंगार म्हणजे – त्याही वेळेला जगद्‌विख्यात असलेले योगाचार्य बी.के.एस. अय्यंगार. त्यांना कायमच वेगवेगळ्या आसनांच्या postures मध्ये बघत असताना ती कधी imprint झाली खोलवर आणि माझ्या दैनंदिन आयुष्याचा भाग बनली... सहजच... सहजयोग... तेव्हापासून आजपर्यंत... आतापर्यंत... दररोज किमान ४५ मिनिटं ते १ तास योगासनांचा.

गणित-अभिनय आणि योग – हे तीनही माझ्यातली जाण आणि ऊर्जा ह्याचा समन्वय अशा काही permutation-combination मध्ये साधतात की अभिनयातली तरलता-गणिताची नेमकी क्रमबिरुद्ध सिद्धता आणि योगाचा अंतर्गत समतोल ह्याची अननुभूत गोळाबेरीज होते.. कायम वेगळी.. योगासनं शरीराचा आणि मन नावाच्या एका अनालकनीय-अमूर्ततेचा समतोल इतका सहज साधतात – आणि हे सगळं फक्त एका श्वासाशी संलग्न असतं..

अभिनयामध्ये आवाजाचा चढउतारही श्वासाबरच असतो.. आवाजाबरहुकूम चेहरा हलतो – आणि चेहऱ्याबरहुकूम शरीर आणि त्याची नेमकी मात्रा किती हे आपोआप ठरवतं. माझ्यातला गणित्या – ह्यांचं आपापसातलं साटंलोटं आता लिहिता लिहिताच कळंतय मला.
म्हणजेच 'जाण' कधीही येते...

आयुष्याला कधीच मी वळण दिलं नाही–
ते जसं वळलं..तशी वळत गेले.
आपलं आयुष्य हे आपलं असलं तरी जन्माला आल्यापासून सहजीवन हा आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग असतो.
कारण एकटं जगणं ही कल्पनाच माणूस नावाच्या प्राणी जीवनात अस्थायी आहे.
तो अस्तित्वात आला तोच मुळी समाज नावाची बांधिलकी जपत. मग स्त्री-पुरुष ही बांधिलकी प्रजननातून सुरू झाली तरी पापुद्रे आणि कंगोरे हे कालानुगतिक आरस्पानी होत गेले.
शरीराशी बांधलं जाऊन सुद्धा अशरीरी होऊ पहाणारं नातं-बंधनात राहून मुक्ततेचा ध्यास घेणारं... ध्यास लावणारं नातं–
निसर्गानीच तुम्हाला एकमेकात सामावणारं आणि पूरक बनवल्यावर स्त्रीमुक्ती आणि पुरुषी अहं हे ह्या नात्याला लागणारे कॅन्सरच आहेत... असंच वाटत आलं मला कायम. अट्टाहास... का बरं? पुन्हा सहजयोगच महत्त्वाचा.

आनंदवनला बाबांकडे गेलं की किमान २-३ महिने राहायची मी. ताई आणि बाबांचं असणं मला भावायचं खूप..
दोन भिन्न व्यक्ती आपल्यातलं वेगळेपण किती छान जपतात.. बाबा असा.. बाबा तसा.. ताई बोलायला लागल्या की ते पारदर्शी असणं माझ्या आतपर्यंत पाझरायचं आणि बाबांशी बोलताना ताईवरून बाबा कधी इंदूवर यायचे त्यांच्याही नकळत..
आणि एका क्षणी सहजपणे लय पकडायचे...
त्या दूरवर लुकलुकणाऱ्या क्षणांची...
जे त्या दोघांचेच होते... तरीही सर्वांचे...
हा सहजयोग...
तुमचे माझे आईबाबाही तर असेच होते की..
आजही अशी लाखो-करोडो जोडपी आहेतच की...
वैविध्यातही एकतानता... नकळत...

नारायण मूर्ती आणि सुधा मूर्ती...
उच्च शिखरावर असूनही ह्या कॅन्सरची बाधा न झालेली...

जपानला गेले तर तिथल्या कंपन्यांमध्ये मुलगी कितीही हुशार असली तरी personal secretary cum interpreter (दुभाषा) ह्याच्यावर तिला किंवा तिच्यातल्या skills ना वाव नाही...
मी अवाक् झाले..
मग तुमचा देश कसा प्रगती करणार?
मी तोंडावरच त्यांना विचारलं होतं.
स्त्री आणि पुरुष ह्यांच्यातली देवाणघेवाणच नातं स्थिर करते. कधी ते...
ह्या अस्थिरतेतली स्थिरता हीच ह्या नात्यातली गंमत आहे...
पुन्हा विरोधाभास... तो समजणं तर आहेच. त्याची जाण येणंही महत्त्वाचं.
आयुष्य - नुसतं काय जगत राहायचं...?

जपानच्या Disney World मध्ये 90° fall असा एक प्रकार आहे.. 90° fall म्हणजे Physics च्या भाषेत Maximum Speed. Newton's 2nd Law of Motion. न्यूटन आणि अर्किमिडीज हे माझे आवडते शास्त्रज्ञ. Gravitational force अत्यंत तीव्रतेने खेचणार. म्हणजे तुमचं रक्त तुमच्याच धमन्यातून अतिवेगानं धावणार फक्त काही सेकंद आणि अचानक त्याचा वेग कमी होणार... एका fraction of second मध्ये आणि हे सगळं इतकं correct scientifically designed-
की त्या ला पोहोचायच्या आधी तुम्ही एका होडीमध्ये- straight jacket मध्ये fix
आणि ती होडी magnetic force ने पुढे चाललीय.
दर १०-१५ फुटांवर Disney च्या Characters चा एक टवाळ ग्रूप वाद्यं वाजवत सांगत असतो-
तुम्हाला पुढे जायचं नसेल तर इथंच उतरा...
होडी अलगद तीराला लागते आणि एक दरवाजा उघडतो..
पुन्हा थोडं पुढे जाताच-
बघा, अजून भिती वाटत असेल तर उतरा...
पुन्हा होडी तीराला आणि दरवाजा उघडणं...
असं अजून काही वेळा होतं.
90° fall .. आता ही शेवटची संधी आहे
उतरून जायची विचार करा...
तुम्हाला choice असतो-
'Humpty dumpty had a great fall'
असं होण्याअगोदर तुम्हाला संधी असते-
आयुष्याचंही तर असंच असतं.
ते तुम्हाला प्रत्येक अनुभव घ्यायला तयार करत असतं-
नको असलेल्या गोष्टी गाळून जातात
आपल्याला वाटतं काय हे-?

आणि एका क्षणी अचानक विश्वदर्शनच होतं. केवळ अद्भुत.

असंच काहीसं झालं...
जवळ जवळ ३ दशकं अभिनयाची म्हणावी तशी assignment घेतली नव्हती मी.
वेगळीच projects हाताळत होते-
प्रगल्भ होत होते अंतर्बाह्य.
वाचन-लिखाण-दिग्दर्शन-कॅमेरा-एडिटिंग-प्रॉडक्शन.
सगळं करायची-
पण अभिनय..... नाही.
ठरवलं काहीच नव्हतं - पण - झालं खरं असं पण ती ऊर्जा तर आतमध्ये होतीच ना?
धरणात साठलेल्या पाण्यासारखी-
ती कशी रूपांतरित होणार वीजेमध्ये..

आधी कळलंच नाही-
न कळणं हेच खरं छान असतं-
त्यात एक १०० नंबरी surprise element असतं-
चित्रकलेमध्ये compulsory pass होणारी मी...
एक मातीचा गोळा हातात आल्यावर...
war & peace...
wars hunger...
wealth of a smile...





ही आणि अशी बनवू लागले.
बोटं फिरतात कशी..
आणि चेहऱ्यावर हे भावनांचे विभोर उमटतात कसे..
हे कोडं सोडवायच्या फंदातही पडले नाही कधी..
जे घडत होतं ते घडवत गेले...
बाबा 2nd World war मध्ये लढले होते..
त्यांनी सांगितलेल्या कहाण्या कुठंतरी खोलवर fossil बनून राहिल्या होत्या-

सैन्यात दाखल होताना माझ्याच death warrant वर सही केली होती मी निल्या माझ्या वयाच्या १८व्या वर्षी...
परत आले ते गुडघ्यात बॉम्बचा splinter घुसून गुडघा निकामी झाला... म्हणून...




An Unsung War Hero...
युद्धातल्या जखमांचे व्रण न मिळालेल्या मेडलसारखे शरीरावर बागवतो... मरेपर्यंत...
जहांगीर आर्ट गॅलरीच्या माझ्या exhibitionमध्ये एक असाच war hero मला चकित करून गेला - M'am - you said it just right असं म्हणाला...
कानाच्या वर अजून तशीच असलेली बंदुकीची गोळी... रूतून बसलेली त्याच्या... त्यांनी लिहिलेले माझ्या डायरीवरचे शब्द... मला कायमचे नि:शब्द करून गेले...





War Hunger... 2nd World war च्या अगणित कथा... वाचल्या बघितल्या... बाबांकडनं ऐकल्या...
आपल्या भुकेल्या, तान्ह्या लेकरासाठी एक पावाचा तुकडा मिळावा... सैनिकांना ration मिळायचं...
देवाणघेवाण विचित्र होती..
सैनिकाला माहीत नसायचं - जिवंत परतेन का माघारी... त्यामुळे हा क्षण जगणं असायचं.. त्या आईला तो पावाचा तुकडा...

आणि ते तान्हं... त्याच्या डोळ्यात इतकंच की...
कित्येक आयांनी आपल्या तान्हुकल्यांना कडेवर घेऊन त्या सैनिकांची भूक शमवलीय...
कोण बरोबर... कोण चूक... हा हिशोबच नाही..
परिस्थिती... आणि त्या क्षणाचं जगणं... प्रत्येकाचं...
असणं... प्रत्येकाचं...
आणि त्यातून उमटलं War hunger.
पहिल्या ४ महिन्यातच जवळपास ४० शिल्पं घडली-
जे मनात उमटायचं ते बोटातून स्त्रवायचं-
जादूच जणू-
आजूबाजूचे म्हणायचे-
तुला भानच नसते-
मूकबधीर होतेस-
तासन्तास... कधी ६-६/८-८ तास उभी-
डोळे तारवटून थकायचे
कोरो चहा-माती आणि माझी बोटं...
जाणीव... जाणिवेपलीकडची..
पाठीचं दुखणं... मानेचं दुखणं...
एकदा sculpture समोर घडलं की जाणवायचं- ते भट्टीत गेलं की त्याबरोबरच एक मातीचा गणपतीही आत जायचा.
आतापर्यंत जे काही माझ्यातून आलं ते तुझं...
भट्टीत तू आणि ते...

४ महिन्यात हेऽऽऽ एव्हढंऽऽऽ
expressions ...हा माझा आत्माच तर होता..
जो अभिनयातून उत्स्फूर्तपणे आविष्कारित व्हायचा...
३ दशकं तेच चक्र थांबलं...
मातीचा स्पर्श झाला... झरझर संवेदना पाझरली
मातीची मूर्ती कधी झाली...
अनाकलनीयच सगळं...
सगळंच...

भ्रूणहत्येवर नाटक लिहीत होते-
वाटलं गणित इतकं कच्चं कसं भ्रूणहत्या करणाऱ्यांचं?
मुली कमी झाल्या तर...?
विचार केला का कधी ह्यांनी?
म्हणजे उद्या एका मुलीचं ४-५ मुलींशी लग्न करून द्यावं लागेल..
मग?
नाहीतर समलिंगी नाती बोकाळतील...
दोन्हीही अयोग्य-
स्त्री-पुरुष नात्याला लागणारा हा advance stage मधला कॅन्सर...!
'जाण' येणं महत्त्वाचं...
मी स्त्री आहे की पुरुष - त्याही आधी मी एक माणूस आहे...

आणि निसर्गाचा अंश आहे...
त्यामुळे माझा DNAवर निसर्गाचा footprint आहे.
किती सोपं आहे समजायला?
सहजयोग...
नाटक ३० वर्षांपूर्वी लिहिलं...
आणि हल्ली जेव्हा Relationships वर काही sculptures घडली माझ्या हातून..
तेव्हा नंतर कधीतरी कळत गेलं...
कधी... कुठं...किती खोलवर रुजलं होतं...




त्यात Birth of Innocence असं एक वेगळंच काहीतरी घडलं- म्हणजे स्त्री-पुरुष नातेसंबंध.. मग तो कसाही आला - नैतिक-अनैतिक बळजबरीचा-मोहमयी-सहजसुंदर-अचानक किंवा इतरही कुठल्या अनुषंगाने..
तरी..
जन्माला येणारं मूल निरागसच असतं.
नंतर समाज भलेही त्याला निरागस राहू देत नसेल-
पण जन्माला येताना त्याची निरागसताच प्रत्येक आईला मोहवते- शारीरिक-मानसिक सगळ्या वेदनेपार नेते.
तसंच 'Living In' rift असं एक sculpture मनातले विचार चोख उमटवतं..
Living In Relationship... सुरूच होते ती मुळी - 'I can walk out on my partner any moment...' कुठल्याही क्षणी मीही




सोडू शकते/शकतो.
अशी घंटी कुठंतरी खोलवर किणकिणत असताना स्त्री-पुरुष नात्यामधलं अद्वैत कसं साधणार... ती निमग्न समाधी...
सगळं कसं मग शरीराच्या सीमारेषेवरच थांबतं...
ह्या rift वर आयुष्य बांधणार कशी?
समाजबांधव बांधत नेण्यासाठीच तर विवाहसंस्था अस्तित्वात आली असणार ना?

अंतर्यामीचे विचार नाटकातून-शब्दातून-अभिनयातून प्रकट होतात तसेच मातीतूनही... दोन्हीमधला हा सहजपणा-
योगायोगाने निश्चित नव्हता... नाहीये-
तरीही 'योगा'ने निश्चित होता.
विचारांची संस्काराची शांत बैठक आणि 'योगा'तून आलेली एकाग्रता-एकतानता.. लय..
माझ्या प्रत्येक भूमिकेमागे एक सहज आलेला ठामपणा आहे.
तसाच तो माझ्या प्रत्येक sculptureमध्येही आहे-
मला तो जसजसा जाणवत जातो, तसतसं ते घडत जातं.
मातीचा गोळा हातात घेते तेव्हा असणारा विचार कशी वळणं घेत कुठे येऊन थांबतो. त्यातली संलग्नता नंतरही कायम जाणवत राहते. प्रत्येक sculptureची आपली अशी एक गोष्ट आहे.
आयुष्याच्या वाटेवर रुजलेल्या जाणिवा शब्दशः मूर्तरूपात येताहेत.
आताशी तर सुरुवात झालीय.

एकाच श्वासाशी निगडित असलेले हे आविष्कार...
माझ्यातून येतात - मलाच घडवतात-
माझाच माझ्याशी समन्वय साधण्यात दुवा बनतात.
ना क्षण चिमटीत पकडता येतात-
ना अनुभव.
समृद्ध कोण कोणाला करतं-
क्षण अनुभवाला-?
की अनुभव क्षणाला-?
इतकीच अनुभूती देऊन जातं प्रत्येक वेळी... निल्या... प्रवाही असं...


**- निलकांती पाटेकर**
भ्रमणध्वनी : ९८२१८७१७८१
clayjoint@gmail.com

महिलादिन विशेषांक

शतकानुशतके दुर्लक्षित असलेली बाब म्हणजे 'स्त्री आरोग्य'. त्यातून नको असलेलं गर्भारपण ही भारतीय स्त्रीच्या आयुष्यातील फार मोठी शोकांतिका! या शोकांतिकेवर मात करण्यासाठी सत्त्याहत्तर वर्षांच्या तरुण वयात प्रयत्नशील असणाऱ्या डॉ. लता लाभसेटवार यांच्या कार्याचा मागोवा घेण्याचा लेखिकेचा हा वेगळा प्रयत्न...



डॉ. लतिका भानुशाली

# गर्भपात कायदा आणि वास्तव

मेरी माँ की कोख मजबूर थी
मैं भी तो एक इन्सान हूँ
आज़दियों की टक्कर में
उस चोट का निशान हूँ
उस हादसे की लकीर हूँ
जो मेरी माँ के माथे पर
लगनी जरूर थी
मेरी माँ की कोख मजबूर थी

मैं वह लानत हूँ
जो इन्सान पर पड रही है
मैं उस वक्त की पैदाइश हूँ
जब तारे टूट रहे थे
जब सुरज बुझ गया था
जब चाँद की आँख बेनूर थी
मेरी माँ की कोख मजबूर थी

मैं एक जिस्म का निशान हूँ
मैं माँ के जिस्म का दाग हूँ
मैं जुल्म का वह बोझ हूँ
जो मेरी माँ उठाती है
मेरी को अपने पेट से
एक दुर्गंध सी आती रही
मेरी माँ की कोख मजबूर थी

कौन जाने कितना मुश्किल है
एक जुल्म को अपने पेट में पालना
अंग अंग को झुलसाना
और हड्डियों को जलाना
मैं उस वक्त का फल हूँ
जब आज़ादी के पेड पर
बौर पड़ रहा था
आज़ादी बहुत पास थी
बहुत दूर थी
बहुत दूर थी
मेरी माँ की कोख मजबूर थी।

(१९४७, अमृता प्रितम)

एकोणीसशे सत्तेचाळीसमध्ये अमृता प्रितम यांनी लिहिलेल्या ओळी आज २१व्या शतकातही कालबाह्य ठरत नाही. भारताला स्वातंत्र्य मिळून अडुसष्ट वर्षं झाली पण तरीही स्त्री जन्माची कहाणी, वेदना वर्षानुवर्षे तीच राहिली. परमेश्वराने स्त्री शरीराची रचनाच अशी केली आहे की शारीरिक भोगाच्या, सुखाच्या वेदनांचा-आनंदाचा हिशेब हा तिलाच द्यावा लागतो पुरुषाला नाही. बीजारोपण करून तो मोकळा होतो आणि ती मुकाटपणे भोगाच्या कहाण्या अंगावर वागवत बसते; कधी मजबुरी म्हणून, कधी सामाजिक गरज म्हणून, कधी मातृत्वाची सिद्धता म्हणून तर कधी व्यवस्थेला टक्कर देत निर्धार म्हणून!

भारताच्या एकूण सामाजिक-सांस्कृतिक व्यवस्थेचा सांगोपांग विचार केला तर लक्षात येते की लग्नानंतर स्वेच्छेने स्वीकारलेले गर्भारपण आणि लग्नाआधीचे जबरदस्तीने लादलेले गर्भारपण यातील मानसिक-शारीरिक-सामाजिक गुंतागुंत प्रचंड अस्वस्थ करणारी आहे. (२००८ मध्ये भारतात वार्षिक गर्भपाताचं प्रमाण ६.४१ लक्ष होतं.)

गर्भधारणा, गर्भपात, लिंग परीक्षा, स्त्री भ्रूणहत्या या प्रत्येक गोष्टीला वेगळा संदर्भ आहे. त्यामागे वेगवेगळा सामाजिक पैलू

आहे. यापैकी नको असलेली गर्भधारणा (Unwanted Pregnancy) हा अत्यंत गुंतागुंतीचा विषय आहे. कधी ही गर्भधारणा प्रेमभंगातील फसवणुकीमुळे झालेली असते, कधी वाकड्या पडलेल्या पावलामुळे झालेली असते, कधी बलात्कारातून नको असलेली गर्भधारणा वाढीस लागते तर कधी वैवाहिक जीवनातील सहजीवनातून-सहसंबंधांतून चुकून नकळत झालेली गर्भधारणा असते.

अशा परिस्थितीत योग्य निर्णय योग्य वेळी घेतला नाही तर मात्र स्त्री जीवन उद्ध्वस्त होते हे सनातन सत्य आहे.

वर्षा ही अशीच आदिवासी पाड्यावर राहणारी मुलगी. वय तेरा-चौदा! नुकतीच वयात आलेली. जंगलात लाकडं तोडायला गेली असताना पाठलाग करून कुण्या नराधमाने तिला खिंडीत गाठले. घरी ही गोष्ट सांगण्याचं तिला धाडस झालं नाही. कारण बलात्कार करणारा माणूस हा गावातील उच्चभ्रू प्रतिष्ठित. जेव्हा सत्य पोटाच्या वाढत्या घेरामुळे लक्षात आले तेव्हा प्रचंड कौटुंबिक हिंसाचाराला तिला सामोरे जावे लागते. स्वतःची कोणतीही चूक नसताना! बापाने लाथाबुक्क्यांनी पोटावर मारून सुद्धा गर्भ पडला नाही. शेवटी तिला डॉक्टरांकडे आणले गेले. गर्भपात करायची किंमत १२०० ते १५०० रुपये. संपूर्ण कुटुंबाचे महिन्याचे उत्पन्नच तीन-चार हजार रुपये. एका दिवसात एवढे पैसे आणणार कोठून? पैसा जमा करायला उशीर झाला. तोपर्यंत वेळ निघून गेली. गर्भपाताचा मार्ग खुंटला आणि आता लग्नाआधी झालेल्या तान्हुलीला पाठीवर घेऊन १५ वर्षांची वर्षा खाली मान घालून शेतात राबते. असंख्य शिव्या, तिरस्कार, तुच्छता, अवहेलना सहन करत आयुष्याच्या जीवघेण्या नवीन पर्वाला ती सामोरी जात आहे.

कविता ही अशीच घरकाम करणारी निम्न मध्यमवर्गीय स्त्री. दोन वेळच्या अन्नासाठी कशीबशी धुणंभांडी करून जगणारी लाचार स्त्री. त्यात जोडीला व्यसनाधीन नवऱ्याची रोजची मारहाण. पहिल्या मुलीच्या जन्मानंतर सरकारी दवाखान्यातून कॉपर-टी बसवून घेतली. पाळी आली नाही म्हणून तपासणी केली तर तीन महिने उलटून गेलेले. कॉपर-टीच्या बरोबरीने गर्भाशयात गर्भ वाढणे म्हणजे बहुविकलांग-मंदबुद्धीचं मूल जन्माला येण्याची दाट शक्यता असते तसेच जंतूसंसर्गामुळे आईचं स्वास्थ्यसुद्धा धोक्यात येऊ शकतं. कायद्याने गर्भपात करायला सरकारी दवाखाना तयार नाही. प्रायव्हेट हॉस्पिटलचा खर्च तिला परवडणं शक्य नव्हतं. पैशाची तजवीज करेपर्यंत दिवस निघून गेले. आता खाटेवर झोपलेला बुद्धिमांद्य मुलगा घेऊन आयुष्याचे ओझे वाहात आहे.

अशा कित्येक वर्षा- कविता नको असलेल्या गर्भधारणेचे ओझे घेऊन आयुष्य कंठित आहेत. नको असलेली गर्भधारणा संपवण्यासाठी आज अमेरिकेमध्ये अत्यंत स्वस्त तंत्रज्ञान उपलब्ध आहे. कोणतीही शस्त्रक्रिया करायची गरज नाही. एक छोटीशी गोळी गालात धरली की सहज सुटका होऊ शकते. भारतीय रुपयांत याची किंमत फक्त ५०० ते ६०० रुपये. शिवाय डॉक्टरांची फी, काऊन्सिलिंग या सगळ्यासाठी अजून तीन-साडेतीन हजारापर्यंत हा खर्च पोहचतो. ही औषधाची गोळी भारतात सहज उपलब्ध आहे. किंबहुना शासकीय रुग्णालयात या गोळीचा गरजेनुसार वापर करावा अशी नियमावली आहे. स्त्रीची मासिक पाळी चुकल्यानंतर एक महिना ते दीड महिना गेला असेल तरच ही गोळी वापरता येते. यापेक्षा जास्त दिवस गेले असतील तर मात्र अन्य उपाययोजनांकडे वळावे लागते. या गोळीच्या वापराच्या यशस्वीतेची अमेरिकेतील टक्केवारी ९७ टक्के एवढी आहे. जर गर्भधारणा गर्भाशयाबाहेर असेल तर ही उपाययोजना निरूपयोगी ठरते.



डॉ. लता लाभसेटवार

भारतात विशेषत: ग्रामीण भागात मात्र याबाबतीत बऱ्याच वेळा पिडिताच्या अज्ञानामुळे शक्य असताना सुद्धा इतके सोपे उपाय केले जात नाही. ज्या पेशंटला इतर आरोग्य समस्या आहेत त्यांच्या बाबतीत अल्ट्रासाऊंड करणे हे आवश्यक ठरते. पण सरसकट सर्वांना या प्रक्रियेला सामोरे जाण्याची गरज नसते. आधीच ग्रामीण भागात दारिद्र्य असते. त्यात स्त्रिया आर्थिक दृष्ट्या सक्षम नसतात. असं असताना खाजगी रुग्णालयात स्त्रियांना नको असलेल्या वैद्यकीय निदान चाचण्यांच्या जाळ्यात अडकवले जाते. सहज उपाय उपलब्ध असताना क्युरेटिंग किंवा महागड्या ट्रिटमेंटच्या मोठ्या जाळ्यात रुग्णाला गुंतवले जाते. त्याचीही मजबुरी असते. कधी पैशाची थैली मोकळी करून गर्भाची थैली मोकळी केली जाते तर कधी हे शक्य होत नाही तेव्हा असंख्य स्त्रिया या नको असलेल्या गर्भारपणाचे ओझं वाहात आयुष्यभर खितपत पडतात.

या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी स्त्रियांना मदत करावी, मार्गदर्शन करावे या विशुद्ध हेतूने भारतात दरवर्षी ७७ वर्षांच्या तरुण स्त्रीरोग तज्ज्ञ **डॉ. लता लाभसेटवार** भारतात येतात. ग्रामीण भागातील स्त्री-रुग्णांची परिस्थिती भयानक आहे. या शिवाय, जोडीला इतर व्याधी आहेतच. गुप्तरोग, ब्रेस्ट कॅन्सर, गर्भाशयाशी निगडित इतर व्याधी याविषयी शहरी-ग्रामीण दोन्ही भागांत प्रचंड अज्ञान आहे. म्हणून स्त्री-रोग, स्त्री-आरोग्य याविषयीची जागृती करणे आणि नको असलेल्या गर्भारपणातून सहज-स्वस्त सुटका कशी करता येते याविषयी जागृती करत डॉ. लाभसेटवार पुण्याजवळील वाघोली गावी दरवर्षी येतात.

सफल वैवाहिक जीवनातील अपेक्षित गर्भधारणा ही कुटुंबासाठी आनंदाची बाब असते. पण कुमारवयात झालेली गर्भधारणा तसेच जबरदस्तीने लादलेल्या स्त्री-पुरुष संबंधांतून निर्माण होणारी गर्भधारणा स्त्रीचे भावविश्व उद्ध्वस्त करते. अशा अडकलेल्या स्त्रिया विविध सरकारी नियमांमुळे, सामाजिक भीतीमुळे, रूढ संकेतामुळे अघोरी उपायांचा आधार घेतात. बापू-

बुवांच्या नादाला लागतात आणि मग 'बुडत्याचा पाय खोलात' या न्यायाने पूर्णपणे संपून जातात. शारीरिक-मानसिक दृष्ट्या खचून जातात. खरंतर नको असलेल्या गर्भधारणेतील गर्भाची वाढ होऊ न देणे हा मानवतेचा विचार आहे. तो स्त्रीचा हक्क आहे.

याच विषयावर गेली ४० वर्षे अमेरिकेत यशस्वीपणे काम करणाऱ्या डॉ. लता लाभसेटवार भारतीय स्त्रियांना सोप्या मार्गाचा उपाय उपलब्ध करून देऊ इच्छितात. जे स्वातंत्र्य अमेरिकन स्त्रीला आहे तेच स्वातंत्र्य याबाबतीत भारतीय स्त्रीला मिळावे म्हणून प्रयत्नशील आहेत.

असं म्हणतात की तुम्ही भारत सोडला तरी भारत तुम्हाला सोडत नाही. डॉ. लता लाभसेटवार यांच्या बाबतीत हे शंभर टक्के खरे आहे. लतामॅडम या मुळच्या सोलापूरच्या. जन्म १९३९ चा. साध्या मध्यमवर्गीय संयुक्त कुटुंबात त्या लहानाच्या मोठ्या झाल्या. चार काका व त्यांची कुटुंब हे सगळे एकत्रच राहत. मोटारीचे स्पेअरपार्ट विकणे बरोबरीने रेडिओ विकणे हा सामूहिक व्यवसाय पूर्ण कुटुंबातील सदस्य सांभाळायचे. पण मुख्य धुरा लता मॅडमच्या वडिलांवर होती. लता धरून सख्खी पाच भावंडं होती. दोन मोठ्या बहिणी मग लता आणि त्यानंतर दोन छोटे भाऊ.

घर वैश्यवाणी. शिक्षणाची परंपरा नाहीच. आई-वडील दोघेही शिकलेले नव्हते. पण वडिलांना धंद्याचं बाळकडू लहानपणीच मिळाले होते. घर पक्कं रूढीवादी आणि पारंपरिक. दोन्ही मोठ्या बहिणी जेमतेम आठवी-नववीपर्यंत पोहचल्या. पण लता मॅडम लहानपणापासून अभ्यासात हुशार होत्या. विज्ञान विषयाची पहिल्यापासून आवड. त्यामानाने भाषेत गती कमी होती. पूर्वी अकरावी मॅट्रिक होती. त्यांना मॅट्रिकला उत्तम गुण मिळाले. संगमेश्वर कॉलेजमध्ये सायन्सची दोन वर्ष त्यांनी पूर्ण केली. विज्ञानशाखेत प्रवेश घेणे हे अपरिहार्यच होतं. कॉलेजमध्ये दुसऱ्या वर्षाला त्या पुणे विद्यापीठात पहिल्या आल्या. आणखीन एक कोणी उत्तर भारतातील मुलगी होती. तिलाही तेवढेच गुण मिळाले. त्यामुळे त्यांना बक्षिसाची रक्कम विभागून मिळाली. जर लताने वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश घेतला तरच त्यांना एक हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार होती. घरचं कर्मठ वातावरण. त्यात मुलीचा जन्म. वडिलांनी साफ नकार दिला. प्रवेश सहजशक्य असताना वडील मुलीला पुढे शिकवायला तयार नव्हेत. शेवटी देगावकर काका, चंडककाका आणि मुरारकाका या वडिलांच्या मित्रांनी मध्यस्थी केली आणि लता मॅडमचा पुण्याच्या बी.जे. मेडिकल कॉलेजात प्रवेश सुकर झाला.

पुढे मात्र वडील वरचेवर लताला भेटायला तिच्या हॉस्टेलवर जात. डॉ. लतांची प्रगती बघून त्यांना खूप आनंद होत असे. वडील स्वतः धडाडीचे होते. स्व-कर्तबगारीने त्यांनी स्वतःचा आणि भावांचा संसार सांभाळला होता. ते अभिमानाने लताला म्हणत, ''माझं सगळं तुझ्यात आलंय.''

१९६४ मध्ये लता यांना एम.बी.बी.एस.ची पदवी मिळाली आणि त्याची इंटर्नशीप सुरू झाली. त्याचवेळी लग्न झालेल्या मोठ्या बहिणीच्या नातेवाईकांकडून त्यांच्याकरिता लग्नासाठी प्रस्ताव आला. नाही म्हणायचा प्रश्न नव्हताच. मुलगा म्हणजे अनंत लाभसेटवार हे त्यावेळी अमेरिकेत पीएच.डी. संपवून 'पोस्ट डॉक' करीत होते. लगेचच बोलणी झाली आणि २५ जुलै १९६३ ला डॉ. लता, डॉ. अनंत लाभसेटवार यांच्याबरोबर अमेरिकेतील ओहोया राज्यात पोचल्या.

सोलापूर ते थेट अमेरिका हा धावपट त्यांच्यासाठी सुद्धा खूप मोठा होता. पण पतीचे शिक्षण पूर्ण झालं की भारतात परत यायचे हे ठरले होते. हातात जो कालावधी होता तो सत्कारणी लावण्यासाठी त्यांनी अमेरिकन वैद्यकीय व्यवस्थेचा आढावा घेतला. आंतरिक उर्मी त्यांनी स्वस्थ बसू देत नव्हती. मग कळले की वैद्यकीय क्षेत्रात काम करायचे किंवा पुढे शिक्षण घ्यायचे तर पुन्हा अमेरिकेत नव्याने इंटर्नशीप करावी लागणार. कमी कालावधीत पूर्ण होणारे स्पेशलायझेशन होते ते म्हणजे पिडिॲट्रीक सर्जन (बालरोग तज्ज्ञ). तिथे त्यांनी फॉर्म भरला पण हे क्षेत्र त्यांना अजिबात खुणावत नव्हतं. शेवटी त्यांनी OB-GYN (Obstetrics & Gynecology) साठी प्रवेश घेतला. OBG किंवा OBGYN या नावाने ही शाखा वैद्यकीय क्षेत्रात ओळखली जाते. या तीन वर्षांच्या कोर्सला त्यांनी प्रवेश घेतला. परंतु इतक्या कालावधीसाठी अमेरिकेत राहाण्याची त्यांना परवानगी नव्हती. 'Part - I केल्यावर तुम्हाला देश सोडावा लागेल' अशी सूचना त्यांना अमेरिकन वकालतीकडून मिळाली होती. नेमकी त्याच वेळी पती अनंत लाभसेटवार यांना फोर्ड फाउंडेशनची एक मिलियन डालरची ग्रँड मिळाली. भारतात परतायचा दोघांचा विचार पक्का होताच. त्याच कालावधीत नॉर्थ वेस्ट इंग्लंडमध्ये अनंत लाभसेटवार यांना आय.सी.आय. रिसर्च फेलोशीप मिळाली आणि अडीच वर्षांसाठी डॉ. लता पतीबरोबर इंग्लंडला आल्या.

इंग्लंड आणि अमेरिका यांच्यातील सामाजिक व्यवस्था यात प्रचंड तफावत आहे. अमेरिकेत वंश, देश, रंग यांच्या पलीकडे जाऊन तुम्ही स्वबळावर सहज मोठी झेप घेऊ शकता. पण इंग्लंडम ध्ये मात्र वंश, देश, रंग या आधारावर सर्रास भेदभाव केला जातो. त्याआधारे सक्षम व्यक्तीला पुढे जाण्याची संधी नाकारली जाते. या भयानक वास्तवाने डॉ. लता प्रचंड अस्वस्थ झाल्या. भारताकडून ग्रँटविषयी कुठलाही मोठा प्रस्ताव मिळत नव्हता. त्यामुळे अखेर अनंत लाभसेटवार हे पुन्हा अमेरिकेत व्हुस्टर (Worcester) मॅसेच्युसेट या ठिकाणी 'रिसर्च सायंटिस्ट' म्हणून रुजू झाले. अमेरिकेत वैद्यकीय व्यवसायात काम करण्यासाठी लता मॅडमना 'लायसन्स एक्झामिनेशन' देणे भाग होते. ती तीन दिवसांची परीक्षा त्या बॉस्टनला जाऊन देऊन आल्या. या परीक्षेच्या आधारे शेवटी त्यांना फॅमिली क्लिनिकमध्ये नोकरी मिळाली. प्रत्यक्ष प्रॅक्टिस कुठे करता येऊ शकेल या शोधातून लतामॅडमना शेवटी मिड वेस्ट भागात केनसास स्टेट युनिव्हर्सिटी (KANSAS STATE UNIVERCITY) जवळ ही संधी मिळली. लतामॅडमना मिळणारी संधी व कामाचा आवाका बघून अनंत लाभसेटवर यांनी आपली नोकरी सोडून सरळ त्याच केनसास विद्यापीठात प्राध्यापक म्हणून जबाबदारी स्वीकारली. इतका मोठा भक्कम आधार जेव्हा स्त्रीला पतीचा, कुटुंबाचा मिळतो तेव्हा ती आकाशात उंच झेप सहजपणे घेऊ शकते याचं उत्तम उदाहरण म्हणजे लताबाईंचं कुटुंब. तीन मुली पदरात असताना

घरची बरीचशी जबाबदारी पतीने सांभाळली त्यामुळे मग आपल्या वैद्यकीय व्यवसायात सर्वस्वी झोकून देणे लतामॅडमना शक्य झाले. अनंत लाभसेटवारांच्या या निर्णयामुळे कौटुंबिक जबाबदाऱ्यांमधून त्या थोड्या प्रमाणात मुक्त झाल्या. घरी 'आनंद' होताच. कामातही आता आनंद मिळू लागला. या नवीन हॉस्पिटलमध्ये लता मॅडमने अल्पावधीत इतके यश मिळवले की नऊ महिन्यांत त्यांनी स्वत:ची प्रॅक्टिस सुरू केली. जंक्शन सीटी, कॅनसास हे छोटेसे ३०,००० लोकवस्ती असलेले गाव होते तरी जवळच मोठी लष्करी छावणी होती. तिथे नेहमीच डॉक्टरांची कमतरता असायची. त्यामुळे त्यांच्या हॉस्पिटलमधून बरेच रुग्ण लता मॅडमकडे पाठवले जायचे. शिवाय युनिव्हर्सिटी व परिसराची एकूण लोकसंख्या १,००,००० होती. तिथले रुग्णही लता मॅडमकडेच यायला लागले. हाताला गुण होताच. बघता बघता व्यवसाय बहरला. नामांकित स्त्री रोग तज्ज्ञ म्हणून त्यांना आसपासच्या भागातील लोक ओळखायला लागले. या छोट्या गावात मदत लागली तर इतर डॉक्टर त्यांना उपलब्ध नव्हते. फक्त दोन फॅमिली फिजिशियन होते पण पदव्युत्तर पदवी प्राप्त केलेले वैद्यकीय व्यावसायिक आसपास नव्हते. त्यामुळे स्वबळावर एकटीनेच त्यांनी हॉस्पिटलचा गाडा हाकायला सुरुवात केली. अमेरिकेत शिकत असतानाच विद्यार्थ्याला सगळ्या गोष्टींचे प्रशिक्षण मिळते. पण भारतात तसे नसते. त्यामुळे इथे प्रत्येक गोष्ट त्यांना अनुभवातून शिकावी लागली. एकीकडे स्व-अध्ययन दुसरीकडे रुग्ण आणि हॉस्पिटलचे व्यवस्थापन या तारेवरच्या कसरतीमध्ये त्यांची दमछाक होऊ लागली. शेवटी लताबाईंची ही अवस्था बघून अनंत लाभसेटवार यांनी प्राध्यापकीला कायमचा रामराम ठोकला आणि ते पूर्ण वेळ हॉस्पिटल व्यवस्थापन सांभाळू लागले. लता मॅडम आदराने म्हणतात की, "डॉलर-रुपयाचा विनिमय दर सुद्धा मला ठाऊक नसायचा. पण मला आर्थिक बाबी कधीच सांभाळाव्या लागल्या नाही. म्हणून पूर्णपणे रुग्ण एके रुग्ण आणि रुग्ण दुणे हॉस्पिटल हे मी सहजपणे करू शकले." कॅनसासमध्ये त्या सतरा वर्षे राहिल्या. नामांकित डॉक्टर म्हणून प्रस्थापित झाल्या.

पण त्यांचा अंतरात्मा मात्र स्वस्थ नव्हता. फक्त स्त्रियांच्या डिलिव्हरीज करत राहायचं याच्या पलीकडे काहीतरी करण्याची त्यांची इच्छा होती. ज्यावेळी मुलीच्या लग्नासाठी एक दिवसच न्यूयॉर्कला जायचे होते तरी ज्याच्यावर पूर्ण प्रॅक्टिस सोपवून जाऊ शकू अशी एकही सक्षम व्यक्ती तिथे नव्हती त्यावेळी त्या अंतर्मुख झाल्या. त्या गावातच अडकून पडल्या होत्या. यातून जर बाहेर पडायचे आहे तर आपल्याला या छोट्या गावातून बाहेर पडले पाहिजे हा त्यांचा निर्धार पक्का झाला. तशी संधी लवकरच त्यांच्यापुढे चालून आली. ओहायो राज्यातील टोलीडो (Toledo) इथल्या एका मोठ्या हॉस्पिटलला स्त्री-रोगतज्ज्ञाची आवश्यकता होती. तिथे आधीच सहा पुरुष डॉक्टर होते. त्यांना प्रकर्षाने स्त्री डॉक्टरच हवी होती. या हॉस्पिटलमध्ये इतर अनेक तज्ज्ञ विविध विभागांत काम करत होते. त्यामुळे विचारांची देवाण-घेवाण होऊन नवीन ज्ञानाची कवाडं उघडण्याची शक्यता दाट होती. स्वत:च्या कामाचा, बुद्धीचा विस्तार करायचा तर आव्हान स्वीकारणे भाग होते. खूप विचारांती शेवटी त्या ओरिगॉन, ओहोयो (Oregon, Ohio) इथे रुजू झाल्या. इथे मात्र निव्वळ 'डिलिव्हरी करणे' याच्या पलीकडे त्यांना जाता आलं. स्त्री-आरोग्य, संतती नियमन, अस्थि स्वास्थ्य, स्त्रियांची पाठदुखी, अस्थिभंग, मधुमेह, हायपर टेन्शन, स्तनाचा कर्करोग या वेगवेगळ्या विषयांचा आवाका त्यांना समजून घेता आला. याही सर्व विषयांत त्या पारंगत झाल्या. भारतीय ज्ञान आणि अमेरिकन ज्ञान यांच्या संयोगाने त्यांनी रुग्णांवर केलेले उपचार प्रचंड यशस्वी झाले. स्त्री आरोग्य, त्यातली गुंतागुंत यावर त्यांनी प्रामुख्याने काम केले. मग पुढची २२ वर्षे त्यांनी याच ठिकाणी आपल्या आयुष्याचे केंद्रस्थान निर्माण केले.

या कालावधीत 'अनवॉन्टेड प्रेग्नंसी'च्या संदर्भात त्यांनी प्रचंड काम केले. दहा वर्षांचा गाढा अनुभव, त्यासाठी केलेल्या उपाययोजनांचे पुरावे असा सगळा अनुभव घेऊन त्या आता दरवर्षी भारतात येतात. भारतात गर्भपात आणि स्त्रीभ्रूणहत्या या गोष्टी परस्परांशी कुठेतरी जोडल्या जातात. खरंतर या भिन्न बाबी आहेत. त्या दोन गोष्टींची सामाजिक व सांस्कृतिक कायदेशीर पार्श्वभूमी भिन्न आहे. त्यामुळे गरज असून सुद्धा गर्भपाताला कायदेशीर परवानगी मिळत नाही. मग दुर्दैवाचे दशावतार घेऊन स्त्रिया आयुष्यभर खितपत पडतात. भारतीय स्त्रियांची ही गतानुगतिकता डॉ. लता लाभसेटवार यांना प्रचंड अस्वस्थ करते. अमेरिकेतील आपल्या ज्ञानाचा उपयोग अडलेल्या स्त्रियांसाठी व्हावा, यासाठी डॉ. लता लाभसेटवार प्रयत्नशील आहेत. नको असलेल्या गर्भारपणातून मुक्त होऊ पाहणाऱ्या बायका अघोरी उपायांकडे वळतात अशा बायकांना त्यापासून परावृत्त करावे, एकूणच स्त्री-आरोग्याचा जागर ग्रामीण भागात निर्माण करावा या हेतूने त्या दरवर्षी भारतात येतात. पुण्याजवळ वाघोली, सनसवाडी येथे डॉ. सरिता व्यवहारे, डॉ. रोहिणी मटे, डॉ. प्रशांत मटे यांच्याबरोबर विनामूल्य सेवा देतात. स्वत:च्या तीन मुली आणि आठ नातवंडं असा प्रचंड गोतावळा असताना सुद्धा आवर्जून महिना-दोन महिने भारतात स्वखर्चाने येतात व स्त्रियांवर मोफत उपचार करतात. गर्भपाताचा सोपा मार्ग उपलब्ध असताना भारतासारख्या गरीब देशात महागडे उपचार स्त्रियांवर का लादले जातात? हा त्यांना पडलेला प्रश्न आहे. या उपाययोजनेत गोळी एकदाच घ्यावी लागते. कोणतीही शस्त्रक्रिया केली जात नाही. कोणतीही महागडी यंत्र, उपकरणं लागत नाहीत तरीही आपल्याकडे सरसकट सगळ्याच स्त्रियांना अल्ट्रा साउंडची सक्ती का केली जाते याचे कोडे त्यांना उलगडत नाही. अत्यंत उद्विग्न होऊन त्या विचारतात की "हे अज्ञान आहे की कट प्रॅक्टिसची अपरिहार्यता?"

सत्तरीनंतर बहुतांश व्यक्ती वार्धक्याच्या ओझ्याने वाकून जातात. पण आज सत्याहत्तर वर्षांच्या लता मॅडम मातीचं ऋण फेडण्यासाठी दरवर्षी भारतात येऊन स्त्री आरोग्यावर काम करताहेत. त्यासंदर्भात जागृती निर्माण करण्यासाठी ग्रामीण भागात पोहचताहेत ही खरोखर उल्लेखनीय गोष्ट आहे. छोट्या गावातून सुरू झालेल्या त्यांच्या या कार्याला व्यापक रूप मिळो हीच सदिच्छा.

**– डॉ. लतिका भानुशाली**
भ्रमणध्वनी : ९३२२२०७८७८
latikabhanushali@yahoo.co.in

महिलादिन विशेषांक

प्रत्येक स्त्रीचं आयुष्य ही स्वतंत्र चळवळ व स्वतंत्र कादंबरी आहे, असं मानणाऱ्या या निर्भीड लेखिका व कवयित्रीची ही सर्जक वाटचाल...

मल्लिका अमरशेख



# जे बोलत नाहीत, लिहीत नाहीत, त्यांचा आवाज...

**ख**रोखरच कठीण आहे स्वत:ला तपासणं त्यापेक्षा लिहिणं सोपं असतं. माझ्या साहित्यात म्हणजे कविता-कथा-नाटक-फिल्म-बतावणी-लोकनाट्य-गाणी या सर्वांमध्ये मी जे काय लिहिलं त्यातल्या लाखो स्त्रिया-त्यांचे चेहरे-त्यांचं असणं मला आता आठवतही नाही - त्यातली स्त्री लिहिताना 'ती' त्यातली 'मी' ही अंशत: जिवंत होतो. आता तो भूतकाळ. भूतकाळ पुन्हा जिवंत करण्यापेक्षा वर्तमान-भविष्य जगणं सोपं न् प्रॅक्टिकलही.

'नैनं छिदन्ति शस्त्राणि' या लघुकादंबरीतली कादंबिनी ही व्यक्ती स्त्री म्हणून पूर्णत: स्वतंत्र माझी निर्मिती! अगदी जाज्वल्य अभिमानासह माझ्या मेंदूत रूतून बसलेली स्त्रीची सार्वभौम प्रतिमा! इतर सर्व स्त्रिया यामध्ये अन् तिच्यात फरक हा आहे की इतर सर्व स्त्रियांत जगभरातल्या किंवा आयुष्यात मला भेटलेल्या स्त्रियांचे चेहरे आहेत. पण ती एकटीच अशी की पूर्णपणे स्वतंत्र!

मला लहानपणापासून जे स्वातंत्र्य मिळालं त्यात सर्व तऱ्हेच्या स्त्रिया भेटल्या. खेडेगावातल्या स्त्रियांपासून कामाठीपुऱ्यातल्या चेहऱ्यावर स्मशान गोंदवलेल्या स्त्रिया-राजकारणातल्या बेरकी स्त्रिया-साहित्यात-कलाक्षेत्रात न् अगदी मध्यमवर्गीय स्त्रिया - सगळ्याच - या सर्वांना मी जेवढी वाचत गेले तेवढी श्रीमंत होत गेले.

*'स्वातंत्र्य हे अजून कुठल्यातरी साखळीचं नाव असतं*
*स्त्रीत्व : होऊन जातं एक भला थोरला पाळीव कुत्रा*
*इमानी डोळ्यांचा*
*स्त्रीत्व : जे खाऊन टाकतं स्त्रीला हळूहळू चवीनं*
*ज्याला हरकत घेत नाही कुठलीच स्त्री!'*
*असं माझ्या कवितेतली स्त्री म्हणते. पण ती असंही म्हणते*
*'माझ्या नवऱ्याला वाटं*
*की मी त्याच्यावर खूप खूप प्रेम करतेय*
*मी त्याचा हा भ्रम तोडत नाही..'*
*न् असंही-*
*'मी एक स्त्री*
*ग्रीकमधली की अमेरिकेतली की आफ्रिकेतली*
*काय फरक पडतो यानं?*
*गर्भाशय असणारच कायम*
*न् स्त्रीत्वाबरोबर चिकटून असलेलं दु:ख*
*एकटेपणाचे विव्हळणारं जखमी श्वापद*
*जगभरातल्या बायका या श्वापदाबरच स्वार होऊन हिंडतात*
*अज्ञान न् दु:खाचे हजारो बुरखे*
*घालून त्या दडवून ठेवतात हातात विजेचा चाबूक*
*कधी त्या हरीण होतात कधी पारधी-'*

- मला वाटतं लेखकाला परकायाप्रवेशाची सिद्धी प्राप्त असावीच लागते, त्याशिवाय त्या त्या व्यक्तीचे भोग तो कसं समजणार?

मी स्त्री आहे म्हणून स्त्रीबद्दल लिहिते असं नाहीय हे प्रथम मला सांगावंच लागेल न् वाचकालाही ते मान्य करण्यावाचून गत्यंतर नाहीय. लेखक हा वाहक आहे. दुसऱ्याच्या दु:खांची ओझी-प्रश्नांचा बोझ-एकटा एकाकी असला तरी त्याला पूर्ण कळपाचा आवाज व्हावं लागतं-जगात घडणाऱ्या प्रत्येक घटना-आयुष्य-दु:ख यांची नोंद ठेवणारा या जगातल्या स्वर्गनरकाचा तो चित्रगुप्तच जणू काय.

माझ्या कित्येक कविता पुरुषवाचकही आहेत. 'हॅण्डल विथ केयर' हे तर पूर्णपणे पुरुषवाचक आत्मचरित्र आहे. त्या पुस्तकातली स्त्री ही खास पुरुषाच्या नजरेतून आलेली आहे. श्रीमंत बापाची लठ्ठ बथ्थड मुलगी - नाईलाजानं केलेल्या लग्नामुळे अर्थातच तिला कसंही वागवण्याचा परवानाच मिळालेला नवरा... पण

तिचाही उद्रेक होतो.

कसायाच्या मागं चाललेल्या निमूट खाली मान घालून चाललेल्या बकऱ्यागत स्त्रिया हे चित्र समाजात असताना मनाला यातना होतात; खैरलांजी ते दिल्ली न् मुंबई गावापासून महानगरापर्यंत बाईची धिंडका - लेखणी पिस्तुल म्हणून वापरू शकत नाही - न् लेखणी जरी शस्त्र असलं तरी ते इथल्या मुर्दाड मनाच्या गेंड्याच्या कातडीच्या पुरुषसुक्ताला धक्काही पोचवू शकत नाही तेव्हा आपल्या या लिखाणातून कितीही बंडखोर स्त्री दाखवली तरी ते अरण्यरूदनच ठरेल असं वाटून कधी कधी तीव्र डिप्रेशनही येतं. हेमिंग्वे-चेकोव्ह हे साक्षात लढाया लढले - मरणाच्या दारापर्यंत जाऊन परतले - आताचे तस्लिमा नसरीन न् सलमान रश्दी न् ज्यांच्या लिखाणावर बंदी घातली न् साहित्यिक आत्महत्या करायला भाग पाडलं ते साऊथचे मुरूगन् हे सर्वच शब्दांसाठी मरणाला - रोजच्या जिवंत मरणाला सामोरं जाताहेत.. त्यापेक्षा आपण बरे की भेकड की चामडीबचाव? हा एक प्रश्नच आहे.

- माझ्या लिखाणातली स्त्री ही खलनायिका नाही. पाताळयंत्री-कारस्थानी-हिंसक नाही.. ही माझ्या पिंडाची स्वभावधर्मामुळे आलेल्या वृत्तीची उणीवच म्हणायची की मी स्त्री आहे म्हणून स्त्रीला झुकतं माप देतेय? जसं बॅकलॉग भरून काढायचं तसं आम्हाला यूज करताय का? ठीक आहे - मग आम्हीही तुम्हाला यूज करू. म्हणजे थोडक्यात स्त्री-पुरुष ही निसर्गाची लाडकी लेकरं एकमेकांचे सहप्रवासी बनण्याऐवजी प्रतिस्पर्धी होताहेत.

स्त्रियाही खलनायिका असू शकतात - प्रत्येक हुंडाबळी गेलेल्या बाईची सासूही कारस्थानी, खलनायिका असते. पुरुषांच्या तोडीस तोड राजकारण करणाऱ्या पाताळयंत्री स्त्रिया असतातच की. केवळ बदनामी व समाज भयापायी लहानग्या कर्णाला समुद्रात लोटून देणारी पहिली कुमारीमाता कुंती तिला मी कोणत्या रंगाने रंगवीन?

वर्षानुवर्ष आमच्यावर अन्याय झाला म्हणून आम्हीही थोडासा अन्याय करू असं म्हणणं किती बरोबर? लेखकानं जज् व्हावं का फिर्यादीचा वकिल व्हावं? आपण त्याला लायक आहोत का? हे सगळे प्रश्न येतात जेव्हा आपण कोणत्या एका पक्षाच्या बाजूचे असू तर.

- मी एक मानवी अस्तित्व आहे न् मला लिहिता येतं हीच एक गोष्ट बरी आहे.

- दरवर्षी पाळणा हलणं हेच बरोबर न् सती जाणं हेही बरोबर, या कालखंडात मी जन्माला आले नाही हीही एक चांगलीच गोष्ट की.

- बाईच्या बाजूनं लिहिण्याचं स्वातंत्र्य अजूनतरी मला आहे ही तर फारच भन्नाट गोष्ट. त्याबद्दल कुणाला धन्यवाद द्यावेत याबद्दल मी बुचकळ्यात पडलेय.

- माझं एकूणच साहित्य वाचून कुणीही माझं साहित्य हे 'ही बया पक्की फेमिनिस्ट आहे' या कप्प्यात टाकेल. (विशेषत: माझ्या आत्मचरित्रानंतर तर बाकीच न वाचताही जाहीर करेल.)

- पण 'जे आहे ते असं आहे' हे सांगणं म्हणजे मी फेमिनिस्ट आहे असं नाही. मी तर उंदीर-मांजर-पक्षी-झाड यावरही कथा-कविता लिहिल्यात तर मग काय समस्त प्राणीवर्गानं त्वरित मला त्यांच्यागत किंवा पर्यावरणवाद्यांनी मला अध्यक्षच करायला हवं या न्यायाने. 'जे बोलत नाहीत, लिहीत नाहीत त्यांचा आवाज व्हायला मला आवडेल' एवढीच माझी भूमिका आहे.

न् आजवर लिहिल्या गेलेल्या लिखाणाबद्दल मी पूर्णपणे समाधानी नाही विशेषत: कथांमधल्या स्त्रियांच्या बाबतीत असं मी आत्मपरीक्षण करेन. त्याऐवजी रवींद्रनाथ टागोरांच्या कथांमधल्या स्त्रिया न् इस्मत चुगताई न् अमृता प्रीतम यांच्या कथांमधल्या स्त्रिया या मला प्रचंड जिवंत प्रत्ययकारी वाटतात. कदाचित मी आजवर स्त्रियांना आरपारच पाहिलं असेल! सगळ्या भेटलेल्या स्त्रियांचे छोटे छोटे तुकडेच मी वेचले. तिचा आत्मा मी कितपत टिपला कोण जाणे. मी तिला उंच केलं 'तिनं असं असावं' हे दाखवलं. नार्सिसस जसा स्वत:च्याच प्रेमात पडला तशी मी जगभरातल्या स्त्रीत्वाच्या प्रेमात पडले! मी स्वत:वर स्वत:च्या स्त्रीत्वावर आयुष्य जगावर, निसर्गावर निहायत प्रेम करते न् त्याचं प्रतिबिंब साहित्यात उमटतं-उमटणारच ना! मला स्वत:च्या स्त्रीत्वाचा सार्थ अभिमान आहे. पण त्याचा फायदा मी घेत नाही-घेतला नाही-घेणारही नाही. पण जसं हिंदी-इंग्लिश चित्रपटात परग्रहावरले सगळे जीव विद्रूप, कुरूप, बेढब दाखवतात आणि मानवमात्र हिरो तद्वत माझ्या कथा-कवितात बाई ही सुंदर, बुद्धिमान अगदी खेडवळ असली तरी संवेदनाक्षम आणि पुरुष सर्वअवगुणसंपन्न! कदाचित हा माझ्या कथा-कवितेतला सर्वात वीकपॉईंट असावा! मात्र दु:खाच्या बाबतीत माझ्यातल्या लेखकानं डावं-उजवं केलं नाही. सर्वसमानभाव..! पुरुष-स्त्री-झाड-पक्षी-उंदीर सर्वांना दु:ख-सर्वांना प्रश्न-सर्वांना भय-सर्वांना शोध घेण्याचा सनातन शाप-

माझ्या 'शरीर' या कथेतली 'रागिणी' रागिणी नाही! लग्नानंतरच्या घटनेनंतर कळतं की तिचं जेण्डर पुरुष आहे! ऑपरेशननंतर रागिणीचा रमेश होतो! नवरा तिला दूर सॅनिटोरियममध्ये सोडून येतो. 'रागिणी' असताना तिचा बॉस तिच्यावर रेप करण्याचा प्रयत्न करतो न् आता 'रमेश' असताना तिला नोकरी मिळत नाही. म्हणजे काय तर स्त्री असतानाही प्रश्न दु:ख न् पुरुष असतानाही! न् रमेश रागिणीचं एक कोरं अस्तित्व आत्महत्या करतं!

तर हे जे काय आहे. कुठल्याही सजीव अस्तित्वाचं दु:खभान हे माझ्या लिखाणाचा बेस आहे.

द्रौपदी पाच पती असताना भरदरबारात तिचं वस्त्रहरण केलं जातं ही विटंबना हे दु:ख भयंकर की कर्णाचं अवघं आयुष्य भयंकर? अंबालिका ते शिखंडी न् भीष्म हा सूडप्रवास भयंकर की अथपासून इतिपर्यंत स्त्री न् स्त्रीच्या शरीरामुळेच आजवरची युद्ध न रामायण-महाभरात घडलं हे खरं की मी अर्जुन आहे हे खरं?

ऐन युद्धाच्या वेळी ज्याला कळेना कुणाची बाजू घ्यावी तसंच

तर माझं झालं आहे का? मी जगभरातल्या स्त्रीची बाजू घेऊ की पुरुषाची की जगभरातल्या सकल सजीवांची? सजीव प्राणिमात्रात काही किटक जातीत मादी संग पार पडल्याबरोबर नराला खाऊन टाकते तर माशांमध्ये काही नर अंडी सांभाळत बसतो. श्रेष्ठ कोण, कनिष्ठ कोण हे कोण ठरवणार? दु:खाचा निवाडा करण्याचे निकष काय? मी स्त्रीचा शोध फक्त घेत नाही तर सर्व जगभरातल्याच सजीव प्राणिमात्राचा शोध हे आपलं काम असायला हवंय. हा शोध दु:खाचा-प्रश्नांचा-विचारांचा-आयुष्याचा-सत्वाचा-तत्त्वाचा-मूल्यांचा-संवेदनशीलतेचा-मनाचा-थेट आत्म्यापर्यंतचा शोध असायला हवा. मी तो तसा करतेय का हाच महत्त्वाचा प्रश्न. शरीरापलीकडचं आपलं असणं हे जितकं खरं तितकं शरीराचं भानही भयानकच. ज्या शरीरसंबंधामुळे वंश वाढतो त्यासाठीच जणू काय लग्न ठरवली जातात. आईपणा हाच एकमेव निकष सर्वश्रेष्ठ मानला जातो तोच शरीरसंबंध मर्जीविरुद्ध झाला की जिवंतपणे मरणयातना. मूल होण्यासाठी निमित्त असलेला नवरा मूल हवं म्हणून हिंसक होऊ शकतो. या सगळ्या गोष्टी फक्त स्त्री आई होऊ शकते म्हणूनच. प्रत्येक स्त्रीचं आयुष्य ही एक स्वतंत्र चळवळ न् एक स्वतंत्र कादंबरी आहे असं मला वाटतं. आणि माझ्या साहित्यात त्याचं किती प्रतिबिंब पडलंय हे मी सांगण्यापेक्षा वाचकानंच सांगितलं तर बरं.

उलटपणी आता खेडेगावातली स्त्रीपण लिहिता-वाचताच काय मोबाईलवर मेसेजपण देणारी झालीय. जात्यावरच्या तिच्या ओव्या गेल्या पण स्वत:च्या आयुष्याची गावातल्या बायांची कथा लिहिणं तिला का जमत नाही हा एक कळीचा मुद्दा जाता जाता उपस्थित करावासा वाटतो.

**– मल्लिका अमरशेख**
भ्रमणध्वनी : ९१६७२३१७५५
malikaamarshaikh97@gmail.com

**ग्रंथाली**

## 'मराठी भाषा दिना'निमित्त विश्वकोशाचे २० खंड भेटकार्ड स्मृतिशलाका स्वरूपात...(व्हिजिटिंग कार्ड पेनड्राईव्ह)





महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे सर्व २० खंड त्यातील ३१२ सूची आणि १८१६३ लेख महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने तयार केलेल्या २० मराठी विश्वकोश हे आता सर्व जगभरातील चोखंदळ मराठी प्रेमींसाठी पेन ड्राईव्हवर उपलब्ध करून देण्यात येत आहेत. 'ग्रंथाली' आणि 'बुकगंगा.कॉम' यांच्या तंत्रज्ञान आणि वितरण साहाय्याने हा पेनड्राईव्ह आपणाला अत्यल्प किंमतीत (रुपये ८००) उपलब्ध करून दिला आहे. विद्यार्थी, शिक्षक, शाळा, महाविद्यालये आणि समस्त मराठी प्रेमींनी या अनोख्या संधीचा लाभ घेऊन आपल्या मराठीच्या जागरात सहभागी व्हावे. या पेनड्राईव्ह मधील विश्वकोशाचे अॅप्लिकेशन विन्डोज बेस कॉम्प्युटरवर, लॅपटॉपवर इन्स्टॉल करून युनिकोड फॉंट स्वरूपात वाचता येईल.
खंडामधील संपूर्ण सूची, विविध नोंदी, विषयवार नोंदी शोधण्याच्या विविध सुविधा यात उपलब्ध आहेत.

■ पेन ड्राईव्ह ८०० रुपयांत, टपालखर्च ५० रुपये.
■ पहिल्या १०० विद्यार्थ्यांना गुलजार यांचा बोस्की ९ पुस्तकांचा संच (मूळ किंमत १०००/- रुपये) व ८००/- रुपयांचा पेन ड्राईव्ह हे १८०० रुपयांचे साहित्य सवलतीत फक्त १२००/- रुपयांत. टपालखर्च २०० रुपये.
■ पहिल्या १०० वाचकांना संकल्पना कोशाचे ५ खंड (मूळ किंमत ३२००/- रुपये) सवलतीत ३००० रुपयांत. या खंडांबरोबर ८००/- रुपयांचा पेन ड्राईव्ह मोफत दिला जाईल. टपालखर्च २०० रुपये.
■ या २ सवलत योजना 'मराठी भाषा दिना'निमित्त 'ग्रंथाली'ने जाहीर केल्या आहेत.

हा विश्वकोश www.bookganga.com या साईटवर उपलब्ध आहे किंवा एक फोन ८८८८ ३०० ३०० या नंबरवर / 'ग्रंथाली' कार्यालय फोन – २४३०६६२४ (granthali02@gmail.com) करून आपणाला या पेनड्राईव्ह विश्वकोशाची नोंदणी करता येईल.

रोहन प्रकाशन

# आता नवा ४था भाग...




निखळ आनंद देणाऱ्या व मती गुंग करून टाकणाऱ्या उत्कंठावर्धक रहस्यकथा

## व्योमकेश बक्षी
## रहस्यकथा

नव्या ४थ्या भागात
वेगळ्या कथा

लेखक : **शरदिन्दु बंद्योपाध्याय**

अनुवाद : सुनीति जैन

१८० पानं • किंमत रु.१६०




आधीचे **३** भागही उपलब्ध

## व्योमकेश बक्षी
## रहस्यकथा

अनुवाद : अशोक जैन

किंमत प्रत्येकी रु.१५०

**३** पुस्तकांचा संच

**रु.४००**

**रोहन प्रकाशन**

घर समृद्ध करणारी पुस्तकं

५ व ६ धवलगिरी, शनिवार पेठ, पुणे ३०
✆ पुणे २४४८०६८६ मो. ८१४९१२०२१०
✆ मुंबई २३८९२३७८ मो. ९८६९११८७६२
E-mail : rohanprakashan@gmail.com

अधिक माहितीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्या
**www.rohanprakashan.com**

महिलादिन विशेषांक

'स्त्रीस्वातंत्र्य अन् समानता' यावर ठाम विश्वास असणारं दिलीप बोरकर हे कोंकणी साहित्यातील एक प्रथितयश नाव. 'साहित्य अकादमी' पुरस्कार विजेत्या लेखकाचे हे 'गोव्यातील स्त्री'बद्दलचे हे परखड व माहितीपूर्ण विवेचन!

दिलीप बोरकर



# गोव्यातील स्त्री, तिचा गोव्यातील वावर

'**स**खी वसुंधरा' कादंबरीच्या मसुदा लेखन काळात पात्रांची आरंभीची चाचपणी करताना सतत एक प्रश्न मनात पिंगा घालायचा, वसुंधरा या मुख्य पात्राशिवाय आणखी किती पात्रांना अधिकृतपणे मसुद्यात महत्त्वाचे स्थान द्यावे..? पात्रांची कमी नव्हती कारण कादंबरीतील केंद्रस्थानी वसुंधरा असली तरी तिच्या अनुषंगाने कितीतरी इतर सख्या आपापल्या परिवेषात कथेत आपलं अस्तित्व मान्य करायला खुणावत होत्या. त्यातून कुणाला टाळायचे आणि कुणाला घ्यायचे हा नाही म्हटला तरी प्रश्न होता. पात्रांची जुळवाजुळव हा प्रकार तसा आरंभाला असतोच. आपण जे काही मांडायला घेतलेलं आहे त्याला पहिल्या प्रथमच जर एक अदृश्य कुंपण तयार करून बांधून ठेवलं तर वाहवत जाण्याचे बऱ्याचशा संभावना चुकतात. हा माझा अगदी आरंभाचा, पात्रांच्या जुळवाजुळवीच्या काळातील वावर असतो बरं का! पण एकदा लिहायला आरंभ झाला की मग कुठला आराखडा, कुठले कुंपण आणि कुठले काय? न विचारता, न सांगता एकेक पात्र सहज येत जाते, स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व ठेवून जाते आणि मग मी त्या पात्राला 'तुला मी ओळखत नाही' असं सांगूच शकत नाही. ते पात्र स्वतःची ओळख स्वतःच सांगत येते.

'सखी वसुंधरा' म्हणजे माझ्या जीवनातील ४२ वर्षातील काळाच्या प्रवासात भेटलेल्या स्त्रियांच्या स्वभावगुणांची एक गुंफण. त्यात मी किती यशस्वी झालो, किती फसलो हा गौण विषय. तो विषय काळाच्या ऐरणीवर भविष्यात येणारच आहे. परंतु १८ वर्षांचा असताना कॉलेज जीवनात विद्यार्थी चळवळीत स्वतःला झोकून दिलं आणि दिल्लीच्या जेएनयू पासून मुंबई विद्यापीठ आणि त्याला संलग्न असलेली मुंबईतील एलफिन्स्टन, रुपारेल, सोफिया आणि इतर महाविद्यालयांबरोबरच गोव्यातील सर्व महाविद्यालयांतील तत्कालीन धडाडीच्या विद्यार्थीनींशी सगळ्या क्षेत्रात अगदी जवळून संबंध आला. राजकीय बाबरात इंदिरा गांधीपासून मनेका गांधी, मार्गरिट आल्वा, शीला दिक्षित, शशिकला काकोडकर, व्हिक्टोरिया फर्नांडीस यांच्यासारख्या कित्येक स्त्रियांना अगदी जवळून पाहाण्याची संधी मिळाली. मनेका गांधी तर पणजीच्या धेंपे कॉलेजमध्येच शिकायची.

साहित्य क्षेत्रात अमृता प्रीतम, दुर्गा भागवत, महाश्वेतादेवी आणि इतर कितीतरी दिग्गज व्यक्तिमत्त्वांना अगदी जवळून पाहाता आलं. नाट्य-सिनेमा क्षेत्रातील काही आघाडीच्या व्यक्तिमत्त्वांशी अगदी छान जिव्हाळ्याचे संबंध जुळून आले, त्यांना समजून घेता आले. गोवा हा तर मुक्त जीवनशैलीच्या विदेशी ललनांच्या डेऱ्यासाठी प्रसिद्ध असलेले पर्यटन स्थळ. या पैकी कितीतरी माझ्या सख्या होत्या, आहेत. या सर्व ओळखीतून स्त्री स्वभावाचे कितीतरी पैलू मला अभ्यासता आले. स्त्री ही किती गहन असते आणि तिला समजून घ्यायला एक जन्म पुरणार नाही अथवा तो समजून घेण्याच्या ताकदी बाहेरचा विषय आहे, याचा साक्षात्कार मला झाला. या सर्व ओळखीत 'सखी' हेच एक स्त्रियांकडील नाते शाश्वत असल्याचे मला जाणवले. हेच 'सखी'गुण ठळक होत जात असतानाच 'सखी' ही इतर सर्व गुणांपेक्षा तिच्या अंगच्या क्षमाशीलतेच्या गुणांमुळेच प्रखरपणे तळपत असल्याचे मला जाणवत गेले.

स्त्री ही माता असते. माता ही माती असते. मातीतून सगळं काही रुजून वर येतं. माती म्हणजे वसुंधरा! सगळे अत्याचार, सगळे आघात सहन करते. किती युद्धे झाली आजपर्यंत या वसुंधरेस आपली मांडलिक करण्यासाठी. किती जाळपोळ, किती विध्वंस होत आला अनादिकाळापासून.. कारण काय तर फक्त मालकीहक्क प्रस्थापित करण्यासाठी. आपलं धनीपण सिद्ध करून ते गाजवण्या साठी. काय साध्य झालं त्यातून..? कुठं नेऊन ठेवलं

आम्ही वसुंधरेला..? सख्याला आपलं सर्वस्व अर्पण करण्यासाठी युगानयुगे तिष्ठत राहिलेल्या वसुंधरेला सखी मानून जर सहज जवळ केले असते तर आज वसुंधरेचे एक वेगळेच रुप आमच्या समोर उभे राहिले असते. जागतिक तापमानाची ओरड करत आम्ही होरपळलो नसतो.

नमनाला घडाभर तेलाची गरज होती का..? अशाने रसभंग होत नाही का..? नाक कुठं आणि बिळी कुठे..? पण मला वाटतं, चाकोरीतलं लिहिणं फारच झालं. मळलेल्या वाटांवरून चालत चालत एवढा काळ सरलाय की मळलेल्या वाटांना सुद्धा आता कंटाळा आला असेल! गोव्यातील स्त्री आणि त्यांचा वावर यावर दृष्टिक्षेप टाकताना सखी वसुंधरात ज्यांचा वावर आहे त्या सर्वच्या सर्व स्त्रिया गोव्यातीलच आहेत. त्यांचा वावर गोव्यातील वेगवेगळ्या क्षेत्रात होत असतो. पण सखी वसुंधरेत आलेल्या सर्वच स्त्रियांनी गोव्यात वेगवेगळ्या क्षेत्रात वावरणाऱ्या स्त्रियांचे प्रतिनिधित्व नक्कीच केलेले नाही. ज्यांनी केलेले आहे ते अगदी अत्यल्प प्रमाणात. सखी वसुंधरे भोवतीच मी भावनिकदृष्ट्या केंद्रित झालेलो असल्याने त्या ग्रहमालेतील इतर ग्रहांचा वावर तसा नगण्यच म्हणावा लागेल.

वास्तविक पाहता भारतीय मानवी संस्कृतीच्या, विकासाच्या प्रवासात आपल्याला कित्येक भारतीय स्त्रिया आपल्या कर्तृत्वासह प्रतिनिधित्व करताना दिसतात. वैदिक काळातील किती तरी स्त्रियांना आम्ही आज सुद्धा ओळखतो. गार्गी, मैत्रेयी, पथ्यवस्ती-सारख्या स्त्रियांची गणना आम्ही तत्कालीन आचार्यांशी करतो. याज्ञवल्क्य ऋषीबरोबर झालेला गार्गींचा वाद सर्वश्रुत आहे. ऋग्वेदातील काही ऋचा स्त्रियांनी रचलेल्या आहेत. आमच्या सर्व मिथकीय परंपरा सुद्धा स्त्रियांच्या खास व्यक्तिमत्त्वांचे ठसे ठेऊन जातात. आम्ही भगवान शंकराला शीघ्रकोपी मानतो. परंतु पार्वती त्याच्यावर मर्दुमकी चालवताना दिसते. महादेवाने तिला तर्क करण्याचे, हट्ट करण्याचे, चर्चा करण्याचे सर्व हक्क बहाल केलेले असतात. तिला त्याने खरं म्हणजे मुक्त स्वातंत्र्य बहाल केलेले असते. पार्वती विद्रोही असते. तिने आपले वडील हिमालयाशी विद्रोह केला होता.

सांगण्याचा मुद्दा म्हणजे भारतातील इतर सर्व राज्यातील संस्कृतीत ज्या प्रमाणे स्त्रियांनी आपला ठळक ठसा उमटविलेला आहे, तसा गोव्याच्या भूमीत मला सापडत नाही किंवा मी त्यापासून अनभिज्ञ आहे. पुरुषप्रधान संस्कृतीचा आरंभ झाल्यापासून स्त्रियांच्या वाट्याला आलेले 'रांधा, वाढा, उष्टी काढा'चे भोग काही चुकलेले नाहीत. तरीसुद्धा या चक्रातून बाहेर आलेली कित्येक नावे आम्हाला दिसतात. काश्मीरची लल्लदेद, मिथिलाची चंद्रकला, दक्षिणेतील अक्क महादेवी, महाराष्ट्रातील बहिणाबाई, जनाबाई, राजस्थानची मीराबाई-मीराबाईने तर धर्मसत्तेवरील पुरुषांच्या मक्तेदारीस आव्हान देऊन प्रश्नचिन्ह निर्माण केले होते. असा हा सगळा इतिहास माझ्या डोळ्यांसमोर असताना त्यात मला माझा गोवा कुठे डोकावताना दिसत नाही. मग प्रश्न निर्माण होतो की गोव्यातील स्त्रीने इतिहासात उल्लेखनीय असे काहीच कर्तृत्व केले नसेल का? भारतातील कित्येक स्त्रियांनी सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि इतर क्षेत्रात आपला ठसा उमटविला आणि आज वानगी दाखल त्यांच्या नावांचा उल्लेख त्या त्या क्षेत्रात केला जातो. परंतु गोव्याच्या बाबतीत मात्र या क्षेत्रात एकही उल्लेखनीय नाव दिसत नाही. काय कारण असू शकते?

असं असले तरी सुद्धा कलेच्या एकमेव क्षेत्रात गोव्यातील स्त्रियांचा आवर्जून उल्लेख केला जातो. मोगूबाई कुर्डीकर, किशोरी आमोणकर, सूरश्री केसरबाई केरकर, लता मंगेशकर आणि अशा कितीतरी संगीतरत्नांनी भारतीय संगीत क्षेत्राचा इतिहास घडविण्यात आपले योगदान दिलेले आहे. तेव्हा असा एक प्रश्न पडतो, गोव्याच्या मागच्या दोन हजार वर्षांपासूनच्या ज्ञात इतिहासात गोव्यावर चालुक्यापासून आदिलशहापर्यंत आणि शेवटच्या काळात पोर्तुगीज अशा कितीतरी साम्राज्यांनी सत्ता चालवली, परंतु त्यांच्या कारकिर्दीत कुठेच गोमंतकीय कलाकार स्त्रीचा नामोल्लेख सापडत नाही. इतर ठिकाणी अनारकली सारख्या नृत्यांगनेचा, आम्रपाली सारख्या वारांगनेचा तरी निदान उल्लेख सापडतो. चार -साडेचार शतकं पोर्तुगीज राजवट गोव्यावर होती. पोर्तुगीज हे विस्तारवादी असले तरी संगीतप्रिय होते. संगीताच्या प्रेमापोटी त्यांनी फादोसारख्या संगीत-नृत्य प्रकारास प्रोत्साहन दिले. पण ह्या चार दशकात त्यांच्या साम्राज्यात एकही स्त्री कलाकार उदयास आलेली नाही. परंतु गोव्याच्या ह्या गुलामगिरीच्या आणि दमनाच्या काळात भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्रात कितीतरी स्त्रियांनी जागतिक स्तरावर नाममुद्रा उठवली.

या अनुषंगाने मी जेव्हा गोवा आणि उर्वरित भारत याची तुलना करतो तेव्हा गोव्यातील स्त्रिया उर्वरित भारतातील स्त्रियांपेक्षा अत्याचार मुक्त होत्या, दडपण मुक्त होत्या. वानगी दाखल देवदासी प्रथेचे एकच उदाहरण देता येईल. देवाच्या सेवेसाठी स्त्रीस अर्पण करण्याची चाल गोव्यात आणि उर्वरीत भारतातच नव्हे तर जगात इतर बऱ्याच ठिकाणी होती. ग्रीक-बाबिलोनियासारख्या पुरातन संस्कृतीवरही ह्या प्रथेचा बराच मोठा प्रभाव होता. देवाची सेवा करण्यासाठी एका घरातील मुलगी देवाला दान करणे आणि नंतर देवाशीच लग्न लावून त्या देवाची आयुष्यभर सेवा करायची, हेच तिचे आद्य कर्तव्य होते. त्यातून तिची मुक्ती होत नव्हती. देवाची सेवा म्हणजे देऊळ आणि गाभारा साफ करता करता देवाच्या पालखी समोर आपल्या अंगची नृत्य अथवा गायन कला सादर करायची. त्यांना त्यांच्या अंगभूत कलागुणांमुळेच कलावंत अशी उपाधी प्राप्त झाली आणि नंतर त्याचे रुपांतर जातिव्यवस्थेत होऊन गेले. याच समाजातील अथवा जातीतील स्त्रियांनी देवाचीच सेवा करावी यावर शिक्कामोर्तब झाले. त्यात त्यांच्या स्त्रीसुलभ भावनांची, स्त्री अधिकारांची पायमल्ली झाली. देवाला अर्पण करण्यात आलेली ही देवाची दासी काळाच्या ओघात देवळाच्या पुजाऱ्यांची भोगदासी बनून गेली. देवदासी ही आपली कामभावना शमवणारी हक्काची दासी असे समीकरण देवळातील पुजाऱ्यांनी

करून घेतले आणि या स्त्रियांच्या शोषणास पारावार राहिला नाही.

परंतु गोव्यात मात्र या स्त्री समाजास कलेने मदतीचा हात दिला. मान सन्मान दिला. देवदासी, भोगदासी या संकल्पनेतून समाजाने तिला बाहेर काढून कलावंताचा मान दिला. तिच्या अंगभूत कलेची कदर केली. जगात इतर ठिकाणी ही देवदासी प्रथा अस्तित्वात असली तरी त्या प्रथेमुळे स्त्रीचे लैंगिक शोषण व्हायचे. हक्काने हे शोषण व्हायचे. परंतु गोव्यात मात्र या समाजावर अथवा व्यवसायावर कलेने पाखर धरली. कलेमुळे या स्त्रियांना समाजात मान सन्मान मिळू लागले. देवदासी म्हणून नव्हे तर कलाकार म्हणून समाज त्यांचा मान राखू लागला.

सर्वप्रथम त्यांच्यातील अंगभूत कलांना प्रोत्साहन देण्यात येऊ लागले. देवा समोरील अथवा देवीच्या पालखी समोरील कला सादरीकरण हे देवाच्या नावाने असले तरी ते उत्सवासाठी असल्याने त्याचा आस्वाद जनसमुदाय घ्यायचा. आंबटशौकिनांची कमतरता तेव्हाही नव्हती आणि आताही नाही. ही एकच गोष्ट जगाच्या नकाशावर सनातन आहे. डोळ्यांना तृप्त करण्यासाठी आसुसलेल्या आंबटशौकिनांना देवदासींच्या नृत्य अथवा गायनकलेस दाद दिल्या शिवाय पर्याय नसायचा. शिवाय गावातील प्रतिष्ठित उच्चभ्रू व्यक्तीचा वरदहस्त त्या देवदासीवर असल्याकारणांनी आणि ती व्यक्ती कलासक्त आणि कलेची जाणकार असल्याने त्याने दिलेली भर मंडपातील दाद आडनजर केली जात नसे. त्यांचीच री ओढत अरसिक सुद्धा आपल्याला कलेची जाण आहे, हे दाखवून देण्यासाठी धडपडत असायचे. या वातावरणामुळे देवदासी असली तरी कलावंत आहे याकडे कटाक्षाने पाहिले जायचे.

यातूनच देवदासीला सामाजिक सुरक्षा लाभू लागली. देवदासी ही देवाच्या नावाने काही लोकांच्या कामभावना शमविणाऱ्या भोगदासी अशी संकल्पना न राहता कलाकार म्हणून त्यांना सन्मान लाभू लागला. गावातील प्रतिष्ठित घराण्यातील पुरुषापासून त्यांना, त्यांच्या मुलाना आर्थिक आणि सामाजिक सुरक्षा लाभू लागली. उर्वरित भारतात 'रखेल' म्हणून जो एक किळसवाणा शब्दप्रयोग होता तसा संदर्भ गोव्यातील या प्रकारास नव्हता. या कलाकारांची उठबस कलेची जाण असलेल्या त्या व्यक्तिसमवेत प्रतिष्ठित घराण्यात व्हायची. त्या व्यक्तीची कायदेशीर पत्नी सुद्धा ही आपल्या नवऱ्याची 'रखेल' असे न मानता तिला आपली बहीण मानून वागवायची. त्यांच्या मुलांना आपल्या मुलांच्या बरोबरीने शिकवायची, काय हवे, काय नको हे बघायची. नामवंत कलाकार म्हणून नाव संपादन केलेल्या कलाकारांनी सुद्धा आपण मोठे झाल्यावर आपले मुळं लपविण्याचा कधी प्रयत्न केला नाही. हे सगळं घडणे शक्य झाले ते ह्या स्त्रियांच्या अंगी वसलेल्या कलेमुळे. मग ती नृत्यकला असो, गायनकला असो अथवा चित्रकला. आज गायनक्षेत्रात जगावर आपली नाममुद्रा ठसवून शास्त्रीय संगीत क्षेत्रावर अधिराज्य गाजविणाऱ्या या गोमंतकीय स्त्री कलाकारांची ओळख याच मार्गातून पुढे आलेली आहे. कविवर्य बा.भ. बोरकर यानी या विषयावर 'भावीण' नावाची एक सुंदर कादंबरी लिहिली आहे.

गोव्याच्या इतिहासात स्त्रियांची नोंद घेण्यासारखा त्यांचा हाच एक वावर ठळकपणे जगासमोर आलेला दिसतो. भारतातील इतर राज्यात स्त्रियांचा संत म्हणून वावर सुरू झालेला असताना त्याच काळात गोव्यातील स्त्रियांवर त्याचा प्रभाव पडलेला दिसून येत नाही. कारण 'संत' बनण्यामागच्या प्रक्रियेमागे समाजातील अत्याचार कारणीभूत असतात. जेव्हा समाजात अराजकता माजते तेव्हा समाजामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी संतांची मांदियाळी सुरू होते. गोव्यात पोर्तुगीज सत्ता होती तरी स्त्रियांवर अत्याचार कधी झालेला दिसत नाही. पोर्तुगीजींनी जबरदस्तीने स्त्रियांना बाटवल्याचे उदाहरण सापडत नाही. उलट संपूर्ण भारतात चालू असलेली 'सती प्रथा' सर्वप्रथम पोर्तुगीजांनी, आल्फांस द अल्बुकर्क याने १५१० च्या दरम्यान कायदा करून जबरदस्तीने बंद केली.

गोव्यातील लोककलेत गोव्यातील स्त्रियांचा असलेला वावर म्हणजे त्यांच्या अंगच्या कलागुणाचा अविष्कारच म्हणावा लागेल. लोककला ही इतिहासाचा मागोवा घेणारा दस्तऐवज असते. गोव्यात काही ऐतिहासिक कारणास्तव भाषावाद निर्माण झाला आणि मराठी आणि कोंकणी अशा वादात गोमंतकीय समाज विभागला गेला. त्या विभागणीत सत्याचा अंश असण्यापेक्षा समविचारी लोकांचा गट अशा प्रकारची ती वाद निर्माण करणारी विभागणी होती. मराठी आणि कोंकणी अशी गटविभागणी असली तरी सर्वांची आपापसात बोलण्याची भाषा मात्र कोंकणी होती. मराठी म्हणणाऱ्यांनी कितीही अट्टाहास केला तरी धालो, फुगडीसारख्या लोकनृत्यात सहभागी होताना जी पारंपरिक गाणी आहेत, ती कोंकणी असल्याने त्यांचा वापर केल्या शिवाय पर्याय राहत नव्हता. असो, 'मराठीचीच बोलु कवतुके' असे म्हणत कोणी सत्याचा स्वीकार करत तर कोणी सहभागी होण्याचे टाळत. यामुळे कित्येक शहाणे लोक लोकनृत्याच्या निर्भेळ आनंदास मुकले. पण ज्यांना या वादात रस नव्हता त्या महिला मात्र मनसोक्त धालो-फुगड्यांची गीते गात राहिल्या. भले कोंकणीत बहिणाबाई झाल्या नसतील. पण अशाच आशयाची धालो-फुगड्यांची किती तरी गाणी आणि ओव्यातील गीते कोणी तरी गात गात लोकवेदांचा खजिना भरून ठेवलेला आहे. त्यांचाच वापर करून गोमंतकीय स्त्रिया आपल्या जीवनात रंग भरत राहिल्या. त्यांनी समृद्ध जीवनाचा आस्वाद लुटला. आज धालो, फुगड्यांच्या मांडावर ग्रामीण महिला धुंद होऊन नाचतात तेव्हा त्यांच्या देहबोलीतून त्यांचे कलासक्त जीवन आविष्कारित होत असतेच आणि भर पावसात एका सुरात ओव्या गात पेरणी करताना त्यांच्या नादात आणि तालात संपूर्ण सृष्टी उल्हसित होऊन जाते.

पण हे सगळं चाललेलं होतं ते पारतंत्र्यात. सामान्य जनतेस आपला आलेला दिवस सारण्यातच समाधान होते. गोमंतकीय हिंदू स्त्री असो अथवा ख्रिश्चन, त्यांचे कार्यक्षेत्र सार्वजनिक सण वगळता आपल्या घरापुरतेच मर्यादित होते. तरी सुद्धा धरित्रीलाच मुक्तीची

जास्त ओढ असते. गोवा मुक्त झाला नव्हता. तो व्हावा आणि मुक्त गोव्यात आपल्याला मुक्त श्वास घेण्यास मिळावा अशी सर्वांचीच इच्छा होती. पण त्यासाठी लढण्याची आवश्यकता होती. स्वातंत्र्य कधी हातावर हात ठेवून बसल्याने प्राप्त होत नसते. कित्येक तरुण मुक्तिसंग्रामात उतरले होते, हालअपेष्टा सहन करत होते, जंगलात वास्तव्य करून राहात होते. त्याना लपतछपत जेवण नेऊन देण्याचे काम गोमंतकीय महिला करत होत्या. पोर्तुगीज पोलिसांना चुकवत एखाद्या रात्री घरी आलेल्या स्वातंत्र्यसैनिकांना गरम गरम जेवण करून वाढत. पोलिसांना सुगावा लागला तर मात्र आपली धडगत नाही याची कल्पना त्यांना होती. क्रूरकर्मा आजेंत मोंतेरो तर असल्याच गोष्टींच्या मागावर असायचा. पोर्तुगीज सरकारच्या विरोधात काही करो अथवा न करो ज्याचा संशय येईल त्यांना पकडून पोलिस ठाण्यावर तो घेऊन जाई आणि स्त्री म्हणून न बघता बदडून काढत असे. त्याच्या नजरेत एखादी तरुण मुलगी पडली आणि तिच्यावर जर स्वातंत्र्यसैनिकांना मदत केल्याच्या संशयाचे निमित्त जरी मिळालं तर ती त्याला बळी पडलीच म्हणून समजायची. असे हे गोव्याचे वातावरण असताना एखाद्या स्त्रीने पोर्तुगीजांच्या विरोधात काही करण्याचे सोडा, बोलणे सुद्धा धोकादायक होते. तरी सुद्धा मनात गोव्याच्या मुक्तीची आकांक्षाच एवढी जबरदस्त होती की त्या पुढे आजेंत मोंतेरो आणि पोर्तुगीज साम्राज्याची कुणालाच तमा नव्हती. आरंभास फक्त स्वातंत्र्यसैनिकांना मदत करण्याच्या उद्देशाने ह्या स्त्रिया वावरत होत्या. परंतु या एवढ्यावर गोव्याची मुक्ती संपादन करणे शक्य नव्हते. इतर स्वातंत्र्यसैनिकांच्या बरोबरीन प्रत्यक्ष संग्रामात उतरण्याची आवश्यकता होती. गोव्याच्या मुक्तिसंग्रामाच्या काळातील १९४५ ते गोवा स्वतंत्र होईपर्यंतच्या काळातला अक्षरश: रणचंडिका बनून गेल्या. त्यात अमुकच हिंदू आणि अमुकच ख्रिश्चन असा भेदभाव नव्हता. आपण भारतीय आहोत आणि गोवा भारताचा अविभाज्य घटक आहे या राष्ट्रप्रेमाने पछाडलेल्या स्त्रियांनी आपल्याला या संग्रामात झोकून दिले. काही प्रत्यक्ष मुक्तिलढ्यात उतरल्या होत्या म्हणून अटक केल्याने तुरुंगात जात तर काहींना स्वातंत्र्यसैनिकांना घरात आश्रय दिल्याच्या कारणाने तुरुंगात जावे लागायचे. स्वातंत्र्यसैनिकांचा ठावठिकाणा कळावा म्हणून मोंतेरो त्याचा अनन्वित छळ करायचा. मोगाबाई नाईक याना दिड वर्ष एकटीलाच कारागृहात ठेवण्यात आले होते. कुणाचीच सोबत नव्हती. त्या कालावधीत त्यांचे अतोनात हाल करण्यात आले होते. त्यांचा मुलगा श्रीकांत तुरुंगात होता, बंधू महाबळेश्वर तुरुंगात होता. अर्धांगवायूने अंथरुणाला खिळून पडलेली मोगाबाईची वृद्ध आई तेवढी घरांत होती.

हे फक्त वानगीदाखल एक उदाहरण गोव्यातील धाडसी स्त्रीचे. गोव्याच्या मुक्तिलढ्याचा इतिहास यासारख्या कित्येक वीरांगनांच्या त्यागाने भरलेला आहे. १९६१च्या डिसेंबरमध्ये गोवा मुक्त झाला. नंतर लगेच गोव्याच्या विलीनीकरणाचा मुद्दा ऐरणीवर आला. गोव्याचे अस्तित्व टिकवायचे की गोवा महाराष्ट्रात विलीन करायचा या मुद्यावर रण पेटले. मुक्तीलढ्यातील ह्या आणि ज्याना मुक्तिसंग्राम हुकला होता त्या नव्या दमाच्या स्त्रिया गोव्याचे स्वतंत्र अस्तित्व सांभाळण्यासाठी परत एकदा रणांगणांत उतरल्या. व्हितोरिया फेर्नांदीससारखी महिला या बाबरात अग्रणी होत्या. कित्येकांनी मुक्त गोव्यात, मुक्त गोव्याचे विलीनीकरण होण्यापासून वाचवण्यासाठी तुरुंगवास भोगला. त्यांच्याच त्यागावर गोव्याचे स्वतंत्र अस्तित्व टिकून राहिले. नंतरच्या काळात संघ प्रदेश असलेल्या गोव्याने घटकराज्याच्या मागणीसाठी जोर धरला. देशाची भाषावार प्रांतरचना असल्याने गोव्याला एक भाषा असण्याची गरज होती. कोंकणी भाषिक राज्य म्हणूनच त्याला घटक राज्याचा दर्जा मिळणे शक्य होते. त्यासाठी गोमंतकीयांनी परत एकदा लढा सुरू केला. गोव्यातील सर्व लोक घरात, घराबाहेर, आपापसात कोंकणी बोलत होते. कोंकणी ही एक स्वतंत्र भाषा म्हणून साहित्य अकादमीने मान्यता दिली होती.त्यात संपन्न साहित्य होते. परंतु गोव्यातील काही लोक तिला मराठीची बोली मानायचे. त्यांचा कोंकणीला भाषा म्हणून मान्यता दिलेल्या साहित्य अकादमीवर विश्वास नव्हता. गोव्यात अमुक संख्येने मुलं शाळांतून मराठी शिकतात, अमुक मराठी दैनिकं गोव्याहून प्रसिद्ध होतात म्हणून राज्यभाषा ही मराठी असायला हवी असे त्यांचे म्हणणे होते. या लोकांना समजावण्यासाठी गोमंतकीय कोंकणी साहित्यिकांनी रात्रीचे दिवस केले. त्यात कोंकणी लेखिकांचा मोठ्या प्रमाणात हातभार होता. प्रचंड लढा उभारावा लागला होता या आंदोलनात. त्यावेळी स्त्रियांनी पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढा दिला होता. लाठी आणि अश्रूधुराचा मारा पचवला होता. तुरुंगवास भोगला होता. यावेळी कित्येकानी आपली घरेदारे सोडली होती, लिहिणं बंद केलं होतं. कोंकणीस राज्यभाषेचा दर्जा मिळाल्या नंतरच त्यांनी लिहिण्यास प्रारंभ केला होता. मातृभाषेच्या सन्मानासाठी चाललेल्या या लढ्यातील स्त्रीचा वावर हा 'न भूतो न भविष्यति' असाच होता.

त्यानंतर काय झालं.. कोंकणी राजभाषा झाली. गोव्याला घटकराज्याचा दर्जा मिळाला. संघ प्रदेशाच्या काळात विधानसभेच्या तीस जागा होत्या, त्या घटकराज्य झाल्याने चाळीस झाल्या. विधानसभेत किती महिला पोहोचल्या...जिल्हा परिषदेत किती पोहोचल्या.. ग्रामपंचायतीत किती पोहोचल्या... विधानसभेसाठी महिलांना एकही मतदारसंघ आरक्षित नाही. जिल्हा आणि पंचायतीसाठी आरक्षण आहे. पण त्यांनी निवडून यायचे आणि त्यांचा नवऱ्यांनी त्यात नाक खुपसायचं. विधानसभेत आम्हाला तीस टक्के आरक्षण पाहिजे अशी अजूनपर्यंत गोव्यातील एकाही महिलेने मागणी केलेली नाही.

अशावेळी मला प्रश्न पडतो, कुठं गेल्या त्या स्त्रिया ज्या आमच्याबरोबर विद्यार्थी चळवळीत होत्या? कोंकणीच्या वेगवेगळ्या चळवळीत, सामाजिक चळवळीत, गोवा बचाव आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. बहुतेकींची लग्नं झाली, त्यांना मुलं झाली. त्यांना खेळवण्यात त्या दंग असतील. कित्येकींनी बऱ्यापैकी पुस्तकं छापून घेतली. पुस्तक लिहून झाल्याबरोबर

प्रकाशकांची प्रतीक्षा आता करावी लागत नाही. सरकारी अनुदान मिळायला लागलेलं आहे. पुस्तक प्रसिद्ध झाल्याबरोबर पुरस्कार मिळायला लागले आहेत. सगळ्या तृप्त तृप्त आहेत.

पण मला कुठेतरी हूरहूर लागून राहिलेली आहे. स्त्री ही एक ताकदवान शक्ती. ती दुर्गेचा, रणचंडिकेचा अवतार! पण ती आज शांतादुर्गा का झाली? कितीतरी समस्या गोव्यात आहेत. त्यावर फक्त महिलाच तोडगा काढू शकतात. 'गुलाबी गँग'सारखी एखादी गँग काढू शकतात. उच्च न्यायालयाने महामार्गावरील मद्यालयांना परवाना देऊ नये म्हणून आदेश दिलेला आहे. त्याच्या विरोधात मद्य व्यावसायिक एकवटत आहेत. दारूने किती जणांचे जीवन आणि संसार उद्ध्वस्त केल्याची उदाहरणे जिवंत असताना गोव्यातील एकही स्त्री संघटना त्याच्या विरोधात उभी ठाकत नाही, आश्चर्य वाटते.

झारा गहरमानी यांचं 'माय लाइफ ॲज अ ट्रेटर' हल्लीच वाचलं होतं. झारा गहरमानी या सामान्य मुलीची ही कथा. एका सामान्य पर्शियन मुलीपासून ती एका धैर्यवान, करारी कार्यकर्तीमध्ये कशी रुपांतरित झाली याची ही कथा आजच्या फेसबुकमध्ये तोंड खुपसून बसलेल्या प्रत्येक स्त्रीने वाचायला हवी. कारण हल्लीच मला एक विचित्र अनुभव आला. एक स्त्री चित्रकार बरीच वर्षे माझ्या मागे लकडा लावून होती. तिला मी नग्न पोर्ट्रेटसाठी मॉडेल म्हणून हवा होतो. मॉडेल म्हणून एखाद्या चित्रकारासमोर बसून राहाणे म्हणजे दिव्य असते. वेळेचीही मर्यादा असते. मी सगळे हसण्यावारी नेलं आणि शेवटी तिला होकार दिला. पण आता ती घाबरली होती. तिच्या एकंदर हावभावावरून ते जाणवत होते.

फक्त रंगांची उधळण केली म्हणून चित्रकार होता येत नसते. मनाला एक प्रगल्भता, उंची लाभणे आवश्यक असते. चित्रकार असो अथवा शब्दकार, मनाची उंची गाठणे अत्यंत महत्वाचे असते. सर्जनशील स्त्रिया आहेत परंतु त्यांच्या सर्जकतेला हल्ली अपेक्षांचं लोढणं आहे. लढाऊ स्त्रिया दिवसरात्र वावरत असतात गोव्यात पण एनजीओंच्या कुरणात! त्यांची क्रांती प्रचंड संख्येने वाढलेल्या टीव्ही चॅनल्सना खाद्य पुरवण्यासाठीच आसुसलेली आहे, असे जाणवण्यापर्यंत मजल गेलेली आहे.

गोव्यांतील स्त्रियांच्या बाबतीत गोव्याबाहेरील लोकांमध्ये एक गैरसमज पसरलेला मला नेहमीच जाणवतो. मी गोव्याबाहेरील काही राज्यात फिरतीवर असताना कित्येकांनी मला गोमंतकीय स्त्रीविषयी विचारणा केलेली आहे. त्यांच्या मते गोव्यातील स्त्री ही फ्री असते. ती सहज उपलब्ध होऊ शकते अशी त्यांची धारणा असते. त्याच गैरसमजातून ही लोकं जेव्हा गोव्यात पर्यटक म्हणून येतात तेव्हा वखवखलेल्या नजरेने गोमंतकीय स्त्रीकडे पाहातात. कधी कधी आपली मर्यादा सोडून आगाऊपणा करतात आणि नंतर भरपूर मार खाऊन निघून जातात.

का बरे पसरला असेल हा गैरसमज..? त्याचे कारण म्हणजे गोव्याच्या पर्यटनाचा जाणूनबुजून केलेला गैरवापर. गोव्याची अर्थव्यवस्था बळकट करायची असेल तर गोव्याच्या पर्यटनावर भर द्यावा लागेल असा एक विचार सरकारी स्तरावर रुजला. गोवा नुकताच पोर्तुगीजांच्या तावडीतून मुक्त झाला होता. भारताच्या स्वातंत्र्यानंतर गोव्याला भारतीय संघात सहभागी होऊन भारतीय बनायला १४ वर्षांचा उशीर लागला होता. इतर राज्यांशी स्पर्धा करून विकास साधण्यासाठी गोव्याला अधिक गतिमान होण्याची गरज होती. गोव्यात त्यासाठी कुशल लोकांची वानवा होती. गोवा संघप्रदेश असल्याने दिल्लीची एकप्रकारची वसाहतच बनला गेला होता. सगळे उच्चपदस्थ दिल्ली अथवा इतर राज्यांचे अधिकारी असायचे. ते आपल्या पद्धतीने धोरणे आखायचे. गोव्यातील स्त्रीविषयी त्यांच्याही मनात गैरसमज होतेच. त्यात गोव्यातील सोनेरी वाळूच्या समुद्रकिनाऱ्यावर विवस्त्र पहुडणाऱ्या हिप्पी पंथाच्या ललना आणि गोमंतकीय स्त्रियांतला फरक जाणून घेणे या आंबटशौकिनांच्या आवाक्याबाहेरचे होते. आंबटशौकीन देशी पर्यटकांना आकृष्ट करण्यासाठी त्यानी समुद्रकिनाऱ्यावरील याच ललनांचा जाहिरातीत वापर करून गोव्याचे निमंत्रण देण्याचे पुण्यकर्म करून, काकासाहेब कालेलकर ज्या गोव्याला पुण्यभूमी गोमंतक म्हणायचे त्याची भोगभूमी करून टाकली. प्रजासत्ताक दिनाला दिल्ली राजपथावरून ज्या चित्ररथांचे संचलन व्हायचे त्यात गोव्याचा चित्ररथ हा आवर्जून पाश्चात्य संस्कृतीवरील विषयावर बेतलेला असायचा. गोव्याचा चित्ररथ म्हणजे तोकड्या कपड्यातील नाचणाऱ्या मुली असेच समीकरण काही काळ होऊन गेले होते. असल्या चित्ररथास त्यामुळे आम्हाला आवाज उठवून तो प्रकार बंद करावा लागला होता.

एक गोष्ट मात्र खरी, भारतातील उर्वरित प्रदेशापेक्षा गोमंतकीय स्त्रीला समाजात विशेष मोकळीक आहे. त्याचे कारण म्हणजे पोर्तुगीजांनी गोव्यात लागू केलेला समान नागरी कायदा. गोव्यातील सगळ्या धर्मातील लोकांना विवाहाच्या बाबतीत एकच कायदा लागू आहे. कायदेशीरपणे विभक्त झाल्याशिवाय गोव्यातील कुठल्याच धर्मीयास दुसरं लग्न करता येत नाही. पूर्वीच्या काळी देवदासी प्रथा होती, शेंसविधी (कलावंतिणीची मुलगी वयात आली की कुणी तरी धनवान किंवा प्रतिष्ठित पुरुष तिचा कौमार्यभंग करायचा.) होता, त्यावर बंदी आणण्यात आली. पोर्तुगीजांनी सतीची चाल बंदच करून टाकली होती. विधवा विवाहास मान्यता दिली होती. या सुधारणेच्या युगामुळे गोव्यातील स्त्री सामाजिक जोखडातून मुक्त होऊन मानाचे जीवन जगत होती.

आता मुक्त म्हणजे काय यावरही लक्ष देण्याची गरज आहे. इंग्रजीत 'फ्री' आणि 'लूज' याला वेगवेगळा अर्थ आहे. गोमंतकीय स्त्री फ्री आहे, मुक्त आहे पण ती 'लूज' म्हणजे सढळ नाही. ती पाहुण्यास स्वागतासाठी, शुभेच्छा देण्यासाठी आलिंगन देईल. परंतु एखाद्याने त्याचा सोयीस्कर अर्थ लावून गैरफायदा घेण्याचा प्रयत्न केला तर त्याला त्याची जागा दाखवण्याची धमक गोमंतकीय स्त्री बाळगून आहे. गोव्यातील ख्रिश्चन समाजात नृत्यप्रकार संस्कृतीचा भाग आहे. त्यांच्या सामाजिक जीवनात दारू पिणे निषिद्ध नाही. पण हे सर्व घडते ते एका मर्यादेत. हिंदू समाजात दारू पिणे निषिद्ध

मानले जाते. पण सार्वजनिक क्षेत्रात जर एखाद्या स्त्रीने दारूला स्पर्श केला तर तिच्याकडे वक्रदृष्टीने कोणी पाहाणार नाही.

पण गोमंतकीय स्त्रीचा हा मुक्तपणा गोव्यात पर्यटक म्हणून येणाऱ्या देशी पर्यटकांच्या आकलनाबाहेरचा असल्याने सार्वजनिक ठिकाणी त्यांना आता अपमानित जीवन जगावे लागत आहे. जे कोणी पर्यटक गोव्यात येतात त्याना सार्वजनिक क्षेत्रात वावरणाऱ्या स्त्रिया, खास करून कॅसिनोवर काम करणाऱ्या स्त्रिया या त्यांना वेश्यासदृश वाटून टोळक्याने येणारे देशी पर्यटक त्यांच्याकडे पाहून अश्लील शेरेबाजी आणि हावभाव करण्याची संधी सोडत नसतात. नोकरी म्हणून बहुतेक स्त्रिया हा छळ सहन करतात. ज्यांना जमत नाही त्या नोकरी सोडतात. गोव्याबाहेरील कित्येक लोक गोव्यात मसाज पार्लर चालवतात. ते लोक आपल्या बरोबर बाहेरून स्त्रीकामगार आणतात आणि 'स्पा' तसेच मसाज पार्लरच्या नावाने खुलेआम वेश्याव्यवसाय चालवतात. त्या सर्व गोव्याच्या मुली असल्याचा आव आणला जातो. उघडउघड ऑनलाइन जाहिराती असतात. नेटवर जाऊन गोमंतकीय मुलगी बुक करता येते. पोलिसांना या गोष्टी सापडत नाहीत पण पर्यटक ग्राहकांना पटकन सापडतात.


आता मानवी नीतिमूल्यं बदललेली आहेत. भोगवादाने उच्चांक गाठलेला आहे. तेव्हा या गोष्टींवर विचार करून वेळ घालवायला, तो आहे कुणाकडे म्हणा..

गोव्यात वेगवेगळ्या क्षेत्रात स्त्रियांचा वावर चालू आहे, तो थांबणार नाही कारण आज गोव्यातील स्त्री ही फक्त घर सांभाळणारी काकूबाई राहिलेली नाही तर स्मार्ट झालेली आहे. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून राजकारणात, समाजकारणात, साहित्यात उतरलेली आहे. साहित्य अकादमीचा पुरस्कार स्त्रीच्या कधीतरी चुकून पदरात पडला जातो, असे वातावरण देशात असताना, गोव्यातील डझनभर स्त्री लेखिकांना तो मिळालेला आहे. तरी सुद्धा एके काळी कसल्याही अपेक्षा न बाळगता दुर्गा भागवत, महाश्वेता देवी यांच्यासारख्यांना आदर्श मानून सामाजिक बांधिलकीचे भान ठेवणाऱ्या गोव्याच्या स्त्रिया कुठंतरी व्यवहाराशी जुळवाजुळव करत असल्याचे जाणवायला लागलेलं आहे. ते खोटं ठरो आणि 'शांते'ची 'दुर्गा' होवो एवढीच प्रार्थना!

– दिलीप बोरकर
भ्रमणध्वनी : ९८२२१३६८८५
bimbkonkani@yahoo.co.in

**॥ग्रंथाली॥**

# धर्मधुरीण




**डॉ. प्रकाश लोथे**

**मूल्य ६०० रुपये**
**सवलतीत ३६० रुपये**

वऱ्हाडातील कर्मठ सनातनी कुटुंबातील धर्मपरायण आबासाहेबांचा मुलगा श्याम ख्रिश्चन मिशनऱ्याच्या प्रभावाखाली येऊन वडिलांशी टक्कर घेऊ पाहतो, तेव्हा त्यांच्यात निर्माण होणारा जीवघेणा संघर्ष चितारणारी ही कादंबरी एकदा वाचावयास घेतली तर खाली ठेववत नाही. भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली ही हृदयद्रावक कहाणी बंगाली लेखक शरदचंद्रांच्या कादंबऱ्यांची आठवण करून देते.

स्त्री शिक्षण, विधवा विवाह, स्वातंत्र्यपूर्व राजकारण व देशाची फाळणी असल्या अनेक तत्कालीन समस्यांमुळे निर्माण झालेला प्रखर वैचारिक लढा चितारत, अनेक कौटुंबिक समस्यांचे पदर सहज उलगडत जाणारी संयत भाषाशैलीतली ही कादंबरी मनाला चटका लावून जाते.

– दिनकर गांगल

महिलादिन विशेषांक

मराठीतील सहा प्रमुख कवयित्रींच्या स्त्री जाणिवांचा मागोवा घेत 'स्त्री काव्याची स्पंदने' मांडणारा हा लेख. लेखिकेच्या काव्यविषयक गंभीर अभ्यासाचा व मराठी कवितेत स्त्री जाणिवांमध्ये आलेल्या स्थित्यंतराचा यातून प्रत्यय येतो.

डॉ. नीलिमा गुंडी



# स्त्रीकाव्याची स्पंदने...

दिडशे वर्षांहून अधिक काळाची समृद्ध परंपरा असलेल्या स्त्रीकाव्याचा प्रवाह आज जोमदारपणे खळाळत आहे. परंपरेतील आत्मलक्षी वृत्तीचे नाते एकीकडे जपत समकालाची स्पंदनेही जागरूक मनाने टिपत आहे. जागेअभावी येथे काहींनाच स्थान देता आले आहे. तरीही येथील निवडक कवितांमधूनही या प्रवाहाची दिशा आणि गती यांचे भान वाचकांना नक्कीच येईल.

'व्यतीत', 'विवर्त' आणि 'व्यामोह' या संग्रहांमधून आत्मलक्ष्यी स्वरूपाची कविता सातत्याने लिहिणाऱ्या ज्येष्ठ कवयित्री प्रभा गणोरकर यांचा काव्यप्रवास वाचकांसमोर येतो. त्यांची 'परत ये' ही कविता स्त्रीसंवेदनेचा एक ठळक विशेष प्रगट करते. जगण्याला खोलवर भिडणे आणि चिवटपणे तग धरणे, हा तो विशेष होय. या कवितेत एक प्रौढ स्त्री दुसऱ्या स्त्रीला जिव्हाळ्याने काही सांगत आहे. त्यात सांगणारीच्या जीवनानुभवाचे संचितच जणू सामावले आहे. कटू अनुभवाने पोळून निघालेल्या दुसऱ्या स्त्रीला नव्याने जगण्याची उभारी देण्याचे सामर्थ्य त्या शब्दांत आहे. कोमल आर्जव ते कणखर आश्वासन दरम्यानच्या अनेक भावछटा त्यात उमटल्या आहेत. स्वत:पासून स्वत:पर्यंत येण्याचा प्रवासच खरा अवघड असतो. म्हणून कवयित्री तिला निजखूण शोधायला सुचवत आहे. क्रमाने विकसित होत गेलेल्या परतीच्या प्रवासाचे टप्पेही वेधक आहेत. त्यात केवळ घरच नाही तर भोवतालचा निसर्गही आप्तवर्तुळात सहभागी आहे. शेवटी आलेला मोरांचा उल्लेख म्हणजे काजळलेल्या मनाला रंग, नाद, गती यांची झळाळी प्राप्त करून देणारी प्रतिमाच आहे.

संवेदनशील मनाने काव्यलेखन करणाऱ्या ज्येष्ठ कवयित्री उषा मेहता यांचे 'आभास', 'अप्रूप', 'अन्वय', 'निरंतर' आणि 'काटेसावर' हे कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. स्त्रीकाव्यातील संवेदनशीलतेचा पैस व्यापक होत असल्याचा प्रत्यय त्यांच्या 'प्रचंड प्रचंड जाळ्यात' या कवितेतून येतो. समकालीन वास्तवाला भिडणारी ही कविता वाचकाला अंतर्मुख करते. गेली कित्येक वर्षे हिंसेची नाना रूपे आपल्या मनावर आघात करीत आहेत. त्यामुळेच निबर झालेल्या मनाने ज्यांची दखलच घेतली जाणार नाही, अशा दृश्यांपासून कवितेची सुरुवात होते. वर्तमानपत्रांतील वृत्तांची शीर्षके व आकडेवारी यांची आठवण करून देणाऱ्या कवितेतील ओळी वाचकाला वास्तवाभिमुख करत जातात. हळूहळू त्या दृश्यांची जणू चित्रलिपीच वेगाने उमटत राहते. कवितेच्या शेवटी आलेला 'आलेन'चा उल्लेख व्यापक असे विश्वभान जागवणारा आहे. या कवितेतील 'जाळे' ही प्रतिमा अर्थपूर्ण आहे. जागतिकीकरणाच्या या युगात संगणकीय 'महाजाल' जगाला जवळ आणत आहे, अशी हाकाटी होत असतानाच हे जाळे 'सावज टिपणारे जाळे' कसे बनत आहे, ही विसंगती त्यातून सूचित होते.

'अंत:स्थ', 'उत्कट जीवघेण्या धगीवर', 'मी भिडवू पहातेय समग्राशी डोळा', 'आरपार लयीत प्राणांतिक' आणि 'दृश्यांचा ढोबळ समुद्र' हे प्रज्ञा दया पवार यांचे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. आंबेडकरी विचारांचा प्रभाव असलेली त्यांची कविता शोषित स्त्रीचे प्रश्न केंद्रस्थानी आणणारी आहे. वास्तवाचे भान धीटपणे व्यक्त करताना त्यांची कविता भाषेचेही सर्जनशील भान व्यक्त करते. स्त्रीवादाच्या तत्त्वज्ञानात स्वातंत्र्य हा कळीचा प्रश्न ठरतो. 'स्वातंत्र्याचं ट्रायल घेऊन सुद्धा' ही त्यांची कविता याच प्रश्नाला भिडते. येथे कवयित्री व्यक्तिगत स्वातंत्र्याविषयी बोलत नसून असंख्य तरुणींच्या स्वातंत्र्याविषयी बोलत आहे. स्त्रीची एकेकाळची समाजमान्य प्रतिमा झुगारून ताठ उभ्या असलेल्या स्त्रियांचे यातील चित्रण परिवर्तनाची ग्वाही देणारे आहे. ट्रायल, संस्कृतीचा दाभण, उसवाउसवी, पोत, माप हे शिवणकामाशी निगडित प्रतिमाविश्व मुळातच स्त्रीला जवळचे आहे. स्वातंत्र्य

हे 'मूल्य' असल्यामुळे त्यासाठी किंमत चुकवावी लागते, याची जाणीव 'स्वातंत्र्याचा जीवघेणा घोर' या शब्दप्रयोगातून होते. मूल्यांचा तात्त्विक पेच या कवितेत सहजपणे काव्यात्म पातळीवर पोहोचला आहे.

'सीझर कर म्हणतेय माती' आणि 'धग असतेच आसपास' या संग्रहातील कल्पना दुधाळ यांच्या कविता मातीशी नाते सांगणाऱ्या आहेत. त्यांच्या कवितांमधून आजच्या काळात झालेली शेतीव्यवसायाची दुर्दशा खोलवर चित्रित झाली आहे. त्यांची 'घालमेल' ही कविता निर्मितिप्रक्रियेवर भाष्य करणारी म्हणून महत्त्वाची वाटते. केवळ सौंदर्यवादी काव्यातच नव्हे, तर वास्तववादी काव्यातही निर्मितिप्रक्रियेचा शोध कविमनाला खोलवर साद घालीत असतो, हे येथे जाणवते. त्यातून कवयित्रीचे काव्यलेखनामागील वृत्तिगांभीर्य प्रगट होते. एकेका शब्दामागचा पीळ व्यक्त करणाऱ्या यातील प्रतिमा कधी शेतीशी संबंधित आहेत तर कधी जगण्याच्या आंतरिक स्पंदनांची प्रतिरूपे आहेत. कवितेच्या ओळीचे काजळ, शांततेची शपथ या प्रतिमा तर निर्मितिप्रक्रियेतील टप्पे सूचित करणाऱ्या म्हणून महत्त्वाच्या ठरतात. कवयित्रीची घालमेल केवळ व्यक्तिगत स्वरूपाची नाही. समकाल आत्मसात करण्याची तीव्र असोशी त्यामागे आहे. कवयित्रीची उत्कट काव्यप्रेरणा तिच्या शब्दाशब्दातून तटतटून व्यक्त झाली आहे.

'जाग', 'उद्ध्वस्तायन', 'खचू लागलेली भुई' आदी कवितासंग्रहांमधली नीलम माणगावे यांची कविता ग्रामीण वास्तवाला थेटपणे भिडणारी आहे. जागतिकीकरण, जैवतंत्रज्ञान, राजकारण आदी क्षेत्रांतील प्रश्नांचे स्त्रीच्या परिप्रेक्ष्यातून होणारे आकलन त्यातून व्यक्त होते. 'ताटी म्हणजे फक्त खोपटाचं दार नव्हे' या कवितेत कवयित्री गंगेशी संवाद साधत आहे. स्त्रीसमस्येचे प्रवाहीपण त्यातून लक्षात येते. या संवादातून कवयित्री मुक्ताईपासूनची आत्मभानाची परंपरा आत्मसात करण्याची गरज लक्षात आणून देते. परंपरेतील मिथकांमागील प्रतीकात्मता कालानुरूप नव्याने वाचण्याचा कवयित्रीचा प्रयत्न लक्षवेधी आहे. 'ताटी म्हणजे फक्त खोपटाचं दार नव्हे', हे कवितेचे शीर्षक मुक्ताईच्या जीवनाचे मर्म व्यापक स्तरावर उलगडून दाखवणारे आहे. यातील 'आभाळाची टक्कर' ही प्रतिमा आशयाला नवे परिमाण देते. आत्मभान हे विश्वभानाच्या स्पर्शानेच उजळून निघत असते, हा त्यातील सूचित आशय कवितेची उंची वाढवतो.

'वांगड' (म्हणजे सोबत) या कवितासंग्रहाने काव्यक्षेत्रात पदार्पण केलेल्या कवयित्री डॉ. सई लळीत यांनी मालवणी बोलीत काही कविता लिहिल्या आहेत. 'तशी हेंची काय खटखट नाय...' ही त्यांची कविता वाचताना काव्यभाषेला अंत:स्वर मिळवून देणारा त्यातील मालवणी बोलीचा वापर लक्ष वेधून घेतो. एका सर्वसामान्य गृहिणीचे यातील मनोगत वरवर पाहता साधे आहे, पण हळूहळू धारदार उपरोधिक होत गेले आहे. आजही काही समाजगटांमध्ये स्त्रीच्या वाट्याला येणारा दुय्यम नागरिकत्वाचा भोग या कवितेतून व्यक्त झाला आहे. स्त्रीला पारंपरिक प्रतिमेत बंदिस्त करून स्वत: जबाबदाऱ्यांतून मुक्त (!) होणाऱ्या पारंपरिक पुरुषी प्रतिमेची कल्पना यातून येते. गृहिणीने वरवर कौतुकाच्या सुरात घडवलेले वास्तवदर्शन खरे तर अस्वस्थ करणारे आहे. हे दर्शन चढत्या क्रमाने घडवण्यासाठी ध्रुवपद आणि कडवी या रचनाबंधाचा वापर अनुरूप ठरला आहे. भाषेच्या पोटात शिरून उपरोधाचे अस्त्र वापरणारी यातील पारंपरिक गृहिणी ही नव्याने आत्मभान जागी झालेली स्त्री आहे, हे लक्षात येते आणि कवितेतील चित्र हलकेच परिवर्तनाचे आश्वासन देणारे वाटू लागते.

**परत ये**

पुरे झाली पायपीट. ही वणवण
हे विचारांच्या अरण्यात भटकणे
शेवाळलेल्या भावनांच्या हिरवट पाण्यात
गटांगळ्या खात अदमुसे होत राहाणे. थांबव आता.
स्वप्नातले निळे घर गेले आहे तुटून
आठवणींच्या काचा तुडवणे थांबव आता.
सोडवून घे नात्यांच्या गुरफटवून टाकणाऱ्या वेलींचे वेढे
बंद कर स्वत:ला अपराधाच्या धगीत होरपळून घेणे
आपल्याला वाटले तेवढी आपली माणसे नव्हती जवळ
स्वत:ला आच लागू दिली नाही त्यांनी
बाजूला सार ते आभासांचे खुळचट भिंग
धूळ झटकून टाक आणि साध्या स्वच्छ दृष्टीने पाहा
जे जसे आहे तसेच, न भिता.
दु:खाच्या नजरेला नजर दे. डोळे उघड.
हे तुला नको होते ते विद्रूप. ही तुला वाटलेली मृदू माती नव्हे.
हे न पाझरणारे खडक. या चिरेबंद भिंती.
कुणी नाही जवळ घेणारे हे समजून घे. हात लांबवू नकोस.
परत ये, परत ये स्वत:त. स्वत:च्या ठिकाणी स्वत: घरी
आणि निरोप पाठव पावसाला, झाडांना, पाखरांना, मोरांना
परतल्याचा

**– प्रभा गणोरकर**

**'व्यामोह'**, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

**प्रचंड प्रचंड जाळ्यात**

अचानक नजरेला पडतं कावळ्याचं अर्धमुर्ध कलेवर
किंवा टायरखाली चिरडलं गेलेलं मांजराचं पिलू
कधी दिसते कोळ्याच्या जाळ्यात तडफडणारी माशी
मुंग्यांनी काढलेली झुरळाची अंत्ययात्रा, नेहमीचीच
सारं नजरेआड टाकतो आपण,
चालायचंच म्हणत, गुरफटून जातो दैनंदिन व्यवहारात

रेल्वे अपघातात मरणाऱ्यांची रोजची सरासरी नऊ
स्फोटांमध्ये चिरफाळलेली माणसं न मोजता येण्याजोगी
शिवाय,
काहींना ठेचून मारलं जातं,
काहींना जाळून टाकलं जातं,
काहींना कापून काढतात,
काहींना बलात्कार करून मारून टाकतात,
काहींवर गोळ्या झाडतात भ्याडपणानं,
राष्ट्रपित्यावर तर रंगमंचावरून पुन्हापुन्हा गोळ्या झाडून
हिंसेचं समर्थन करतात तथाकथित शूर देशभक्त!
ठसठसत राहतं हे सारं मनात

आणि आता हा आलेन...
बोरडमच्या तटावर मरून पडलेला,
अवघ्या जगाची हताशा त्याच्या चिमुकल्या देहात
तडफडताहेत असंख्य माशा प्रचंड प्रचंड जाळ्यात

(मध्य पूर्व व पश्चिम अशियात सुरू असलेल्या भयानक सिव्हिल वॉरमुळे लिबिया, केनिया, सीरिया यासारख्या देशांमधील लाखो लोक युरोपियन देशांकडे मिळेल त्या मार्गाने आश्रयासाठी पलायन करत आहेत. अशाच प्रयत्नात सीरियन परिवारातील एक निरागस बालक, 'आलेन' याचा समुद्रात बुडून मृत्यू झाला. लाटांनी त्याचा मृतदेह तुर्कस्तानच्या बोरडम किनाऱ्यावर आणून टाकलेला आढळला आणि ते छायाचित्र माध्यमांनी प्रसिद्ध केले. त्यामुळे संपूर्ण जग हादरले. आलेन हा सर्वांच्या उंचबळून आलेल्या भावनांचा प्रतीक बनला.)

**– उषा मेहता**

**'काटेसावर'**, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

**स्वातंत्र्याचं ट्रायल घेऊन सुद्धा**

स्वातंत्र्याचं ट्रायल घेऊन सुद्धा
नीट बसलीच नाहीत आयुष्यं
आमच्या शरीराभोवती फिट्ट...

चांगल्या ताठ तर उभ्या होतो आम्ही
ना खांदे पाडून,
ना पोक काढून,
ना छाती आत ओढून,
ना नजर खाली झुकवून,
ना पायाच्या अंगठ्यानं
तीच ती माती कोरून

मग का नाही घेतली
नीट मापं आमची?
पोरी विचारताहेत जाब
आयांना
बापांना
अख्ख्या घरादारांना

आया
बाप
अख्खं घरदार
चिडीचुप्प

पोरी ऐकतच नाहीत
भांडत राहतात
तावातावाने

त्याचं काय आहे पोरींनो –
मग आया सांगतात
एखादं रहस्य सांगितल्यासारखं
कानात कुजबुजत,
एखाद्या पोपटात असतो ना
राजाचा अथवा
राक्षसाचा पंचप्राण
तसे तुमचेही आहेत सुरक्षित
शिवलेले
संस्कृतीच्या दाभणाने

मापं कसली देता पोरींनो?
उसवाउसवीचा गोंधळ मांडल्याशिवाय
तुम्हाला दिसायचा नाही पोत
कपड्यांचा
शरीराचा
नि अवघ्या अस्तित्वाचा.
सांगतात आया
आणि झोपून जातात बिनघोर
पोरींच्या जिवाला घोर लावून
जीवघेणा
स्वातंत्र्याचा!

**– प्रज्ञा दया पवार**

**'दृश्याचा ढोबळ समुद्र'**, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

**घालमेल**

झाडाभोवती आळं
तसं डोळ्यांभोवती काळं असलेल्या
जिवाच्या घालमेलीचा
हा एकेक शब्द म्हणजे
नखातल्या काळ्यानिळ्या रक्ताची ठसठस

इथं स्वत:ला
डोंगरासारखं फोडावं लागतं
तापलेल्या भट्टीसारखा ताव यावा लागतो
घालमेलीचा उफळा
आतल्या आत थोपवून
शांततेची भयंकर शपथ घ्यावी लागते
मेल्यासारखी झापड लागू न देता
श्वासाश्वासाला खरेपणाचा
जाब विचारावा लागतो
संसाराच्या वटारलेल्या डोळ्यांत
कवितेच्या ओळींचं काजळ फासावं लागतं
तेव्हा कुठं
अनुभवांची प्रामाणिक सांगड
शब्दांत सापडते

घालमेल
नुसती घालमेलच नसते ती
अख्खा समकाल आतड्यांना गुंडाळलेली
केविलवाणी उलथापालथ असते जिवाची

**– कल्पना दुधाळ**

**'धग असतेच आसपास'**, लोकवाङ्मय गृह, मुंबई.

**ताटी म्हणजे फक्त खोपटाचं दार नव्हे**

गंगे
आतली शिवण उसवल्याशिवाय
आभाळाचं मोठेपण
कसं समजेल?

पण तू अशी घाबरू नको
नजर फिरवू नको
पापण्यासुद्धा मिटू नको

आभाळाकडे थेट बघ
म्हणजे जाणवेल तुला,
आभाळ म्हणजे
एक मोठी पोकळीच आहे!
काळजातल्या पोकळीसारखी,
जी तू... आतून शिवून टाकलीयेस

मुक्ताईनं ताटी उघडायला सांगितली
पण ताटी म्हणजे
फक्त खोपटाचं दार नव्हे
हे तर तुलाही माहिती आहे
मुक्ताबाईपासून माझ्यापर्यंत
माझ्यापासून तुझ्यापर्यंतच नव्हे, तर
पुढच्या-मागच्या सगळ्या पिढ्यांनी
ताटी उघडायचं काम केलेलं आहे

ताटी उघडल्याशिवाय
आभाळाचा तुकडा घेऊन
सूर्य आत येत नाही
आतली शिवण उसवल्याशिवाय
मनाचं आभाळ आभाळाला भेटत नाही
आणि आभाळाची टक्कर झाल्याशिवाय वीज लकाकत नाही

वीज आता
आपल्यालाच व्हावं लागेल
काळ्याकुट्ट अंधारात
नवी दिवटी पेटवावी लागेल

**– नीलम माणगावे**

**'खचू लागली भुई'**, कविताघर प्रकाशन, पुणे.

**तशी हेंची काय खटखट नाय...**

तशी हेंची काय खटखट नाय...
जेवाण मातर चारठाव येवस्थित होया
तिखटमीठ नीट लागाक होया
पेज, फोडणेचो भात, असला तेंका खपणा नाय
बाकी हेंची काय खटखट नाय
घरदार सगळा झळझळीत होया
घागर कळशी लखलखीत होयी
कोळ्याची जाळी खय लोंबता कामा नये
गोठ्यात श्याण दिसता कामा नये
इतकी खय घाण तेंका खपणा नाय
बाकी हेंची काय खटखट नाय

कपाळाक ठसठशीत लायलला होया
केसात फुल माळलला होया
साडी वरती खोचता कामा नये
खांद्यावयलो पदर ढळता कामा नये
ड्रेस, गाऊन तेंका खपणा नाय
बाकी हेंची काय खटपट नाय
इस्त्रीचे कपडे घालून रुबाबशीर फिरतत
आसलल्यो जिमिनी एकएक इकून टाकतत
घरातला, शेतातला मीच करूक होया
पोराटोरांचा, भायरभुतूर मीच राबाक होया
तुमी पण वायच काम करा म्हटला तर तेंका खपणा नाय
बाकी हेंची काय खटखट नाय...

– **सई ललीत**

**'वांगड'**, साई प्रकाशन, (सिंधुदुर्ग जिल्हा), बांदा.

स्त्रीलिखित काव्याचे अवकाश आता केवळ स्फुट काव्यापुरते मर्यादित राहिलेले नाही. रजनी परुळेकर (दीर्घकविता, काही दीर्घकविता, पुन्हा दीर्घकविता), मल्लिका अमरशेख (मालिका कविता – महानगर), मीनाक्षी पाटील (दीर्घकविता – इट इज इन युअर डी एन ए), नीरजा (दीर्घकविता – मी माझ्या थारोळ्यात), माधुरी माटे (मालिका कविता – पाऊस खजिन्याच्या विहिरीत बंद) आदी अनेक जणींनी विशाल आशयाचा पट काव्यात आणला आहे. तसेच स्त्रीलिखित काही खंडकाव्यांचाही येथे निर्देश केला पाहिजे. उदा. १. अनुराधा वैद्य 'माझी चिंध्यांची बाहुली' (काव्याम्बरी १९९६), २. मंदा कदम – सखी सावित्री (२००७), ३. मीरा – 'ऐक द्रौपदी' (२००९), ४. मनीषा साधू – 'प्रहर' (२०११) हा बदल उल्लेखनीय आहे.

आजचे स्त्रीकाव्य अनेक कवयित्रींच्या लेखणीच्या समर्थ आविष्काराने समृद्ध होत आहे. त्याची गणना आज केवळ काव्याचा एक 'उपप्रवाह' म्हणून न करता मध्यवर्ती प्रवाहाला ऊर्जा देणारा महत्त्वाचा घटक म्हणून केली गेली पाहिजे. येथे नमुन्यादाखल दिलेल्या या कवितांमधून समकालीन स्त्रीकाव्याचे आशय-अभिव्यक्तीचे वाढते सामर्थ्य अधोरेखित होतेच. शिवाय सामाजिक परिवर्तनाच्या स्वराशी संवादी राहणारा त्यातील सूरही प्रभावी असल्याचे जाणवते. हे चित्र आश्वासक आहेच आणि स्त्रीकाव्याविषयीच्या अपेक्षा वाढवणारेही आहे.

– **डॉ. नीलिमा गुंडी**
दूरध्वनी : ०२०-२४४८६०१५
भ्रमणध्वनी : ९८८१०९१९३५
nmgundi@gmail.com

**ग्रंथाली**

# हृदयाच्या भूलगोष्टी

**कथा हृदयशस्त्रक्रियेची, जीवनाची**




**डॉ. मीना मार्कण्ड भट्ट**

**मूल्य १०० रुपये**
**सवलतीत ६० रुपये**

सेठ गोरधनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय व के.ई.एम. रुग्णालय, परळ, मुंबई येथील डॉ. प्रफुल्लकुमार सेन व त्यांच्या टीमने जी मनापासून रुग्णसेवा केली त्यामुळे स्फूर्ती घेऊन हे पुस्तक लिहिले.
डॉ. सेन व डॉ. अश्विनीकुमार ध्रुव ह्यांनी हृदयशस्त्रक्रिया व बधिरीकरणशास्त्राचा के.ई.एम. रुग्णालयात पाया घातला. देशाच्या कानाकोपऱ्यांतून येणाऱ्या रुग्णांना ह्याचा फायदा झाला. गेल्या सहा दशकांपासून ही परंपरा अजून तशीच चालू आहे. म्हणून ह्या पुस्तकाचा घाट घातला. ह्यातून वाचकांना हृदयशस्त्रक्रिया व बधिरीकरणशास्त्राबद्दल माहिती मिळेल अशी आशा.
तसेच लेखिकेच्या जीवनाची जडणघडण व वेगवेगळे प्रसंग ह्याचे पण थोडेसे वर्णन केले आहे.

## नवीन मॅजेस्टिक पुस्तके





आशापूर्णादेवी, महाश्वेतादेवी, महादेवी वर्मा, अमृता प्रीतम, कुर्रतुल ऐन हैदर, इंदिरा गोस्वामी आणि प्रतिभा राय – ज्ञानपीठ पारितोषिक विजेत्या ह्या सात लेखिकांच्या साहित्याची थोडीफार ओळख करून देणारे, तसेच त्या त्या भाषिक समाजाचे कौटुंबिक, सामाजिक जीवन, त्यांच्या रूढी, परंपरा, श्रद्धा–अंधश्रद्धा विशेषत: स्त्रीजीवन समजून घेण्यास मदतपूर्ण ठरू शकणारे पुस्तक

# ज्ञानपीठ लेखिका

मंगला गोखले

मूल्य : ३६० रुपये




'सहावं महाभूत आणि मी' ही गोष्ट आहे ; आजच्या काळातल्या सहाव्या महाभूताची–कॉम्प्यूटरची– तशीच कॉम्प्यूटरने वेढून टाकलेल्या माणसांच्या जमातीची आणि ह्या प्रवासाचा साथीदार आणि साक्षीदार असलेल्या सतीश जोशींची.

'भारत म्हणजे आय. टी. तज्ज्ञांचा देश' ही नवी व्याख्या जगाने मान्य केली. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमधला हा महत्त्वाचा 'भारतीय टप्पा' म्हणजे जागतिक पातळीवरच्या बिझनेसमधील एक महत्त्वाची उलथापालथ. ही ह्या उलथापालथीचीही गोष्ट आहे.

# सहावं महाभूत आणि मी

शोभा बोंद्रे/सतीश जोशी

प्रस्तावना : मनोहर पर्रीकर

मूल्य : २२० रुपये

मॅजेस्टिक

प्रमुख विक्रेते : मॅजेस्टिक बुक स्टॉल। गिरगाव। पुणे । मो. ९९२२३४४०८१ मॅजेस्टिक बुक डेपो। ठाणे (प.), दूरध्वनी : २५३७६८६५ मॅजेस्टिक ग्रंथदालन। शिवाजी मंदिर, भ्रमणध्वनी : ९८९२२२०२३९ मॅजेस्टिक बुक गॅलरी । म्हात्रे पुलाजवळ, १०० फूट डीपी रोड, पुणे । दूरध्वनी : (०२०) ६८८८८९०८

Website : www.majesticprakashan.com | E-mail : majesticph@gmail.com

Click करा www.majesticonthenet.com या साईटवर

Customer Care : 022-65666755

महिलादिन विशेषांक

अभिनय, दिग्दर्शन, वक्तृत्व, नृत्य यासारख्या अनेक सृजनात्मक क्षेत्रात आपल्या लखलखीत स्त्रीत्वासह वाटचाल करणाऱ्या लेखिकेचं हे सामाजिक व व्यक्तिगत विश्लेषण...

संपदा जोगळेकर-कुलकर्णी



# त्रिपुरी पौर्णिमेची ज्योत

''मी स्त्री आहे
याचा मला अभिमान आहे.
माझ्या सौंदर्याची कल्पना,
मला पाहताक्षणी तुम्हाला येईल.
पण माझ्या प्रतिभेची कल्पना
माझ्या 'कलाकृतींतून' येईल.
प्रतिभेचे मात्र, 'या सम हा' असतात.
'मादी' या संकल्पनेच्याही पलीकडे जी नेते ती 'स्त्री'
रंग, रेषांहूनही जिला असतो आत्मा, ती असते 'स्त्री'.
अशी मी स्त्री 'सौंदर्यमती'
याचा मला अभिमान आहे.''

अभिनय आणि दिग्दर्शनाच्या क्षेत्रात धडपडणारी मी एक कलावंत आहे. तुम्ही कित्येक वर्ष मला पहाता, कधी नाटकात, नृत्यात, निवेदन क्षेत्रात, दिग्दर्शनच्या क्षेत्रात. मला अभिमान वाटतो, प्रत्येक नवीन कलाकृती साकारताना त्या कलाकृतीचा आणि माझ्या कृतीचाही. अभिमान का? तर मी नुसतीच कलावंत नसून एक स्त्री-कलावंत आहे. निसर्गदत्त सृजनकलेचा, सर्जनतेचा, संवेदनशीलतेचा, वात्सल्यपूर्ण भावनांचा आविष्कार असतो माझ्या कलेत.

अंगभूत प्रतिभेचं म्हणाल तर मला नेहमी असं वाटतं की प्रज्ञेला, प्रतिभेला, बुद्धीला कोणतंही लिंग नसतं. त्याला किंवा तिला वाटत असतं ते अभिव्यक्त होणं. विचारांची झेप दोन पंखांची असते. ती पक्षाची किंवा पक्षिणीची नसते. शाळेत, कॉलेजमध्ये असताना मला बक्षीस मिळालं की माझा एक मित्र म्हणायचा (रागाने) ''हं! बोलणारी मुलगी जरा बरी असली दिसायला की लगेच बक्षीस घेऊन जातात'' पण आता इतकी वर्षं झाली, मी अजून बोलतेच आहे. बक्षीस या प्रलोभनाच्याही पलीकडे जाऊन मी बोलतेच आहे. गेली ३० वर्षं माझ्या विचारांचं, मुद्द्यांचं, मतांचं कौतुक करणारे कित्येक भेटत गेले, भेटतात. कोणाला जगण्याची दिशा मिळाली, कुणी करियरचा पुनर्विचार केला व यशस्वी झाले. कुणी मर्यादांचं अनुकरण केलं, तर कुणी जगाकडे पहाण्याचा दृष्टिकोन सकारात्मक केला. असो. जिथे सातत्य असतं तिथे काहीतरी निर्मितीचं रूप येतच येतं, हे खरं.

माझं कार्यक्षेत्र हे खरं तर प्रदर्शनाचं क्षेत्र. 'वरलीया अंगा' महत्त्व जास्त. परंतु मी मात्र प्रज्ञेला महत्त्व अधिक देत गेले. स्वत:ची आब राखून स्वत: काम केले आणि आता जगही ती 'आब' ठेवू पहातं. 'स्त्री' म्हणून अंगभूत लवचिकतेचा, हळवेपणाचा, जिद्दीचा, वात्सल्याचा मला कायमच उपयोग करता आला. स्त्री स्वतंत्र आहे याचा सोयीपुरता अर्थ न घेता स्वैराचाराच्या परखड व्याख्येचं भान मी कायम राखलं. नृत्यातही अभिजात नृत्य साकारताना कृष्णाची यशोदा उभी केली. वात्सल्यरसाचा नितांत सुंदर आणि हळवा, मर्यादाशील आविष्कार 'कृष्ण' या कथ्थक बॅलेत जपला. 'ऑल द बेस्ट'पासून आताच्या 'किमयागार', 'तिन्हीसांज' या मराठी नाटकात आदरयुक्त स्त्री प्रतिमा उभी केली. माझ्या कार्यकर्तृत्वाचा अभिमान माझ्या आजी-आजोबांपासून माझ्या पुढच्या पिढीलाही वाटावा याचं भान सदोदित राखलं. याहून वेगळा स्त्रीत्वाचा आविष्कार मी नाट्यदिग्दर्शनात राखण्याचा प्रयत्न करीत राहते व राहणार. शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संख्येत शेतकरणींची संख्या फारच कमी. कारण मनाची लवचिकता, जिद्द आणि जबाबदारीचा खरा अर्थ माहीत असलेली स्त्री, 'ही' उभी राहते खंबीरपणे. आत्महत्येचा पलायनमार्ग, ती स्वीकारत नाही. माझ्या मनातली ही स्त्री प्रतिमा मी 'तिन्हीसांज' नाटकात सांभाळली. विषय वेगळा, नाजूक आहे. शेतकरणीच्या अर्थाअर्थी जवळ जाणारा नाही. पण

तिच्यासारखी माझ्या नाटकातली नायिकाही खचून जात नाही, उभी राहते खंबीरपणे. अग्निपरीक्षा देते पण 'राख' होत नाही. कुटुंबाला उभं करते. लेखकानेही तसे लिहिले व मी साकारतानाही कुठेही रडूबाई स्त्रीप्रतिमा जाणूनबुजून ठेवली नाही. माझ्या 'टॉस' नाटकातही एकच शेवट होता. 'उंबरठा' या चित्रपटासारखा. त्या स्त्रीचा कोणताही दोष नसताना तिने घर सोडून निघून जायचं. लेखकाला मी पहिला प्रश्न विचारला. 'उंबरठा' या कलाकृतीला २५-३० वर्षं झाली. समाज अजूनही तिथेच राहून कसं चालेल. माझ्या नाटकातली स्त्री एकटी घर सोडून जाणार नाही उलट ज्याची चूक आहे त्याला घर सोडायला लावेल आणि सासरचं संपूर्ण कुटुंब तिच्यापाठी उभं राहील. या नाटकाचं मी दिग्दर्शन केलं नाहीय, मी केवळ भूमिका केली आहे. परंतु मला एवढंच समजतं की आज तुम्हाला तुमच्या क्षेत्रात जर 'पत' प्राप्त झाली असेल तर आपण 'स्त्री'नेच लोकांना हा विचार करायला भाग पाडलं पाहिजे. मी ते विचारण्याचं डेरींग केलं आणि लेखक-दिग्दर्शकाने ते मान्य केलं. पण कदाचित मी हा प्रश्नच उपस्थित केला नसता तरी हे नाटक झालंच असतं, पण एका प्रश्नाचं धाडस कलाकृतीला वेगळ्याच उंचीवर नेऊ शकतं. पुरुषाच्या खांद्याला खांदा देण्याच्या नुसत्या बाता करून नाही चालत.


आज कित्येक स्पर्धांना मी परीक्षक म्हणून जाते तेव्हा पहाते की कित्येक मुली स्त्रीत्वाला हिडीस रूप देताहेत. त्यांच्याही नकळत. स्त्री-पुरुष समानतेचा अर्थ स्त्रीत्वाचं टेक्श्चर/पोत घालवून सगळंच बिनधास्त, निर्लज्ज पातळीवर आणून ठेवायचं, असा चुकीचा अर्थ बहुधा काहींना वाटतोय. जो अवयव विकसितही झाला नाही तो हलवण्याचा हिडीसपणा कित्येक नृत्यात दिसतोय. मुलामुलींना वय लहान असताना संगीतातला केवळ ताल आणि लय कळतोय पण या मुलींचे, मुलांचे पालक काय करताहेत? त्यांना कळतोय ना या सगळ्याचा अर्थ? मुलीला मी पूर्ण स्वातंत्र्य दिलंय असं अभिमानाने सांगताना स्वातंत्र्याचा नेमका अर्थ समजावून मग सोडलंत का त्यांना समाजात, हे कान धरून/उपटून विचारायची गरज आहे. आईच अभिमानाने सांगते माझी मुलगी माधुरीसारखी डिट्टो नाचते, दीपिकासारखीच स्मार्ट आहे. त्या आया केवळ निसर्गाचा नाइलाज म्हणून आई झाल्या हे खरं.

अग्नी आणि लोणी या निसर्गतःच 'वेगळ्या' गोष्टी. यात कनिष्ठ-श्रेष्ठतेचा प्रश्न नाही, ते वेगळे आहे. ते एकमेकांसारखे होऊ शकत नाहीत हेच त्यांचे वैशिष्ट्य आणि याच त्यांच्या मर्यादा आहेत. दोन्हींचं अस्तित्व महत्त्वाचं. स्त्रीत्व पुसणे म्हणजे क्रांती नाही आणि पुरुषत्वाला हरवणे म्हणजे उत्क्रांती नाही. प्रत्येक आई-वडिलांनी त्रिपुरी पौर्णिमेच्या सोहोळ्यासारखं वागायला हवंय. नदीकाठी, तलावात दीप सोडायचाय पण त्या दीपाची विचारांची ज्योत पेटवून. एकदा ती सुयोग्य ज्योत तेवू लागली की त्या दीपाला अंधाराचं भय नाही. मलाही कलावंत आणि दिग्दर्शक म्हणून माझ्या प्रत्येक कलाकृतीला एक विचारांची ज्योत पेटवावी लागते. तेव्हा माझ्या संपूर्ण करियरची होईल त्रिपुरी पौर्णिमा.

गणपती, दुर्गा मूर्तींचं विसर्जन करतात तेव्हा जिथे त्यांचं विसर्जन होतं तिथली मृत्तिका (माती) पाटावर दिमाखात व आदराने आणली जाते. आपलं जगणंही असंच हवं. मग पुरुष असो वा स्त्री. इतकं पवित्र की आपल्या मृत्यूनंतरही आपल्या मूठभर राखेतून काही पवित्रच हाती लागलं पाहिजे.

**– संपदा जोगळेकर-कुलकर्णी**
भ्रमणध्वनी : ९८२०१२४३७३
sampadajk@gmail.com

**ग्रंथाली**



**भारतीय व्यायाम साधना**

**डॉ. अरुण दातार**
**डॉ. आरती दातार**

**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

हा ग्रंथ अनेकांचा मार्गदर्शक गुरू होईल एवढे धन या ग्रंथात आहे...

**तुमच्या घरात पाक्षिक पुणे पोस्ट असतं तेव्हा...**

तुमची मुलं स्वतःहून मराठी वाचू लागतात...

घरामध्ये विचारांची देवाणघेवाण वाढते...

सकारात्मक विचारांची पेरणी मनामनांत होते..

अशी अनेक कारणं..

अवघ्या मराठीजनांचं पाक्षिक 'पुणे पोस्ट' । वार्षिक वर्गणी ५०० । एका वर्गणीवर एक दर्जेदार पुस्तक भेट । संपर्क : ७७२२००५०८१, ०२०-२४४६४६९६

महिलादिन विशेषांक

**बहिणाबाईची कविता, थेरीगाथा, कुसुमाग्रजांची कविता, सावित्रीबाईंचे साहित्य इ. विषयांच्या अभ्यासक, सामाजिक-शैक्षणिक विषयांवर परखडपणे विचार मांडणाऱ्या व्याखात्या, परिवर्तनवादी चळवळीतील तत्त्वनिष्ठ कार्यकर्त्या प्रा. आशालता कांबळे यांनी मांडलेला स्त्रीअभिव्यक्तीचा प्रखर पैलू...**



**प्रा. आशालता कांबळे**

# दलित स्त्रियांची अभिव्यक्ती

दलित स्त्रियांच्या अभिव्यक्तीचा विचार करताना इ.स.पूर्व सहाव्या शतकापर्यंत मागे जावं लागतं. खरंतर तेव्हा 'दलित' हा शब्दही अस्तित्वात नव्हता. पण आज दलित संकल्पनेत ज्या तळागाळातील समुदायाचा समावेश केला जातो, त्यातील 'चांडाळ' समुदायाची 'प्रकृती चांडालिका' आणि 'दासी' म्हणून काम करणारी 'पूर्णा (पुन्ना)' या दोन स्त्रियांची ठळक उदाहरणे देता येतील. बुद्धांच्या भिक्खुणी संघात महाप्रजापती किंवा यशोधरा (भद्रा कात्यायना) यासारख्या राजघराण्यातील स्त्रियांच्या बरोबरीनेच याही स्त्रियांना आदराचं स्थान मिळालं आणि मनाची उन्नत अवस्था प्राप्त करण्याचा आत्मविश्वासही त्यांच्यात दृढ झाला. मात्र इ.स. तिसऱ्या शतकानंतर मनुस्मृतीच्या कडक अंमलबजावणीने स्त्री-शूद्रांचा आवाजच दाबला गेला आणि स्त्री पूर्णपणे मूक झाली. शूद्र स्त्रीची तर अजूनही वाईट अवस्था झाली कारण ती 'इंद्र' म्हणून सामाजिक पातळीवर, तर 'स्त्री' म्हणून कौटुंबिक पातळीवरही कमालीची दडपली गेली. तिचं अस्तित्वच जणू अमान्य करण्यात आलं. त्यानंतर जवळजवळ हजार वर्षांच्या काळापर्यंत ती कुठेही अभिव्यक्त होताना दिसत नाही. साधारण बाराव्या शतकानंतरच्या संतचळवळीने मात्र तिला अभिव्यक्त होण्याइतका अवकाश प्राप्त करून दिला असं म्हणायला हरकत नाही. स्त्रियांच्या बाबतीतल्या संतांच्या उदार दृष्टिकोनामुळे तेराव्या शतकातील चक्रधरांची शिष्या महदंबेपासून ते सतराव्या शतकातील रामदासांची शिष्या वेणाबाईपर्यंत संतस्त्रियांची अभिव्यक्ती दृष्टीस पडते. या संतस्त्रियांच्या नामावलीत दलित स्त्री म्हणून संत चोखोबांची पत्नी सोयराबाई आणि बहीण निर्मलाबाई या दोन स्त्रियांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. त्यातील सोयराबाई म्हणते,

'देहासि विटाळ म्हणती सकळ।
आत्मा तो निर्मळ शुद्धबुद्धा'

तर निर्मलाबाई म्हणते,

'नाही मज आशा आणि कोणाची
स्तुती मानवाची करून काय'

सत्याचा साक्षात्कार झाल्याने मुक्तीची स्वप्ने पाहणाऱ्या या स्त्रिया खऱ्या अर्थाने दलितत्वाच्या बंधनातूनही मुक्त झाल्या होत्या असंच म्हणावं लागेल.

सामाजिक स्तरावर मात्र स्त्रीला कोणत्याच बंधनातून समाजाने मुक्त केलं नाही. म्हणूनच अठराव्या शतकात. पेशवाईने जातलिंगाधारित समाजव्यवस्था पुन्हा एकदा काटेकोरपणे प्रस्थापित केली आणि एकूणच स्त्रीचा आवाज पहिल्यापेक्षाही अधिक दडपून टाकला. यातून त्यांना मुक्त करण्यासाठी जोतिबा आणि सावित्रीमाई या फुले दांपत्याने जीवाचं रान केलं. यांनी सुरू केलेल्या स्त्रीशिक्षणाच्या चळवळीमुळे एकोणिसाव्या शतकात पुन्हा एकदा स्त्रीचा आवाज समाजाला ऐकू येऊ लागला. दलित समाजातील (मांग समुदाय) मुक्ता साळवेच्या 'ज्ञानोदय'मध्ये प्रकाशित झालेल्या 'मांगमहारांच्या दु:खाविषयी निबंध' यातून दलित स्त्रीच्या परखड अभिव्यक्तीवर प्रकाश पडतो. 'विद्रोही शब्दांत व्यक्त झालेले नैसर्गिक सत्यावर आधारित विज्ञानवादी विचार' असंच या अभिव्यक्तीचं वर्णन करता येईल.

विसाव्या शतकातील दलित स्त्रीने ही विद्रोहाची परंपरा अनेक पातळ्यांवरून वेगाने पुढे नेली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या महामानवाने भारतात जी अभूतपूर्व क्रांती केली, त्याचा वसा भारतातील दलित स्त्रीने उचलला आणि कमालीच्या आत्मविश्वासाने ती अभिव्यक्त होऊ लागली. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक पातळ्यांवरून ही अभिव्यक्ती ठळकपणे दिसून येते. फक्त स्वत:ला 'व्यक्ती' म्हणून अभिव्यक्त करणे एवढाच यामागचा त्यांचा उद्देश नव्हता, तर

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जो मानवमुक्तीचा लढा उभारला होता, त्या आंदोलनाला बळ देण्यासाठी त्या अभिव्यक्त होत होत्या. साधारण १९२०-२५ पासून या इतिहासाला सुरुवात होते असं म्हणायला हरकत नाही. याच काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीनेसुद्धा वेग घ्यायला सुरुवात केली होती. १९२३ नंतर आपलं परदेशातील शिक्षण आटोपून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णपणे भारतातील आपल्या बांधवांसाठी कार्यतत्पर झालेले होते. दलितमुक्तीच्या लढ्याला यात पहिलं प्राधान्य होतं. संपूर्ण भारतभर आंदोलनांचा वणवा पसरत चालला होता आणि दलित स्त्रिया त्या वणव्यात स्वत:ला झोकून देत होत्या. यात पहिलं नाव डोळ्यांसमोर येतं, ते इ.स. १९२४ मध्ये नवी वस्ती नागपूर येथे 'चोखामेळा कन्याशाळे'ची स्थापना करणाऱ्या 'जाईबाई चौधरी' यांचं. जाईबाईंचं कुटुंब १८९६च्या दुष्काळात नागपूरला स्थलांतरित झालं. तिथे गरिबीशी सामना करण्यासाठी काटक्या गोळा करणाऱ्या छोट्या जाईला मिशनऱ्यांच्या शाळेतील ग्रेगरी मॅडमनी पाहिलं आणि शाळेत येण्याविषयी विचारलं. घरच्यांना न सांगता जाई त्यांच्या शाळेत बसू लागली. घरच्यांना जेव्हा समजलं तेव्हा जाईला खूप मार मिळाला. पण ग्रेगरी मॅडमनी समजावून सांगितल्यामुळे जाईची शाळा पुन्हा रीतसर सुरू झाली. चौथीपर्यंत शिक्षण होऊन लग्न झालेल्या जाईला संसार चालवण्यासाठी पतीबरोबर स्टेशनवर हमालीही करावी लागली. पुढे एका शाळेत शिक्षिकेची नोकरी मिळाली. पण अस्पृश्य समाजातील असल्यामुळे शाळेतली मुले घटली आणि जाईबाईंना नोकरीला मुकावे लागले. याच काळात त्यांना बाबासाहेबांच्या सभा ऐकायला मिळाल्या. जाईबाई त्या सभांतील भाषणांनी भारावून गेल्या. वैयक्तिक अडचणींवर मात करण्याचं बळ घेऊन त्यांनी जीवनात सामोऱ्या गेल्या. आज या शाळेचं 'जाईबाई चौधरी ज्ञानपीठ'मध्ये रूपांतर झालंय. जाईबाई बाबासाहेबांना ऐकूनच थांबल्या नाहीत, तर त्याही सभांतून भाषणे देऊ लागल्या. बाबासाहेबांनी स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला तेव्हा त्याचे नागपूरातील सभासद वाढवण्याची जबाबदारी जाईबाईंना दिली होती. त्या उत्तम कवयित्री होत्या. आकाशवाणीवरून त्यांचे काव्यवाचन होत असे. ११ ऑक्टोबर १९६४ मध्ये या तेजस्वी स्त्रीचं निधन झालं. अत्यंत धडपडीच्या कार्यकर्त्या म्हणून 'कौसल्या बैसंत्री' यांचं एक नाव पुढे येतं. १९२६ साली जन्मलेल्या कौसल्या त्या काळात बी.ए. झालेल्या होत्या. त्यांनी स्वत:चा जोडीदार स्वत: निवडला. १९४७ साली जातीने धोबी असलेल्या बिहारच्या डी.लीट. झालेल्या व्यक्तीशी त्यांनी रजिस्टर्ड लग्न केलं होतं. त्या काळातलं कौसल्याबाईचं हे धाडस खरोखरीच अभूतपूर्व होतं.

या शिकलेल्या स्त्रियांबरोबरच कमी शिकलेल्या किंवा अजिबातच शिक्षण न झालेल्या स्त्रियादेखील डॉ. बाबासाहेबांच्या चळवळीत अभिव्यक्त झालेल्या दिसतात. १९२० साली भारतीय अस्पृश्य परिषद नागपूर येथे घेण्यात आली होती, त्या परिषदेत मंजूर करण्यात आलेल्या सक्तीच्या व मोफत शिक्षणाच्या ठरावावर तुलसाबाई बनसोडे व रुक्मिणीबाई यांनी घरगुती भाषेत पण निर्भीडपणे मुलींना सक्तीच्या शिक्षणाची आवश्यकता आहे असं सांगितलं होतं. शालेय शिक्षण कमी असलेल्या या स्त्रियांची जागरूकता, दूरदृष्टी, स्त्रियांच्या प्रगतीची तळमळ या गोष्टी यातून अधोरेखित होतात. १९३५च्या सुमारास नागपूर येथे अंजनाबाई देशभ्रतार यांनी मुलींसाठी वसतिगृह सुरू केले होते, तर १९४८ साली नाशिक येथे दादासाहेब गायकवाड यांनी सुरू केलेल्या मुलींच्या वसतिगृहाच्या पहिल्या व्यवस्थापिका म्हणून गीताबाई गायकवाड यांनी जबाबदारी उचलली होती. २४ व २५ मे १९३६ रोजी नवीन कॉटन मार्केट नागपूर येथे एक संमेलन आयोजित केले होते. त्याच्या स्वागताध्यक्षा म्हणून यशोदाबाई डाहाट यांनी भूमिका बजावली होती. या संमेलनात मुलींच्या हस्तकौशल्याचे प्रदर्शन, वक्तृत्व स्पर्धा आणि इतर चढाओढीही झाल्या होत्या.

विविध प्रकारचं वृत्तपत्रीय लेखन करून अभिव्यक्त होणाऱ्या स्त्रियांचीही नावे इतिहासात सापडतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेल्या जनता पत्रासाठी वर्गणी देण्याइतकी जागरूकता या स्त्रियांमध्ये आलेली आढळते. पुणे येथील दलित महिला मंडळाने भीमाबाई चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम घेऊन जनता पत्रास पाच रुपये देणगी पाठवल्याचे उल्लेख आढळतात. 'सोमवंशी मित्र' या शिवराम जानबा कांबळे संपादक असलेल्या त्यावेळच्या मासिकात शिवुबाई जाधव, सोनकांबळे यांनी १ डिसेंबर १९०८ रोजी एक पत्र लिहिलेलं आहे. यातूनही स्त्रियांची जागरूकता लक्षात येते. त्या लिहितात, 'उच्चवर्गात आता पुनर्विवाह होतात. काडीमोड होते, स्त्रियांचे मुंडण वगैरे करत नाहीत, सती जात नाहीत. हा जसा बदल झाला आहे, तशी मुरळ्या सोडण्याची पद्धतही बंद करावी.' शिवुबाईंना मुरळी म्हणून सोडलेलं होतं. त्यामुळे त्यांना या समस्येविषयी जास्तच कळवळा होता. त्यांच्या या पत्राचा परिणाम होऊन खडकी येथे राहणाऱ्या सुशिक्षित तरुण गणपतराव हनुमंतराव गायकवाड या तरुणाने शिवुबाई यांच्याशी १८ एप्रिल १९०९ रोजी विवाह केला. दलित स्त्रियांच्या अभिव्यक्तीने समाजपरिवर्तनास केवढा हातभार लावलेला आहे हे सिद्ध करणारी ही घटना आहे.

त्याचबरोबरीने 'पतितपावन' साप्ताहिकामध्येही स्त्रियांनी लेखन केलेले आहे. शारदा शेवाळे, द्रौपदी कांबळे, शांताबाई गोंडाणे, शांता जाधव आदी स्त्रियांची यासाठी नावे घेता येतील. स्त्री शिक्षणाबद्दल आस्थेवाईकपणे लिहिणाऱ्यांच्यात नलिनी जगताप, पार्वतीबाई पाचाडे, सुशीला गजभिये, शीला पवार, धोंडाबाई मोरे यासारख्यांचा समावेश होता. कथा, एकांकिका, उपहासात्मक लेख अशा माध्यमातून या आपली मते मांडत राहिल्या. अनुसुया कांबळे, नलिनी साळवे, कांताबाई इंगळे यांनी तर डॉ. बाबासाहेब आणि बौद्ध धम्मावर लेखन केलेलं आहे.

१९२७च्या ऐतिहासिक महाड सत्याग्रहामध्ये तर स्त्रियांची संख्या खूप मोठी होती. डॉ. बाबासाहेबांनी ही संख्या बघून त्यांची २७ डिसेंबर रोजी स्वतंत्र सभा घेतली होती. याच सभेत त्यांना

जबाबदारीची जाणीव करून दिली होती. 'दारू पिणाऱ्या नवऱ्याला घरात घेऊ नका. घरात काही अमंगल होऊ देऊ नका. तुमच्या पोटी जन्माला आलेल्या मुलासाठी साहेब बनवण्याची स्वप्नं बघा.' अशा प्रकारे स्त्रियांनी आपापल्या घरातले देव पाण्यात बुडवण्याचा निर्णय घेतला होता. लुगडी नेसण्याची पद्धत बदलवली होती. कितीही कष्ट पडले तरी मुलांना शिक्षण देण्याचे मनाशी खूणगाठ बांधली होती. याच सभेमध्ये विठाबाई नावाच्या स्त्रीने समारोपाचं भाषण करून, 'आम्ही अशा वागू' असं बाबासाहेबांना आश्वासनही दिलेलं होतं.

दलित स्त्रियांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ पुढे नेण्यासाठी अनेक ठिकाणी परिषदा भरविलेल्या आहेत. आंदोलने, सत्याग्रह करून तुरुंगवास भोगलेला आहे. राजकारणाचाही भाग बनलेल्या आहेत. बाबासाहेबांनी शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना केल्यानंतर नाशिक येथे पक्षाच्या जिल्हाध्यक्ष म्हणून शांताबाई दाणी यांनी जबाबदारी घेतली होती. शांताबाई दाणी या खूप धडाडीच्या कार्यकर्त्या होत्या. 'रात्रंदिन आम्हां' या स्वकथनात त्यांनी स्वत:च्या सामाजिक-राजकीय चळवळीतील ज्वलंत अनुभवाविषयी लिहिलेलं आहे. याच प्रकारे नागपूरच्या सुलोचना डोंगरे, पुण्याच्या राधाबाई वराळे, मद्रास प्रांताच्या मीनाम्बल शिवराज यासारख्या अनेक स्त्रियांचा चळवळीत खूप मोठा सहभाग होता. 'अखिल भारतीय अस्पृश्य महिला परिषदे'ची स्थापना करून या स्त्रियांनी नागपूर, कानपूर, मुंबई अशी अधिवेशने घेऊन ती यशस्वी करून दाखवलेली आहेत. (१९४२ मध्ये सुलोचना डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली कानपूर अधिवेशन तर १९४५ मध्ये मीनाम्बल शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई अधिवेशन.) डॉ. बाबासाहेबांना मानपत्र देण्यासाठी आणि हिंदू कोडबिलाच्या समर्थनासाठीसुद्धा २५ डिसेंबर १९५२ रोजी कोल्हापूर येथील राजाराम चित्रपटगृहात स्त्रियांच्या एकूण नऊ संस्थांतर्फे परिषद आयोजित केली होती त्यावेळी विमलाबाई बागल यांनी प्रास्तविक भाषण करून हिंदू कोडबिल बारगळल्याबद्दल खेद व्यक्त केला होता आणि ते बिल होईपर्यंत आपण साऱ्या स्त्रियांनी डॉ. आंबेडकरांच्या पाठिशी राहिले पाहिजे असंही सांगितलं होतं.

डॉ. बाबासाहेबांच्या चळवळीचा सुरुवातीचा काळ हा असा अनेक स्त्रियांच्या सहभागाने देदिप्यमान झालेला दिसतो. अजून कितीतरी स्त्रियांच्या कामाची दखल इथे विस्तारभयास्तव घेता येत नाहीय. 'आम्हीही इतिहास घडवला' या पुस्तकात एकूण ४७ स्त्रियांची स्वतंत्रपणे विस्तृत माहिती आलेली आहे. यातल्या अनेकींच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन लेखिका उर्मिला पवार आणि मीनाक्षी मून यांनी त्यांच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकलेला आहे. या स्त्रियांनी आपल्या उमेदीच्या काळात जे झपाटलेपणाने चळवळीचं काम केलेलं होतं त्याविषयी त्या इथे भरभरून बोलत आहेत. त्यांची जिद्द, चळवळीविषयीची आस्था, समुदायासाठी जीवन जगण्याची धडपड हे सारं यातून तीव्रपणे समोर येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निर्वाणानंतरही आंबेडकरी समाजातील स्त्रियांमधील लढाऊ ऊर्जा वेळोवेळी समोर आलेली आहे. १९६४ साली जो भूमिहीनांचा सत्याग्रह झाला त्यामध्ये लाखो स्त्रियांनी सहभाग घेऊन तुरुंगवास भोगला, तर नामांतर सत्याग्रहातही हजारो स्त्रिया तुरुंगात गेल्या. त्यांच्यावरील जातीय अत्याचारांचा त्यांनी मोठ्या हिंमतीने सामना केला. पण त्या लढ्यापासून मागे हटल्या नाहीत. आजही ही इतिहासाची पाने त्याच स्वरूपात पुढे सरकत आहे. प्रत्येक पिढीतील आंबेडकरी स्त्री स्वाभिमानाच्या लढ्यासाठी कंबर कसून आजही तयार आहे. २००६मधील 'खैरलांजी आंदोलन' हे याचं जितंजागतं उदाहरण आहे. या आंदोलनात स्त्रियांनी मुंबईमध्ये मंत्रालय हलवून सोडलं होतं. सारं प्रशासन त्यांच्या या लढाऊ बाण्याने हादरून गेलं होतं. संपूर्ण महाराष्ट्रातील उच्चशिक्षित स्त्रिया या आंदोलनात रस्त्यावर उतरल्या होत्या. अजूनही या लढ्याला यश आलेलं नाही आणि अजूनही वेगवेगळ्या पातळ्यांवर स्त्रिया लढतच आहेत.

सामाजिक आंदोलनांमध्ये बीड जिल्ह्यातील 'मनीषा तोकले' हे नाव सातत्याने पुढे येतं. मनीषाताईंची अभिव्यक्ती वक्तृत्वाच्या पातळीवर तसेच कृतिकार्यक्रमाच्या पातळीवरही उठून दिसते. वस्तीपातळीवरही त्यांनी संघटनात्मक कामाची उभारणी केलेली आहे. मुंबईमध्ये 'रमाताई अहिरे' या एक धडाडीच्या कार्यकर्त्या आहेत. उत्तम संघटनकौशल्य असलेल्या रमाताई वक्त्यासुद्धा आहेत. 'मंगलाताई लोंढे' या सामूहिक पातळीवर काम करणाऱ्या, बचतगटाच्या माध्यमातून स्त्रियांना संघटित करून उभ्या करणाऱ्या आहेत. दलित वस्त्यावस्त्यातून कितीतरी स्त्रिया स्थानिक पातळीवर संघटनात्मक कामं करतात. कल्याणच्या 'माया चव्हाण', डोंबिवलीच्या 'कुंदा निळे', नांदेडच्या 'नंदाताई तायवाडे', उल्हासनगरच्या 'प्रा. अस्मिता अभ्यंकर' अशा केवढीतरी नावे घेता येतील. राजकीय क्षेत्रात स्वत:ला सिद्ध केलेल्या 'मायावती' हे एक ठळक नाव आहे. वर्षा गायकवाड, सुलेखा कुंभारे ही नावेसुद्धा राजकीय क्षेत्रात तळपताना दिसतात. औद्योगिक क्षेत्रात 'कल्पना सरोज' यांची झेप खूपच उत्तुंग आहे. अतिशय अभावजन्य परिस्थितीतून स्वत:ला सिद्ध करत ही आंबेडकरी स्त्री आज 'कमानी ट्यूब' नावाच्या मोठ्या कंपनीची मालकीण आहे. करोडो रुपयांची उलाढाल करण्याची तिची क्षमता भल्याभल्यांना अचंबित करणारी आहे.

आंबेडकरी स्त्रियांची अभिव्यक्ती साहित्याच्या क्षेत्रात तर खूपच उल्लेखनीय आहे. साधारण १९७० पासून छापील पुस्तकांच्या स्वरूपात आंबेडकरी स्त्रिया अभिव्यक्त झालेल्या दिसतात. सुगंधा हेंडे या त्यातील पहिल्या कवयित्री. 'विरतं धुकं' हा त्यांचा पहिला कवितासंग्रह. १९७८ साली भंडारा येथे झालेल्या बौद्ध साहित्यसंमेलनाच्या त्या अध्यक्ष होत्या. अमेरिका-लंडन येथे भारतीय महिलांच्या प्रतिनिधी म्हणून सहभागी होण्याचा सन्मान त्यांना मिळाला. हिरा बनसोडे या त्यांच्याच बरोबरीच्या कवयित्री. १९७० साली प्रकाशित झालेल्या त्यांच्या 'पौर्णिमा' कवितासंग्रहाने एकूणच मराठी साहित्यक्षेत्रात दखल घ्यायला लावली. या संग्रहातील 'सखी' आणि 'यशोधरा' या कवितांचं इंग्रजीमध्ये

भाषांतर झालेलं आहे. त्यानंतर त्यांचे 'फिर्याद' आणि 'फिनिक्स' हे कवितासंग्रह प्रकाशित झाले. हिराताईंना खूप मान-सन्मान मिळाले आणि त्यांच्या कविता विद्यापीठीय अभ्यासक्रमातही समाविष्ट केल्या गेल्या. आंबेडकरी जाणिवा घेऊन अभिव्यक्ती करणाऱ्या हिराताई आजही कविता गाऊन सादर करतात. 'पराजित इतिहास बदलण्याचे बलदंड हात तुम्ही द्याल का?' असं म्हणून हिराताई आपल्या अभिव्यक्तीतून परिवर्तनाची आस बोलून दाखवतात. डॉ. ज्योती लांजेवार यांचा साहित्यप्रवास १९८२ ते २०१३ पर्यंतचा. पहिल्या पिढीतील प्रतिभाशाली अशा महत्त्वाच्या साहित्यिकांतील हे एक नाव. त्यांनी कवितेबरोबरच समीक्षाप्रांतातही लेखन केलं.

'अरे कृष्णा, अंगभर वस्त्रं पुरवण्याऐवजी
वस्त्र ओढणारे ते हात तरी छाटून टाक.'

असं म्हणण्याचं धाडस या आंबेडकरी कवयित्रीने आपल्या कवितांच्या माध्यमांतून केलेलं आहे. याच पिढीमध्ये उषाकिरण अत्राम, सुरेखा भगत, मीना गजभिये, कुसुम गांगुर्डे, सरला ठमके, प्रतिभा राजानंद, डॉ. आशा थोरात, झिंगुबाई बोलके अशा अनेक कवयित्री आहेत.

'जिथे दिशांचा येतो आक्रोश कानावर
तेथील मुक्यांची अगतिकता साहू
तेथे चल जाऊ'

असं म्हणणारी सुरेखा भगत यांची कविता 'स्वातंत्र्य जिथे, प्रेम जिथे, तेथे चल राणी' असं म्हणणाऱ्या माधव ज्युलियनांच्या निव्वळ रोमँटिक कवितेला ओलांडून नक्कीच पुढे जाते. सामाजिक जाणिवेच्या सहजीवनाला प्राधान्य देत ती समष्टीशी आपलं नातं अधोरेखित करते. भारतीय संस्कृतीने प्रस्थापित केलेलं स्त्रीत्व ती चक्क नाकारते आणि स्त्रीत्वाला ओलांडून बुद्धकाळातील स्त्रीने व्यक्त केलेल्या 'माणूस'पणाशी आपलं नातं जोडते.

नव्वदच्या दशकानंतर तर आंबेडकरी स्त्रियांच्या कविता-लेखनाचा प्रवास नवेनवे संदर्भ घेत यशस्वीपणे पुढे चाललेला दिसतो. १९९९मध्ये साहित्यक्षेत्रात प्रवेश केलेल्या छाया कोरेगावकर यांच्या कवितातून योनिशुचितेभोवती फिरवत ठेवलेल्या बाईच्या बाईपणावर प्रभावीपणे भाष्य येतं. आंबेडकरवादी दृष्टीने बाईपण समजून घेताना ही कवयित्री मोठ्या धाडसाने संस्कृतिरक्षकांना विचारते,

'निखालस वात्सल्याच्या विराट प्रवाहात
कसं डागाळतं तिचं अवघं माणूसपण
योनिशुचितेचा कावळा शिटल्यावर?'

उषा अंभोरे नावाच्या कवयित्री अशाच प्रकारे संस्कृतिरक्षकांना विचारतात की, 'परंपरेचे नकाब चढवून,

त्यांनी मला देवघरात बसविले
आणि हातात शस्त्र घेताना मात्र
धार लावण्यास मनाई केली'

आंबेडकरी कवयित्री स्वत:ला बुद्ध-फुले-आंबेडकर या त्रिसूत्रीत बांधून घेतात. प्रा. आशालता कांबळे आपल्या कवितेतून म्हणूनच स्त्रीचं 'माणूस'पण अमान्य करणाऱ्या आपल्याच बांधवांनादेखील धारेवर धरते. 'अज्ञानी आंबेडकरवादी'सारख्या तिच्या कवितेतून आंबेडकरी स्त्रीवादाची वेगळी ओळख समोर येते. ज्योती-सावित्रीच्या सहजीवनाची हकदार, हिंदू कोडबिलाची राखणदार अशा भूमिकेत जेव्हा स्त्री उतरते, तेव्हा जातिवादाच्या विरोधात लढताना तिच्यासोबत असणारा तिचा सखा, भाऊ, मित्र या भूमिकेतला पुरुष चक्क तिच्या विरोधात उभा राहतो, ही विसंगती या कवयित्रीने संध्या तांबे, संध्या रंगारी, सरिता जांभुळे, उषा भालेराव, पुष्पा कांबळे, नीला वाघमारे, माया वासनिक, कुसुम अलाम, डॉ. प्रतिभा अहिरे, नलिनी कुडक, लता इंगळे, सुनंदा आबळे, मनीषा जाधव, प्रतिमा राजगुरू अशा अनेक कवयित्री आहेत.

जागतिकीकरण, भांडवलीकरण, बाजारीकरण आणि विज्ञान-तंत्रज्ञान यांचा विस्फोट करीत सारी दुनिया जवळ असणाऱ्या शब्दांनी एकविसाव्या शतकातील कविता वेगळं वळण घेऊ लागली. आंबेडकरी कवयित्रींच्या कवितांतूनही याचे पडसाद उमटलेले दिसतात. आंबेडकरी मूल्यांचा धागा जराही सुटू न देता जागतिक परिघाशी नातं जोडणाऱ्या कवितांमध्ये 'प्रज्ञा दया पवार' या कवयित्रीचं नाव अग्रक्रमाने घ्यावं लागतं. 'ग्लोबल व्हिलेज', 'पीस अँड जर्मनी' अशा शीर्षकामधून ती व्यक्त होते. मानवी अस्तित्वाचा वेध घेणारी प्रज्ञाची कविता जशी विसाव्या शतकातही सती गेलेल्या रूपकुंवरच्या धडधडत्या चितेने व्याकुळ होते तशीच मानवाने स्वत:च्या स्वार्थासाठी पर्यावरणाची मांडलेली चिता बघूनही व्याकुळ होते. ग्लोबलायझेशनच्या जमान्यात निसर्गाशी चाललेली क्रूरता बघून हळहळते. उभ्या पृथ्वीशी स्वत:ची नाळ जोडू पाहणारी ही कवयित्री 'दृश्याचा ढोबळ समुद्र' या कवितासंग्रहातील 'फोटो' कवितेत म्हणते-

'बघा ही पृथ्वीची
विस्तीर्ण पाठ
तिच्यावरच बसते मी
अश्शी मांड ठोकून
नि घेते लपेटून
'स्व'च्या सळसळत्या संवेदनेत
अवघी समष्टी'

या कवयित्रीचं भावविश्व जात, धर्म, भाषा, प्रांत, देश याच्याही पलीकडचं आहे. अवघ्या पृथ्वीवरील 'माणूस'पण स्वत:च्या सळसळत्या संवेदनेत सामावून घेण्याइतकी मेंदूची ताकद आणि हृदयाची विशालताही तिच्या ठायी आहे.

आंबेडकरी कवयित्री एकूणच इतिहास, संस्कृती, धर्म या साऱ्याकडे वेगळ्या दृष्टीने पाहतात. कविता मोरवणकर नावाची कवयित्री बाप, भाऊ, पती या भूमिकेत पुरुषांनी स्त्रीचे रक्षण करावे असं मानतच नाही. पुरुष सबळ आणि बाई दुर्बल या समीकरणालाच ती छेद देते. त्यासाठी संस्कृतीच्या रूपात तिच्या हाती सोपवलेले रक्षाबंधन, भाऊबीज यासारखे स्त्रीला दुर्बळ म्हणून संदेश देणारे सणच नाकारते. ती म्हणते-

खरं तर रक्षाबंधन, भाऊबीज करून
मला सवयच झाली होती
तुझ्यावर विसंबून राहाण्याची
निदान यावेळी तरी तू
माझ्याबरोबर चालताना दिसशील
माझं रक्षण करण्यासाठी नव्हे,
नवा समाज घडविण्यासाठी'

नवीन पिढीची अजून एक कवयित्री शारदा नवले. अंधश्रद्धेवर हल्ला करताना बोलीभाषेचा वापर करीत ती म्हणते-

आता येकच कर पोरी
भाळावरचं नशीब नगं बगूस
नगं बगू हातावरची रेस
जगायचं आसंल मानूस म्हणून
तर वलांडून जा येस.'

आंबेडकरी कवयित्रींचे विचार हे असे परंपरांची 'येस' ओलांडणारे आहेत. नव्याने लिहिणाऱ्या दीपा राजवर्धने, वर्षा भिसे, गाथा जाधव, सुरेखा पैठणे, करिश्मा पल्लवी यासारख्या कवयित्रीदेखील याच वाटेने पुढे चालतात.

कवितेतील अभिव्यक्तीप्रमाणेच 'स्वकथना'तील अभिव्यक्तीनेही आंबेडकरी स्त्रियांनी साहित्यात वेगळा ठसा उमटवलाय. या स्वकथनांतून जात-पुरुषसत्ताकतेतून वाट्याला आलेल्या अन्याय-अत्याचारांना सामोरे जाऊनही ताठ मानेने-स्वाभिमानाने उभी राहिलेली स्त्री समोर येते. ही स्वकथने निव्वळ आठवणींचा रम्य चाळा करण्यासाठी लिहिलेली नाहीत, तर जीवनाचे, विषम समाजस्थितीचे, पुरुषप्रधान संस्कृतीतून वाट्याला आलेल्या दुय्यमतेतूनही स्वत:चं स्वतंत्र अस्तित्व जपण्यासाठी स्त्रियांनी केलेल्या धडपडीचे चित्रण यात येते. १९८१ साली प्रसिद्ध झालेले 'अंत:स्फोट' हे यातील कुमुद पावडे यांचे पहिले स्वकथन. संस्कृतच प्राध्यापिका झालेल्या कुमुद पावडे कॉलेजमध्ये शिकत असताना संस्कृत घेऊन वर्गात बसणाऱ्या एकमेव स्त्री विद्यार्थिनी होत्या. स्त्रीत्वाची भीती न बाळगता 'माणूस' म्हणून समाजात वावरणाऱ्या कुमुद पावडे 'अंत:स्फोट'मधून वाचकाला परिवर्तनासाठी तयार करतात. यानंतरचं गाजलेलं स्वकथन म्हणजे बेबी कांबळे यांचं 'जिणं आमचं'. १९८५ मध्ये प्रकाशित झालेल्या या स्वकथनाच्या प्रस्तावनेत 'मॅक्सिन बर्न्सन' यांनी म्हटले आहे की, 'समाजशास्त्र आणि इतिहासाच्या दृष्टीने ही एक अमोल खाण ठरेल.' मुक्ता सर्वगौड यांच्या 'मिटलेली कवाडे' या स्वकथनातून विधायक आणि रचनात्मक कार्याच्या धडकांमुळेच शोषित समाजाच्या विकासाची मिटलेली कवाडे उघडतील असा लेखिकेचा विश्वास व्यक्त झालेला आहे. शांताबाई दाणी यांच्या 'रात्रंदिन आम्हां' या स्वकथनातून, जातीयतेच्या चटक्यांना तोंड देत त्यांनी घडवलेलं स्वत:चं झुंजार व्यक्तिमत्त्व समोर येतं. १९८६ साली प्रकाशित झालेल्या शांताबाई कांबळे यांच्या जन्माची कथा 'माझ्या जल्माची चित्तरकथा' यातून उभी राहते. नवऱ्याने दुसरं लग्न केलं हे ऐकताच 'मी तुझ्याबरोबर आता येत नाही' असं त्याला ठणकावून सांगणाऱ्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाच्या आणि स्कॉलरशिपवर शिक्षण घेऊन उभं राहून शिक्षिकेची नोकरी करत शिक्षणविस्तार अधिकाऱ्याच्या पदापर्यंत पोचणाऱ्या तसेच मुलांना उत्तम शिक्षण देऊन उभ्या करणाऱ्या एका स्वाभिमानी स्त्रीचं हे स्वकथन आहे. असंच एक स्वकथन आहे 'माझी मी' नावाचं. यशोधराबाई गायकवाड नावाच्या शिक्षिकेची समाजाकडे बघण्याची करुणामयी दृष्टी यातून व्यक्त होते. सुशीला पटेकर यांच्या 'फरफट' या स्वकथनातून 'एक सर्वसामान्य असहाय स्त्री ते चळवळीत काम करणारी स्वतंत्र कर्तृत्वाची कार्यकर्ती' असा खडतर पण जिद्दीचा प्रवास दिसून येतो. असाच जिद्दीचा प्रवास उलगडणाऱ्या स्वकथनांमध्ये जनाबाई गिऱ्हे (मरणकळा), प्रियकला मेश्राम (हरलेला डाव), सुनीता अरळीकर (हिरकणीचं बिऱ्हाड), मंगला केवळे (जगायचंय प्रत्येक सेकंद), विमल मोरे (तीन दगडांची चूल), गुणाबाई गाडेकर (स्मृतिगंध), राजसबाई गायकवाड (मी आहे ही अशी आहे) या स्वकथनांचा उल्लेख करता येईल. नजुबाई गावित यांचे 'आदोर' हे आदिवासी स्त्रीचे पहिले स्वकथन आहे. आंबेडकरी साहित्य चळवळीत किंवा एकूणच साहित्यविश्वात खूप मोठं नाव असलेले असे प्रा. केशव मेश्राम, पद्मश्री नामदेव ढसाळ आणि पद्मश्री दया पवार यांच्या सहचारिणी म्हणून, या मोठ्या व्यक्तींच्या सहवासातील अनुभवांना शब्दांत टिपत स्वत:ची स्वतंत्र ओळख मराठी साहित्यविश्वाला करून देणाऱ्या अनुक्रमे डॉ. नंदा मेश्राम (मी नंदा), मल्लिका अमरशेख (मला उद्ध्वस्त व्हायचंय), हिरा दया पवार (सांगायची गोष्ट म्हणजे) या लक्षवेधी स्वकथनांचा उल्लेख करता येईल. निव्वळ पतीची ओळख म्हणजे आपली ओळख नव्हे, तर स्वत:ची स्वतंत्र ओळख असल्याची जाणीव असलेली ही स्वकथने, स्त्रीला पतीच्या छायेत खुरटून जाण्याच्या किंवा त्याच्या व्यक्तिमत्त्वात स्वत:च्या व्यक्तिमत्त्व लुप्त करून टाकण्याच्या पुरुषसत्ताक परंपरेलाच छेद देतात. स्त्रीचं 'माणूस' म्हणून स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करतात. सुजाता लोखंडे यांच्या 'माझं नर्सिंग' याही स्वकथनाचा यात उल्लेख करावा लागेल. वैद्यकीय क्षेत्रातील अनुभव सांगणारं हे मराठी साहित्यातील पहिलं स्वकथन आहे.

कोकणच्या पार्श्वभूमीवर स्त्रीच्या जिद्दीचा शोध घेत तिचं नातं वैश्विक स्त्रीशी जोडणाऱ्या दोन स्वकथनांपैकी एक प्रा. आशालता कांबळे यांचं (चरित्र आणि स्वकथन यांच्या सीमारेषेवरचं) 'आमची आई' हे स्वकथन. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागतांच्या मार्गावरून चालणे म्हणजे प्रगतीच्याच दिशेने झेपावणे हा संदेश देणारं प्रा. आशालता यांच्या आईचं चरित्र म्हणजे उभ्या विश्वातील कष्टकरी प्रातिनिधिक चरित्रच म्हणावं. जिद्द, स्वाभिमान, कर्तृत्वावरील विश्वास, शिक्षणावरील श्रद्धा, विज्ञानवाद असा साऱ्या मानवी मूल्यांचा संदेश देणारं हे स्वकथन आहे. कोकणच्या पार्श्वभूमीवरचं दुसरं स्वकथन म्हणजे एकूण स्वकथाच्या प्रांतात सर्वात गाजलेलं, बेस्ट सेलरचा मान पटकावलेलं आणि

थेट कोलंबिया विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात जाऊन आंबेडकरी स्त्रीचं कर्तृत्व सातासमुद्रापार पोचवणारं उर्मिला पवार यांचं 'आयदान' होय. २००३ साली 'ग्रंथाली' प्रकाशनने प्रकाशित केलेल्या ह्या पुस्तकाच्या आतापर्यंत कितीतरी आवृत्त्या आणि पुनर्मुद्रणे निघालेली आहेत. २००८ साली त्याचं इंग्रजी भाषांतर माया पंडित यांनी केलं. त्याचं हिंदीतही भाषांतर झालेले आहे. अनेक पुरस्कार प्राप्त झालेलं हे स्वकथन म्हणजे कोकणातील सुखदुःखासह, बाईच्या स्वतंत्र वेदनेसह, तेथील कड्याकपारीसह आणि तळागाळातील समाजाच्या जगण्यासाठी तिथे अस्तित्वात आलेल्या 'आयदान'च्या विणीसह मराठी साहित्यात पहिल्यांदाच इतक्या रसरशीतपणे आलेलं स्वकथन आहे.

आंबेडकरी स्त्री कथा-कादंबरीच्या स्वरूपातही अभिव्यक्त झालेली दिसते. १९८८ साली प्रकाशित झालेल्या उर्मिला पवार यांच्या 'सहावं बोट' या कथासंग्रहाने या अभिव्यक्तीला सुरुवात झालेली आहे. त्यानंतर त्यांचे 'चौथी भिंत' आणि 'हातचा एक' असे दोन कथासंग्रह प्रकाशित झाले. 'कवच' नावाच्या त्यांच्या कथेत आंब्याच्या कोयीच्या कवचासारखं टणक, खंबीर व्यक्तिमत्त्व असलेली इंदिरा रंगविलेली आहे. पुरुषांच्या अश्लील वागणुकीला आपल्या कडक शब्दांनी उत्तरं देऊन नामोहरम करणारी यातील स्त्री रंगवून लेखिकेने जणू सर्वच स्त्रियांना धैर्याचा आणि खंबीरतेचा वस्तुपाठ दिलेला आहे. नलिनी पुडके यांच्या नावावर 'परका', 'एकटी' आणि 'किमया विज्ञानाची' असे तीन कथासंग्रह आहेत. सुशील मूल जाधव यांचा 'बुद्धनीती कथा' हा लहान मुलांसाठी खास असलेला कथासंग्रह उल्लेखनीय आहे. मीनाक्षी मून यांनी बुद्धकालीन भिक्षुणींना कथाबद्ध केले तर अनिता पगारे यांनी 'वस्तीवरची पोरं' या कथासंग्रहामध्ये झोपडपट्टीतील मुलांच्या जगण्याचे वास्तव दुनियेपुढे आणलेले आहे. राजेश्वरी कांबळे (मृद्गंध), शकुंतला रोकडे (एलिझाबेथ) यांनीही कथेच्या प्रांतात भर घातलीय. प्रज्ञा दया पवार यांच्या 'अफवा खरी ठरावी म्हणून' हा कथासंग्रह तर पारंपरिक विषयांना छेद देणारा धीट कथासंग्रह आहे.

कादंबरी क्षेत्रात अरुणा लोणंदकर या लेखिकेची 'वल्लरी' कादंबरी लक्ष वेधून घेते. तृतीयपंथाकडे करुणेच्या नजरेने पाहून त्यांचे भावविश्व चितारणारी ही कादंबरी एकूणच क्षेत्रात वेगळी कादंबरी आहे. करुणा जमदाडे यांची 'रमाई' आणि 'यशोधरा' अशा दोन कादंबऱ्या आहेत; तर कमल वानखेडे, तेजस यांनी 'तथागत गवाह' नावाची कादंबरी प्रथम हिंदीतून प्रकाशित झाली आणि नंतर त्याचंच 'तथागतांच्या साक्षीने' हे मराठी रूपांतर केलेलं आहे. कादंबरी क्षेत्रातील नव्या पिढीचं दमदार नाव म्हणजे शिल्पा कांबळे. समकालीन समस्यांना घेऊन जागतिक आव्हानांचा वेध घेत आंबेडकरवादाचं सूत्र जराही सुटू न देता तिने 'निळ्या डोळ्यांची मुलगी' ही कादंबरी लिहिलीय. कादंबरी लेखनाचं खरं आव्हानं पेलणारी ही लेखिका आहे. सुजाता लोखंडे यांची 'फूटपाथ ते नोटरी' ही कादंबरीदेखील लक्षवेधक आहे.

नाटक या क्षेत्रात आंबेडकरी स्त्रियांची फारशी नावे नाहीत. अभिनयाच्या क्षेत्रात, संगीत क्षेत्रातही अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतकी तुरळक नावं आहेत. अमृता मोरे ही सितारवादनातून अभिव्यक्ती करते, तर वैशाली माडे, उर्मिला धनगर या गायनक्षेत्रात आहेत. आंबेडकरी जलसा करणाऱ्यांमध्ये सुषमादेवी यांचं नाव समोर येतं. नाट्यलेखनामध्ये स्नेहल रामटेके यांचे 'साऱ्या विश्वाला बुद्ध हवा' हे बुद्धांच्या जीवनावरील संवादरूपाने चितारलेले प्रसंग आणि उर्मिला पवार यांचा 'इलास पावन्यांनू, बसा' हा एकांकिका संग्रह लक्षात घेण्यासारखा आहे. २०१३ साली मात्र रंगभूमीवर आलेला 'धादांत खैरलांजी' हा एकूणच मराठी रंगभूमी ढवळून काढणारा नाट्यप्रयोग ठरला. 'खैरलांजी वंशसंहार' प्रकरणावर या नाटकातून प्रकाश टाकलेला आहे आणि या प्रसंगाचं नातं आजच्या शहरी वास्तवाशी जोडलेलं आहे. २०१४ साली व्यावसायिक रंगभूमीवर उर्मिला पवार यांचं 'आयदान' (सुषमा देशपांडे यांनी नाट्यरूपांतर केलेलं) आणि कविता मोरवणकर यांचं 'ज्योति-सावित्री' ही दोन नाटके आलेली आहेत.

संपादनाच्या क्षेत्रात प्रा. रेखा मेश्राम ('रमाई' मासिक), सुरेखा रामटेके ('विश्वलीडर' मासिक) यांची नावे समोर येतात. अनुवाद किंवा भाषांतर या क्षेत्रात डॉ. अरुणा लोखंडे यांचं नाव घेता येतं. यांनी बऱ्याच पुस्तकांचं हिंदीतून मराठीत भाषांतर केलेलं आहे. 'राहुल सांकृत्यायन', 'मैदान', 'नागफणी', 'कोर्ट मार्शल' ही त्यातील काही महत्त्वाची भाषांतरे. प्रा. अर्चना हातेकर यांनी 'तथागत बुद्ध आणि त्यांचे आदर्श भिक्खू' हे अनुवादित पुस्तक लिहिलेले आहे. दुसऱ्या भाषेतील ज्ञान मराठीत आणण्याचं त्यांचं हे कर्तृत्व लक्षात घेण्यासारखं आहे.

प्रवासवर्णनामध्ये उर्मिला पवार यांचं 'मॉरिशस एक प्रवास' हे मॉरिशसच्या समाजजीवनावर प्रकाश टाकणारं पुस्तक तर 'प्रवास आम्हा दोघांचा' हे मालती बुकाणे यांचं थायलंड, मलेशिया, सिंगापूर या तीन देशांतील प्रवासाच्या अनुभवाचं प्रा. आशालता कांबळे यांनी केलेले शब्दांकन आहे.

वैचारिक लेखनात आंबेडकरी स्त्रियांचा लेखनप्रवास वृत्तपत्रांसाठी किंवा मासिकांसाठी प्रासंगिक लेख तसेच पीएच.डी.साठीचे संशोधनात्मक प्रबंध आणि स्वतंत्र संशोधन अशा स्वरूपात आहे. यातील डॉ. माधवी खरात यांचा 'पत्रांच्या अंतरंगातून बाबासाहेब' हा पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेला प्रबंध खूप महत्त्वाचा आहे. डॉ. श्यामल गरुड यांनी देखील दलित स्त्री आत्मकथनांवर पीएच.डी. करून त्याचं पुस्तकही बाहेर आलेलं आहे. वृत्तपत्रीय आणि प्रासंगिक लेखनातून अभिव्यक्त होणाऱ्या स्त्रियांमध्ये अ‍ॅड. मनस्वी तायडे, विदिशा धामणकर, प्रा. अस्मिता अभ्यंकर, मेघना सुर्वे, प्रा. अभिनया कांबळे ही नावे महत्त्वाची आहेत. नवीन पिढीचं दमदार प्रतिनिधित्व करणाऱ्या म्हणून या तरुण आंबेडकरी स्त्रियांची वाटचाल खूप आशादायी आहे. चिकित्सक लेखनात भर टाकणाऱ्या पुस्तकांमध्ये अजून प्रज्ञा दया पवार यांच्या 'केंद्र आणि परीघ' या पुस्तकाचं नाव घेता येईल. अलीकडेच

त्यांचं 'टेहलटिकोरी' हे पुस्तकही प्रकाशित झालेलं आहे. गाथा सोनावणे हिचे 'उपेक्षित सिद्धार्थ पत्नी यशोधरा' हे पुस्तक चिकित्सेच्या जवळ जाणारं आहे. जयश्री गायकवाड यांनीदेखील 'राहुलमाता यशोधरा' आणि 'आमच्या आई रमाई' ही दोन पुस्तकं लिहिलेली आहेत.

स्वतंत्रपणे संशोधन करणाऱ्या आंबेडकरी स्त्रियांमध्ये उर्मिला पवार आणि मीनाक्षी मून यांच्या 'आम्हीही इतिहास घडवला' या महत्त्वपूर्ण ग्रंथाचा उल्लेख करता येईल. आंबेडकरी चळवळीचा दस्तावेज म्हणून या ग्रंथाचं मोल खूप मोठं आहे. उर्मिला पवार यांचं 'दलित लेखिका आणि त्यांचं साहित्य' हे पुस्तक सुद्धा महत्त्वाचं आहे. विदिशा धामणकरने चळवळीत काम करणाऱ्या स्त्रियांच्या मुलाखती घेऊन 'विस्तारलेलं अवकाश' हे पुस्तक लिहिलेलं आहे, तर प्रा. आशालता कांबळे यांनी 'समर्थ स्त्रियांचा इतिहास' हे पुस्तक लिहून त्यात थेरीगाथा, रमाई, यशोधरा, जिजाऊ, बहिणाबाई चौधरी अशा स्त्रियांच्या सामर्थ्याचा इतिहास मांडलेला आहे. 'बहिणाबाईंची कविता : एक आकलन' हा त्यांचा स्वतंत्र साहित्यिक संशोधनाचा ग्रंथ आहे. यातील बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांचं लेखिकेच्या शब्दांतून आलेलं आकलन अमेरिकेतील लेखिका अनुराधा गानू यांनाही भुरळ पाडून गेलं. त्यांनी याचं अमेरिकेतील रसिकांसाठी इंग्रजीमध्ये 'संगितिके'त रूपांतर केलं. संविधानमूल्यांचं संवर्धन करणाऱ्या साहित्याचा वेध घेणारं 'माणूस घडविणारं साहित्य' हे दैनिक महानायकामधून दोन वर्षे प्रसिद्ध झालेलं त्यांचं सदर वाचकांच्या खूप पंसतीस उतरलेलं आहे. त्यांनी केलेली कुसुमाग्रजांच्या कवितेवरील 'रसपूर्ण मीमांसा' विविध नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेली आहे.

आंबेडकरी साहित्यिकांच्या अभिव्यक्तीतील हा धावता आलेख आहे. अजून कित्येक जणी यातून निसटल्या असण्याची शक्यता आहे. या स्त्रियांनी आपल्या अभिव्यक्तीतून परंपरेलाच नाकारण्याचं धाडस दाखवलेलं आहे. बुद्धकाळातील थेरींच्या धाडसी परंपरेचा वारसा आपलासा करत या सर्वच पातळ्यांवर अभिव्यक्त होत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धांच्या परंपरेची आधुनिक भारताला १९५६ साली ओळख करून दिली. स्वातंत्र्य, समता, बंधुता, विज्ञाननिष्ठा ही त्या परंपरेतून आलेली मूल्ये आंबेडकरी स्त्रियांनी विचारात घेऊन आपली वाटचाल केलेली आहे. साहित्यक्षेत्रात 'दलित साहित्य' या नावाने सुरू झालेली अभिव्यक्तीची वाट आज 'आंबेडकरी साहित्य' या नावाने ओळखली जात आहे. 'संविधानमूल्यांचे साहित्य' या नावानेही पुढे ती प्रस्थापित व्हायला हरकत नाही. कारण संविधानाची निर्मितीच मुळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेली आहे. त्यांनी बुद्धांपासून घेतलेली मानवी मूल्ये, संविधानाची पायाभूत सूत्रे म्हणून स्वीकारली आहेत. म्हणूनच 'आंबेडकरी साहित्य' आणि 'संविधानमूल्यांचे साहित्य' हे वेगवेगळे असू शकत नाही. आज याची जाणीव ठेवून आंबेडकरी स्त्रिया स्वत:ला अभिव्यक्त करताना दिसत आहेत. जागतिकीकरणाशी संबंध आलेल्या नवीन पिढीच्या लेखिका, जगण्याची नवीन आव्हाने समर्थपणे पेलताना आणि आपल्या करिअरसाठी आकाशी झेपावताना भारताच्या भूमीत रूजलेलं बुद्ध तत्त्वज्ञान जराही विसरू इच्छित नाहीत. म्हणूनच आंदोलनांसाठी रस्त्यावर उतरतानाही त्या कधी कायदा हातात घेत नाहीत किंवा साहित्यातून अभिव्यक्त होताना मानवतेच्या मूल्यांनी ओतप्रोत भरलेलं असं साहित्यलेखन करत इथल्या मातीशी आपलं नातं घट्ट रूजवून ठेवल्याची साक्ष द्यायलाही विसरत नाहीत.


– **प्रा. आशालता कांबळे**
भ्रमणध्वनी : ९९३०३७३०५३
k.ashalata@yahoo.co.in



**मासिकाच्या मालकीबद्दल निवेदन**

**(रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स फॉर्म ४ (नियम ८ अन्वये)**


| | |
|---|---|
| प्रसिद्धीचे ठिकाण | : ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |
| प्रकाशन काळ | : मासिक |
| मुद्रकाचे नाव | : इंडिया प्रिंटिंग वर्क्स |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ |
| संपादकाचे नाव | : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |
| मालकाचे / प्रकाशकाचे नाव | : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |

मी, सुदेश राजाराम हिंगलासपूरकर असे जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा आहे.

दि. १/३/२०१७

कवी, चित्रकार संजीव खांडेकर हे नाव नेहमीच आपल्या परखड विचारांसाठी अन् अभिव्यक्तीसाठी ओळखलं जातं. 'स्त्री'ला काय हवं (असतं)? या कालौघात नेहमीच ऐरणीवर येणाऱ्या प्रश्नाची त्यांनी केलेली ही चिकित्सा...

संजीव खांडेकर



# योनिभयग्रस्त शोकांतिका...

संवेदनाशील विचारवंत पुरुष आणि स्त्रीत्वाचा अभ्यास करणाऱ्या, 'जेंडर सेन्सेटायझेशन' किंवा लिंग जाणीव संवेदनाचा मागोवा घेणाऱ्या विचक्षण स्त्रियांना - एकूण अशा मूलभूत विषयाचा विचार करणाऱ्या साऱ्यांनाच Feliz nuevo siglo doktor Freud हॅपी न्यू सेंच्युरी, डॉक्टर फ्रॉईड या गेल्या दशकात गाजलेला नाटकाबद्दल नव्याने सांगण्याची गरज नसली तरी मला या नाटकातील काही भागाचा सविस्तर उल्लेख करण्याचा मोह टाळता येत नाही.

'स्त्रीला काय हवे (असते)' या विषयावर गेल्या दोन अडीच हजार वर्षांत मुख्यत: पुरुषांनीच इतके प्रचंड लेखन, चिंतन केले आहे की काही वेळा या पुरुषी चिंतनाचा अभ्यास फ्रॉईड किंवा लोकांच्या 'फिअर सायकोसीस' या रूपकातून करावा की काय असा धाडसी विचार माझ्या मनात अनेकदा येऊन गेला आहे आणि ॲरिस्टॉटल व फिलायस यांच्या एकत्रित स्प्रॅन्गर सारख्यांनी चित्रित केलेल्या वा अनेक अनाम कलावंतांनी शिल्पित केलेल्या कलाकृतींची आठवण येऊन माझ्या चेहऱ्यावर मलाही नकळत उमटलेले हसू हे माझी लाज वाटून उमटले की तत्ववेत्त्यांची उडालेली भंबेरी पाहून उमटले याचे उत्तर आजही मला सापडलेले नाही. चित्र असो वा कविता, कथा असो वा कादंबरी, चित्रपट वा नाटक, शिल्प वा साधे गाणे, तत्त्वज्ञान वा अगदी विज्ञानदेखील अशा सर्वच क्षेत्रांत गेली हजारो वर्षे या एका प्रश्नाचा माग काढणे थांबलेले नाही. 'स्त्रीला काय हवे' या प्रश्नाने कधी बिथरून तर कधी घाबरून, कधी उत्सुक तर कधी प्रतिभेच्या कल्पनाविश्वातून, कधी विज्ञानाच्या कसोट्यांवर घासून तर कधी तांत्रिक मांत्रिक बनून, मानस विश्लेषणाच्या भूलभुलैय्यातून तर कधी तत्त्वज्ञानाच्या हिंदोळ्यावरून, शरीर व जीवशास्त्राचा आधार घेऊन तर कधी समाजशास्त्र इतकेच काय पण मार्क्सवादी अर्थशास्त्राची आकडेमोड करून या प्रश्नाची तड लावण्याचा प्रयत्न अनेकांनी अनेक वर्षे केला. एक चित्रकार म्हणून स्त्रीची नग्न किंवा न-नग्न प्रतिमा रंगवताना येणारी धुंदी मी अनुभवली आहे, त्यामुळे चित्रातून हा वेध कसा घेतला गेला किंवा शिल्पातील कोणत्या वळणावर कसे श्वास रोधले जातात याचीही मला कल्पना आहे. मिथकांच्या जंजाळात महापुरुषांनी स्त्री देहात कसा व का प्रवेश केला इथपासून अर्धनरनारीनटेश्वर किंवा मोहिनीच्या रूपाबद्दल कृष्णाला 'नार' बनवण्याच्या खेळाबद्दल किंवा आचार्य, महाराज, नाथ, स्वामी, भिक्खू किंवा आणि कुणी यांच्या मोह, माया व क्रोध, काया अशा सर्वच निरूपणाबद्दल मी थोडंबहुत वाचन केलेले आहे. शास्त्रीय संगीतातील जवळपास प्रत्येक बंदिश, जी मुख्यत: गायकांनी गायली आहे, ती कोणा ना कोणा स्त्रीची कथा, व्यथा किंवा कविता, आनंद, दु:ख, विरह, मिलाफ अशीच का असावी - एखाद्या पुरुषाची कथा वा व्यथा का नसावी असा प्रश्न मला फार पूर्वीच पडला होता व त्याचेही उत्तर पुरुषाच्या 'स्त्रीला काय हवे (असते)?' या मूलभूत प्रश्नातच अडकले आहे याची मला कल्पना आहे.

अनेक समकालीन मानस-समाज-जैव-शरीर शास्त्राच्या व विशेषत: अलीकडेच उदयाला आलेल्या उत्क्रांती शास्त्राच्या अनेक अभ्यासकांना 'स्त्रीला काय हवे (असते)?' या प्रश्नातच मानवी संस्कृतीच्या चलनवलनाचे रहस्य दडले आहे असे प्रकर्षाने वाटते. जेफरी मिलर या तरुण अभ्यासकासारख्या अनेकांना त्यामुळे कला असो वा विज्ञान, सौंदर्यशास्त्र वा नैतिकशास्त्र अशा सर्वच क्षेत्रांचा उगम व विस्तार या प्रश्नाच्या शोधातून झाला असे वाटू लागले आहे. डार्विनच्या 'लैंगिक निवडी'च्या निरीक्षण निष्कर्षाचा आधार घेऊन व फ्रॉईडच्या 'लिबिडो' किंवा 'जीवनेच्छे'चा विलास करून किंवा आधुनिक मेंदू व मज्जाशास्त्राच्या अभ्यासातून मिळालेल्या



गृहितकातून त्यांच्या मतांना निश्चितच आधार मिळतो. मार्क्सवादी व अन्य डाव्या विचारवंतांनी, स्त्रीवादी लेखिका व कलावंतांनी याच अभ्यासांचा वा निरीक्षणांचा उपयोग करून 'स्वत:ला काय हवे (तेच) स्त्रीला (कसे) हवे असते' याचा पद्धतशीर प्रसार व प्रचार करून, त्याचे सौंदर्यशास्त्र बनवून स्त्रीचे व स्त्रीत्वाचे दमनाचे राजकारण कसे केले याबद्दल गेल्या काही वर्षांत बरेच लेखन व विवेचन झाले आहे.

स्त्रीला काय हवे (असते) याचा विचार करता करता तिच्यावर 'त्याचे' हवे असणे लादत तिची मूर्ती कशी घडवली, तिचे चित्र कसे चितारले व का घडवले याचा शोध एखाद्या रंजक नव्या पुस्तकाचा विषय होऊ शकेल. 'द आदर इज मिरर, दे ऑल हॅड फिअर ऑफ मिरर आदर' या लांकांच्या उक्तीचा वापर करून स्त्रीबद्दल वाटणारी भीती हाच पुरुषसत्तेचा केंद्रबिंदू आहे काय, असा प्रश्न मला पडतो. त्यामुळेच 'वुमन डजन्ट एक्झिस्ट' या लांका यांच्या विधानाचे स्त्रीवादी विचारवंतांनी केलेले खंडन वा लांकावादी स्त्री पुरुष - अगदी झीझेक (झायझेक) यांच्यापर्यंतच्या मंडळींनी केलेले समर्थन वा विश्लेषण मला मान्य नाही. फ्रॉईडच्या पठडीत वाढलेल्या लांका यांचे विधान मला अनेकदा त्यांच्या ठायी असलेल्या पुरुषाला स्त्रीबद्दल वाटणाऱ्या आदिम (आर्किटायपल) भीतीतून आले असावे असा माझा दावा आहे. भीतीमध्ये पलायन व आक्रमण असे दोन परस्परविरोधी डिफेन्स मेकॅनिझम्स (संरक्षण प्रतिक्रिया) दडलेले असतात. पलायनात ज्याची/जिची भीती वाटते ती वस्तू वा व्यक्ती यापासून लांब जाणे, नजरेआड जाणे वा करणे, ती नाहीच असे मानून व्यवहार करणे अशा अनेक गुंतागुंतीच्या क्रियांचा अंतर्भाव आहे. तर आक्रमणात हिंसा, मालकी, गुलामी, व्यवस्था, शासन अशा विविध स्तर-प्रस्थर प्रतिक्रियांची व्यामिश्र रचना अभिप्रेत आहे. तिची भीती हा जर उगमबिंदू मानला तर या दोन्ही प्रतिक्रियांच्या राजकीय निवडीतून लांका यांचे 'वुमन डजन्ट एक्झिस्ट' हे वचन कसे आकार घेते किंवा एकूण पुरुषप्रधान व्यवस्थेचा मॉलिक्युल - रेणू कसा निर्माण होतो याचे ज्ञान आणि भान येऊ शकते.

हे विधान करताना लांकावादी बुद्धिवाद्यांना व कट्टर तत्त्वचिंतक झायझेकवादी डाव्या धुरीणांना तसेच काही स्त्रीवाद्यांनाही अंगावर घेण्याचा 'आ बैल मुझे मार' असा साहसी प्रयोग मी करतो आहे या जबाबदारीची मला जाणीव आहे. '(स्त्रीबद्दल) आम्हाला भीती नव्हे फक्त प्रीतीच' वाटते अशी खोचक प्रतिक्रियाही मी ऐकली आहे.

पुराणकथा मग त्या इथल्या असोत वा ग्रीकांच्या, माया किंवा बॅबिलॉनच्या, सुमेरियन किंवा अति आदीम समाजाच्या, त्या सर्व कथांचा ऐतिहासिक धांडोळा घेतला, त्यातील देव-देवतांच्या मानवी व अमानवी संबंधांचा मागोवा घेतला, त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक कर्मकांडे, मूर्ती उपासना, आयकॉनॉग्राफी वा चिन्ह, संज्ञा, रूपकांचा तपास केला तर आपल्याला काय आढळते? लिंगपूजेच्या कित्येक हजार वर्षे आधी अस्तित्वात असलेली योनीपूजा, मातृरूपे, स्तनपूजा, बळी, वृंदावने, नृत्यप्रकार, संगीतातील स्वीकृत मिथेनने स्पष्ट केलेली आवाहने व आवाज - अशा अक्षरश: हजारो साधनांतून सातत्याने पुढे येणारी गोष्ट म्हणजे मानवी समाजातील पुरुषाला स्त्रीच्या स्त्रीपणाविषयी असलेली - अज्ञानातून वा ज्ञानातून जाणवलेली 'अद्भुतां'ची भावना. स्वत:च्या लिंग सामर्थ्याविषयी असलेली अपुरेपणाची कल्पना, वीर्यपतनानंतर आपोआप आक्रसणाऱ्या लिंगाची हतबलता, त्यातून स्त्रीच्या योनीविषयी व तिच्या अपार इच्छेच्या अथांगपणाला - तळाला पोचण्यात जाणवलेले अपयशाचे, खचलेपणाचे औदासिन्य व एका पराभूत पुरुषीभावाचे भय, पुरुषी जैव स्पर्धेचे शारीर मानसिक दडपण, त्यामुळे सतत हरवले जाण्याचे तणाव, लिंगाचे अपुरेपण किंवा पुन:पुन्हा जाणवलेली 'मर्त्यता' - संपलेपणाचा भुंगा स्वत:ला पोखरत आपला भुसा करतोय ही भावना.

फ्रॉईडपासून झायझेकपर्यंत अनेक मानसतत्त्वज्ञांनी मांडलेला विचार निरीक्षणांच्या अगदी विरुद्ध, अशी ही माझी मांडणी आहे.

आपल्याकडे राजवाडेंसारख्या वा कोसंबींसारख्या अनेक व पाश्चात्त्य देशांतील अनेक इतिहास संशोधकांनी व मानवी उत्क्रांतीच्या साधनांचा अभ्यास करणाऱ्या अनेक विचारवंतांनी पूजाविधीचा उगम - ज्याची वा जिची पूजा करण्यात येते. त्याच्या वा तिच्या सामर्थ्याविषयी वाटणाऱ्या भीतीमुळे उद्भवले - या जाणीवेत आहे असेच विवेचन केले आहे. पूजेचा एक उद्देश हा जसा शरण जाणे वा लीन होणे असा असतो, तसाच सामर्थ्य मिळवणे व ती शक्ती अनुकूल करणे, तिला 'वश' करणे, तिच्यावर 'नियंत्रण' मिळवणे व आपली 'इच्छापूर्ती' करणे हाही तेवढाच महत्त्वाचा असतो. पूजेची प्रथा व पद्धती यांचा राजकीय हेतू त्या त्या दैवी शक्तीला गुलाम बनवणे किंवा ताब्यात ठेवणे असाच असतो. भीती हा पूजेचा (व प्रीतीचाही) गाभा असतो. नतमस्तकता हाच पूजेचा उद्देश असतो. शरण जाणे हा बचावाचा व म्हणून लपण्याचा एक



***Phyllis and Aristotle Johannes Sadeler I***
***After Bartholomeus Spranger***
***(Netherlandish, Antwerp 1546–1611 Prague)***

मार्ग असतो. योनीपूजा ते लिंगपूजा हा सर्व प्राचीन समाजातील प्रवास हा पुरुषाच्या स्त्रीबद्दल वाटणाऱ्या भीतीचा, लैंगिक निवड स्पर्धेतील तणावाचा आणि आपल्या अपुरेपणाच्या – मर्यादेच्या झालेल्या जाणीवेतून आलेल्या हतबलतेचा प्रवास आहे. तो तसाच व्यामिश्र आहे व अनेकऐतिहासिक व मिथिक स्तरांच्या बांधणीतून तयार झालेला आहे.

आधुनिक पाश्चात्य मानसशास्त्र हे फ्रॉईडच्या प्रतिमेच्या आणि त्याने रोजच्या जीवनाकडे नव्याने पाहिलेल्या लैंगिक इच्छेच्या शमन-दमन क्रिया, प्रतिक्रियांच्या ताण्याबाण्यातून उभ्या केलेल्या जीवनइच्छेचे प्रगटीकरण म्हणून पाहिले गेले, उदयास आले व विस्तारले. फ्रॉईडची व त्यानंतर त्याच्या अनेक समर्थक शिष्यांनी स्पष्ट केलेली एक मांडणी म्हणजे 'कॅस्ट्रेशन किंवा आपले लैंगिक अवयव गमावण्याची माणसाला वाटत असलेली भीती' या सिद्धांताप्रमाणे जरी पुरुषाला लैंगिक जाणीव झाल्यावर किंवा त्याही पूर्वी आपल्याला लिंग आहे, तसे ते स्त्रीला नसते हे समजल्यावर तिचे असलेले लिंग कुणीतरी कापून टाकले असावे असे वाटते व जसे तिचे लिंग नष्ट झाले तसे आपलेही – कुणीतरी म्हणजे लैंगिक शमनाच्या स्पर्धेतील अन्य पुरुष – बाप किंवा भाऊ, मित्र किंवा अन्य बलदंड पुरुष ते आपल्यापासून हिरावून घेईल याची त्याला भीती वाटते. हा सिद्धांत क्रांतिकारक तर आहेच व त्यामुळे पुरुषाच्या पुरुषी व्यवहारांची उकल करण्याची, एखादी न पाहिलेली वाट तो दाखवतो.

परंतु स्त्रीची 'कॅस्ट्रेशन' भीती पुरुषापेक्षा अधिक गहिरी आहे असे फ्रॉईड मानतो. पुरुषासारखे लिंग आपल्याला नाही, ते आपण गमावले, याचा न्यूनगंड व हेवा, कमीपणा व द्वेष असा तिचा दुहेरी मानसरेणू असतो असे त्याचे म्हणणे. आपल्याला लिंग नाही म्हणून व ते पाहिल्यानंतर त्याच्याबद्दल वाटलेली भीती, उत्सुकता, हेवा, गंड अशा संमिश्र भावनांतून स्त्रीची जडणघडण होते असे फ्रॉईड व त्याच्या अनेक समर्थकांचे म्हणणे आहे.

या अर्थाची शेकडो चित्रे, कथा, कविता पाश्चात्य कलावंतांनी व त्यानंतर येथील कलाकारांनी निर्माण केल्या व त्यातून 'कॅस्ट्रेशन अॅस्थेटिक' किंवा 'लिंगनाश भयाचे सौंदर्यशास्त्र' निर्माण केले. आपल्याकडे 'आधुनिक' मॉर्डनिस्ट दृश्य कलावंत, कवी व नाटककार, साहित्यिक अशा अनेक मंडळींना अशा सौंदर्यशास्त्राचा पडलेला मोह सुझा, हुसेन, मह चित्रे, कोलटकर, खानोलकर, तेंडुलकर आदी अनेकांच्या कलाकृतींमध्ये कसा प्रतिबिंबित झाला आहे यावर स्वतंत्र पुस्तक लिहावे लागेल.

जिऑरजिओ अॅगमबेन यांच्या 'नग्नता' या पुस्तकात ख्रिश्चन मिथिकामधील अॅडम व इव्हची कथा विस्तृतपणे सांगितली आहे. या कथेत इडनच्या बागेतील सफरचंद खाण्याचे पाप केल्यामुळे नग्न आदिम पुरुषाला व नग्न आदिम स्त्रीला परमेश्वराने कशी वस्त्र परिधान करायला लावली याचे वर्णन आहे. त्यात इव्हने वस्त्रे परिधान करायला नकार दिल्यावर देवाने ती वस्त्रे तिच्यावर बळजबरीने कशी चढवली याचा उल्लेख आहे. परमेश्वरानेच तिच्या नग्नतेचे (नग्न राहण्याचे) स्वातंत्र्य कसे हिरावून घेतले, तिच्या इच्छेविरुद्ध तिला प्रावरणात कसे गुंडाळले गेले याचेच ते वर्णन आहे. (वस्त्रे चढवणारा हा परमेश्वर स्वत: नग्न होता की नव्हता, असलाच तर त्याचे लिंग कोणते व कसे होते याचे वर्णन मात्र आपल्याला मिळत नाही व नसला तर त्याने कोणत्या पापापायी वस्त्रे चढवली याही बाबी गुलदस्त्यात आहेत.) थोडक्यात फ्रॉईडिअन स्त्रीला (वा पुरुषाला) वाटणारी कॅस्ट्रेशन भीती – पुरुषाच्या स्त्रीला (वा पुरुषाला) वाटणारी कॅस्ट्रेशन भीती – पुरुषाच्या लिंगाचा हेवा वा भय आदिम स्त्रीला नव्हते हेच या कथेतून सिद्ध होते.

आपल्याकडे उभार, मोठ्या स्तनांच्या व विशाल योनी पुष्पाच्या विविध देवतांच्या मूर्ती असोत वा अगदी अलीकडे १४-१५ व्या शतकात हंपीच्या मुख्य देवालयावर मांड्या पसरून व दोन्ही हातांनी आपली योनी फाकून उभी असलेली स्त्रीची मूर्ती असो, अशा व याप्रकारच्या अनेक शिल्पांमध्ये स्त्रीला आपणास नसलेला लिंगाची भीती तर नव्हेच नव्हे पण आपल्या योनीच्या सामर्थ्याचा झालेला गर्वच डोळ्यांसमोर उभा राहतो. गंमत म्हणजे अशा सर्व शिल्पांमध्ये तिच्याबरोबर उभ्या असलेल्या पुरुषाच्या प्रतिमा केविलवाण्या, कमी जागा दिलेल्या, कृश व लिंग अर्धवट ताठ असलेल्या, भयचकित भाव असलेल्या अशाच आहेत.

फ्रॉईडच्याच सिद्धांताचा उलट्या पद्धतीने विचार केला तर

पुरुषालाच आपल्याला हा कोणता अवयव उगवला, याचे भय, आश्चर्य वाटण्यालाही वाव आहे. जे दिसत नाही त्याची उत्सुकता व भीती जास्त वाटते. स्त्रीचा अदृश्य लैंगिक अवयव हीच पुरुषाची भीती व उत्सुकता राहिली आहे काय?

"So please, therapists and analysts, since she is not castrated, even though she may be unsure of her rights and abilities, don't you castrate her."

मरिआ लॅन्गर (Marie Langer) ही विसाव्या शतकातील एक महत्त्वाची मानसतज्ज्ञ. ती फ्रॉईडकडेच शिकली. परंतु तिच्यातील स्त्रीवादी मानसतज्ज्ञाने तिला स्त्रीकडे व तिच्या लिंगभयगंडाकडे पूर्णपणे वेगळे बघायला लावले. वरील वाक्य तिच्या गाजलेल्या 'From vienna to Managua' या पुस्तकातून घेतले आहे.

या लेखाच्या सुरुवातीला मी सबीना बर्मन या प्रसिद्ध नाटककार, पत्रकार आणि मानसशास्त्रज्ञ स्त्रीवादी विदुषीच्या 'हॅपी न्यू सेंच्युरी, डॉक्टर फ्रॉईड' या नाटकाचा उल्लेख केला आहे.

या नाटकाच्या एका दृश्यात एक तरुण मुलगी – तिचे नावही फ्रॉईडच्या सुप्रसिद्ध पेशंट कथेतील 'डोरा' असेच आहे. ती एका ऑपरेशन टेबलावर पूर्ण नग्न झोपली आहे. टेबलाच्या एका बाजूला सिगमंड फ्रॉईड तर दुसऱ्या बाजूला (नित्से, रिल्के, फ्रॉईड यांची जवळची मैत्रीण असलेली) लोन अँन्ड्रीया सालेम उभी आहे. ती प्रेक्षकांना सांगते की डॉक्टरांनी डोरावर 'मेजर सर्जरी' करायची ठरवली आहे आणि त्यासाठी मी हे आयुध (स्कालपेल) तयार करते आहे. ही शस्त्रक्रिया आहे 'कॅस्ट्रेशन'ची.

जर या स्वतंत्र तरुणीचा रोग तिच्या कल्पनेतील लिंग असेल तर आपल्याला तिचे हे कल्पित लिंगच कापून टाकावे लागेल असे म्हणत डॉ. फ्रॉईडची त्याच्या आयुधासह त्या नग्न डोराबरोबर तिचे नसलेले लिंग कापून टाकण्यासाठी झटापट सुरू होते.

काही हजार वर्षांपूर्वी परमेश्वराने बळजबरीने चढवलेले वस्त्र व काढून घेतलेली नग्नता व त्यानंतर गेली शंभर वर्षे तिच्या नसलेल्या लिंगाची तिलाच भीती दाखवून ते उपटून टाकण्याची चालू असलेली शस्त्रक्रिया दोन कृतींमध्ये पुरुषाचा स्त्रीकडे पाहण्याचा भयकोन कसा विस्तारत गेला आहे याचे आपल्याला दर्शन व्हावे.


सुमारे दहाबारा वर्षांपूर्वी मी लिहिलेल्या 'इन सर्च ऑफ अ बेस्ट फक ऑफ माय लाईफ' या कवितेचा नायक स्वतःला असलेल्या लिंगाच्या अपुरेपणाच्या भावनेने पछाडलेला आहे. त्याच्या भीतीची छायाच पुरुषाच्या पुरुषीपणाचा खरा चेहरा आहे काय, असा प्रश्न मला अनेकदा पडतो.

डोरा किंवा स्त्रीच्या उन्मादाचे आपल्याला अचूक निदान झाले नाही. तिच्या उन्मादाचे रहस्य आपल्याला कळले नाही. स्त्रीला काय हवे असते हे कोडेच राहिले की काय अशी फ्रॉईडची खंत होती.

आजच्या अतिचंगळवादी आणि बाजारपेठीय अर्थव्यवस्थेत स्त्रीला काय हवे या प्रश्नाचे उत्तर शोधताना तिचा असलेला किंवा कल्पित जी (G) बिंदू कोठे आहे व तो कसा मिळवावा व तिला लैंगिक सुखाच्या अत्युच्च शिखरावर कसे पोचवावे याचेच चर्वीकरण केले जाते. किंबहुना जी स्पॉट ही नव्या मुक्त अर्थव्यवस्थेची एक चलाख खेळी आहे असे मला अनेकदा वाटते. सद्य अर्थव्यवस्थेत स्त्री व पुरुष यांना वेगळे मानलेच जात नाही. सर्वचजण ग्राहक असा सुटसुटीत शब्द वापरला गेल्याने लांकाच्या 'वुमन डजन्ट एक्झिस्ट' या वाक्याला मग नवा अर्थ प्राप्त होऊ शकतो. पुरुष वर्चस्वाच्या मुक्त बाजारपेठ व्यवस्थेत मग सगळेच पुरुष ठरतात. कारण अशा पुरुषप्रधान व्यवस्थेचे सौंदर्यशास्त्र, सांस्कृतिक मानदंड, नीती आणि भावशास्त्र पुरुषाच्या 'गेझ'वरच निश्चित केले जातात. अशा अवस्थेत मग सर्वच जण पुरुष असतात किंवा बनू पाहतात. ग्राहक पुरुष एवढीच त्यांची वर्गवारी. या सर्वच पुरुषांना स्त्री नावाच्या संकल्पनेची भीती व उत्सुकता, वासना व लालसा असते. या सर्वच ग्राहकांना तिला मिळवायची असते. अशावेळी असलेला वा नसलेला, कल्पित व कधीही हमखास मिळेलच याची शाश्वती नसलेला, म्हणून सतत त्याचा मोह वाटणारा, एकदा तरी मिळावा, मिळवावा असे वाटणारा, पाऱ्यासारखा गुळगुळीत हातून निसटून जाणारा 'जी' स्पॉट अशा व्यवस्थेचे व्यवच्छेदक लक्षण ठरतो. त्यामुळे सतत नव्या प्रॉडक्टच्या – उत्पादनाच्या, खरेदीच्या, उपभोगाच्या रेट्यामध्ये सारा समाज अडकवून ठेवता येतो. अशा समाजात कालचा फोन आज चालत नाही, कालचा शर्ट उद्या जुना होतो, वेग आणि सतत बदलणारे उत्पादन व ते नवे मिळवण्याची धडपड असा हा प्रवास असतो. एका अर्थाने पुरुषाने उभ्या केलेल्या त्याच्या भीतीच्या राजकारणावर हा नियतीने उगवलेला सूडच आहे. परंतु या खेळात सारा समाजच अतृप्त पुरुषाचा आत्मा बनून जखमी अश्वत्थाम्यासारखा भणंग भटकंतीला सामोरा जातो हे त्याचे दुर्दैव आहे.

'जी स्पॉट' बाजारपेठीय व्यवस्था – तिच्या कक्षेत येणाऱ्या सर्वांनाच पुरुष ग्राहक बनवते. झायझेक यांच्या एका लेखात कोकाकोलाचे उदाहरण वापरून सद्य बाजारपेठीय अर्थव्यवस्थेवर भाष्य केले गेले आहे. 'तहान भागवा, कोक प्या' अशी जाहिरात असते. परंतु कोक पिऊन तहान भागत नाही. कोकचा फॉर्म्युलाच असा बनवला आहे की तो लागलेली तहान वाढवतो. मग काय! पुन्हा तहान भागवण्यासाठी कोक प्या. अशा न भागणाऱ्या व पुन्हा पुन्हा लावल्या गेलेल्या तृष्णेच्या शांतीसाठी माणूस फिरत राहतो. 'जी स्पॉट' त्याहूनही गूढ व रहस्यमय आहे. तो आहे किंवा नाही असलाच तर नेमका कुठे याबद्दल गेली काही वर्षे सतत नवनवीन लिखाण, संशोधन छापून येत असतं. तो सापडल्याचा दावा जरी केला गेला तरी तुमच्या माझ्यासारख्या माणसासाठी ती एक गूढ आणि संदिग्ध गोष्ट राहते. असमाधान हा नव्या भांडवली व्यवस्थेचा मुख्य मंत्र आहे. त्यामुळे आपला 'जी स्पॉट' आहे मात्र तो आपल्या पुरुषाला मिळत नाही, म्हणून स्त्री आणि पुरुष दोघेही असमाधानी. संपूर्ण अर्थव्यवस्था आज माणसाला असमाधानाच्या

जंजाळात अडकवून ठेवण्यासाठी, त्याला रोज नवे काहीतरी विकत घ्यायला प्रवृत्त करण्यासाठी आणि त्याच्या पाठी रोज नवी तहान लावण्यासाठी (पूर्व)नियंत्रित केली जाते. मर्ढेकरांच्या 'भटकत फिरलो भणंग आणिक, मिळेल तेथे पाणी प्यालो' अशी अवस्था माणसाची होती. आणि 'घशात कोरड दुसरी आज' अशा विचित्र पिपासेने प्रेरित झालेले माणसांचे तांडे शॉपिंग मॉलच्या सरकत्या जिन्यावर वरखाली सरकत राहतात. असे वर खाली सरकणे हाच त्यांच्या 'लिबिडो'चा उद्देश बनतो. हे नियंत्रित जिन्यावर वर-खाली होणे हाच त्यांचा फोर प्ले आणि हेच त्यांचे मैथुनाचे माध्यम बनते. शॉपिंग मॉल एवढेच अवकाश दाबलेली नव्हे तर मुक्त केलेली लालसा, तिची बनलेली पिपासा आणि त्यामुळे जीवाला लागलेले पिसे असे या नव्या उन्मादाचे स्वरूप असते. या बाजारात - बाजारपेठेत स्त्री असो वा पुरुष त्या सर्वातच फ्रॉईडची डोरा दडलेली असते, तिचा उन्माद 'विमोचित अबोधा'चा (Unleashed Un- conscious) तिच्या नजरेचे - गेझ पुरुषाच्या आकांक्षांचे म्हणून भयगंडाचे. असा भयगंडाचा पट्टा घेऊन सतत कोणाशी ना कोणाशी तरी फोनवर बोलत किंवा इंटरनेटवर तरंगत जत्थ्याने चालणारी माणसे, स्त्रिया आणि पुरुष गर्दीने एकटीच भटकताना दिसतात. लहानपणी अंधारलेल्या रस्त्यावरून जाताना सोबत एखादा दगड कुणी प्रतीक म्हणून - सोबतीला घेऊन जात असे. रामरक्षा, हनुमान कवच किंवा कुठला तरी ताईत वा गंडा बरोबर असे. आता गजबजलेल्या, हजारो दिव्यांनी लखलखलेल्या रस्त्यावरून चालताना फोन बरोबर असतो. जितका तो सोबतीचा दगड किंवा रामरक्षा किंवा ताईत अर्थशून्य तितकाच हा फोन. निदान त्यावेळी रस्ता अंधाराचा, वय लहान अशी परिस्थिती होती. आता भर दिवसा हे निरर्थक बडबडीचे साधन. जगाबरोबर 'रिअल' टाईमबरोबर राहण्याची सक्ती, मागे राहण्याची भीती आणि असमाधानाबरोबर युती अशा त्रिकोणात एकट्या माणसाचा जीव गुदमरतो.



अशा वातावरणात आपोआपच अविश्वासाचे ढग सहज जमतात. दुसऱ्या माणसावर, मित्रावर, विकत घेतलेल्या वस्तूवर, मत दिलेल्या उमेदवारावर, त्याच्या पक्षावर, त्याच्या राजकारणावर, वाचलेल्या, ऐकलेल्या बातमीवर, मिळणाऱ्या पैशावर, आईबाप, मुलगा, प्रियकर, प्रेयसीवर, इतकेच काय संप्रेरकांनी हिरवा, निळा, लाल, पिवळा असे रंग ल्यालेल्या फुला-फळांवर, त्यांच्या चवींवर, गोडव्यावर, वास आणि गंधावर, रंग आणि रेषेवर साऱ्या निसर्गावरचा - माणसाचा विश्वास ढळू लागतो.

मागे सांगितलेल्या दोनी भयगंडाने पछाडलेल्या पुरुषाला या त्यानेच निर्मिलेल्या जगात उपरेपण आणि अविश्वास यामुळे पराकोटीच्या परात्मभावामुळे, आपलेपण संपल्यामुळे, अपुरेपणाच्या टोकावर उभे राहिल्यामुळे स्वत:चीच भीती वाटू लागते. हे परात्मपण किंवा अर्थशून्यता साठीच्या दशकात उदयाला आलेल्या अस्तित्ववादी विचारधारेत वर्णन केलेला उपरेपणापेक्षा निश्चितच वेगळी जात सांगणारे आहे.

मार्क्सने सुमारे १६५ वर्षांपूर्वी भांडवलशाहीच्या (अति) प्रगत अवस्थेत माणूस माणसापासून, समाजापासून आणि शेवटी स्वत:पासून तुटेल असे भाकित केले होते. आपण त्या भाकिताला आलेली फळे आहोत काय, असे वाटावे अशीच ही परिस्थिती आहे.

अविश्वासाची दरी एवढी रूंद होत चालली आहे की आता हात लांब करूनही दुसऱ्याचा हात हाती येत नाही, जवळ फोन असून, ४ जी कनेक्शन असून, घरादारात वाय फाय किंवा आणिक काहीतरी असूनही मारलेली हाक तिच्या त्याच्यापर्यंत पोचत नाही. प्रतिसाद उमटत नाही. जी.ए. कुलकर्णींच्या कथेत असतो तशी एखादी विहिर, भग्न महालाचे दालन आणि आपल्याच आवाजाचे प्रतिध्वनी सतत ऐकू येत असल्याने आलेली बधीर तरी भयावह मनस्कता - जसे पुढे पाऊल टाकावे की नको असा संभ्रम करणारे श्रद्धा आणि स्वत्व ढळलेले वातावरण हा आपल्या भवतीच्या पर्यावरणाचा अटळ भाग आहे.

अशावेळी चळवळी थंड पडू लागतात, संघटना फुटतात, माणसे जमणे दुर्धर होऊ लागते - डाव्या चळवळींना त्यांच्या चर्चा, अभ्यास वगैरेंना, मोर्चे आणि सभांना लागलेल्या गळतीचे हेच एक मुख्य कारण आहे.

वाउलट 'इव्हेंट' मॅनेज करून आणि खोटी आमिषे दाखवून गर्दी जमवणे सहज शक्य होते. अशा गर्दीला ध्येय वा मध्यबिंदू नसतो, ती जमते आणि फुटते. गर्दी जमवणे व ती विस्कटणे याचीच नवी बाजारपेठ तयार होते. अशा बाजारपेठेमुळे माणसाला त्याच्या समूह कल्पनेपासून - राजकीय प्रेरणेपासून, बदलाच्या इच्छाशक्तीपासून अधिकच दूर फेकता येते. अशा परिस्थितीत क्षणिक साहसाचे राजकारण वा बाजारपेठेच्या इच्छांचे पूर्तीकरण अशा प्रक्रियेला चालना मिळते.

अशा परिस्थितीचा सोपा व पहिला बळी असतो स्त्री. पुरुषप्रधान व्यवस्थेने तिला पूर्वीच पुरुष सौंदर्य व नीतीशास्त्राचे - ॲस्थेटिक व्यवस्थेचे घटक बनवले असल्याने, पुरुषाची इच्छा हाच तिचा अनकॉन्शस किंवा अबोध बनवला असल्याने मुक्तीची कवाडे

उघडताच तो दाबलेल्या इच्छांचा प्रवाह ओसंडून बाहेर पडतो. हिटलरला असलेला किंवा आपल्या देशातील सध्याच्या 'इव्हेन्ट राजकारणा'ला असलेला महिलांचा पाठिंबा हा या परिस्थितीचा परिणाम आहे. भयगंडग्रस्त स्त्री-पुरुष हे अशा राजकारणाची सोपी शिकार असते. भयाचे रूपांतर त्यांना हिंसक, असहिष्णू व व्यक्तीकेंद्री बनवण्यात केले जाते.

स्त्रीला काय हवे (असते) या प्रश्नाचे उत्तर अनेक शतके पुरुषाला जे हवे असते तेच असे घटवून त्याचे मिथिक व नीतीशास्त्र बनवल्यामुळे स्वतंत्रतेच्या वाऱ्याबरोबर साऱ्या समाजच पुरुषी, स्पर्धात्मक, हिंसक, रागावलेला, चिडचिडा आणि 'शिकारी' बनू लागतो. (त्याच्या या 'शिकारी' पैलूविषयी परत कधीतरी सविस्तर लिहावे लागेल.)

अशा समाजाच्या गरजा आपोआप वाढतात, चंगळवादाचे एक मूळ हे नवसमाजातील असमाधान व अविश्वास या दोन धाग्यांचे बनले आहे. हे धागे गुंतागुंतीचे आहेत. वाढलेल्या गरजांमुळे स्पर्धा व हिंसा दोन्ही वाढते. गरजांच्या विषम प्रमाणात उत्पादन केल्याने निसर्गाची संपत्ती व साधने संपू लागतात. ('सरप्लस किंवा अतिरिक्त सुखतृष्णा याविषयी मार्क्सवादी पण फ्रॉईडच्या छायेत वाढलेले मानसविचारवंत जॅक्स लांका यांनी गेल्या शतकात मांडलेले चिंतन या संदर्भात पुन्हा पहावे लागेल.)

अशा कठीण समयी कोण कामाला येऊ शकेल? या झगमगाटी निसरड्या रस्त्यावर चालू असलेली घसरण कशी थांबू शकेल? भयग्रस्त पुरुषी चेहऱ्याचा समाज कोण बदलू शकेल व कसा बदल घडेल हे व याच संदर्भातले अनेक प्रश्न माझ्यासमोर जसे तुमच्यासमोर आहेत तसेच ते आहेत.

माझ्या मते सर्व प्रश्नांचे सोपे उत्तर 'स्त्री' असे आहे व अवघड उत्तर पुरुषवर्चस्वी व्यवस्थेत 'स्त्री'ने पुन्हा 'स्त्री' बनणे हे आहे. योनीभयग्रस्त पुरुषाची मर्यादा तिला नाही. म्हणून तिला काय हवे (असते) याचे उत्तर पुरुषाकडे पाहून नव्हे तर स्वत:कडे पाहून तिला करावे लागेल. भांडवली अर्थव्यवस्थेच्या अगतिकतेमुळे क्षीण झालेली प्रस्थापित मांडणी हा तिच्या व म्हणून साऱ्या समाजाच्या मुक्तीचा हा क्षण आहे.

ही क्षीण भांडवली अर्थव्यवस्था आज परंपरावादी, भेदी, धर्म वा जात आदी भिंतीवादी विचारांच्या आधाराने, प्रबळांच्या हितावर हात मिळवून ताकद मिळवण्याच्या प्रयत्नात आहे. आपल्याकडे अवतरलेला मोदीज्वर आणि मोदीभ्रम अशा व्यवस्थेचे नवे सौंदर्यनीतीशास्त्र घडवण्याच्या प्रयत्नात आहे. जगभर अशा स्थितीवादी उजव्या राजकारणाला नवे धुमारे फुटत आहेत.

अशा कातरवेळी 'स्त्री' नावाची या व्यवस्थेची कडी सुटू शकते. ती स्वतंत्र - न्यूनगंडरहित, स्वप्रकाशित अशी अवतरली तर या व्यवस्थेचा पाया व त्यावर उभी असलेली वर्चस्वप्रवण इमारतीचे बांधकाम कोसळू शकते. त्यामुळे 'स्त्रीला काय हवे (असते)' या प्रश्नाचे एक थेट उत्तर 'आरसा' असे आहे.

स्वच्छ आरसा. ज्याच्यासमोर उभे राहून ती स्वत:ला निरखेल. मोकळी आणि मुक्त, बंधनरहित, अनावृत्त व स्वतंत्र उभी राहील. स्वत:ची ओळख पटवेल. 'मिरर इज द आदर' 'ॲन्ड आदर इज द इमेज इन मिरर' 'देअरफोर नो फिअर, दर मिरर आदर' अशी नव्या जगाच्या नव्या फ्रॉईडची कविता मग ती लिहू शकेल.

आरसा ही मानवी व्यक्तिमत्वाच्या ओळखीचे, अस्तित्वाच्या आधाराचे कारण असते हे फ्रॉईडपासून अलीकडच्या उत्क्रांतीवादी मानसशास्त्र अभ्यासकांपर्यंत अनेकांनी आपल्याला सांगितले. पुरुषी वर्चस्ववादी व्यवस्थेने स्त्रीला आरशापासून वंचित ठेवले. तिला दिलेल्या आरशात पुरुषाला ती जशी हवी तसेच तिने पहावे व त्या 'आदर'च्या भयदमन चक्रात पिसून घ्यावे अशी ती योजना होती. ही योजना उधळून टाकायची असेल तर तो पुरुषी आरसा फोडून टाकावा लागेल, नवा आरसा शोधावा लागेल.

अनेक नव्या तरुण स्त्रियांच्या चित्रांमध्ये, शिल्पांमध्ये, कथा वा कवितेमध्ये, गाणे आणि संगीतामध्ये मला तो दिसतो. माझ्या अनेक मैत्रिणींनाही तो दिसतो. अशा रचनांचे नवे सौंदर्यशास्त्र उभे करावे लागेल. त्यासाठी पारंपरिक राजकारण आणि तिचे गोड गोड सोपे सोपे सौंदर्यशास्त्र मोडावे लागेल.

१८४०-५० च्या दरम्यान जॅकपशे नावाच्या निवृत्त फ्रेंच अधिकाऱ्याने 'स्त्रियांच्या आत्महत्या' या विषयावर किती, कुठे, कारणे असा आकडेवारीचा पसारा जमवला होता. त्याचे पुस्तक होताना जर्मनीतून हद्दपार झालेल्या मार्क्सने त्या पुस्तकाला 'स्त्रिया आत्महत्या का करतात?' असा प्रश्न घेऊन प्रस्तावना लिहिली होती. फ्रॉईडच्या जन्माआधी सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी मार्क्सने स्त्रीला काय हवे या फ्रॉईडीअन प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रगल्भ प्रयत्न केला होता. पुढे न्यूयॉर्क डेली ट्रिब्युन या वृत्तपत्रातील आपल्या स्तंभात आणि १८४४ मध्ये इकॉनॉमिक व फिलॉसॉफिकल मॅन्युस्क्रिप्टस् या आपल्या अभ्यासातही त्याने 'स्त्रीपुरुष संबंध' यावर विस्ताराने नसले तरी बरेच स्पष्ट भाष्य केले आहे. 'स्वातंत्र्य दाबण्याची सामाजिक स्थिती' हेच स्त्रियांच्या आत्महत्येचे वा उन्मादाचे कसे कारण आहे, असे स्पष्ट प्रतिपादन त्याने फ्रॉईडच्या पन्नास वर्षे आधी केले याचे मला नेहमीच आश्चर्य वाटून राहिले आहे. स्त्रियांची गुलामी, पुरुषाने बनवलेली - जणू तुरुंगात टाकलेली त्याची स्त्री - हे मानवी प्रेम (फ्रॉईडीअन लैंगिक शमन) व मानवी स्त्री-पुरुष संबंधांच्या नैसर्गिक आविष्काराला, त्याच्या सहज व मुक्त आविष्काराला बाधा आणतात - असे त्याचे मत होते. अशा संबंधांत माणसाची वस्तू होते. खरेदी व विक्री होते. वापरून उपयोग संपला की फेकून देता येते अशी केवळ वस्तू झाल्यामुळे स्वत:पासून आणि मुख्य म्हणजे स्वत:च्या स्वत्वापासून माणूस (स्त्री) दूर जातो.

खासगी मालमत्तेचा आणि ती स्वत:ला पाहिजे तशी उधळण्याचा अधिकार हा व्यक्तिकेंद्री व्यक्तिवादाचा अतिरेक आहे, असा अधिकार जेव्हा समाजव्यवस्थेचा गाभा बनतो तेव्हा माणूस दुसऱ्या माणसाकडे आपले प्रतिबिंब म्हणून नव्हे तर आपली मर्यादा किंवा आपली दुर्बलता म्हणून पाहतो, असे मार्क्सने लिहून

ठेवले आहे. फ्रॉईडिअन आरशातील प्रतिबिंबाचे राजकीय व सामाजिक पृथक्करण मार्क्सने त्याच्या जन्माआधी कित्येक वर्षे करून ठेवले होते असे मला वाटते.


खासगी मालमत्ता व ती उधळण्याचा अधिकार हाच स्त्री (व पुरुषसुद्धा) व आरसा यांच्यामध्ये येणारा पडदा आहे. आणि आता या पडद्याने केवळ आपलेच नव्हे तर साऱ्या भवतालाचेच प्रतिबिंब भेसूर व दुबळे केले आहे. हा मधला पडदा म्हणूनच टरकावण्याची, भिरकावण्याची आज गरज आहे. तसे केले तर स्त्रीला आणि त्यामुळे पुरुषाला सुद्धा एकमेकांच्या डोळ्यांत स्वत:ची भयव्याकुळ नव्हे तर स्वच्छ प्रतिमा दृग्गोचर होईल. स्त्रीला स्वतंत्र होता येईल. दोघांना एकमेकांवर, भवतालावर प्रेम करता येईल. अशावेळी बेगडी सोबतीची आभूषणे आपोआप गळून पडतील. नग्न स्वातंत्र्याची प्रचीती व म्हणून सहजीवनाची हरवलेली भावना पुन्हा नवी पालवी फुटून संपन्न होईल.

– संजीव खांडेकर
भ्रमणध्वनी : ९३२३४६९८२४
sanjeev.khandekar@gmail.com

ग्रंथाली




संजीवनी खेर यांची
दोन नवीन पुस्तके




जलसुक्त आणि नोबेल साहित्यिक

आपल्यापैकी क्वचितच कुणी असेल की जो जल ह्या रसायनाला फक्त 'एच् टू ओ' म्हणून स्पर्शत असेल. हे जीवनाचे रसायन आहे, ते सर्वांचे 'जीवन' आहे. ते केवळ पिण्याचे, धुण्याचे, झाडांना, गुरांना पाजायचे पाणी नाही; तर त्याला आपण खूप काही गुण जोडले आहेत. पावित्र्याच्या संकल्पनानी सजवले आहे. श्रद्धेने पूजले आहे. अनेक कथांनी त्याची महती जागी ठेवली आहे. पिढ्यान्‌पिढ्या त्यावर पोसलेले आपण त्याचे ऋण मानत आहोत. पण आजच्या काळात ते ऋण चुकते करायला मात्र आपण काचकुच करत आहोत. जलधारांनी आपले अखंड सांस्कृतिक अस्तित्व घेरलेले आहे. पिढ्यांची तृषार्तता जल भागवत आहे. त्यानेच तर ही पृथ्वी इतकी देखणी केली आहे, जिवंत केली आहे. ते किती किती रूपांत आपल्याला तृप्त करीत असते! ह्या जलाने भूगोल नि इतिहास घडवले आहेत. भूतभविष्य त्यात विरघळलेले आहे. विज्ञानाने त्याचे रहस्य आपल्यापुढे मांडले आहे. ज्ञानी, विचारवंत, त्याच्या स्पर्शाचे हळवेपण, माणसाच्या आत्म्याला जपण्याचे गुण सांगत असताना; आपण हव्यासापोटी हे अलौकिक द्रव नासवत आहोत.

**मूल्य २५० रुपये  सवलतीत १५० रुपये**

भारताला साहित्यासाठी नोबेल एकदाच मिळाले. पण नदीन गॉर्डिमीर, वॉली सोयिंका, ऑक्टव्हिया पाझ, हरमन हेस, ल क्लेझिओ, रुडयार्ड किपलिंग, ओरहान पामुक, नगीब महफूज वा रशियन लेखक असोत की आफ्रिकन, त्यांना भारतीय तत्त्वज्ञानाने, खास करून बुद्ध, गांधी आणि उपनिषदाच्या विचारांनी प्रभावित केल्याचे दिसते. त्यांच्या साहित्यावर त्याचा गहिरा ठसा आहे. दुःखाची परिभाषा, त्याचा रंग, माणसाची हाव नि शोषणाची वृत्ती, शांतीच्या शोधात भटकणारी बिद्ध मनं, विध्वंसाने बेचिराख झालेले लोक अखेर उपनिषद, बुद्ध वा गांधींकडेच वळताना दिसतात. गतशतकातील युद्ध उन्मादाने भोगलेल्या असीम वेदना नकोत म्हणून 'युद्ध नको मज बुद्ध हवा' असे वाटले तर साहजिक नव्हे का?

**मूल्य २५० रुपये  सवलतीत १५० रुपये**

महिलादिन विशेषांक

कौटुंबिक न्यायालयात गेली तीस वर्षे वैवाहिक संबंध व संबंधविच्छेदाचे वेगवेगळे प्रकार डोळसपणे व संवेदनशीलतेनं हाताळताना आलेल्या अनुभवांतून स्त्री अभिव्यक्तीचे केलेले गेलेले हे विवेचन...

अ‍ॅड. चित्रा फडके



# आयुष्य उधळायचे की जोजवायचे?

अभिव्यक्ती हा तसा बोजड शब्द आहे. स्त्रीला काय काय वाटते आणि ते वाटणे, त्या जाणिवा ती दुसऱ्यापर्यंत पोहोचवू शकणे हा माझ्या मते त्याचा बाळबोध अर्थ. तरल भावनांच्या अभिव्यक्तीसाठी कुणी कविता करते, कुणी लिहिते, कुणी चित्रांतून व्यक्त होते तर कुणी शिल्पामधून. पण सर्वसामान्य स्त्री जी अनेक समस्यांना सामोरे जात जात रोजच्या रहाटगाड्याला ओढत एक-एक दिवस रेटत असते, तिला पण खूप काही वाटत असते. दुःख, आनंद, राग, द्वेष, अनुकंपा, असहाय्यता अशा अनेक भावनांची एक वीण असते तिचे जगणे परंतु ही वीण प्रत्येकीच्या पिंडाप्रमाणे वेगवेगळी असते. काही जणी लोकलमधल्या मैत्रिणींकडे झालेल्या त्रासाचे गाऱ्हाणे गाऊन रित्या होतात तर काही शेतात निंदणी-खुरपणी करताना शेजारणीला आपले क्लेश सांगून पुन्हा नवे सोसायला/झेलायला तयार होतात. काहीजणी सांगण्या-बिंगण्याच्या फंदात न पडता मस्त गाणी गातात तर काही गाणी ऐकतात तर काहींना व्यक्त होणेच जमत नाही आणि मग त्या कुढत राहतात, अतिरेक झाला की वेड्यापिश्या होतात. स्त्रीसाठी तिचं कुटुंब, हा फार मोठा आधार असतो. या कुटुंबासाठी ती लढायला, मरायला तयार असते अन् या कुटुंबासाठी ती अनेक प्रकारचा त्रासही सहन करते.

कौटुंबिक न्यायालयाच्या पायऱ्या चढणाऱ्या स्त्रिया ह्या बहुतेक वेळा त्यांचा सहनशीलतेची क्षमता संपल्यामुळे तिथे आलेल्या असतात, तर कधी इगोट्रिपमुळे खेचल्या जातात. मग सर्वसामान्यपणे जगणे त्यांच्या हाती उरत नाही आणि बहुतेक वेळा मग 'विवेक'देखील त्यांची सोबत सोडतो. न्याय मिळेल या अपेक्षेने आलेल्यांना हे माहीतच नसते की न्याय कशाला म्हणायचे. अन्न, वस्त्र, निवाऱ्याची व्यवस्था करण्याचा हुकूम म्हणजेच न्याय का? नवऱ्याने, सासूने माझा छळ केला त्याचे काय? त्यांना शिक्षा नको का व्हायला? आणि मग न्यायव्यवस्था जर काही शिक्षा देत नसेल तर मग मीच ती देईन असा काहीसा आविर्भाव/भावना! मग तोल ढळतो आणि स्त्रिया रौद्ररूप धारण करतात. मग मुलांचे हित जिवापाड जपणारी आईच त्यांचा वापर स्वतःच्या प्रतिशोधासाठी करू लागते. अभिव्यक्तीचं हेही एक आगळं रूप, जे त्रासदायक असतं. अभिव्यक्ती बघितली की मन विषण्ण होते.

स्वरा प्रेमात पडली. मिहिरला अमेरिकेला जायचे होते पुढे शिकायला. मग तो पुढे गेला. ही एका वर्षाने गेली. दोघे एकत्र राहत होते. त्यांनी आपसात ठरवले की आधी स्वराचे शिक्षण पूर्ण करायचे तोपर्यंत मिहिर नोकरी करेल आणि दोघांसाठी कमवेल. दरम्यान त्यांनी भारतात येऊन रीतसर लग्न केले. ठरविल्याबरहुकूम सर्व गोष्टी होत गेल्या आणि स्वराचे शिक्षण संपता संपता त्यांच्या घरात गोजिरवाण्या जयेशचा जन्म झाला. बाळंतपणासाठी स्वराची आई, बहीण, वडील सर्व आले होते. स्वराच्या आईचे आणि मिहिरचे खटके उडायला लागले. स्वरा बावरली. तिच्या नाजूक मनोवस्थेचा खाष्ट आईने ताबा घेतला आणि स्वराला फितवले. स्वराला आता शिक्षण पूर्ण झाल्यावर चांगली ८-१० लाख महिन्यांची नोकरी मिळाली असती आणि मग मिहिर दोन वर्षे शिकल्यावर त्याला पण! पण आईच्या मनातल्या 'मंथरे'च्या सांगण्यावरून स्वरा लहान जयेशला घेऊन भारतात पळून आली आणि तिने सरळ घटस्फोटासाठी दावा दाखल केला. आता मिहिर वेडापिसा झाला. मुलासाठी आणि बायकोसाठी! खाष्ट सासू मिहिर-स्वराला भेटूच देत नव्हती आणि मिहिर-जयेशला तर अजिबात नाही. जयेशचा वापर पूर्णपणे मिहिरला नामोहरम करण्यासाठी सुरू झाला. इतकी शिकलेली स्वरा- तिला चांगले ठाऊक होते की जयेशला त्याच्या वडिलांची- मिहिरची गरज आहे - असणार आहे, पण आईच्या हातातले बाहुले बनली, स्वरा! आणि भारतातून येऊन

काहीही कामधाम न करता तिने मिहिरकडे पैशांची मागणी केली, भरणपोषणासाठी. मिहिर पैसेही देत होता पण त्याला जयेश मात्र भेटत नव्हता. मिहिर अमेरिकेत आणि स्वरा-जयेश भारतात. मिहिर जेव्हा-जेव्हा भारतात येई तेव्हा-तेव्हा जयेशला भेटण्यासाठी कोर्टापुढे अर्ज करीत असे. अर्ज मंजूर झाले तरी स्वरा काहीतरी खोटेनाटे कारण पुढे करून भेट टाळत असे. एकूण काय तर त्याच्या पंधरा दिवसांच्या सुट्टीपैकी दोन-चार दिवस फक्त दोन-तीन तासांसाठी जयेशची भेट व्हायची. मिहिर हतबल झाला होता. खूप दुःखी मनाने तो परत जायचा. जयेशला आपल्या वडिलांबद्दल वाटणारी नैसर्गिक ओढ स्वरा व तिची आई जाणीवपूर्वक छाटत होत्या. स्त्रीचे हे रूप फारच भीषण असते. 'माझे तेच खरे' असा अट्टाहास, ही अभिव्यक्ती भूषणास्पद नक्कीच नाही.

दुसरी अशीच भयानक प्रकारची अभिव्यक्ती राणीची. चांगल्या हुद्यावर नोकरी. मुंबईच्या नाईट लाईफची चटक! शृजा तिची गोड मुलगी. चार दिवस आनंदकडे, तीन दिवस राणीकडे - दोघांनी मान्य केलेली न्यायालयातली तडजोड! राणीच्या लक्षात आले की शृजाचा कल जास्तीत जास्त आनंदकडे होतोय. त्याचे कारण आनंद शृजाबरोबर जास्तीत जास्त वेळ घालवायचा तर राणी शृजाला तिच्या आयाच्या/कामवाल्या बाईच्या भरवश्यावर सोडून पार्ट्यांमध्ये रमायची. आपल्यातल्या नैसर्गिक मातृत्वाच्या भावनांच्या अभावाची जाणीव असूनसुद्धा शृजाला आपल्याकडे वळवण्यासाठी राणीने त्या अजाण पोरीवर अत्याचार सुरू केले. ज्या दिवशी आनंदने तिला शाळेतून त्याच्या घरी न्यायचे असायचे, त्या दिवशी ती शृजाला शाळेतच पाठवायची नाही. शृजाला न्यायाधीशांनी भेटायला बोलावले तर राणीने तिला पढवून पाठवले. बिच्चारी सात-आठ वर्षांची शृजा छान खोटे बोलायला शिकत होती. इतके की जज म्हणाले, ''माझे उलटतपासणीचे सर्व कसब पणाला लावल्यावर मला शृजाकडून थोडेसे सत्य कळले.'' राणीला ही जाणीव नसावी का - की आपणच आपल्या लेकीचे नुकसान करतोय? तिच्यापुढे काय आदर्श निर्माण करतोय आपण? मोठी झाल्यावर ती राणीशी देखील सराईतपणे खोटे बोलणार नाही का?

एक जरा अडाणी जोडपे घटस्फोटासाठी भांडत होते. दोन-तीन वर्षे केस चालू होती आणि शेवटी घटस्फोट झाला. निकालाच्या दिवशी न्यायाधीशसाहेबांनी शेवंताबाईला सांगितले की तुमचा घटस्फोट झाला. ती कावरीबावरी होऊन न्यायाधीशसाहेबांना विचारू लागली - ''म्हंजी आता इथे कोर्टात यायचे नाही? म्हंजी आता माहा नवरा मला दिसणार बी न्हाई का?'' हे अडाणीपण होते की निरागसता? नवरा तिला निदान कोर्टात तारखेच्या दिवशी दिसतो म्हणून ती कोर्टात येत होती!

काही जोडपी मात्र छान हसतखेळत घटस्फोटासाठी येतात आणि सहा महिन्यात घटस्फोट घेऊन मोकळी होतात. त्यांच्यात कुठेही कटुता नसते, इतकी की न्यायाधीशसाहेब विचारतात- ''एवढे छान वागता-बोलता एकमेकांशी तर मग घटस्फोट का घेता?'' कारण निश्चितच गंभीर असणार पण सामंजस्य एवढे असते की आपली झाकली मूठ काही उघडत नाहीत आणि एकमेकांवर चिखलफेक तर मुळीच नाही. पण अशा बायका एकूण कमीच असतात.

समाज फार वेगाने बदलतोय. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी घटस्फोटित स्त्रीला जरा वाईट नजरेनेच बघितले जायचे आणि म्हणून असेल पण बायकांनी घटस्फोट मागण्याचे प्रमाण कमी होते. आज तसं नाहीय. घटस्फोट घेणं किंवा मिळणं, हा प्रकार तसा सहज झालाय व लोकांनाही त्यात काही गैर वाटत नाही. 'नाही पटत मग कशाला एकत्र राहायचं?' आज 'नवा गडी नवा डाव मांडणे' पण सहज शक्य होते. आणि मुले आहेत म्हणून त्यांच्यासाठी रोज मरणयातना सहन करत जगण्यापेक्षा मुलांची जबाबदारी एकटीने पेलत जगणाऱ्याही खूप जणी असतात.

शीला अशीच सुशिक्षित - दोन गोड मुलांची आई. नवऱ्याने मुले पळवून नेली आणि परत देईना. नवरा चांगला श्रीमंत होता. शीलाने जिवाच्या आकांताने मुले मिळवली - नवऱ्याची अट एकच - काहीही पैसे देणार नाही. न शीलासाठी, न मुलांसाठी. स्वाभिमानी आणि करारी शीलाने दोन्ही मुलांची जबाबदारी एकटीने पेलली आणि दोन्ही मुले छान घडली. त्यांना वडिलांची उणीव न भासू देणे किती अवघड गेले शीलाला, पण तिने त्यांना आर्थिक तोशिस लागू दिली नाही आणि भावनिकरित्या पण त्यांना छान सक्षम बनवले. त्यांचे सगळे करण्यात तिला स्वतःकडे लक्ष द्यायला वेळच नव्हता. पण तिला त्याची न खंत ना खेद. मुले कर्तबगार निघाली यातच ती कृतकृत्य झाली.

न्यायालयात बऱ्याच जणी नवऱ्याला अद्दल घडवायची हाच एक हेतू मनात धरून येतात. त्यांचे विवेकाचे भान सुटलेले असते. स्वतःचे नुकसान झाले तरी चालेल, पण त्याला अद्दल घडलीच पाहिजे असा सूर असतो. मग त्यांचा तो अतिरेकी राग, द्वेष, असूया या सर्व निगेटिव्ह भावना कमी होईपर्यंत वाट बघावी लागते. खूप समजूत काढावी लागते, तेव्हा कुठे त्यांना पटते की त्याचे स्वतःचे आयुष्य अनमोल आहे आणि ते दुसऱ्याला अद्दल घडवण्यात वाया घालवायचे नसते. मग त्यांचे दुःख, क्लेश भरभरून वाहतात. त्यांना खांदा द्यावा लागतो रडायला आणि रिते होईपर्यंत रडू द्यावे लागते. त्यांच्या आत्मसन्मानाला टेकू द्यावा लागतो. हळूहळू गाडी रूळावर येते आणि करवादत आलेली ती बाई पुन्हा नव्या विचाराने व नव्या जोमाने जगू लागते.

सुहानी अशीच एक गोड मुलगी. गोरी नव्हे गुलाबी गोरी कांती. टपोरे डोळे, लालचुटुक जिवणी, काळेभोर लांबसडक केस, पण मलूल, विझलेली अशी आली. चांगली भरभक्कम पगाराची नोकरी होती पण बिनइस्त्रीचा, विटलेला धुवट सलवार-कमीज, केसांचा बुचडा बांधलेला, कानात-गळ्यात काही नाही - एकूण अशा भावनिक अतिरेकाने ग्रासलेली होती की स्वतःकडे लक्षच नव्हते तिचे! अगदी शांतपणे तिने मला सांगितले की मला हर्षदला धडा शिकवायचाय. माझ्या मुलीच्या वयाचीच होती - माझ्या पोटात तुटले तिची अवस्था बघून. तिच्या म्हणण्याप्रमाणे आम्ही अद्दल घडवायची तयारी सुरू केली. मी तिला बरेचदा बोलवत

असे व थोड्या तिच्याशी संबंधित, थोड्या अवांतर गप्पा मारीत असे. असे करत करत एक दिवस तिचा बांध कोसळला. खूप रडली. अगदी हळवी झाली आणि मग शांत झाली. पुढल्या वेळेस आली तेव्हा मी तिच्या रूपाचे, शिक्षणाचे, तिच्या हुद्याचे कौतुक केले. त्यानंतर हळूहळू दर वेळेस तिच्यात बदल जाणवत गेला. केसांचा बुचडा गेला आणि कधी सैलसर वेणी तर कधी मोकळे केस. कानात-गळ्यात छोटासा नाजूक दागिना आला. छान इस्त्री केलेले, सुंदर रंगसंगतीचे सलवार-कमीज आले. अधूनमधून छान परफ्यूम पण वापरायला लागली आणि चार-सहा महिन्यात छान हसायला पण लागली. मला प्रथमच तिच्या गालावरची खळी दिसली. मग धडा शिकवणे, अद्दल घडवणे ही भाषा बदलली आणि ''आता मी मस्त जगणार'' हा उद्घोष सुरू झाला. सतत स्वत:चे फोटो पाठवत असते आणि कशी छान जगतेय हे नियमित कळवते. तिच्यातली स्थित्यंतरे तिला जाणवली की नाही हे नाही सांगता येणार पण मला तिची अतिरेकी अवस्था ते आताची मजेत जगतानाची अवस्था अगदी बारकाईने व जवळून अनुभवता आली.

दुसऱ्याच्या जीवनात डोकावता येणे - नव्हे डोकवावे लागणे आणि त्यांच्या अगदी तरलभावना जाणून घेणे हा व्यवसायाचा भाग आहे म्हणून स्त्रिया कशा व्यक्त होतात ह्याचा भरपूर अनुभव आहे. ज्या घटस्फोटाच्या दिव्यातून सहिसलामत बाहेर पडतात, त्या नव्याने सुखी होण्याचा प्रयत्न करतात पण स्वरा आणि राणीसारख्या बायका आयुष्य उधळून टाकतात, स्वत:ही दु:खीच राहतात आणि इतरांनाही दु:खी-कष्टी करतात. हा त्यांना मिळालेला शाप की ही त्यांची वेगळी अभिव्यक्ती?


– चित्रा फडके

भ्रमणध्वनी : ९८२११२९८८८

chitraphadke@hotmail.com







## ठसे आठवांचे

**विनता कुलकर्णी**

**मूल्य १५० रु.**
**सवलतीत ९० रु.**

लेखिकेने केवळ आठवणींची गुहा उघडलेली नाही तर त्याभोवती असलेले हळुवारपण, स्निग्धता, स्थित्यंतर, त्यातून उभे राहिलेले भावविश्व यांचा मागोवा घेतलेला आहे. घटना, प्रसंग, अनुभव यांना सहाणेवर घासून त्याचा उजळपणा टिपला आहे, आवश्यक तेथे परखडपणे स्वत:ला व्यक्त केले आहे तर कधी मार्मिकपणे वेध घेतलेला आहे. अनुभवांशी असलेला प्रामाणिकपणा, लेखनातला तरलपणा, शब्दांची अचूकता, विचारांची व्यापक बैठक, संशोधन यामुळे या संग्रहाला समृद्धपणा लाभला आहे. लेखांचा आवाका लहान स्वरूपाचा दिसत असला तरी त्यांना कवेत घेतलेला आशय खूप मोठा आहे आणि तेच या संग्रहाचे मोठेपण आहे.

ग्रंथाली




## प्रतिबिंब


**सुधीर कारखानीस**

**मूल्य १४० रु.**
**सवलतीत ८० रु.**

हा एक आगळा कथासंग्रह आहे. या कथासंग्रहातील कथा पूर्णपणे काल्पनिक आहेत आणि कोणत्याही वास्तविक प्रसंगाशी किंवा व्यक्तींशी साम्य आढळल्यास हा केवळ योगायोग असेल. तरीसुद्धा अनेक कथांतील पात्रं वाचकांना कुठे नं कुठे तरी भेटल्यासारखी, जवळून पाहिल्यासारखी वाटतील आणि त्यामुळेच या कथांना, त्यातील घटनांना जिवंतपणा आलेला आहे.

## शोधयात्रा

**डॉ. अनंत देशमुख**




**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**

मराठी साहित्य संशोधन, वाङ्मयेतिहास आणि समीक्षा हे डॉ. अनंत देशमुख यांच्या दीर्घकालीन अभ्यासाचे विषय आहेत. त्यांच्या वाचन, व्यासंग आणि चिंतनातून त्यांनी केलेले हे लेखन असून त्यात त्यांच्या सूक्ष्मदर्शी आणि चिकित्सक वृत्तीचे प्रतिबिंब पडल्याचे दिसून येते. एखाद्या अलक्षित राहिलेल्या घटना-प्रसंग-व्यक्ती वा साहित्यकृतीवर त्यांचे भाष्य या लेखांमधून दिसून येते. संशोधनाच्या, वाङ्मयेतिसाच्या आणि समीक्षेच्या अवघड आणि अनघड वाटेवरून केलेल्या प्रवासाचे आणि त्यातील त्यांच्या चिंतनाचे दर्शन या पुस्तकात पाहायला मिळते.

मराठीबद्दल आस्था नि कळकळ असणाऱ्या रसिक वाचकांना हे पुस्तक निश्चितच आनंददायक आणि विचारप्रवर्तक वाटेल...

महिलादिन विशेषांक

दोन्ही लेखिका एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबईत व अनुक्रमे पदव्युत्तर मराठी विभाग व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागात अध्यापनाचे काम करतात. दोघींचा आपापल्या विषयातील अभ्यास हेच या लेखाचे सार!





राजश्री कुलकर्णी / मनीषा माधवा

# स्त्रीचा राजकीय प्रवास : उपस्थितीपासून सहभागाकडे

**रा**जकारणातील स्त्रियांचा सहभाग हा विषय रुढार्थाने वादाचा होऊ शकतो. या वादाचा केंद्रबिंदू स्त्रियांचा राजकारणातील मर्यादित सहभाग हा आहे. ८ मार्च या जागतिक महिला दिनाचा स्मरणोत्सव ही महिलांच्या राजकारणातील मर्यादित सहभागाची ठळक खूण म्हणता येईल. अर्थात याचे महत्त्वाचे कारण आपली समाजरचना हे आहे. स्त्रियांचे समाजातील स्थान त्यामुळे आजूबाजूच्या परिस्थितीचे तितकेसे ज्ञान नसणे अशी कारणांची एक साखळीच असल्याचे दिसते. महिला दिनाच्या निमित्ताने अनेक चर्चासत्रे आयोजित केली जातात. वृत्तपत्रांमध्ये, मासिकांमध्ये भरपूर मजकूर छापून येतो. तरीही स्त्रियांच्या राजकारणातील सहभागासंदर्भातील प्रश्न अनुत्तरित राहतात.

स्त्रियांच्या राजकारणातील सहभागासंदर्भात वेगवेगळ्या चार दृष्टिकोणांमधून विचार करता येईल. पहिला आणि महत्त्वाचा दृष्टिकोण म्हणजे 'महिला सबलीकरण.' भारतीय राजकारणातील 'वर्गवारी' लक्षात घेता हा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. दुसरा मुद्दा आहे, 'प्रतीकात्मतेचा'. ही प्रतीकात्मकता केवळ प्रतीकात्मताच उरते कारण भारताची समाजरचना ही वेगवेगळ्या भेदांवर आधारित आहे. लिंगभेद, वर्णभेद यांमुळे भारतातील माणसांच्या बुद्धीचे वेगवेगळे तुकडे झालेले आहेत. तिसरा मुद्दा आहे तो स्त्रियांसाठीच्या राखीव जागांचा. राखीव जागांमुळे भारतीय स्त्रियांचे समाजकारणातील स्थान बदलले आहे असे दिसत नाही. ज्या देशामध्ये स्त्रिया अजूनही आर्थिक हक्कांपासून, मालमत्तेसंदर्भातील हक्कांपासून वंचित आहेत तिथे समता अजून तरी दृष्टिक्षेपात नाही हे खरे.

वस्तुत: स्त्रियांच्या राजकारणातील सहभागाकडे सर्व भेदांपलीकडे जाऊन निरपेक्ष बुद्धीने पाहायला हवे. जनसामान्यांना त्यांच्या ध्येयाप्रत नेण्याची ती एक संधी असते. राजकारणात प्रवेश करणे म्हणजे सत्तेमध्ये वाटा मिळविणे. निर्णय घेणे, आपली ध्येयधोरणे एकत्रितपणे राबविणे. अर्थात शासन चालविणे असा अर्थ घेतला जातो आणि तो चुकीचाही नाही. या अर्थाचा स्त्रियांसंदर्भात विचार केला तर उपस्थिती आणि सहभाग यांमधील अंतराचा विचार करावा लागतो. उपस्थिती हे दिसणे असते तर सहभाग हा कृतीचा, निर्णयक्षमतांचा असतो. उपस्थिती आपोआप सहभागामध्ये रूपांतरित होत नाही हेही येथे लक्षात घ्यावे. त्यासाठी सक्रिय सहभागाची आवश्यकता आहे. हा सहभाग कमी प्रमाणात आहे त्याची कारणे पुन्हा समाजरचनेपर्यंत येऊन थांबतात.

ज्याप्रमाणात राखीव जागा स्त्रियांना मिळाल्या आहेत त्या प्रमाणात स्त्रिया राजकारणात उच्च पदांवर पोहोचल्या आहेत असं दिसत नाही. काही स्त्रीवादी राजकीय विश्लेषक किंवा राजकारणी महिलाही आरक्षण नको असे म्हणताना दिसतात, ते उपस्थिती आणि सक्रिय सहभाग या दोन्हीतील अंतरामुळे. रोटेशन हे या उपस्थितीचे जणू कारणच बनले आहे. निवडणुकांपूर्वी इमारतींवर लागणाऱ्या मोठमोठ्या फलकांकडे पाहिले तरी हे सहज ध्यानात येते. वडिलांच्या पुण्याईमुळे राजकारणात स्थिर झालेला मुलगा आणि रोटेशनमुळे त्याच्या पत्नीला मिळालेली 'उमेदवारी'. या उमेदवार पत्नीचे सोज्ज्वळ असे छायाचित्र, सोबत संपूर्ण नाव असे या फलकाचे स्वरूप असते. (येथे व्यंकटेश माडगूळकरांच्या 'सत्तांतर'ची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.) स्त्रिया राजकारणी आहेत, राजकारणात आहेत परंतु 'सत्तेमध्ये अतिशय कमी प्रमाणात आहेत.'

राजकारणातील महिलांची भूमिका ही अधिकतर टेकू देणारी राहिली आहे. शिडी आहे पण शिखर नाही असे म्हटल्यास वावगे ठरू नये. स्त्रीच्या स्वभावधर्मातील सेवाभाव गृहीत धरून तिला कामाची संधी दिली जाते. स्त्री शिक्षिका असते, डॉक्टर असते त्या-त्या क्षेत्रात ती मोठी होते. राजकारणाचा एक भाग असलेल्या शासकीय उच्चपदस्थांच्या नेमणुकांमध्येही हीच बाब दृष्टीस येते. महिला अधिकाऱ्यांना साईड पोस्ट देण्याचा प्रघातच आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात सामाजिक सुधारणांच्या माध्यमातून स्त्रीशिक्षणासंदर्भात मोलाचे कार्य घडले. या शिक्षणाने स्त्रीला सार्वजनिक ठिकाणी काम करण्याची संधी दिली. ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज यांनी हिंदू जीवनपद्धतींमधील घातक रूढीपरंपरांचे निर्मूलन व्हावे यासाठी सामाजिक सुधारणांच्या चळवळी केल्या. महाराष्ट्रात या संदर्भात खूप महत्त्वाचे कार्य घडले. मोठ्या प्रमाणात लेखनही झाले. तत्कालीन रूढीवाद्यांनी या सुधारणांना कडाडून विरोध केला. वसाहतवाद्यांच्या विरोधात आपली संस्कृती वाचवण्यासाठी हा विरोध आहे असे चित्रही सनातन्यांनी निर्माण केले. निवेदिता मेनन या राज्यशास्त्राच्या अभ्यासक म्हणतात की, या चळवळी आणि समाजसुधारणांना केला जाणारा विरोध या दोन्ही बाबी वसाहतवाद्यांच्या धोरणातून आल्या होत्या. वीणा मजुमदार यांच्या मते ''भारताचे गतवैभव पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी या सुधारणावादी चळवळी लोकशाही मूल्ये तसेच पाश्चिमात्त्य सुधारणावादी विचारांना टीपकागदाप्रमाणे शोषून घेऊ लागल्या. बदल हवा होता आणि मुळंही घट्ट धरून ठेवायची होती. इथल्या संस्कृतीच्या साच्यामध्ये आकाराला आलेला हा बदल असावा ही तत्कालीन समाजाची अपेक्षा स्वाभाविक होती कारण याच समाजाने वसाहतवाद्यांनी केलेले घाव सोसले होते. समाजसुधारणेच्या चळवळीतून बाहेर आलेल्या महिलांचा लैंगिक समानतेशी फारसा संबंध नव्हता. या स्त्रिया ह्या समाजसुधारणा चळवळीच्या लाभार्थी होत्या हे मात्र नक्की.''

राष्ट्रवादाचा पारंपरिक इतिहास हा पुरुषांच्या नजरेतून लिहिला गेला असला तरी स्त्रियांचे वैविध्यपूर्ण लेखन बघता चळवळीअंतर्गत आणखी एक चळवळ उगलडणे सोपे जाते. आत्मकथनात्मक लेखन, मुलाखती, ऐतिहासिक दस्तऐवज, वेगवेगळ्या संस्थांची कागदपत्रे कार्यालयीन अहवाल यांचा अभ्यासही चळवळ उलगडण्यास साह्यभूत ठरतो. (जाफरी, २०१२; २८०) स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाने स्त्रियांमध्ये राजकीय जागरूकता निर्माण केली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सभासदत्व स्त्रियांसाठी खुले होते. १९०५ मधील स्वदेशी चळवळीमध्ये स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. पर्यायाने स्वातंत्र्य चळवळीमध्ये त्या सहभागी झाल्या. यानिमित्ताने स्त्रियांच्या वेगवेगळ्या संघटनांची स्थापना झाली. डॉ. ॲनी बेझंट यांच्या १९१४ सालच्या राजकीय प्रवेशामुळे भारतीय स्त्रियांच्या संघटना स्वातंत्र्य आंदोलनाशी जोडल्या गेल्या. डॉ. बेझंट यांची भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या अध्यक्षा म्हणून निवड झाली. राष्ट्रीय चळवळीमध्ये सरोजिनी नायडू यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी अनेक स्त्रियांना स्वातंत्र्य चळवळीकडे वळवले. स्त्रिया एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी राजकीय चर्चा करण्यासाठी जाऊ लागल्या. (हिसार, हरियाणा १९३०) सामूहिक भगिनीभाव गांधीजींनी रुजवला. 'सिस्टर्स ऑफ मर्सी', 'मदर ऑफ एन्टायर ह्युमॅनिटी' यासारख्या संकल्पनांनी स्त्रियांची स्वातंत्र्यआंदोलनातील भूमिका विषद केली. अर्थात ही भूमिका पारंपरिक हिंदू समाजाला अनुसरणारी होती. या चळवळीमधील स्त्रियांचा अप्रत्यक्ष सहभागही तितकाच महत्त्वाचा होता. सूतकताई (खादी), त्यागभावना, आंदोलनकर्त्यांना पाठबळ देणाऱ्या माता आणि पत्नी इत्यादी. राष्ट्रीय आंदोलनातील स्त्रियांच्या सहभागाच्या सर्व कार्यक्रमांची रचनाच अशा प्रकारची होती की, चळवळीत सहभाग असेल परंतु त्यासाठी घर सोडावे लागणार नाही.

सविनय कायदेभंगाच्या चळवळीदरम्यान कार्यकर्त्या स्त्रियांचे प्रमाण आणखी वाढले आणि त्यांचे कर्तृत्व अधोरेखित झाले. धरणे आंदोलनांमध्ये स्त्रिया अधिक चांगली कामगिरी करू शकतात, याची गांधीजींना खात्री होती. स्त्रियांचे प्रेमळ मन (अहिंसक वृत्ती) या आंदोलनांसाठी उपकारक ठरेल हा गांधीजींचा विश्वास सार्थ ठरला. Picketing was to be "Initiated and controlled by women. They may take and should be in strict subordination to them." (Young India 1920 : 20)

'भारत छोडो' मोहिमेतील स्त्रियांचे नेतृत्वगुण वाखाणण्यासारखे होते. सुचेता कृपलानी, अरुणा असफअली यांच्या नेतृत्वाने इतर स्त्रियांना प्रेरणा दिली. भूमिगत कार्यकर्त्यांमध्येही स्त्रियांचा समावेश होता. या काळातील आंदोलनांमध्ये ग्रामीण स्त्रियांचा लक्षणीय सहभाग होता.

असे असूनही ब्रिटिशकालीन इतिहासातील नोंदी हेच दर्शवितात की पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचा सत्तेतील सहभाग नगण्य होता. (संदर्भ : ऑल इंडिया काँग्रेस कमिटी)

१९५१ साली पहिल्या लोकसभेमध्ये २२ स्त्रियांना प्रतिनिधित्व मिळाले होते. २०१४ साली ६६ स्त्रिया लोकसभेत प्रतिनिधित्व करताहेत. ही स्थिती समाधानकारक नाही. ७३व्या घटनादुरुस्तीनंतर (१९९२) स्थानिक स्वराज्य संस्थांमधील चित्र मोठ्या प्रमाणात पालटले आहे परंतु संख्यात्मक, गुणात्मक नाही. (कविता महाजन यांची 'ब्र' ही कादंबरी या दृष्टीने केवळ वाचनीय नाही तर चिंतनीय ठरावी.) ३३ टक्क्याच्या तुलनेत प्रतिनिधित्व कमी त्यातही निर्णयक्षम, पराक्रमी, राजकारणी स्त्रियांची कमतरता हे सध्याच्या भारतीय राजकारणाचे रूप आहे. सुषमा स्वराज यांच्यासारख्या नेतृत्वाने स्त्रियांच्या राजकारणाचा पोत बदलवला आहे हे दिसून येते. परराष्ट्रमंत्रीपदची धुरा सांभाळत असताना मोठ्या आजारपणाला तोंड देत त्यांनी आपल्या जाबबदाऱ्या पार पाडल्या. नुकत्याच पार पडलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत २२७ जागांपैकी १२९ जागांवर महिला उमेदवार निवडून आल्या. यापैकी १५ जागा ह्या स्त्रियांसाठी राखीव नव्हत्या हे विशेष! ही उपस्थिती नसावी तर निर्णयक्षम सहभाग असावा अशी आशा करूया.

पर्यावरणसंरक्षण, शिक्षणाचा हक्क, माहितीचा अधिकार, स्त्रीविषयक चळवळी आणि अमेरिकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष ट्रम्प यांच्या विरोधातील निदर्शनांमधील स्त्रियांचा आवाज अशा समांतर चळवळींमध्ये स्त्रिया महत्त्वाचे कार्य करीत आहेत. स्त्रियांची उपस्थिती सहभागामध्ये लवकरच परावर्तित व्हावी.

**राजश्री कुलकर्णी**
भ्रमणध्वनी : ९००४२००४८७
raj.aseem22@gmail.com

**मनीषा माधवा**
भ्रमणध्वनी : ८४५०९०९७२२
m.manisha@gmail.com



ज्येष्ठ राजकारणी नॅन्सी पेलेसी

# अमेरिकेतलं महिला राजकारण

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

अमेरिकेत स्त्रीला मतदानाचे हक्क १९२० मध्ये मिळाले. म्हणजे १७७६ मध्ये देश स्थापन होऊन जवळजवळ १५० लोटलीत तरी तिला दुय्यम स्थान होतं. त्या काळात ती मतदान करू शकत नव्हती हे ओघानं आलंच. पण सुमारे शंभर वर्षांपूर्वी तिला मतदानाचे हक्क मिळताच ती एकदम आपल्या हक्कांविषयी जागृत झाली असं म्हणता येणार नाही. मतदानाचं स्वातंत्र्य मिळूनही ती पुरुषाश्रीतच राहिली. एवढी की सही करताना ती आपलं स्वत्व विसरत असे. नवऱ्याच्या नावामागे 'सौ.' ही उपाधी लावून ती काम निभावून नेई. तिचं नाव जगापुढे येत नसे. नवऱ्यावरून तिची ओळख होत असे.

पण सत्तरीच्या दशकात हे पार बदललं. ग्लोरिया स्टायनम (Steinen) नावाच्या महिलेनं स्त्रियांना संघटित करून त्यांना स्त्रीमुक्तीचं भान करून देणारी चळवळ सुरू केली. ती तमाम नवऱ्यांच्या जातीला मुळीच आवडली नाही. तरीही पुढील पंचवीस-तीस वर्षांत ही मोहीम एवढी यशस्वी झाली की आता स्त्री-पुरुषांच्या हक्कात द्वैत सापडत नाही. त्या काळात

नीतिमूल्य बदलली. स्त्रीपुरुषांच्या संबंधात क्रांती घडली. त्याचे पडसाद जगभर उमटले. त्यासाठी अमेरिकन स्त्रियांनी आपल्या मताधिक्याचा पुरेपूर फायदा घेतला. कुठल्याही लोकशाहीत 'मत' हे प्रभावी शस्त्र असतं हे त्यांनी जगाला दाखवून दिलं. हळूहळू स्त्रियांची सामाजिक बंधनातून, दडपणातून मुक्ती होऊन पुरुषांचा त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. स्त्री ही पुरुषाच्या उपभोगाची वस्तू नसून स्वतंत्र विचाराची, हक्कांची व्यक्ती आहे असा मानस दृढमूल होत गेला. बिल क्लिंटनचे परराष्ट्र सचिव मॅडेलिन आलब्राईटनं हे बघून म्हटलं की लोकशाहीशिवाय विकास करणं कठीण. पण स्त्रियांशिवाय लोकशाहीच अशक्य.

आपण भारतात ज्या स्त्रीमुक्तीसाठी, स्त्रीहक्कांसाठी लिंगसमतेसाठी स्वातंत्र्य मिळून सत्तर वर्षं लोटलीत तरी धडपडत व तडफडत आहोत हे अधिकार अमेरिकन स्त्रीनं अवघ्या पाव शतकात कसे प्राप्त केले? चूल आणि मूल ही चाकोरी सोडून पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून ती कशी उभी राहिली? आणि त्यापासून आपल्याला काही शिकण्यासाठी आहे का? या प्रश्नांची उत्तरं शोधणं आवश्यक आहे. कारण आपला देश या बाबतीत जगाच्या योजनेमागे आहे. शिकलेल्या घरात जरी स्त्रीमुक्ती सापडत असली तरी खेड्यापाड्यातून, अल्पशिक्षित घरात तसं अद्याप झालेलं नाही. त्यासाठी केलेले कायदे कागदापुरतेच आहेत. अगदी अलीकडे आपल्या सरकारनं एकट्या (Single) स्त्रीच्या एका प्रश्नाला हात लावला. नवरा नाही म्हणून स्त्रियांना पारपत्र नाकारण्यात येई. पण आता एकट्या स्त्रीलाच नव्हे तर तिला लग्नबाह्य संबंधातून निर्माण झालेल्या मुलामुलींना हे विहार स्वातंत्र्य देण्यात आले. अमेरिकेत तर असं केव्हाच झालं. नाही तर नवऱ्याच्या किंवा वडिलांच्या परवानगीशिवाय सौदी अरेबियातल्या स्त्रिया जशा परदेशगमन करू शकत नाही तशी आपल्या स्त्रियांची स्थिती असे. पुरुषांना बांधून ठेवणारी ही प्रथा आता इतिहासजमा झाली आहे. ही स्त्रीमुक्तीच समजायला पाहिजे.

अमेरिकन स्त्रियांचं हे यश बघून त्या बहुसंख्येनं राजकारणात शिरल्या असाव्यात नाही तर इथे एखादा महात्मा फुले किंवा धोंडो केशव कर्वे उदयास आले असावेत असं वाटणं सहाजिक आहे. पण हा समज चुकीचा ठरेल कारण या देशात स्त्रियांचं राजकारणात प्रतिनिधित्व अल्प आहे. या महासत्ताक राष्ट्रात राजकारणामध्ये फक्त २० टक्के स्त्रियाच सापडतात. ८० टक्के जागा पुरुषांनी व्याप्त केलेल्या आहेत. ही आकडेवारी फार बोलकी आहे.

अमेरिकी संसदेत एकूण ५३५ सभासद आहेत. त्यातले ४३५ लोकसभेत असून तिथे फक्त ८३ स्त्रियांचा म्हणजे १९.४ भरणा आहे. उच्चगृहात म्हणजे सिनेटमध्ये १०० सिनेटर्सपैकी फक्त २१ महिला आहेत. या बुद्रुक लोकांना सिनेट ही जगातली सर्वाधिक विचार व मनन करणारी संस्था असा आत्मगौरव करून घेण्याची भारी सवय. तिथे स्त्रियांची अल्पसंख्या बघून त्या विचार व मनन करण्यास अपात्र आहेत असं म्हणता येईल का?

राज्यस्तरीय पातळीवरचं चित्र अंमल बरं असलं तरी तेवढंच निराशाजनक आहे. अमेरिकेतील सर्व विधानसभेत एकूण २४.८ टक्के स्त्रिया आढळल्या तेच असमाधानकारक चित्र गव्हर्नर्स (मुख्यमंत्री) व महापौरांच्या बाबतीत दिसतं. एकूण ५० गव्हर्नर्समध्ये फक्त ६ महिला व १०० मोठ्या शहरात १९ महापौर २०१६ च्या शेवटी सापडले. जनतेत स्त्रिया बहुसंख्यांक असताना हे कसं शक्य आहे? २०१४ मध्ये अमेरिकेत एकूण ११९.४ दशलक्ष प्रौढ पुरुष तर १२६ दशलक्ष प्रौढ स्त्रिया होत्या. मग त्यांनी स्त्री प्रतिनिधी बहुसंख्येनं का निवडून दिले नाहीत? भारतात हा प्रश्नच उद्भवत नाही कारण आपल्या देशात स्त्रीभ्रूणहत्येच्या सौजन्याने ४८.५ टक्केच स्त्रिया उरल्या आहेत. ३६ दशलक्ष पुरुष जादा आहेत.

पण अमेरिकेतील संसदेत स्त्रियांचं प्रमाण २० टक्क्यांच्या आसपास सापडत असलं तरी भारताची स्थिती अजूनच दयनीय आहे. आपल्या लोकसभेत एकूण ५४३ सभासद आहेत. त्यातल्या फक्त ६६ किंवा १२ टक्के जागा स्त्रिया भूषवतात. जगातील वेगवेगळ्या देशातील लोकसभेत स्त्रियांचं सरासरी प्रमाण २२ टक्के आहे. ते तौलनिक दृष्ट्या अमेरिकेएवढंच असलं तरी आपला देश याबाबतीत बराच मागे आहे. भारतीय लोकसभा हे स्मार्ट फोनवर अश्लील दृश्य बघण्याचं एक आदर्श स्थान समजण्यात येतं. लोकांचे प्रतिनिधी त्या कृत्यात मग्न झालेले असतात. अशा वातावरणात स्त्रिया अस्वस्थ होणार नाहीत काय? त्यांच्या अत्यल्प प्रमाणाचं तेही एक कारण असू शकतं. बुरखा चढवलेल्या सौदी अरेबियाच्या संसदेत भारतापेक्षा जास्त स्त्रियांचं प्रमाण सापडतं. हे वाचून कुणाचं पित्त खवळणार नाही?

स्त्रियांना राजकारण न आवडण्याची अनेक कारणं देता येतील. किंबहुना अल्प प्रतिनिधित्व असूनही या लिंगानं समहक्क व समता कशी प्राप्त केली हे अमेरिकन लोकशाहीचं विशेषत्व आहे. सपात्र मतदारविश्वात स्त्रिया बहुसंख्याक आहेत. २०१६च्या अध्यक्षीय निवडणुकीत एकूण १३६.६ दशलक्ष मतं पडलीत. त्यातली ५३ टक्के स्त्रियांची होती. हा मताधिक्याचा बडगा अमेरिकन स्त्रियांनी यशस्वीपणे वापरून पुरुष राजकारण्यांकडून स्त्रीधार्जिण व मुलांना पोषक असे कायदे संमत करून घेतले. आखाड्यात उतरून मल्लयुद्ध न खेळता त्यांनी उद्दिष्टपूर्ती केली. त्यासाठी त्यांना राजकारणाच्या चिखलात उतरून गलिच्छ होण्याची जरुरी भासली नाही.

नुसत्या जनतेत स्त्रिया बहुसंख्यांक नाही. कामगारवर्गात त्यांचा भरणा ५७ टक्के आहे. म्हणून देशबांधणीत व अर्थकारणाला टेकू देण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. बौद्धिक दृष्ट्याही त्या पुरुषांवर कुरघोडी करतात. मुलांपेक्षा मुलींची संख्या विद्यापीठात मोठी आहे. त्यामुळे त्यांनाच विरुद्ध लिंगापेक्षा जास्त पदव्या व नोकऱ्या मिळतात. ही स्त्री प्रगती भारतात सापडत नाही. आपल्या देशात स्त्रिया राजकारणात मागे का? याचं मुख्य कारण म्हणजे राजकारण एक प्रकारचं मुष्टियुद्ध समजण्यात येतं. होळीत

रंगफेक होते तशी या क्षेत्रात चिखलफेक झाल्याशिवाय राहत नाही. खोटेनाटे आरोप केल्याशिवाय यश मिळवणं कठीण. ४५ वर्षीय भारतीय वंशाची निकी हेली (पूर्वाश्रमीचं नाव रंधावा. तिचे आईवडील अमेरिकेत पंजाबवरून आलेले.) २०११ मध्ये जेव्हा दक्षिण कॅरोलायना राज्याच्या गव्हर्नर पदासाठी राजकारणात उतरली तेव्हा तिच्या शिलावर शितोंडे उडवण्यात आले होते. तरीही रडण्याऐवजी ती लढली व त्या प्रांताची पहिली महिला गव्हर्नर झाली. आता तिची संयुक्त राष्ट्रसंघाची अमेरिकन राजदूत म्हणून नियुक्ती झाली.

जे राजकारणी स्त्रियांविषयी असंवेदनशील दाखवतात ते या देशात निवडूनच येत नाहीत. मुलींनी तंग कपडे घातल्यानं बलात्कार होतात असं म्हणणारे राजकारणी आपल्या संसदेत किंवा विधानसभेत सापडत असले तरी असे अवतार अमेरिकेत कधीच विजयी होत नाही. भारतात २०१३ मध्ये कामगारवर्गात स्त्रियांचं प्रमाण फक्त २४ टक्के होतं. स्त्रियांच्या कष्टाचा व कौशल्याचा देशबांधणीसाठी पुरेपूर उपयोग न केल्यामुळे भारत मागे राहिला आहे हे नाकारता येत नाही. अजूनही आपल्या देशात पुरुषांचा बायका बाहेर काम करण्यास विरोध असतो. असं पुरुषी वर्चस्व अमेरिकेत कालबाह्य झालं आहे. पण दुसऱ्या टोकाला अनेक उच्चपदी स्त्रिया सापडतात. देशातल्या ५१०० वैमानिकांमधल्या ११.७ टक्के स्त्रिया आहेत. तेच प्रमाण अमेरिकेत व जगात अवघं ३ टक्के आहे. पण कौशल्याचा हा लहानसा कवडसा प्रतिनिधिक नाही. त्यांच्या योगदानाचा आपण उपयोग करीत नाही.

सिनेटर्सच्या जागेसाठी उभं असलेल्या दोन उमेदवारांनी स्त्रियांना तुच्छ लेखणारं विधान केलं होतं. ते म्हणाले की, बलात्कार झाला तर स्त्रीनं हैदोस घालण्याऐवजी तो मूकपणे सहन करून त्याचा आस्वाद घ्यावा. त्यामुळे एवढा कल्लोळ माजला की ते दोन्ही रिपब्लिकन पक्षाचे दावेदार हरले आणि डॅमॉक्रॅट पक्षाला सिनेटमध्ये बहुमत मिळालं. तेव्हापासून स्त्रियांविषयी आदरानं व सन्मानानं बोलण्याचा येथील राजकारणात पायंडाच पडला. महिला संघटनांचा त्यांच्यावर एक प्रकारचा वचक असतो.

असं असूनही राजकारणातल्या स्त्रियांच्या मतांना फारसं महत्त्व दिलं जात नाही. मतांऐवजी प्रसारमाध्यमं त्यांच्या वेष व केशभूषेला जास्त महत्त्व देतात. त्यामुळे स्त्री ही उपभोग्य वस्तू असं जरी अमेरिका समजत नसली तरी ती रंगमंच शोभिवंत करणारी उत्तम व्यक्ती हा मानस अजून तरी पूर्णपणे लोप पावला नाही. याशिवाय महिलांना राजकारणात उडी मारण्यापासून परावृत्त करणारी सार्वत्रिक गोष्ट म्हणजे व्यवसाय व संसार यामध्ये मेळ बसवण्यात आलेल्या अडचणी. ते द्वंद्व जगभर सापडतं.

२०१५ मध्ये जवळजवळ १८० देशांमधल्या १८ देशांचे देशप्रमुख महिला होत्या. पण हा मान अमेरिकन स्त्रीला कधीच मिळाला नाही. २०१६च्या अध्यक्षीय निवडणुकीत हिलरी क्लिंटन जेवढी या पदासमीप आली तेवढी कुठलीच स्त्री इतिहासात आली नाही. ती या निवडणुकीत जिंकणार व इतिहास घडवणार असं सर्वांना वाटलं तरी गोऱ्या स्त्रियांनीच तिला दगा दिला. या गटातल्या ५३ टक्के महिला फितूर होऊन ट्रंपकडे वळल्या. गौरवर्णीय अल्पपठित स्त्रियांची ही फूट निर्णायक ठरली.

तरी पण एका मोठ्या राजकीय पक्षानं तिचं अध्यक्षीय पदासाठी नामांकन केलं ही इतिहास घडवणारी गोष्ट होती. हे मोरपिस कायमंच हिलरीच्या शिरपेचात राहील कारण हा स्त्रीत्वाच्या सन्मानाचा एक तुरा होता. म्हणून ती पुढच्या खेपेला म्हणजे २०२०मध्ये विजयी होईल असं वाटणं सहाजिक आहे. पण त्यासाठी कुणी आपले श्वास रोखून ठेवू नये. कारण अमेरिकन राजकारण भारतीय राजकारणापेक्षा जास्त निर्दयी आहे. हरलेल्या उमेदवारांना ते क्वचितच क्षमा करते. पराजयाचा कलंक आत्मघातकी ठरतो. त्यामुळे तिला दुसरी संधी मिळणं अशक्यच. मालवलेल्या ज्योतीप्रमाणे पराजित झालेला राजकारणी या देशात काजळी धरतो. देणगीदारांना नवीन रक्त हवं असतं. त्यांच्या सहकार्याशिवाय अध्यक्षीय निवडणूक लढण्यास ट्रंपचे खोल खिसे लागतात. हिलरी तेवढी श्रीमंत नाही. शिवाय तिचं वयही आडवं येतं. २०२० मध्ये ती ७२ वर्षांची होणार. म्हणजे ज्ञानेश्वरी वाचण्याच्या किंवा तीर्थक्षेत्रांना भेट देण्याच्या या दिवसात राजकारण कुणाला आठवतं?

काही भारतीय लोकांचा डोळा मिशेल ओबामांवर आहे. माझ्या जानेवारी २०१७च्या भारतभेटीत तिचं नाव अनेकांनी काढलं. मला त्यांची निराशा करावी लागली. अमेरिकेतला मतदार वर्ग सूज्ञ, चिकित्सक, सुविद्य व जागृत. तो नवरा अध्यक्ष होता म्हणून त्याची परिसस्पर्श बायकोला लागेल यावर विश्वास ठेवत नाही. त्यामुळे भारताप्रमाणे अमेरिकेत घराणेशाही कधीच रूजली नाही. केनेडी किंवा बुशचं या बाबतीत नाव घेता येईल. पण या कुटुंबातल्या प्रत्येक व्यक्तीला झटावं लागलं. आपलं कर्तृत्त्व जनतेला पटवून द्यावं लागलं. नुसत्या घराण्याच्या नावावरून कुणी मत देत नाही. ही चिकित्सक बुद्धी आपल्या देशात सापडत नाही. गोपीनाथ मुंडेच्या २०१४ मधील अपघाती मृत्युमुळे त्यांची कन्या पंकजा मुंडे यांना मुख्यमंत्री पदाचे डोहाळे लागले होते. अननुभवी असूनही त्यांना मंत्रीपद देण्यात आले. इंदिरा गांधींच्या दोन्ही मुलांना राजकीय अनुभव नव्हता. पण केवळ नावावरून त्यांना प्रधानमंत्रीपद बहाल करण्यात आलं होतं. अमेरिकेची लोकशाही आपल्या मानानं कितीतरी प्रगल्भ. ती अशा कुठलंच भरीव कृत्य न केलेल्या उमेदवारांचा स्वीकार करणार नाही. मिशेल ओबामानं आतापर्यंत लिहून दिलेली भाषणं उत्तमपणे वाचण्यापलीकडे कुठलीच कामगिरी केली नाही. म्हणून तिच्याविषयीचा उत्साह आवरून धरलेलाच बरा. अमेरिकेत तरी अध्यक्षपदासाठी तिचं नाव कुणी गांभीर्यानं घेत नाही.

सध्या अमेरिकन राजकारणात सर्वोच्च पदावर असलेली स्त्री म्हणजे ७५ वर्षीय नॅन्सी पेलोसी; त्या डेमॉक्रॅट पक्षाच्या व डाव्या मताच्या. त्यांची मतं एवढी टोकाची की मध्याच्या उजव्या



**नव्यानेच सिनेटर म्हणून निवडून आलेली भारतीय वंशाची कमला हॅरीस.**

बाजूला असलेल्या सर्वसामान्यांना ती पटत नाही. कॅलिफोर्निया प्रांतातून त्या १९८७ पासून सातत्यानं लोकसभा प्रतिनिधी म्हणून निवडून आलेल्या. पण त्यांच्या मुकुटातला स्त्रीत्वाचा तुरा प्रदीर्घ राजकीय जीवन नसून २००७ ते २०११ च्या काळात अमेरिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच महिलेनं भूषवलेलं लोकसभापतीपद होय. त्यानंतर लोकसभेत डेमॉक्रॅट पक्ष अल्पसंख्यांक होत गेल्यामुळे त्या पदच्युत होऊन एका निम्नस्तरीय पदावर फेकल्या गेल्या. त्यांची राष्ट्रीय पातळीवरील लोकप्रियता १५ टक्क्यापेक्षा कमी आहे.

आता अमेरिकेच्या राजकीय क्षितिजावर फार कमी उदयोन्मुख महिला राजकारणी दिसताहेत. याबाबतीत डेमॉक्रॅट पक्षाची आशा २०१६ मध्ये कॅलिफोर्नियातून सिनेटर म्हणून निवडून आलेल्या कमला हॅरीस नावाच्या ५२ वर्षीय महिलेवर आहे असं अनेकजण म्हणतात. कमलाची आई चिनईमधून अमेरिकेत स्थायिक झालेली डॉक्टर व वडील लेखाशास्त्राचे जमेकातून आलेले कृष्णवर्णीय प्रोफेसर. वर्णीय भिन्नतेमुळे त्यांचा कमला लहान असतानाच घटस्फोट झाला. शिक्षणानं ती विधितज्ज्ञ असून कॅलिफोर्नियाच्या राजकारणात तिनं यश कमावलं. पण राष्ट्रीय पातळीवर ती अजून झळकायची आहे. तिची पार्श्वभूमी जवळजवळ ओबामासारखीच असल्यामुळे तिच्यातही अमेरिकेच्या ४४ व्या अध्यक्षांची बीजं आहेत असा आशावाद व्यक्त केला जातो. ओबामा अध्यक्षपदासाठी २००८ मध्ये उभे राहिले तेव्हा त्यांच्या अनुभवांच्या गाठोड्यात सिनेटमध्ये हजेरी लावलेले १४२ दिवस व मोठी जीभ या पलीकडे दुसरं काही भांडवल नव्हतं. त्याच तुटपुंज्या अनुभवांवर मिश्रवर्णीय कमला हॅरीसही अध्यक्षपदासाठी पात्र होईल असं डेमॉक्रॅट पक्षाला वाटणं सहाजिक आहे. याचं उत्तर काळच देऊ शकेल.


**– अनंत पां. लाभसेटवार**

latalabh@aol.com

(लेखक फर्स्ट नॅशनल बॅंक आणि ट्रस्ट कंपनी, यू.एस.ए.चे चेअरमन ऑफ दी बोर्ड होते.)

## 'धर्मधुरीण' कादंबरी पुणे आणि नागपूर प्रकाशन सोहळा

मराठी पुस्तकांचे वाचन सध्या कमी होत चाललेले आहे. दर्जेदार कथा-कादंबऱ्या आज लिहिल्या जात नाहीत असे नाही; परंतु जगभरातच त्यांना वाचक उरलेला नाही. डॉ. प्रकाश लोथे यांनी लिहिलेली कादंबरी मात्र मनाची पकड घेणारी आहे. वाचनीयता हे तिचे वैशिष्ट्य आहे. त्यातील पात्रांचा निर्मळपणा पाहून साने गुरुजींच्या लेखनाची आठवण होते, असे विचार ज्येष्ठ लेखक रंगनाथ पठारे यांनी व्यक्त केले. डॉ. लोथे यांच्या धर्मधुरीण या कादंबरीचे प्रकाशन करताना ते बोलत होते. 'ग्रंथाली'तर्फे शुक्रवारी, १० फेब्रुवारी २०१७ हे पुस्तक प्रकाशित झाले.

सुरुवातीला सुदेश हिंगलासपूरकर यांनी सांगितले, की गेली ४२ वर्षे 'ग्रंथाली'ची वाचक चळवळ सुरू असून, आजवर ८०० पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. धर्मधुरीणमध्ये स्वातंत्र्यपूर्व काळातील महाराष्ट्र आणि एका कर्मठ कुटुंबाची चटका लावणारी कहाणी आहे. हिंदू-मुस्लिम तेढ, ख्रिश्चन धर्माचे आकर्षण, स्त्रियांचे प्रश्न, रूढी-परंपरांच्या चौकटी, असा फार मोठा पट सुमारे ५०० पानांच्या कादंबरीत विणलेला आहे. छापील पुस्तकाच्या बरोबरच 'बुकगंगा'च्या मंदार जोगळेकरांनी त्याचे इ-बुक सुद्धा प्रकाशित केले. लौकरच 'ऑडिओ बुक'च्या स्वरूपातही ते निघेल.

नंतर डॉ. लोथे यांनी मनोगत व्यक्त केले. आपल्या वडिलांचे ऋण फेडण्यासाठी ही कादंबरी त्यांनी लिहिली. त्यांचे आजोबा वाशीमला धर्मधुरीण म्हणून प्रसिद्ध होते. त्या काळातील व्यक्ती, समाजव्यवस्था, निरनिराळ्या विचारसरणी यांचा अभ्यास करताना त्यांना या कादंबरीचा 'आत्मा' सापडला. अमेरिकेतील न्यू जर्सी येथे अनेक वर्षे बालरोगतज्ञ म्हणून काम करत असताना मराठी मंडळे आणि नियतकालिकांचे नेतृत्व त्यांनी केलेले आहे. त्यांच्या अनेक कथांना पारितोषिके मिळालेली आहेत.

सुप्रसिद्ध दिग्दर्शिका सुमित्रा भावे यांनी धर्मधुरीणची वैशिष्ट्ये सांगताना, त्यातील निवडक भागाचे वाचन केले. डॉ. मोहन आगाशे आपल्या नर्मविनोदी भाषणात म्हणाले की, पुस्तक वाचनाची मला सवय नाही, परंतु चांगल्या वाचक मित्रांकडून मी महत्त्वाच्या पुस्तकांचा सारांश जाणून घेतो. लेखक, दिग्दर्शक आणि नट आपापले मार्ग अनुसरत असतात. नट हा प्रत्यक्ष समोर दिसत असल्यामुळे तोच भाव खाऊन जातो.

'ग्रंथाली'च्या संस्थापकांपैकी प्रमुख असलेल्या दिनकर गांगल यांनी धर्मधुरीणचे महत्त्व विषद केले. त्यावर उत्तम मालिका होऊ शकेल असेही सांगितले. डॉ. लोथे नागपूरचे आहेत. अशा वऱ्हाडी कादंबऱ्या क्वचितच मराठीत आलेल्या आहेत. बंगाली लेखक शरदचंद्र यांच्याशी जवळीक सांगणारी ही कादंबरी आहे. संस्कृतीचे आणि स्मरणरंजनाचे पदर त्यात उलगडतात. नियती हीच कहाणी ठरवत जाते. आस्था, जिव्हाळा आणि लोभसता यांचे सुरेख दर्शन त्यातून होते.

अलका लोथे यांनी आपल्या यजमान लेखकाबद्दल थोडक्यात मनोगत व्यक्त केले. दोन वर्षांच्या अविरत कष्ट आणि चिकाटीतून 'धर्मधुरीण' कादंबरी सिद्ध झाली असे त्यांनी सांगितले.

अस्मिता पांडे यांनी नीटस सूत्रसंचालन केले आणि शेवटी आभार मानले.

**– रवींद्र गुर्जर**

ग्रंथाली मुंबई आणि लोथे कुटुंबीय नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने अमेरिकास्थित डॉ. प्रकाश लोथे लिखित 'धर्मधुरीण' या कादंबरीचे विधीवत प्रकाशन, शुक्रवार, १७ फेब्रुवारी २०१७ रोजी, सेंटर पॉईंट नागपूर येथे आयोजित समारंभात करण्यात आले. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी आणि ज्येष्ठ कादंबरीकार डॉ. रवींद्र शोभणे यांच्या हस्ते नागपूरकर रसिकांच्या साक्षीने हा प्रकाशन समारंभ पार पडला.

दीपप्रज्ज्वलनानंतर लोथे परिवाराने सामूहिक अथर्वशीर्ष भक्तिभावे सादर करून गणेशवंदना केली. 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी मान्यवरांचे आणि उत्सवमूर्ती डॉ. प्रकाश लोथेंचे ग्रंथ आणि पुष्प देऊन स्वागत केले.

डॉ. प्रकाश लोथे मूळचे नागपूरचे. व्यवसायाने अमेरिकेत स्थायिक झाले मात्र मराठी भाषेचं सातासमुद्रापार संवर्धन आणि परदेशात मराठी भाषिकांचे संघटन या दोन्ही संकल्पांना कुशलतेने पूर्ण केले. अमेरिकेतील 'एकता', 'रंगदीप', 'स्नेह' या वार्षिकांतून आणि भारतातील 'रुचि', 'लोकमत', 'सकाळ', 'कथाश्री', 'गंधाली' या दिवाळी अंकांतून वैश्विक मराठी वाचकांच्या परिचयाचे ते झाले आहेत.

आपल्या वडिलांच्या जन्मशताब्दीदिनी डॉ. लोथे यांनी आपल्या वडिलांच्या जीवनचरित्राला केंद्रस्थानी ठेवून ही दीर्घ कादंबरी यशस्वीपणे प्रकाशित केली याबद्दल मान्यवरांनी डॉ. लोथेंचे अभिनंदन केले.

इतिहासात, राजकारणात, समाजकारणात सक्रिय असलेल्या नावलौकिकप्राप्त असतं किंबहुना हलाखीच्या परिस्थितीत जो माणूस आपल्या मुलांना 'माणूस' म्हणून घडवितो तो 'घडीव' माणूस समाजापुढे सातत्यानं नवविचार, नवचैतन्य, जीवनाबद्दलची कळकळ अर्थपूर्ण मांडतो असाच प्रत्यय देणारी 'धर्मधुरीण' ही कादंबरी आहे असं मत डॉ. रवींद्र शोभणे यांनी आपल्या भाषणात व्यक्त केलं.

'बाप' हे तत्त्व असतं ते आपल्याला समजून सामान्य म णसातल्या आभाळभर शहाणपणाचं चरित्रदर्शन घडविणारी ही कादंबरी अभिरुचिसंपन्न रसिक मनापासून स्वीकारतील हा विश्वास अध्यक्षीय समारोप डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी व्यक्त केला.

भाऊसाहेब भांडारकर यांनी आभार मानले. सुदेश हिंगलासपूरकर शुभदा फडणवीस यांनी केले.

**– शुभदा फडणवीस**

## 'डोळियांचा डोळा' पुस्तक प्रकाशन सोहळा

'ग्रंथाली'च्या पुस्तक प्रकाशनाच्या चळवळीत एका नव्या पुस्तकाचा समावेश झाला ते म्हणजे सेल्स टॅक्स सहआयुक्त पुरुषोत्तम वि. गावंडे लिखित 'डोळियांचा डोळा' या पुस्तकाचा. १ फेब्रुवारी २०१७ रोजी, स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक सभागृहात संपन्न झालेल्या या पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी होते ज्येष्ठ नाटककार रत्नाकर मतकरी, थोर समाजसेवक डॉ. रवींद्र कोल्हे यांच्या शुभहस्ते या पुस्तकाचं प्रकाशन झालं. प्रसिद्ध अभिनेते दीपक करंजीकर आणि अभिनेत्री संपदा जोगळेकर-कुलकर्णी यांनी पुस्तकातील काही ललितलेखांचं अभिवाचन केलं. न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांची प्रस्तावना लाभलेल्या या पुस्तकात लेखक पुरुषोत्तम गावंडे यांनी जीवनाच्या अनेक टप्प्यावर, मुक्कामांवर जो अनुभव आला त्याचं फार सुंदर वर्णन केलं आहे. आणि या पुस्तकाच्या रूपाने या सगळ्या अनुभवांत इतरांनाही सामील करून घेतलं आहे. रोजच्या अनुभवाला येणाऱ्या आणि रोज घडणाऱ्या घटनांमधून हे लेख आले आणि हेच या पुस्तकाचं वैशिष्ट्यं असल्याचा उल्लेख सर्व मान्यवरांनी करत आपल्या मनोगतातून लेखकांना शुभेच्छा दिल्या. अत्यंत अनौपचारिक संवाद साधत लेखक पुरुषोत्तम गावंडे यांनी या शुभेच्छांना स्वीकार करत हे पुस्तक वाचकांसमोर ठेवलं.

''इतरांच्याकडे मुळीच न बघता आपलं आपण सुख संपादन करीत आणि अशा सुखाचा आनंदोत्सव साजरा करीत राहणं ही अवघड कला आहे की नाही? आणि अशा कलेचं प्रशिक्षण माणसाला मिळणं आज गरजेचं आहे आणि म्हणूनच इतरांच्या सुखाने सुखी होण्याची बात सोडा, पण किमान आपल्या सुखाने तरी सुखी होण्याचं आपण शिकूया!'' – असा अतिशय थेट, मनमोकळा संवाद साधत लेखकाने या शब्दांच्या प्रवासात आपल्याला सहभागी करून घेत आपल्याला स्वत:कडे आणि इतरांकडे सजगतेने डोळे उघडून पाह्यला लावलं आहे.

**– अस्मिता पांडे**


ग्रंथाली

# डोळियांचा डोळा



पुरुषोत्तम वि. गावंडे

**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**

मी पेशाने सरकारी नोकर असल्यामुळे आमच्या बाबू कुळाच्या कुळाचाराप्रमाणे समाजपराङ्मुखता, असंवेदनशीलता व मिळमिळीत कोरडेपणा अंगी बाणविणे आवश्यक होते. मात्र असे असूनही काही ठिकाणी मर्यादेचे थोडे अधिक्रमण करून क्वचितपणे किंचित कठोर शब्दांचा वापर करण्याचे औधत्य झाले आहे. त्या मागचा सामाजिक संदर्भ लक्षात घेतल्यास तशी शब्दयोजना क्षम्य वाटेल. अर्थातच या शैलीचे मला मुळीच वैषम्य वाटत नाही.

एके दिवशी हिंगोलीवरून मला एका युवकाचा फोन आला. जीवन-मृत्यूबाबत कीथ टर्नर या व्यक्तीवरील मी लिहिलेला लेख वाचून आत्महत्येच्या निर्णयापासून परावृत्त होऊन, पुन्हा नव्या उमेदीने जगण्याचा निर्धार केल्याचे त्याने मला सांगितल्यावर मी अक्षरशः गहिवरलो! आणि या लेखनाला त्यावेळी जगातला सर्वोच्च पुरस्कार मिळाल्यासारखे वाटले.

## ॥ग्रंथाली॥

द्वारा बुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली क्र. ९, तळमजला, जे.के. सावंत मार्ग, यशवंतराव चव्हाण नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प.), मुंबई ४०००१६ ● दूरध्वनी : २४३०६६२४, २४२१६०५० ● granthaliruchee@gmail.com www.granthali.com



### आता काय करायचं... - चांगदेव काळे

'आता काय करायचं...' या कथासंग्रहातील कथा चांगदेव काळे यांची कथालेखनावर असलेली हुकूमत स्पष्ट करणारी आहे. प्रस्तुतच्या संग्रहातील आशयप्रदेश जीवनातील विविध क्षेत्रांचे चित्रण करणारा आहे; आणि हे जीवनचित्रण त्यांनी पुरेशा ताकदीने केलेले आहे. चित्रमयता, नाट्यात्मकता प्रसंग रेखाटण्यातील कुशलता, अल्पाक्षरी वाक्यरचना, प्रवाही निवेदन आणि ठसठशीत व्यक्तिरेखा यांच्यामुळे या कथांना उंची गाठणे शक्य झाले आहे.

मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.

### सफरनामा - स्मिता भागवत




लेखिका स्मिता भागवत यांचा प्रवासाचा छंद वारसागत! टुरिझमची फॅशन अस्तित्वात येण्यापूर्वी ज्येष्ठांनी आम्हाला हेतूपूर्ण प्रवास घडवले. या अनुभवांना शब्ददेह देताना लेखिकाने प्रवासाच्या पुन:प्रत्ययाचा आनंद लुटला. ज्यांना प्रवासानंद लाभला आहे त्यांना समांतर स्मरणयात्रा घडावी आणि ज्यांना आवड असून प्रवास जमलेला नाही त्यांना शब्दयात्रेचा आनंद लाभावा या हेतूने प्रवासप्रेमी लेखिकेने 'ग्रंथाली'च्या वाचकदिनी वाचकांना दिलेल्या नजराण्याचे नाव आहे 'सफरनामा'!

मूल्य १६० रु. सवलतीत १०० रु.




### सुंदर ते ध्यान - डॉ. यश वेलणकर

'सुंदर ते ध्यान' हा आहे पाच मित्रमैत्रिणींचा वाद-संवाद. माणूस कोणत्याही विचारसरणीचा- धर्माचा, कोणतेही काम करत असेल, आस्तिक-नास्तिक असेल, त्याने ध्यानाविषयीचे पूर्वग्रह बाजूला ठेवून ध्यान समजून घ्यायला हवे. रोजच्या धावपळीच्या आणि धकाधकीच्या आयुष्यातदेखील ध्यानासाठी वेळ काढायला हवा हे आपले मत यश मांडत राहतो. आपल्या सर्व मित्रांनी ध्यान शिकून घ्यावे आणि ते त्यांच्या दिनचर्येचा भाग बनवावे यासाठी त्याचे प्रयत्न चालू आहेत. त्या प्रयत्नांचा प्रवास म्हणजेच हा वाद-संवाद आहे.

मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.

### सोलमेट - अर्चना गाडेकर शंभरकर



मैत्रीएवढे श्रेष्ठ नाते नाही. ते इतर साऱ्या मानवी नात्यांहून मोठे तर असतेच शिवाय ईश्वर आणि भक्त यांच्या संबंधांहूनही ते श्रेष्ठ असते. सारा आसमंत व्यापून उरण्याची किमया फक्त याच एका नात्यात आहे, असे नाते कधी सहज तर कधी प्रयत्नपूर्वक मिळवावे लागते. मात्र जे ते मिळवतात त्यांच्या भाग्याला पार नसतो. अशा या नात्याचे नितांत सुंदर दर्शन घडवणारे पुस्तक म्हणजे सोलमेट...

मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.




### मिरग - डॉ. सई लळीत

लग्न हे आयुष्यभराचे बंधन असते. दुसरे लग्न हा विषयच खूप गुंतागुंतीचा आहे. दुसरेपणाला दिलेली मुलगी... कसं असेल तिचं भावविश्व... त्याचं वरकरणी स्थिर भासणारं भावविश्व... आणि त्या दोघांचं मिळून भावजीवन... ही कादंबरी आहे त्यांचं अंतरंग... कादंबरीतला काळ साधारण वीस वर्षांपूर्वीचं आहे. डॉ. सई लळीत यांनी त्यावेळी टिपलेल्या गोष्टींचे अर्थ आयुष्याच्या वेगवेगळ्या वळणांवर वेगवेगळे लागले आणि त्यांना कातर करून गेले.

मूल्य १३० रु. सवलतीत ६५ रु.

### नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१६ - सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते



आजच्या मूलभूत शोधाच्या बीजात उद्याच्या तंत्रज्ञानाचा महावृक्ष लपलेला असतो. या तंत्रज्ञानरूपी महावृक्षाच्या दर्शनातून बौद्धिक आनंद तर मिळतोच. त्याचबरोबर तो पाहताना आपल्यासमोर उद्याचा भविष्यकाळ आणि त्यातल्या संधीही सामोऱ्या येतात. त्या संधींचा पट मूलभूत संशोधनापासून तर तंत्रज्ञानविकासापर्यंत पसरलेला आहे. त्या कर्तृत्व गाजवण्याची स्फूर्ती तुम्हाला मिळावी, यासाठीच ही 'नोबेलनगरीतील नवलस्वप्ने' सुधीर थत्ते आणि नंदिनी थत्ते यांनी सादर केली आहे.


मूल्य ८० रु. सवलतीत ५० रु.

शरद जोशी –शोध अस्वस्थ कल्लोळाचा! हे वसुंधरा काशीकर–भागवत यांनी लिहलेले, राजहंस प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल आपल्या व शरद जोशींच्या १७/१८ वर्षांच्या सहवासात त्यांच्या कार्याचा व व्यक्तिमत्वाचा शोध घेणारे पुस्तक आहे.

शरद जोशींच्या आयुष्याची दुसरी बाजू जी समाजासमोर कधीही आली नाही, ती आपणास काशीकरांच्या लिखाणातून वाचायला मिळते.

युनोतली प्रतिष्ठेची, पैशांची, सुखासीन नोकरी. युरोपातील सुसंस्कृत, समृद्ध, सुखी आयुष्य. ज्यात निश्चितता आहे, सुरक्षितता आहे ती सोडून, दोन मुली, बायको सगळ्यांना घेऊन भारतात आले. केवळ भारतातल्या शेतकऱ्याचा विचार मनात घेऊन. महाराष्ट्रात येऊन कोरडवाहू शेती करायची. शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची कारणे शोधून ऊपाययोजना करावयाची. त्यासाठीच जमीन घ्यावयाची. अनेकांनी त्यांना वेड्यात काढावे अशीच परिस्थिती होती.

एक ब्राह्मण माणूस शेतकऱ्यांचे प्रश्नावर काय काम करणार? प्रश्न कसे सोडवणार? इथंपासून ते समाज शरद जोशींना स्वीकारेल का? असे अनेक प्रश्न होते. पण तेच शरद जोशी शेतकरी योद्धे म्हणून आपल्या समोर आहेत.




शरद जोशींनी कारखानदार आणि शेतकऱ्यांचे गणित मांडले. एका दाण्याचे हजारो दाणे पिकवणारा शेतकरी गरीब... लोखंडात वाढ न करणारा कारखानदार मात्र श्रीमंत? शेतकऱ्याच्या शेतमालाला भाव मिळत नाही. त्याला सरकारी धोरण कारणीभूत आहे, त्यामुळेच आपला शेतकरी दरिद्री आहे, ह्या निष्कर्षावर ते आले. जोशींनी शेतकऱ्याला खऱ्या अर्थाने जागे केले. शेतकरी अर्थसाक्षर झाला. उत्पादन खर्च काढू लागला. शेतीमालाला रास्त भावाची मागणी करू लागला. अणि भाव ठरवण्याचे पद्धतीला आव्हानही करू लागला.

शेतकऱ्याला सत्तेविरूद्ध उभे राहण्यासाठी धैर्य दिले. शेतकऱ्यांचे दबाव गट तयार केले. भीक नको हवे घामाचे दाम घोषणा दिली. शेतकऱ्याला स्वाभिमान दिला. आत्मसन्मान जागृत केला.

शेतकऱ्यांचा हा खंबीर नेता...एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व आतून किती हळुवार–संवेदनशील होता, एकाकी होता हे वसुंधरा काशीकर–भागवतांचे लिखाणातून सतत जाणवत राहते. पुस्तकातील १८ प्रकरणातून अर्थातच संवादातून हे सार आपणास मिळत.

शरद जोशींच्या पहिल्या भेटीपासून ते अखेरपर्यंतच्या भेटीपर्यंतचे अनेक प्रसंग पुस्तकात आहेत.

लीलाकाकू, गझल गायन, बडनेरा रेल्वे स्टेशन, नर्मदा परिक्रमा, पुस्तकं आणि शरद जोशी, लक्ष्मी मुक्ती, अशा प्रकरणातून कधीही व्यक्त न झालेले जोशी बघायला मिळतात.

लीलाकाकू अर्थातच त्यांच्या पत्नीचे त्यांना खूप कौतुक होते. त्यांचा विषय निघाला की ते खूप हळवे होत. आज ती असती तर बच्चू, (लेखिकेला लाडाने ते बच्चू म्हणत) मी काही केल नसतं. खुर्चीत बसून पुस्तके वाचली असती. त्यांच्या आठवणीने दुःखी होत, स्वतःवरच चिडत. अक्षरशः लहान मुलासारखे हुंदके देत. पत्नीच्या निधनानंतर प्रचंड एकटेपणा त्यांच्या आयुष्यात आला होता. एकप्रकारे त्यांच्या संवादाचे माध्यमच हरवले होते.

लेखिकेने शरद जोशींना, तुम्ही नर्मदा परिक्रमा का करत आहात? असा प्रश्न विचारल्यावर त्यांवर त्यांचे उत्तर असे होते, संघटना पुढे न्यायची तर तब्येत चांगली हवी. नर्मदापरिक्रमा करून मी नवं शरीर, नवी ताकद घेऊन परत येणार आहे. नर्मदा परिक्रमा पूर्ण होताच नर्मदा तुमच्यासमोर येते, तुमची इच्छा विचारते.

बडनेरा रेल्वे स्टेशनवर माझी व शरद जोशींची भेट झाली होती. मी बँकेत वि.वसुली अधिकारी म्हणून काम करत होतो. जोशींनी अक्षरशः मला मिठी मारली. आपण दोन टोक. काही हरकत नाही. म्हणाले, 'देशपांडे साहेब, आमचा शेतकरी गरीब आहे. कर्जवसुली करतांना फार कठोरपणाने नका करत जाऊ. सहानुभूतीने घेत जा. शेतकऱ्यांवरचे जबरदस्त प्रेम त्याच्या बोलण्यात दिसून आले.

वसुंधरा काशीकरांच्या लिखाणास भावनेचा स्पर्श झाला आहे.ओघवती लिखाणशैलीमुळे पुस्तक वाचनीय झाले आहे. मनाला भिडते. अनेक प्रसंग वाचताना डोळ्यांत पाणी तरळते. शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा हा माणूस किती संवेदनशील, हळवा होता हे अनेक प्रसंगातून वाचायला मिळते.

एक तर शरद जोशीसारखी माणसे कोणाजवळ व्यक्त होत नव्हती. व्यक्तिगत संवाद साधत नव्हती. शेतकऱ्यांसाठीच त्यांचे आयुष्य समर्पित होते. परंतु लेखिकेवरील त्यांचं पितृवत प्रेमापोटी ते वसुंधरा काशीकरांजवळ ते व्यक्त झाले, आणि महत्वाचे म्हणजे त्यांनी ते अचूक टिपून आपल्या लिखाणात मांडले. हेच ह्या पुस्तकाचे यश आहे.त्त नाहीतर शरद जोशींची दुसरी बाजू आपणा सर्वांना समजली नसती.

राजहंस प्रकाशनाने हे पुस्तक प्रकाशित केले आहे.

शरद जोशी समजून घेण्यासाठी प्रत्येकाने हे पुस्तक वाचलेच पाहिजे .

**मूल्य ₹२००/–**
**'ग्रंथाली' येथे सवलतीत १८० रुपये**

साधना प्रकाशन




## पार्श्वभूमी

मागील दहा वर्षांपासून गोविंद तळवलकर साधना साप्ताहिकात नियमितपणे लिहितात. चार वर्षांपूर्वी त्यांचा मेल आला, 'रामचंद्र गुहा यांचा Politics and play या शीर्षकाचा पाक्षिक स्तंभ The Telegraph या दैनिकात चालू आहे. तो स्तंभ मराठीतही प्रसिद्ध व्हावा अशी त्यांची इच्छा आहे, मी त्यांना 'साधना'चा पर्याय सुचवला आहे.' त्या मेलबाबत डॉ. नरेंद्र दाभोलकरांना सांगितले तेव्हा ते उत्स्फूर्तपणे म्हणाले, 'तळवलकर सूचवताहेत आणि गुहा तयार आहेत, या दोन्ही गोष्टी साधनासाठी पुरस्कारासारख्याच आहेत.' अर्थातच आम्ही होकार कळवला. त्यानंतर डिसेंबर २०१२ पासून गुहांचा तो स्तंभ 'कालपरवा' या नावाने साधनात सुरू झाला, मागील चार वर्षे साधनाचा सर्वाधिक वाचकप्रिय स्तंभ म्हणून त्याचेच नाव घ्यावे लागते.

गुहा यांचा स्तंभ साधनात सुरू होतोय, ही बातमी सांगितल्यावर साधनाच्या विश्वस्त व सहसंपादक राहिलेल्या ८० च्या घरात असलेल्या कुमुद करकरे हरखून गेल्या. कारण गुहांच्या लेखनाच्या त्या जबरदस्त चाहत्या होत्या. त्यामुळे नियोजित स्तंभातील सर्व लेखांच्या अनुवादाची जबाबदारी त्यांनी मागून घेतली. दीड वर्षांपूर्वी त्यांचा मृत्यू झाला. तोपर्यंतच्या अडीच वर्षांत 'कालपरवा' सदरातून ५५ लेख प्रसिद्ध झाले, ते सर्व लेख कुमुदताईंनीच अनुवादित केले. त्यातील निवडक २५ लेखांचे हे पुस्तक आहे. 'गुहांच्या या सदराचा अनुवाद करण्यामुळे, माझे शेवटचे दिवस छान जात आहेत,' असे त्या वारंवार बोलून दाखवत असत. परंतु हे पुस्तक पहायला त्या आता नाहीत.

डिसेंबर २०१२ ते मे २०१५ या अडीच वर्षांच्या काळातील निवडक लेखांचे हे पुस्तक आहे. त्यानंतरच्या दीड वर्षात, या सदरातील लेखांचे अनुवाद तिघांनी (अशोक वाडीकर, संकल्प गुर्जर, विनोद शिरसाठ) केले. आणखी वर्षभराने साधनातील 'कालपरवा' सदर पाच वर्षांचे होईल तेव्हा, म्हणजे जानेवारी २०१८ मध्ये अलीकडच्या अडीच वर्षांतील निवडक लेखांचे पुस्तक 'कालपरवा : भाग २' या नावाने प्रसिद्ध होईल.

रामचंद्र गुहा यांची डझनभरापेक्षा अधिक इंग्रजी पुस्तके प्रकाशित झाली आहेत आणि त्यातील काहींच्या विविध भाषांत आवृत्त्या आल्या आहेत. मात्र Politics and play हा स्तंभ अन्य पाच भाषांतील प्रत्येकी एका नियतकालिकातून प्रसिद्ध होत असला तरी, त्यातील निवडक लेखांचे पुस्तक पहिल्यांदा मराठीत येत आहे. म्हणजे 'कालपरवा' हे गुहा यांच्या कोणत्याही इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद नसून, स्वतंत्र पुस्तक आहे. कालपरवा सदरातील लेखांची निवड या पुस्तकासाठी करताना, क्रिकेटवरचे लेख वगळले आहेत. शिवाय, काही घटना-प्रसंगांच्या निमित्ताने लिहिलेल्या लेखांचे संदर्भ काळ उलटल्यानंतर कमी होतात किंवा विस्मृतीत जातात, म्हणून त्या प्रकारचे लेख बाजूला ठेवले आहेत. तसे करणे काहीसे जड गेले, पण पुस्तक आटोपशीर व्हावे यासाठी २५ लेख ही मर्यादा आम्ही स्वतःहून आखली होती.

इतिहास, राजकारण, समाजकारण, पर्यावरण आणि क्रिकेट या पाचही क्षेत्रांत संशोधनपर तरीही ललितरम्य लेखन करणे हा रामचंद्र गुहा यांचा सर्वांत महत्त्वाचा गुणविशेष आहे. इतिहास जिवंत करून वर्तमानाशी त्याचे धागे जुळवणे किंवा जुळू शकणारे धागे दाखवणे ही त्यांची खासियत आहे. याचा प्रत्यय या पुस्तकातील प्रत्येक लेख वाचताना येईल. लेखमाला प्रसिद्ध करण्यासाठी मराठीत साधनाची निवड करणे, या लेखमालेतील निवडक लेखांचे पुस्तक प्रकाशित करण्यासाठी परवानगी देणे, २५ लेख निवडण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य देणे आणि या प्रकाशन समारंभाला स्वतः उपस्थित राहणे, या चारही कारणांसाठी गुहा यांचे मनःपूर्वक आभार.

- **पृष्ठे १५२, मूल्य : १५० रुपये**
  **'ग्रंथाली' येथे सवलतीत १२० रुपये**

रोहन प्रकाशन





**एक मुठ्ठी आसमाँ**
**सत्यकथा एका झरीनाची... गगनाला गवसणी घालणाऱ्या उमेदीची!**
**शोभा बोंद्रे**

● राजपुत्राचं सिंड्रेलाशी लग्न होतं, त्यानंतर...'and they lived happily everafter'... साधारणपणे कोणत्याही परीकथेचा शेवट हा असा गोड असतो. पण झरीनाची खरी गोष्ट अशा शेवटानंतरच सुरू होते. एक राजमहाल पत्त्यांच्या बंगल्यासारखा कोलमडून पडतो आणि झरीना नव्या डावाला सुरुवात करते ती झोपडपट्टीतल्या एका खोलीतून! उज्जैनसारख्या छोट्या शहरातून मुंबई नामक जनअरण्यात आलेली झरीना बिकट परिस्थितीला कशी सामोरी जाते? सुखी संसाराचं, एका उबदार घरट्याचं स्वप्न तर कधीच उद्ध्वस्त झालेलं असतं, मग स्वाभिमानाने जगण्याच्या आणि स्वअस्तित्वाच्या लढाईत ती कशी उभी राहते? आपल्या लेकीला स्वतंत्र व आत्मनिर्भर बनवण्याचं तिचं स्वप्न ती पूर्ण करते का?...
झरीनाची ही गोष्ट वाचताना आपण या सत्यकथेत पूर्णपणे गुंतत जातो... जात-पात, धर्मकांड, स्त्री-पुरुष अशा कुठल्याही मर्यादा न जुमानता निग्रहाने पुढे पुढे जात राहणारी झरीनाची ही संघर्षकथा आपल्याला एक नवी उमेद देते, जगण्यावरचा आपला विश्वास वाढवते... एवढं नक्की!

● **पृष्ठे २५२, मूल्य २४० रुपये**
**'ग्रंथाली' येथे सवलतीत २०० रुपये**

**कस्तुरबा : शलाका तेजाची**
**अरुण गांधी**
**अनुवाद :**
**अशोक जैन**

● महात्मा गांधी व कस्तुरबा या दोघांनी मिळून अहिंसात्मक चळवळीचा पाया घातला आणि दोघांनी तिला वाहून घेतले. या अलौकिक स्त्रीला कोणताही अडथळा थोपवू शकत नसे. हे पुस्तक म्हणजे महात्मा आणि कस्तुरबा गांधी यांचे नातू अरुण गांधी यांच्या आयुष्यभराच्या संशोधनाचे फळ आहे. एका देशाच्या जन्मामागील ऐतिहासिक घटना यात आहेत. तशीच ही एक मुग्ध प्रेमकहाणीही आहे. आजपर्यंत गांधींच्या चरित्रकारांनी त्यांच्या सर्वश्रुत आख्यायिकेवर आधारून लेखन केले आहे. हे चरित्र ही या दोन मानवी जीवांची अस्सल कहाणी आहे. प्रचंड प्रतिकूल परिस्थितीवर मात करून राहिलेले दोन महान जीव!

● **पृष्ठे ३०४, मूल्य १९५ रुपये**
**'ग्रंथाली' येथे सवलतीत १६५ रुपये**

ग्रंथयात्री

# ग्रंथपान

चांगदेव काळे

संपर्क : ९८६९२०७४०३

**ठसे आठवांचे**

**विनता कुलकर्णी**




परदेशात वास्तव्य करून राहिलेली मंडळी आपला मातीचा गंध आणि भाषेचा गुण सोबत घेऊन वावरत असतात, हे सांगण्यासाठी कुठला आरसा दाखवण्याची गरज उरलेली नाही. ही मंडळी परदेश वास्तव्य स्वीकारतात यापाठी त्यांची अपरिहार्यता असू शकते, मात्र त्यांच्या भारतीयत्वाच्या अभिमानात कुठे उणे नसते, हेही अभिमानास्पदच म्हणायला हवे. उच्चविद्याविभूषित विनता कुलकर्णी, ज्या संख्याशास्त्र आणि संगणकशास्त्र हे विषय अमेरिकन विद्यापीठात शिकवतात, याच विषयावरील त्यांची चारचार पुस्तके अभ्यासक्रमात आहेत, तरीही त्या मराठीपण जपून आहेत. महाराष्ट्र मंडळ, बृहन्महाराष्ट्र मंडळ, मराठी भाषक मंडळ, महाराष्ट्र फाउंडेशन अशा संस्थांमध्ये सहभागी आहेत, या संस्थांच्या नियतकालिकांचे संपादन-लेखन पाहतात, इतर संस्थांमधून सेवावृत्तीने कार्यरत राहतात, यावरून हे स्पष्ट व्हावे, मातीचा गुण किती खोलवर रुजलेला आहे. आणि तोच गुण त्यांच्या 'ठसे आठवांचे' या लेखसंग्रहातून ठळकपणे तरारून आलेला दिसून येतो.

परदेशातील अनुभव हे परदेशस्थ भारतीयांच्या वाट्याला येणे स्वाभाविक ठरते, तसे इकडचे पूर्वाश्रमीचे अनुभव, आठवणी त्यांची सोबत करीत असणे अपरिहार्य ठरते. त्यामुळे त्यांच्या लेखनात हे दोन्ही अनुभव समृद्धपणे साकारले जातात. त्यांची गुंफण वाचकाच्या उत्सुकतेला भुरळ घालीत राहते. विनता कुलकर्णी यांचे लेखन हे असे दोन खंडांच्या अनुभवांना गुंफणारे, पूर्वाश्रमीच्या स्मृतींना उजाळा देणारे, आपुलकी आणि मर्मबंधांना स्नेहार्दतेचे कोंदण कोरणारे, असे वरवर भासत असले तरी त्याला चिंतन आणि संशोधनाची जोड आहे. त्यामुळे विषयांचा तळ डोहासारखा सखोल आणि काही वेगळेपण दाखविणारा ठरलेला आहे. वाऱ्यावर उडणारा पतंग, प्रेमभावनेचा १४ फेब्रुवारी हा व्हॅलेन्टाईन डे, वेड्यात काढणारा एप्रिल फूल, अशुभ भासणारा १३ हा अंक, सरत्या वर्षाला निरोप देणारा ३१ डिसेंबर हे विषय आपल्या परिचयाचे. परंतु त्यांचे उगम, उगमकर्ते, हेतू, उपयोग, इतिहास यांचे तपशील आपल्या परिचयाचे असण्याची शक्यता कमी. ती उणीव या लेखांतून दूर होते. नावात काय आहे, हे वाक्य सर्रासपणे वापरले जाते, परंतु त्याचा कर्ताकरविता लेखातून सापडतो, तेव्हा त्याचे महत्त्व अधिक उजळ होते. नाताळच्या वेळी सांताक्लॉज येऊन खेळणी देतो, एवढेच त्याचे प्रयोजन असते का? नाही, हेच त्याचे उत्तर. कोण कुठल्या रूपात येऊन आपली नकळत मदत करून जातो, तो आपल्यासाठी सांताक्लॉज नसतो का? होय, तो सांताक्लॉजच असतो.

आपल्याकडे एक ओरड सातत्याने होत आहे, ती जंगले नष्ट केल्याची. परिणामी जंगली प्राणी मनुष्यवस्तीत येत आहेत. परंतु अमेरिकाही त्याला अपवाद उरलेली नाही ती वेगळ्या अर्थाने. इथे हरणांची संख्या इतकी आहे की, ती मनुष्यवस्तीत येतात. त्यांचा तपशील लेखिका आकडेवारीसह देतात. तीच गोष्ट नेट आणि संजयला दिसणारे महाभारताचे युद्ध. आपले जन्मघर, नातीगोती, कर्मयोगिनी नंदिनी यासारखे जिव्हाळ्याचे विषय आहेत, जे नात्यातल्या आर्द्रतेने ओथंबलेले आहेत.

लेख आकाराने लहान आहेत, परंतु त्यांचा आवाका मोठा आहे. लेखनाला एक गती आहे, जी वाचकाला खिळवून ठेवते. लेखात आपल्याला काय म्हणायचे आहे, त्याविषयीचे मत ठाम आहे. त्यामुळे लेखांना बांधेसूदपणा प्राप्त झालेला आहे. त्यात नोंदवलेले निरीक्षण आणि त्याओघात आलेली वाक्ये तर एक वेगळेच समाधान वाचकासमोर ठेवतात. जसे,

'पतंग आणि मानवी वर्तनामध्येही साधर्म्य मानता येईल. समाजात दिखावू मोठेपणासाठी दुसऱ्याचा पाय खेचून स्वतः पुढे जाण्याची प्रवृत्ती, आणि खेळात दुसऱ्याचा दोर तोडून स्वतःचा पतंग उंचावर नेण्याची युक्ती, दोन्हीमागे अहंकारी वृत्ती सारखीच. पण एखाद्या तीव्र झोताबरोबर पतंग फाटून भेलकांडत भुईसपाट होतो तेव्हा दुसऱ्याचा मांजा न कापता, आपल्या आयुष्याच्या पतंगापुढती नगन ठेंगणे करणे उचित आणि सुसंस्कृत लक्षण आहे.'

'आत्मिक समाधानासाठी, अंगभूत गुणांना खुलवण्यासाठी आणि आयुष्य एकसुरी न होण्यासाठी काहीतरी सकारात्मक नाद हवाच. मात्र सृजनात्मक वेड जोपासताना आणि स्वतःच्या आयुष्यात रंग भरताना, स्वतःचे विविध छंद जपताना, इतरांच्या आयुष्याचा बेरंग न करण्याइतपत शहाणपण असणं महत्त्वाचं.'

'आपल्या इंग्रजी वर्षाचा एप्रिल महिना 'ऑल फूल डे'ने सुरू होतो. अगदी पंधराव्या शतकापासून ही प्रथा अस्तित्वात आहे. त्या दिवशी कुणाचीही 'निरुपद्रवी' खोडी/गंमत मंजूर समजली जाते.'

पुस्तकाचे मुखपृष्ठ सतीश खानविलकर यांनी सजविले आहे. आठवणींचे ठसे हे विविध आकराचे आणि रंगांचे असू शकतात. त्यांची जणू प्रतीकेच मुखपृष्ठावर साकारली आहेत.


**मूल्य १५० रु. • सवलतीत ९० रु.**

|| ग्रंथयात्री ||

# ग्रंथपान

**मिरग**

**डॉ. सई ललीत**



आशा-अपेक्षा आणि समजूत यांच्या झोक्यावर अनेकदा आयुष्य झोके घेत राहते, कधी उंच, कधी संथ तर कधी नुसतेच टांगलेले. यालाच आपण जीवन असे नाव देतो. या जीवनाविषयीचा कप्पा वैयक्तिक स्वरूपाचा असतो तेव्हा तो एका परिघात बंद राहतो, परंतु आयुष्य हे कधीच एकटे नसते, त्याभोवती नात्याची वीण असते. त्यामुळे एकास बसलेला पीळ इतरांनाही सहन करावा लागतोच. अशीच नात्याची, ताणतणावाची आणि तितकीच आपलेपण जपणारी कथा म्हणजे 'मिरग' ही कादंबरी होय. मिरग म्हणजे मृगनक्षत्र.

आशा या पोरवयातील मुलीची ही कथा आहे. दहावीला ८५ टक्के गुण मिळवणारी ही मुलगी खूप शिकायचं, शिक्षिका व्हायचं हे स्वप्न बाळगते. तिला वाचनाची आवड आहे. लिहायची आवड आहे. बारावी होते. आता मुलीचं लग्न लावून आपण मोकळं व्हावं, ही आस बापाच्या मनात उसळी घेते. आई आशाच्या पाठी उभी राहून लग्नाच्या कल्पनेला रोखू पाहते. परंतु आजारी असलेला बाप त्यांच्यापुढे पेच टाकतो, ' तू पै पैसा गोळा कर आणि पाच वर्षांनी तेचा थाटामाटात लगीन कर, पण त्या लग्नात मी असीन की नाय ता सांगूक शकनय नाय. निदान एका मुलीचा तरी कन्यादान माझ्या हातान होवचा एवढी माझी इच्छा होती.'

लग्न हा जीवनात आनंद फुलवणारा, दोन जिवांना एकत्र आणणारा पवित्र संस्कार, सर्वांच्या साक्षीने पार पडणारा. परंतु त्यात असलेल्या व्यवहार नावाच्या राक्षसापुढे किती शरण जावे लागते, हे सर्वज्ञात आहे. त्यातून हातावर पोट असणाऱ्यांची अवस्था तर आणखीच बिकट. अशावेळी तडजोड करणे एवढेच हाताशी असते. आशाचे लग्न हे अशाच तडजोडीवर पार पडते. एक मुलगी असलेल्या बिजवराशी संसाराची गाठ बांधली जाते. पुढे संसार सुरू होतो, पण त्याचे स्वरूप असते, 'मी इथं नसण्यामुळे काहीही फरक पडणार नाही तर मग राहून काय उपयोग? कोणीतरी सोडून दिलेल्या नको असलेल्या मांजरासारखं वळचणीला राहून एवढं मोठं आयुष्य जगून काढायचं? गोधडी धुवून काढल्यासारखं? बस्स झालं हे नकोसं जगणं.'

कथानक एका मुलीच्या भावविश्वाशी जोडलेले असल्याने, तिचा घरातील वावर, कामाचा उरक, आई, वडील यांच्या कामात मदत करण्याचा मनस्वीपणा, घरातला केर काढण्यापासून ते शेतातील कामांपर्यंतच्या अनेक कामांचा तपशील देत आशाच्या व्यक्तिरेखेला आकार देण्याचा प्रयत्न लेखिकेने केलेला आहे. त्यातून तिच्या विविध अंगभूत गुणांचा परिचय होतो. स्वभावाच्या पैलूंवर प्रकाश पडतो. तिचा निरागसपणा तर अनेकदा प्रत्ययास येतो. मांजरांना दूध मिळावं म्हणून गाय पाळायची, हे उदाहरण खूप बोलके आहे. ती केवळ अभ्यासात रमणारी आहे असे नाही, आपल्या परिस्थितीची जाणीव असलेली आहे. बिजवराशी लग्न ठरले तेव्हा, दुसरेपणाची भावना खिन्न करणारी होती. आपण फक्त रिकामी जागा भरायला जाणार आहोत का? असा प्रश्न उपस्थित करणारी. परंतु जी पत्नी मृत्यू पावली आहे, ती आपली बहीण होती आपल्या आक्कासारखी, असे समजून घ्यायचे. त्याच्या मुलीचे आपण आई व्हायचे, हा समजूतदारपणा तिच्या ठायी असावा, हे मन किती मोठे आहे!

पती श्रीकांत पहिल्या पत्नीच्या दुःखातच रममाण राहून आशाच्या भावनांकडे सपशेल दुर्लक्ष करतो, तेव्हा आशाचा होणारा कोंडमारा तिच्या उपदेशात उतरतो. 'आपल्याच नवऱ्याक भूलवूचा लागता ताई? ता मंग आपला माणूस कसा?' तर आईच्या तोंडी असलेले वाक्य किती स्पष्टपणे बाहेर पडलेले आहे, 'जावयांनू तुमचा लगीन एका मुलीशी झाला वस्तुशी नाय एवढा फक्त लक्षात ठेवा!'

या कथानकाला कोकणची पार्श्वभूमी आहे. त्यामुळे संवादाची भाषा तीच आहे. तिच्यातला गोडवा, लय आणि ढब जशीच्या तशी येथे उतरली आहे. शिवाय सोबतीला तिथला सुंदर परिसर, निसर्ग, शेती, पीकपाणी आहेच. परंतु स्वतःच्या शेतात असलेला 'काळांबा' नावाचा आंबा आणि 'कोथमिन्या' नावाचा भात, त्यांची वैशिष्ट्ये आहेत. आंब्याविषयीचे वर्णन तर मजेशीर असेच आहे,' काळांबा, त्याचे आंबे काळपट, हिरव्या सालीचे पण आतून एकदम केशरी भगवे, गोड रसाळ चवीचे. एखादा काळा ओबडधोबड माणूस स्वभावाने एकदम गुणी आणि प्रेमळ असावा तसा हा आंबा.' घरात असलेल्या चंगू आणि मंगू या दोन मांजराचा वावर, त्यांचे पराक्रम आणि त्यांचा लळा, हेही यात येते. 'अगे ही मांजरा नाय. दोन वाघ आसत पराक्रमी. मी जर राजा असतंय तर सोन्याच्या वाटीत हेंका दूध दिलं असतंय.'

आक्काची घरातल्यांना येणारी आठवण आणि श्रीकांतला पहिल्या पत्नीची येणारी आठवण हा धागा समान ठेवूनही भावनिकतेची वेगवेगळी पातळी इथे अनुभवास येते. भाषा लयदार आणि चिंतनाची जोड असलेली, वास्तवाचे चित्रण करणारी आहे. संवाद नेमके आणि आशयघन आहेत. सतीश भावसारांचे मुखपृष्ठही तसेच आशयगर्भ आहे.

**मूल्य १३० रु. • सवलतीत ६५ रु.**

# ग्रंथपान




संजीवनी खेर यांच्या लेखनाशी वाचक म्हणून आपला स्नेह या आधीच जोडला गेलेला आहे. 'सर्वसाक्षी' या पुरस्कारप्राप्त सांस्कृतिक इतिहासाने आणि इतर साहित्याने त्यांच्या लेखनातला कसदारपणा आणि संशोधनाची आवड, यांचा परिचय आपल्याला यापूर्वी करून दिलेला आहे. त्यांच्या लेखनाला संशोधनाची जोड आहे तशी त्यातल्या साक्षेपी चिंतनाला आणि निरीक्षणालाही दाद द्यावी अशी उत्तम किनार आहे. त्यामुळे लेखन वाचताना केवळ माहितीचे भांडार उघडले जात नाही, तर त्या विषयाला दिलेल्या सखोलचे परिपूर्णत्व आपल्याला अचंबित करीत जाते. तो अनुभव देण्यात 'जलसूक्त' अपवाद नाही. या विषयासंबंधी त्यांनीच केलेले विधान असे आहे, 'उद्याची युद्धे ही पाण्यावरून होतील असे अस्वस्थ करणारे भवितव्य वर्तवले जात आहे. अशावेळी या पाण्याची खोली तपासून पाहावीशी वाटणे स्वाभाविक आहे. म्हणून हा लेखनाचा प्रपंच करत आहे.'

आपली भूमी सुजलाम् सुफलाम आहे असे आपण म्हणतो. परंतु त्याचवेळी आपला देश पावसावर अवलंबून असलेला देश आहे, हेही वास्तव आहे. काही भागात मुबलक पाऊस तर काही भागात अखंड डोळे आकाशाकडे. आपल्याकडे बारमाही वाहणाऱ्या नद्या आहेत, परंतु धरणांनी त्यांचे प्रवाह थांबले आहेत. असे असले तरी त्यांचे महत्त्व जराही कमी झालेले नाही. या नद्या जिथून उगम पावतात आणि जेथे विलय पावतात, या दरम्यानचा त्यांचा प्रवास हा अद्भूत आहे. तो कसा आहे, त्याच्या काठावरील संस्कृती कशी आहे, इतिहास, पुराणे, वेद, पौराणिक ग्रंथ यांत त्यांच्याविषयीचे संदर्भ काय आहेत, यांचे वर्णन आणि त्यानिमित्ताची परिशिष्टे असलेला हा संग्रह आहे. त्यासाठी भारतातील काही प्रमुख नद्या, गंगा, यमुना, नर्मदा, गोदावरी, कृष्णा, कावेरी, सिंधू, ब्रह्मपुत्रा आणि राजस्थानात हरवलेली सरस्वती, यांचा समोवश या संग्रहात आहे.

राजस्थानात हरवलेली सरस्वती आणि डॉ. राजेंद्रसिंह यांनी सुरू केलेले जोहडचे प्रयोग, या दोन्ही विषयांचा मागोवा या लेखात आहे. राजस्थानातील पाणी दुर्भिक्ष्य, तेथील महिलांना त्यासाठी करावी लागत असलेली पायपीट, त्याच प्रदेशात असलेले पवित्र पुष्कर सरोवर आणि खाऱ्या पाण्याचे सांभर सरोवर, घडीसार सरोवर त्यांच्याभोवती असलेल्या शुक्राचार्य, देवयानी, आणि ययाति यांची कथा व शाकंबरी देवीच्या मंदिराचे मिथक, ब्रह्मदेव-सावित्री-सरस्वती-गायत्रीची कथा यांचे वर्णन यात येते.

गंगा ही सगळ्यांना पावन करणारी नदी. गंगामैया. भगिरथाच्या कठोर तपाचरणाने शिवजटेत प्रकटलेली स्वर्गीची गंगा. वसूंची मुक्तता करण्यासाठी मानवीरूपात धरतीवर येऊन शंतनूशी विवाह केला आणि कुरुवंशाची जन्मदात्री बनलेली गंगा. भौगोलिक दृष्टीनं ती भारतातील सर्वात मोठी नदी नाही, परंतु पावित्र्याच्या संकल्पनेत तिची बरोबरी दुसरी कुठलीही नदी करू शकणार नाही. ती केवळ शिवाशी संबंधित नाही तर ती विष्णूपदी म्हणूनही पवित्र मानली जाते. गंगोत्री ते गंगासागर हा तिचा प्रवास म्हणजे मिथकांचे आगर आणि इतिहासाचे साक्षीदार, सांस्कृतिक वैभवाला जन्म देणारा. तिची अतिशय सुंदर, अजोड मूर्ती पवनारला विनोबांच्या आश्रमात आहे. तीच गोष्ट यमुनेची. ऋग्वेदातील महत्त्वाची देवता असलेल्या सूर्याची अत्यंत लाडकी कन्या, सूर्यतनया, सूर्यजा, रविनंदिनी ही तिची नावे. काही पौराणिकांच्या मते पाण्याच्या जामुनी रंगामुळे ती जमुना-यमुना, कालिंदी म्हणूनही ओळखली जाते. कृष्णाने द्वारकेला परत जाताना तिच्याशी विवाह केला. नर्मदा - अवखळ कुमारिका या लेखात नर्मदेविषयीचे वर्णन आहे. नर्मदा ही गंगेची ज्येष्ठ भगिनी मानली जाते, तर पुराणकथानुसार ती नागांची बहीण आहे. तिची स्तुती करून मनापासून स्मरण करणाऱ्याला सर्पविषाचे भय राहणार नाही, असे गंगावचन आहे. बहुतेक नद्या या सवाष्ण सम जल्या जातात, खणानारळाने त्यांची ओटी भरतात. परंतु नर्मदा ही एकमेव कुमारिका मानली जाते. त्याविषयीच्या कथा पुराणात आहेत. ही एकमेव नदी आहे, जिची परिक्रमा केली जाते आणि जिच्याकाठी चारशे तीर्थस्थाने आहेत. तिचं पावित्र्य असे की तिच्या प्रवाहातील दगड शिवरूप समजला जातो.

गोदावरीचा त्र्यंबकेश्वर ते राजमहेंद्री हा प्रवास रामकथेची निगडित आहे. तर कृष्णा ही महाराष्ट्राची लडिवाळ कन्या आहे. कावेरी, सिंधू, ब्रह्मपुत्रा यांचीही माहिती या संग्रहात आहे. ही माहिती संदर्भग्रंथांच्या, नकाशांच्या आणि फोटोच्या आधाराने परिपूर्ण आहे. त्यामुळे आलेले तपशील हे अधिकृत आणि संशोधनावर आधारलेले आहेत.

निलेश जाधव यांनी सजवलेले मुखपृष्ठ सुंदरच. मंदिराच्या कळसाचे प्रतिबिंब पाण्यात पडलेले असून त्यात जलदेवतेची शिल्पप्रतिमा साकारलेली दाखवलेली आहे. नदीला देवीच्या रूपात मानल्या जाणाऱ्या संस्कृतीचे हे प्रतीक उठावदारपणे दाखवून 'जलसूक्त'ची समर्पकता अधोरेखित केली आहे.


**मूल्य २५० रु. • सवलतीत १५० रु.**



# ग्रंथपान

**सोलमेट**

**अर्चना गाडेकर शंभरकर**




'आकाशात उंच उडणाऱ्या पतंगाने हे विसरून चालणार नाही की, कुणीतरी त्याची दोरी घट्ट धरून ठेवलेली आहे, कुणी दुसरी दोरी त्याला जमिनीवर कोसळण्यास भाग पाडू शकते. ही दोरी संस्काराची असू शकते, जी नात्याला खंबीरपणे धरून ठेवते आणि कितीही उंच गेलो तरी जमिनीशी असलेले नाते सोडू देत नाही.' पतंगोत्सवाच्या प्रसंगात सहजपणे पतंगाची दोरी आणि संस्कारांची तुलना वाचताना जरा थबकलोच. लेखनात अशा तऱ्हेचे मंथन व्यक्त होते तेव्हा ते लेखकाच्या पुढच्या लेखन प्रवासातील यशाची नांदी ठरते. पुस्तकरूपाने आलेले हे पहिलेच लेखन असूनही आश्वासक असे काही यात आहे, हे तिथेच लक्षात आले.

जीवनात घडणाऱ्या प्रसंगांना सामोरे जाणे अपरिहार्य असते. परंतु त्याही परिस्थितीत आपण त्याच्याकडे पाहतो कसे, बोध कोणता घेतो, हेही महत्त्वाचे ठरते. भूतकाळात काय घडले, भविष्यात काय घडणार, यापेक्षा वर्तमानकाळात घडणाऱ्या घटनांना समजून घेणं महत्त्वाचे आहे. आपल्या आजूबाजूच्या माणसांना गृहीत धरण्यापेक्षा त्यांची कदर करायला हवी. आणि जेव्हा जे वाटते ते तेव्हाच करून घ्यायचे, आयुष्य तुम्हाला पुन्हा संधी देत नाही. हे विचार देखील असेच, लेखिकेचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन दाखविणारे.


'सोलमेट' ही म्हटली तर एक प्रेमकहाणी आहे, म्हटले तर आपल्या भोवतालच्या परिस्थितीचे चित्रण आहे. कथानकाच्या जोडीने भवताल हातात हात धरून चालतो तेव्हा ते लेखन समग्रतेचे दर्शन घडवणारे ठरते. त्याचा अनुभव हे लेखन देते. ही प्रेमकहाणी अनु आणि श्री यांच्यातील असून ती चिरागशी येऊन थांबते. या प्रेमकहाणीत असलेल्या व्यक्तिरेखा म्हणजे अनु ऊर्फ अनन्या, जी स्वतःच निवेदकाच्या रूपात आपल्यासमोर येते. श्रीनिवास तिचा प्रियकर, कुलदीप, रिया, डॉ. मुस्तफा, जिग्नेश, सोनी, आई आणि इतरजण. या सगळ्यांची स्वतःची खास वैशिष्ट्ये आहेत. जगण्याचा, जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा स्वतंत्र दृष्टिकोन आहे, तसा एक नितळपणा त्यांच्यात मिनलेला दिसतो. ज्यामुळे एक प्रसन्न आणि भावनांची कदर असलेले विश्व उभे राहिले आहे. परंतु माणसांचे वागणे तसे निसर्गाचे वागणे, विज्ञानाची किमया कथानकाच्या वातावरणात स्वतःचे रंग भरतात आणि जे घडत जाते त्यावर विश्वास ठेवणे अवघड होत जाते.


कांदबरीची जडणघडण होते ती गुजरातच्या भूमीत. सगळ्या जगाला अंहिसेचा संदेश देणाऱ्या महात्मा गांधींच्या प्रदेशात १९६० ते १९६९ या काळात येथे २९३८ दंगे झाले होते. १९८५ मध्येही दंगे झाले होते. त्यानंतर झालेला भूकंप आणि गोध्राकांड. पैकी गोध्राकांड आणि भूकंप यांची पार्श्वभूमी कथानकाचा एक भाग, नव्हे अभिन्न भाग ठरले आहेत. ते कथानकाची दिशा बदलून टाकते, नव्हे माणसाच्या वागण्याचे संदर्भही बदलून टाकते. ज्याच्या मुळाशी एक सूत्र विसावलेले आहे, 'प्रतिकारच करायचा नाही, धडा शिकवायचा.' यातील अनेक संदर्भ आपणास प्रसारमाध्यमातून कळलेली आहेत. परंतु नेमकेपणाने कथानकाशी जुळणारे संदर्भ संयतपणे मांडल्यामुळे यातील आशय थेट येऊन भिडतो. कथानकातील ताण अधिक तीव्र होतो. जुळत आलेले ध्रुव दोन दिशांना फेकले जातात. या घटना जीवन बदलून टाकतात. तीच गोष्ट येथील उत्तरायण –पतंगोत्सवाची आणि गरबाची. हे दोन्ही खेळ उत्सवासारखे खेळले जातात. संस्कृती म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. यातील गंमत, आनंद आणि उत्कटता यांचीही गुंफण कथानकात कलात्मकपणे केलेली आहे.

नात्यातील वीण आणि स्वभावांचे बारकावे, यामुळे व्यक्तिरेखा सजीवपणे साकार झालेल्या दिसतात. श्रीनिवास, कुलदीप, डॉ. मुस्तफा यांच्यातले माणूसपण, प्रेम, जिव्हाळा जितका तरल आहे तितकीच निवेदक म्हणून असलेली अनु स्वतः विषयी उत्कटपणे समोर येते. सोनीचे स्वतःचे निर्णय हे स्वतःसाठीचे आहेत. रियाचे जगणे वेगळे आहे. आईच्या संस्काराशी घट्ट नाते असलेल्या अनुला हे जग वेगळे भासते. ते तिच्या वागण्यातून स्पष्ट होत जाते. तरी त्याविषयी कुठला द्वेष वा असूया नाही. एक समज असलेली व्यक्तिरेखा म्हणूनच तिचा वावर दिसतो. सारे कथानक ती स्वतः निवेदनातून मांडत जाते, स्वतःला केंद्रस्थानी न ठेवता तटस्थपणे इतरांकडे पाहते. त्यामुळे कहाणी एका तरुणीची आहे, तरी ती इतरांचे दर्शन समग्रपणे घडवीत जाते.

लेखनाला गती आहे. भावनांची स्पंदने अलगदपणे टिपलेली आहेत. अभिराम भडकमकर आणि सुरेश द्वादशीवार यांच्या प्रस्तावनेत या विषयी अधिक मनोज्ञपणे विचार व्यक्त झालेले आहे. सतीश भावसार यांनी मुखपृष्ठ सजवलेले आहे. बहरलेल्या वृक्षाच्या कुशीत दोन पक्षी कुंजन करीत असल्याचे दाखविले आहे. सफल प्रेमाचे बहुरंगी साक्ष देणारे मुखपृष्ठ उत्कृष्ट झाले आहे.

**मूल्य १५० रु. • सवलतीत ९० रु.**





मुंबई मराठी साहित्य संघाच्या वतीने कै. मनुकाका पंडित स्मृतिप्रतिष्ठान तर्फे दिला जाणारा पुरस्कार स्वीकारताना सुदेश हिंगलासपूरकर

हस्ते ज्येष्ठ साहित्यिक

आणि

मुंबई मराठी संघाचे अध्यक्ष

मधु मंगेश कर्णिक




अशोक बेंडखळे लिखित 'आठवणीतले गाव' पुस्तक प्रकाशनसमयी

माधवी कुंटे

सुहास बहुलकर

लेखक अशोक बेंडखळे

आणि

माधव राजवाडे






महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोशांच्या २० खंडांची 'पेन ड्राईव्ह आवृत्ती' नुकतीच प्रसिद्ध करण्यात आली आहे. या आवृत्तीचे वितरण ग्रंथाली आणि बुकगंगा मार्फत करण्यात येणार आहे. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या सोहळ्यामध्ये, संस्कृती मंडळाचे अध्यक्ष बाबा भांड, बुकगंगाचे मंदार जोगळेकर, आमदार राज पुरोहित, विश्वकोश निर्मिती मंडळाचे दिलीप करंबेळकर, ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर, मराठी भाषा विभागाचे प्रधान सचिव भूषण गगराणी आणि महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या सचिव सुवर्णा पवार

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2016 -2018
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, बुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.